मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजकृत सूक्तिरत्नावली त्रयोदश यष्टी

सुखवर सुधा

तरंगिणी भाष्य

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

॥ मंगलाचरण ॥

श्री ज्ञानेश्वरचरणरज बार बार सिरधारी ॥
जगमतभेदसु (१) भीतबति(२) करूहुं बिनति बिचारि (३)॥

श्रीगुलाबरावमहाराजांच्या शिष्यपंचकातील श्री भाऊसाहेबजी खापरे यांनी स्वाध्यायार्थ लिहिलेल्या टीपा

माता मे पंचलतिका वासुदेवः पिता मम ।
मातामहश्च ज्ञानेशो भ्राता नारायणस्तथा ॥
उमा महेश्वरावाद्यौ मम वंशधरावुभौ ।
कुर्वन्तु मंगलं सर्वे चिदानंदस्वरूपिणः ।

मातेच्या (पंचलतिका - ज्ञानेश्वरकन्या श्री गुलाबराव महाराज) चरणाचे स्मरण परंपरेने तरी व्हावे म्हणून मातेच्या ''सुखवर सुधा'' नामक ग्रंथाचा (स्वाध्याय) विचार करतो.

मंगलाचरणाचा अर्थ - श्री ज्ञानेश्वर चरणरज - श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणांची रजधुळ पुन्हा पुन्हा मस्तकावर धारण करून (१) 'जगमतभेणदसु' - जगांतील मतभेदाविषयी (२) भीतबती - भीती धारण करणारी मी (ग्रंथकर्ती) (३) बिचारी - दीन किंवा विचार पूर्वक 'बिनति करहुं' - विनंती करते ॥१॥

॥ तरंगिणी ॥ (४)

ज्ञानेश्वर पग नमन करी सुखसमझावनहेत (५) ।
मेरे बिनति ग्रंथ को मै हि तिलक(६)करी देत ॥१॥

तरंगिणीचा अर्थ - (४) तरंगिणी - स्वतःच्या सुखवरसुधा या मूळ

ग्रंथावर स्वतःचीच (महाराजांची) 'तरंगिणी' नामक टीका. / ज्ञानेश्वर पग नमनकरी- श्री ज्ञानेश्वर महाराजांचे चरणाला नमन करून माझा ग्रंथ (५) सुखाने - सहज - समजावा म्हणून मीच आपल्या सुखवरसुधा ह्या विनंतीरूप ग्रंथाला (६) तिलक - टीका (ग्रंथ भाष्य) करून देते.

निर्विघ्न ग्रंथसमाप्ति व्हावी म्हणून व निर्विघ्न संप्रदाय चालावा म्हणून हें मंगल केलें आहे.

''आदिमध्यान्तमंगलानि शास्त्राणि प्रथन्ते''

या वचनाला अनुसरून मुळांत 'बार बार' असें पद घातलें आहे. अदृष्ट अनंत असल्यामुळें विघ्नेंही अनंत आहेत म्हणून कोणत्याही वेळीं ह्याची निवृत्ति व्हावी याकरितां सद्गुरुस्मरणावांचून दुसरा उपाय नाहीं, म्हणून 'बार बार सिरधारि' हें पद घालतें आहे.

ग्रंथनिर्देशकारण

आतां ग्रंथनिर्देशकारण सांगतों :-

एकाच प्रस्थानत्रयावर ज्याप्रमाणें अनेक आचार्यांच्या मतभेदानें भाष्य झालें आहे किंवा वारकरी पंथात तुकारामांकडचे लोक एकनाथांचा अभंग व एकनाथांकडचे लोक तुकारामांचा अभंग म्हणत नाहींत, असा परस्पर द्वेष दाखविण्यांत येतो. किंवा कबीरमतांत हंसकबीर व रामकबीर, सत्नाबी कबीर अशीं नानाप्रकारचीं मतें झालीं आहेत. (य१३.१) त्याचप्रमाणें नानकमतातही दोन प्रकारची मतें होत आहेत. तसें माझ्याही मतांत विवादानें असाच मतभेद होण्याचा संभव आहे कीं काय अशी भीति वाटून हा ग्रंथ करितों.

प्रश्न - अहो पण शांकरवेदान्तमतांत १८२ मतें आहेत. त्या सर्वांची सहनशीलता -

''यया यया भवेत्पुंसां व्युत्पत्तिः प्रत्यगात्मनि ।
सा सैव प्रक्रीयेह (७) स्यात्साध्वी सा चानवस्थितिः ॥''

ह्या वचनानें सुरेश्वराचार्याने दाखविली आहे. मग तुम्हीच

मतभेदसहनशील कां होत नाही ?

उत्तर - मी मतभेदसहनशील न होण्याचें कारण निराळें आहे.

एक सिद्धान्तावच्छिन्न [८] भिन्नप्रक्रियात्मक मतभेदांची मी सहनशीलता धारण करतो. पण एक संप्रदाय असून विरुद्धाचरणमतभेद[९] व भिन्नसिद्धान्तावच्छिन्न [१०] भिन्नप्रक्रिये संबंधी मतभेद यांची सहनशीलता अनिर्णीत[११]-प्राप्ति-दोषास्तव धारण करीत नाहीं - म्हणून भिन्न सिद्धान्त धारण करून भिन्न प्रक्रिया काढणारे माझ्या मतांत उत्पन्न होऊं नयेत म्हणून विनंति करावीशी वाटते.

---

७. प्रकृतीहस्यात्?- ह्या जागी 'प्रक्रियेहस्यात्' असा पाठ इतरत्र दिसतो. येथील पाठ लेखन करणाऱ्याच्या चुकीने असावा.

८. एक सिद्धान्तावच्छिन्न भिन्न प्रक्रियात्मक मतभेद - एकाच सिद्धांताने मर्यादित अशा भिन्न प्रक्रियेविषयी मतभेद. ज्यात मूल (मूळ) सिद्धांताविषयी मतभेद नसून प्रक्रियेविषयी मतभेद आहेत, असे मतभेद.

९. विरुद्धाचरणमतभेद - एकाच संप्रदायांत परस्पर विरुद्ध आचरणाविषयी मतभेद.

१०. भिन्न सिद्धान्तावच्छिन्न मतभेद - भिन्न सिद्धान्तांनी मर्यादित ज्या भिन्न प्रक्रिया त्याविषयी मतभेद.

११. अनिर्णितप्राप्तिदोषास्तव - अनिर्णित पदार्थांची प्राप्ति हा जो दोष त्यासाठी.

दोहा

बिनवूं सज्जनचरणनख यह वर दीजे मोय ।
भिन्न अरथ मम बानिको स्वमत न कीजे कोय ॥२॥

दोहा (२) चा अर्थ -सज्जनांच्या चरणाला माझी हीच विनंती आहे की माझ्या वाणीचा आपल्याच मतानुसार भिन्न अर्थ कोणी करू नये एवढा मला वर द्यावा. ॥२॥

१२. उपसर्पणादिकेकरून - (गुरूकडे हात जोडून उपदेशासाठी जाणे.)

शूद्र योनीमध्यें जन्म असल्यामुळे उपसर्पणादिकें [१२] करून

मला कोणाला उपदेश करण्याचा अधिकार नाहीं, अथवा आमच्या या संप्रदायांत शिष्यानें जरी गुरूला वरिष्ठ मानावें असे आहे तरी गुरूनें शिष्याला नीच मानावें असा विधि नाही. याला -

''शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवा सारिखें ॥
त्याचा फळे उपदेश । आणिकां दोष उफराटे ॥''

हें तुकारामांचें वचन प्रमाण आहे. पुनः मजकडून माधूर्यसंप्रदाय शिकणाऱ्या सर्वांना मला बहिणी समजणें प्राप्त असल्यामुळें मला विनंति करून याचना करणेंच उचित आहे; आज्ञा देणें उचित नाहीं. आतां विनंतीला मान दिलाच पाहिजे असा आग्रह करण्याचा जरी अधिकार नाही तरी कल्पतरूचे ठिकाणी याचना निष्फळ होणार नाहीं असे वाटून **''यह वर दीजे मोय''** हें पद उच्चारलें आहे. आणि माझी याचना विशेषें करून निष्फळ होणार नाहीं हें **''मोरे हित सबही चाहत''** इत्यादि पदानें पुढें सांगणार आहें. (य१३.२)

आतां जो वर मागितला आहे त्याचा नामनिर्देश करितों.

आपल्या मतानें माझ्या मताचा भिन्न अर्थ कोणी करूं नये हाच वर मला पाहिजे.

जसा नानकपंथामध्यें **'गोपाळ तूं आपले चरण दाखीव'** इत्यादिक वाक्यें असूनही मूर्तिपूजाखंडणपर त्या मताचा कांहीं दुराग्रही लोक असा अर्थ करितात-

''मै न गणेश प्रथम नमाऊ । कृष्ण विष्णु कबहूं नहि गाऊं ॥''

या वचनावरून कबीर हिंदू नव्हते व सिख हिंदू नाहींत असा कांहीं सिखांचा दुराग्रह आहे परंतु हिंदूचा मुख्य मूळ मंत्र जो ॐ कार तो नानक महाराजांच्या हृदयाचा मुख्य मंत्र होता हें ते बिचारे विसरतात.

पुनः ॐकार उपदेशाची जशी परंपरा आहे तशी बिष्मअल्ला उपदेश करण्याची परंपरा नाहीं. कबीरमतांतही तोच प्रकार पुष्कळ झालेला आहे. तसें माझ्या मतांत होऊं नये म्हणून मी अर्थ लिहून

ठेवल्याविरुद्ध किंवा सिद्धान्त निराळा काढून प्रक्रिया निराळी असा अर्थ माझ्या वाणीचा कोणी काढूं नये.

माझ्या संप्रदायाचे रक्षक तात व राधापति असल्यामुळे मी कोणावर रक्षणाची भिस्तही घालीत नाहीं. ज्यांनीं मला हा संप्रदाय दिला तेच त्याचें रक्षण करतील. उगीच कोणी कोणाला भलतेंच शिकवूं नये;

- असा मजजवळ राहणाऱ्या व इतर सर्व महात्म्यांना हात जोडून वर मागतों.

माझ्यापासून केलेल्या अध्ययनपरंपरेवाचून पूर्वींच ठरविलेल्या आपल्या मताला अनुकूल एकादें वाक्य मिळाल्यास किंवा एकादें आपलें अव्यक्त मत माझ्या एकाद्या वाक्यानें दृढ होत असल्यास- तेच तेवढे वाक्य घेऊन- सरसकट माझ्या वाणीचा कोणी अर्थ करूं नये.

जसे, भक्तिपदतीर्थामृतांत प्रथम अध्यायांत मी **स्वप्नेश्वरमताचा अनुवाद** केला असून पुढील अध्यायांत त्याची उपेक्षा व किंचित् खंडणही केलें आहे. तथापि प्रथम अध्यायांतील वाक्य अंमळ स्पष्ट असल्यामुळें मी स्वप्नेश्वरमताचा होतो असा माझ्या वाणीचा आपल्या मतानुसार अर्थ ओढूं नये.

या उदाहरणावरून आणखी उदाहरणें जुळवून घ्यावींत. इतकेंही करून कोणी स्वतःच्या बुद्धीनें माझ्या वाणीचा विचारच करूं नये असें नाहीं, पण तो कोणत्या रीतीनें करावयाचा तो सांगतो. (य१३.३)

करें तो तैसा चहिये शांकरमत न विरोध ॥
अरु जीवत मुक्ति समे लहे सगुणपदबोध ॥३॥

दोहा ३ चा अर्थ - *माझ्या वाणीचा अर्थ करणेच असल्यास तो असा करावा की शांकरमताला विरोध येणार नाही आणि जीवन्मुक्तिमध्ये परमेश्वराच्या सगुणपदाचा बोध प्राप्त होईल. श्रीमच्छंकराचार्यांचेच अद्वैत मत मला मान्य आहे.*
फक्त जीवन्मुक्तीमध्ये त्या मतास बाध न येता सगुण भक्ति होऊं शकते हे जे त्यांनी स्पष्ट सांगितले नाही ते मी आपल्या ग्रंथांत स्पष्ट केले आहे असा भाव ॥३॥

केवलाद्वैताला शांकरमत म्हणतात. त्याचें कारण शिवानें सांगितलें

म्हणून व शंकराचार्यांनी सांगितलें म्हणून. या **केवलाद्वैताला विरोध येणार नाहीं अशा रीतीनें माझ्या वचनाचा अर्थ करावा.**

शंकरानंदानें जसें ज्ञानोत्तरभक्तीची अपेक्षा नाहीं असें सांगितलें आहे त्याप्रमाणें माझ्या वचनाला समजूं नये; तर जीवनमुक्तीत भगवद्भक्ति राहते हा निश्चय असूं द्यावा.

प्रश्न - अहो, पण शंकराचार्यांनी षट्पदी आदि स्तोत्रांत ज्ञानोत्तर भक्ति सांगितली आहेच. मग शांकरमतविरोधी अर्थ करूं नये व जीवन्मुक्तींत भक्ति राहावी असा अर्थ करावा, अशी पुनरुक्ति सांगण्याचे कारण काय?

उत्तर - श्रीमच्छंकराचार्यांनी भगवच्छरीराला **मायासंपादित** (१३) असें स्पष्ट म्हटलें असून **मायावच्छेदसंपादित** (१४) असे आशयानें दाखविलें तरी स्पष्ट दाखविलें नाहीं. त्या आशयालाच **अनध्यस्तविवर्तत्व** आणून लक्षणानें स्पष्ट केलें आहे. एवढ्याकरितां तेंच अद्वैत मधुर झालें आहे असें मी म्हणतो. मंगल चतुष्टयी व्याख्यानामध्यें **(उच्छिष्टपुष्टिलेश)**(१५) या मधुराद्वैताचें लक्षण केलें आहे तें पहावें.

---

१३. मायासंपादित - 'माया' ह्या निमित्त कारणाने घडवून आणलेले. ह्यांत भगवंताच्या विग्रहाला मायेचा परिणाम म्हटले नाही हे स्पष्टच आहे. (टीपा.पा.२) पण निमित्त कारणामुळे मायेच्या कर्तृत्वाचा थोडासा भास होतो. तथापि ''मायेच्या अपेक्षेने संपादित'' असा त्याचा आशय आहे पण तो आशय स्पष्ट नाही. 'मायेची अपेक्षा' हेच निमित्त.
१४. मायावच्छेद संपादित - मायारूप जो अवच्छेद त्याने संपादित म्हणजे अवच्छिन्न, मर्यादित जे चैतन्य तेच भगवच्छरीर. मायेच्या अपेक्षेने असणारे जे चैतन्य ते.
१५. ''उच्छिष्ट पुष्टिलेश'' - श्रीधरांनी (श्रीभागवताचे संस्कृत भाष्यकार) चार श्लोकांनी जे भागवताचे टीकेस मंगल केले त्यावरील व्याख्यारूप असलेला श्री महाराजांचा संस्कृतग्रंथ. हा ग्रंथ यष्टि १६ (संस्कृतरचना) या मध्ये मुद्रित आहे.

अन्याचारजभावना शांकरगुरुको ग्यान ।

मम अनुभव अरु योजनाचारो पूर्वप्रमाण ॥४॥

दोहा ४ चा अर्थ - (१) श्रीगुरु शंकराचार्यांचे ज्ञान, (२) त्यांच्याहून इतर काही आचार्यांच्या भावना, (३) हे ज्ञान व भावना यांची मी केलेली योजना, आणि (४) माझा स्वतःचा अनुभव; मी आपल्या ग्रंथात दिला आहे. ह्या चाऱ्हींना पूर्वीचे प्रमाण आहे. ॥४॥

आचार्य म्हणजे ज्यांनी वेदानुसार धर्म स्थापन केला आहे ते, किंवा प्रस्थानत्रयावर ज्यांनीं भाष्य केलें आहे ते. म्हणजे श्रीमद्भगवत्पूज्यपादाचार्य, वल्लभाचार्य, श्रीनिंबाकाचार्य, कृष्णचैतन्याचार्य, विज्ञानभिक्ष्वाचार्य, श्रीकंठाचार्य, भास्कराचार्य, रामानुजाचार्य, यादवप्रकाशाचार्य, अभिनवगुप्ताचार्य, मध्वाचार्य, हे होत. त्याचप्रमाणें तंत्रस्थापकही नकुलीशाचार्य, वसुगुप्ताचार्य, अभिनवगुप्ताचार्य, शाक्त इत्यादि आहेत.

- त्यांत **''ज्ञान''** श्रीमच्छंकाराचार्यांच्या मताप्रमाणें मला इष्ट आहे. आतां अन्य जे आचार्य त्यापासून घेतलेली **''भावना''** मला इष्ट आहे. आतां कोण्या आचार्यापासून कोणती भावना घेतली आहे त्याचें थोडक्यात निदर्शन करितो. (य१३.४)

प्रश्न - अहो अन्य आचार्य म्हटल्यानें सर्वच आचार्यांपासून भावना कां होत नाहीं ?

उत्तर - दुसऱ्या ग्रंथावर टीका करीत असतांना दुसऱ्याचा आशय धरून चालावें लागतें. या टीकेंत मी आपलाच आशय स्पष्ट करीत असल्यामुळे अन्य शब्दांचा अर्थ मला इष्ट तेवढाच करण्यामधे मला कोणताही प्रतिबंध नाहीं. शिवाय जो मत्कृत मूळ मानतो तो मत्कृत टीकाही मानीलच.

अधिकारप्रकरणांत जसा त्रैवर्णिक शब्दाचा संकोच करतां येतो तसा मीही येथें अन्य शब्दाच्या अर्थाचा संकोच करितों.

प्रथम भावना घ्यावयाची असल्यास विष्णुस्वामीसंप्रदायांतील आचार्यांची मला संमत आहे. कारण तात स्वतः आपण ज्ञानेश्वरीत व

४

अमृतानुभवांत नाथसंप्रदायी व शांकरमताचे आहों असें सांगतात व नाभामहाराज त्यांना ते विष्णुस्वामीसंप्रदायी आहेत असे सांगतात. तातांचे वाक्य हें आहे -

क्षीरसिंधुपरिसरी । शक्तीच्या कर्णकुहरीं ।
नेणों कैं श्रीत्रिपुरारी । सांगितलें जें ॥१७५२॥
तें क्षीरकल्लोळा आंत । मकरोदरीं गुप्त ।
होता तयाचा हात । पैठें झालें ॥१७५३॥
तो मत्स्येंद्र सप्तशृंगी । भग्नावयवा चौरंगी ।
भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण झाला ॥१७५४॥
मग समाधि अव्यत्यया । भोगावी वासना या ।
ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनी ॥१७५५॥
तेणें योगाब्जिनी सरोवर । विषयविध्वंसैकवीर ।
तिये पदीं कां सर्वेश्वर । अभिषेकिले ॥१७५६॥
मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव ।
संपादिलें सप्रभव । श्रीगैनीनाथा ॥१७५७॥
तेणें कळकळित भूता । आला देखोनि निरुता ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥१७५८॥
ना आदिगुरुशंकरा । लागोनि शिष्यपरंपरा ।
बोधाचा हा संसरा । जाला जो आमुतें ॥१७५९॥ ज्ञाने.अ.१८

नाभाजीचें [१६] वाक्य येणेंप्रमाणें :-

विष्णुस्वामिसंप्रदाइ दृढ ज्ञानदेव गंभीर मति ।
नाम तिलोचन शिष्य सूर शशिसदृश उजागर ।
गिरा गंग उन हारि काव्यरचना प्रेमाकर ।
आचारज हरिदास अतुलबल आनंददायिन ।
तिही मारग वल्लभ विदितप्रभुपद्धतिपराइन ।
नवधा प्रधानसेवासुदृढ मनवचक्रमहरिचरनरति ।
विष्णुस्वामिसंप्रदाइ दृढ ज्ञानदेव गंभीरमति ॥

४८ कबित्त [१७]

विष्णुस्वामिसंप्रदाइ बडोई गंभीरमति ज्ञानदेव नाम ताकी बात सुनि लीजिये । (य१३.५) पिता ग्रह त्यागि आई ग्रहन संन्यास कियो दियो बोल झूट तिया नहि गुरु कीजीये । आई सुनि वधू पाछे कह्यो जान्यो मिथ्यावाद भुजनि पकरि मेरे संग करी दीजिये । ल्यायसो लिवाय जाय अतिही रिसाय दीयो पातिमे तेडारी रहे दूरि नहि छीजिये ॥१७८॥

भये पुत्र तिन तामे मुख्य बडो ज्ञानदेव जाकी कृष्णदेवजुसों हियकी सचाई है । वेद न पठावे कोऊ कहे सब ज्ञाति गई, लई करी सभा अहो कहा मन आई है । विनसो ब्रह्मत्व कही श्रुतिअधिकार नाही, बोल्यो यो निहारी पढे भैसा ले दिखाई है । देखि भक्ति भाव चाव भयो आनि गहे पाव कियोई सुभाव वहीगही दीनताई है ॥१७९॥

---

१६. नाभाजीचे वाक्याचा अर्थ - विष्णुस्वामी.

दृढ व गंभीरमति असलेले ज्ञानदेव विष्णुस्वामी संप्रदायाचे होते. हे त्रिलोचनाचे (शंकराचे) शिष्य असून चंद्र व सूर्य ह्यांच्या सारखे प्रकाशमान होते. त्यांची वाणी गंगेसारखी असून रचना प्रेममय होती. हे स्वतः आचार्य, हरिदास, अतुळबळ आणि आनंद देणारे होते. त्याच मार्गात प्रसिद्ध ईश्वर भक्ति परायण वल्लभादि होऊन गेले. त्यांची नवविधा भक्ति असून त्यांत दृढ सेवा, मन वाचा व कर्म ह्यांचे योगाने हरि चरणावर प्रीति ठेवणे हे मुख्य आहे.

१७. नाभाजीचे शिष्य प्रियादास यांचे कवित्त ४८ चा अर्थ -

विष्णुस्वामी संप्रदायांत फार गंभीरमति असे ज्ञानदेव होऊन गेले. त्यांचे विषयी माहिती ऐकून घ्या. त्यांचे वडिलाने गृहत्याग करून संन्यास ग्रहण केला. आणि खोटेच सांगून दिले की मला (तिया) स्त्री नाही, आपण माझे गुरु व्हा. ते ऐकून त्यांचे मागे त्यांची स्त्री आली. त्या स्त्रियेचे सांगण्यावरून सर्व खोटे प्रगट झाले. तिने ह्यांना माझ्या बरोबर पाठवून द्या अशी विनंती केली. आणले असेल तो घेऊन जाईल असे स्वामी फार क्रोधाने बोलले, (पतिमेते डारी) । दूर राहणे शोभत नाही. त्यांना जी मुले झालीत त्यांत ज्ञानदेव अतिशय मुख्य होते. त्यांचा कृष्णदेवाशी अंतःकरणपूर्वक प्रेम आहे. ब्राह्मणांनी ''तुम्हाला ब्राह्मणत्वावाचून श्रुतिपठणाचा कधीच अधिकार नाही'' असे ज्ञानदेवांना म्हटले. हे ऐकून ज्ञानदेवांनी रेड्याकडे पाहिले असतां तो रेडा वेद उच्चारण करू लागला. त्यांचा भक्तिभाव

५

पाहून आश्चर्याने चकीत होऊन ब्राह्मणांनी शुद्ध अंतःकरणाने व दीन होऊन ज्ञानदेवांचे प्रेमाने पाय धरले.

या दोन्ही वचनांत तात हे विष्णुस्वामिसंप्रदायी होते हे स्पष्ट आहे. या परस्परविरोधी वचनांचा समन्वय करणें अतिशय कठीण आहे, कारण तात अप्रमाण असतील अशी शंकाही घेता येणें शक्य नाहीं व नाभाजीलाही अप्रमाण म्हणण्याला जरा बुद्धि कचरते; कारण महीपतिराय महाराजांनीं भक्तविजय, संतलीलामृत ग्रंथांत असें म्हणून ठेवलें आहे कीं 'मी संतांची चरित्रें नाभाजीकृत भक्तमालेवरून लिहीत आहें.'

यद्यपि तातांच्या प्रत्यक्ष वचनापुढें आम्हाला नाभाजीची मातब्बरी नाहीं, तरी एकाद्या दृष्टीनें समन्वय झाला तर उगीच विरोध करण्याचें प्रयोजन नाहीं. म्हणून असा **समन्वय** करतां येतो कीं — योगवासिष्ठांतील मुमुक्षुप्रकरणांत सांगितलेल्या व्यासांच्या ३२ आकाराप्रमाणेंच उभयविग्रहवान् तात हे शांकरज्ञानाचें मूळ स्थान होऊन विष्णुस्वामिसंप्रदायांतील भावनेला उत्तेजक होते असें नाभाजीच्या शब्दावरून अनुमान केलें असतां चुकी होण्याचा संभव नाहीं. म्हणून *वल्लभाचार्यांतून भावना घेणे मला अनिष्ट वाटत नाही.

परंतु शांकरमतविरोधी नसल्यास शुद्धाद्वैतांत व केवलाद्वैतांत पुष्कळ अंशाचाच मेळ आहे.

*राधावल्लभ व *चैतन्यसंप्रदायांतीलहि भावना विरोधी नसल्यामुळे मी स्वीकारल्या आहेत. ज्या सिद्धान्तविरोधी आहेत त्या गृहीत नाहींत याविषयीं कांहीं सांगणें नको.

*श्रीकंठअपय्यादीक्षित यांची शैवी भावना हीही ग्रहण केली आहे कारण तातांनींही गाथ्यादिकांत विष्णुस्तुति व अमृतानुभवांत शिवस्तुति केलेली आढळते.

याप्रमाणें *प्रत्यभिज्ञाचार्यांच्याही कांही भावना घेतल्या आहेत.

याप्रमाणें आणखी आचार्यांच्याही युक्त भावना घेतल्या असून

बाकीच्यांचा परित्याग केला आहे. (य१३.६)

कोणत्या आचार्यापासून कोणती भावना घेतली आहे हें मी **'कुसममधु'** ग्रंथाच्या 'सुरुची' नामक टीकेंत सांगेन. *(सुरुची टीका उपलब्ध नाही)*

प्रश्न - तर मग तुम्ही इतर आचार्यांच्या भावना व शांकरमताचें ज्ञान मिळून आपला एक पंथ काढला कीं काय ?

उत्तर - नाहीं, तातांनी अनुग्रह दिल्याप्रमाणें अनुभव घेऊन, उगीच धर्माधर्मामध्यें द्वेष वाढूं नये म्हणून, शांकरमताचें ज्ञान व इतर मतांच्या भावना यांची योजना मात्र केली आहे व मी आपला अनुभवही वर्णन केला आहे. अथवा या चारही गोष्टींला पूर्वप्रमाण आहे.

*शांकरमताचें ज्ञान योगवासिष्ठ व सूतसंहितेंत सांगून ठेवलेलें आहे.

*ज्ञानोत्तर शिवभक्ति सूतसंहितेंत सांगितली असून *ज्ञानोत्तर कृष्णभक्ति भागवतांत सांगितली आहे.

पुनः भक्ताचें चरित्र वर्णन करण्याविषयीं परसंप्रदायानींही द्वेष ठेवला नाहीं. जसें - राधावल्लभ मतांत नामदेव, कबीर वगैरेच्या स्तुतींची पदें आहेत.त्याप्रमाणे महीपतीराय शांकरमताचे असूनही त्यांनी इतर मतांच्या भक्तांचे वर्णन केलें आहे.

संप्रदायासंबंधाची योजना पुष्पदंताचार्यांनीं पूर्वीच सांगून ठेवली आहे.

''त्रयी सांख्यं योगं पशुपतिमतं वैष्णवमिति ।
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमतः पथ्यमिति च ॥
रुचीनां वैचित्र्याद् ऋजुकुटिलनानापथजुषाम् ।
नृणामेको गम्यस्तवमसि पयसामर्णवमिव ॥७॥ शिवमहिम्नस्तोत्र

याप्रमाणें पूर्वीच सर्व होऊन गेले असून इतर आचार्यांच्या भावनेविषयींही नारद, शांडिल्य, गर्ग, वसिष्ठ, यांनीं आपआपल्या सूत्रांत व संहितेंत आणि स्वप्रेश्वरादिकांनीं आपआपल्या भाष्यांत पूर्वीच सांगून

६

ठेवलेलें आहे. माझा अनुभव पूर्वी तातादिकानींही स्पष्ट केलाच आहे. मीही बाळपणापासून व तातानुग्रहापासून त्याची रुची घेत आहें ह्मणून या चारही गोष्टी ज्या रीतीनें मांडल्या आहेत त्या रीतीनें प्रमाण आहेत.

शांकरमतांतील जीं वचनें ***पद्यग्रंथांत, *गद्यांत** किंवा ***सन्निहितगद्यांत** घेतलीं आहेत तींही प्रमाणच आहेत.

सर्वसमन्वय साधिये, यदि तुमसो नहि होत ॥
तों औरन को छांडिये, जे शंकर अरिगोत ॥५॥

दोहा ५ चा अर्थ - सर्व आचार्यांच्या मतांचा समन्वय करावा, जर तुम्हाला त्या सर्वांचा समन्वय करता आला नाही तर शंकराचार्यांचे जे शत्रु असतील ते व त्यांचे गोत (गोत्रज) ह्यांना सोडून द्यावे ॥५॥

म्हणून या सर्व आचार्यांचा समन्वय करावा असें मी म्हणतों. (य१३.७)

समन्वयाचे प्रकार

समन्वय तीन प्रकारचा आहे. **१.उत्तम २.मध्यम** आणि **३.अधम.**

१. मृगजलाच्या पूराचें पाहिजे तसे वर्णन करतां येतें तसें परमेश्वराच्या मायेचा स्वीकार करून कोणतेही प्रकारचें वर्णन करता येतें, असें दृढ समजणें हा **उत्तम समन्वय** होय. किंवा –

२. मांडुक्यकारिकेंतील अलातचक्रनिरुपणाप्रमाणें [१८] **उपजीव्यांचा** [१९] **अविरोध साधून शांकरसिद्धान्ताला उपजीवक** [२०] **करणें** हाही **उत्तम समन्वय**च म्हणावा.

३. जीवन्मुक्तांच्या मौनाचा [२१] साधक जो **उपेक्षारूप समन्वय** कीं - चार्वाकावांचून इतर सर्वांनांच यमनियमादिक मान्य असल्यामुळें विवाद कशाला करावा अशा स्वरूपानें असणारा **मध्यम** म्हणावा.

४. त्या त्या **मतांच्या पायऱ्या लावून शांकरमताला शिखरीभूत करणें** हाही मध्यमच होय.

५. कोणतेंही **प्रयोजन** मनामध्यें घेऊन समन्वय करणें **अधम**

समन्वय म्हणावा किंवा -

६. **ऐतिहासिक** दृष्टीनें समन्वयही **अधमच** होतो.

७. न लागणाऱ्या वाक्यांचा एकादा मुद्दाम उद्देश काढून समन्वय करणें याला **क्लिष्ट समन्वय** म्हणतात. हाही **अधमच** आहे. आणि

८. श्रद्धेच्या बलावर जैनमताप्रमाणें सिद्धान्ताविषयीं संशयात्मक विधान करणें तो **अधमाधम** आहे.

पैकीं उत्तम व मध्यम दोन समन्वयच मला मान्य आहेत. अधम-समन्वय मान्य नाहीं.

या दोन पैकीं कोणताही समन्वय करतां येणार नाहीं तर शांकरमताचें ग्रहण करून बाकीच्या मताचा परित्याग करावा. उगीच संशयग्रस्त होऊं नये अशी विनंती आहे.

७

---

१८. मांडुक्य कारिकेतील ''आलातचक्र'' निरूपण - (अलात शान्ति प्रकरण)

ऋजुवक्रादिकाभासमलात् स्पन्दितं यथा ।
ग्रहणग्राहकाभासं विज्ञानस्पन्दितं तथा ॥४७॥

अर्थ - ज्याप्रमाणे (अलाताचे) जळत्या कोलिताचे फिरणे, सरळ, वाकडे वगैरे आभास होतात त्याप्रमाणे ग्रहण व ग्राहक (विषय व विषयी) हे भास विज्ञानाचे स्फुरण आहे ॥४७॥

अस्पन्दमानमलातमनाभासमाजं यथा ।
अस्पन्दमानं विज्ञानमनाभासमजं तथा ॥४८॥

अर्थ - ज्याप्रमाणे स्पन्दनरहित अलात (कोलित) आभासरहित व अज (अचल) असते त्याप्रमाणे स्पन्दनरहित विज्ञान आभासशून्य व अचल असते ॥४८॥

अलाते स्पन्दमाने वै नाभासा अन्यतो भुवः ।
न ततोऽन्यत्र निस्पन्दान्नालातं प्रविशन्ति ते ॥४९॥

अर्थ - अलात फिरत असतांना जे आभास होतात ते दुसऱ्या कोण्या कारणाने (अलाताचे ठिकाणी येऊन) होत नाहीत, तसेच अलात स्पन्दरहित झाल्यावर ते आभास दुसरे कोठे जात नाहीत किंवा अलातांतहि प्रवेश करीत नाहीत. ॥४९॥

न निर्गता अलातात्ते द्रव्यत्वाभावयोगतः ।
विज्ञानेऽपि तथैव स्युराभासस्याविशेषतः ॥५०॥

अर्थ - आभासांचे ठिकाणी द्रव्यत्व नसल्यामुळे ते आभास अलातापासून निघत नाहीत. विज्ञानाच्या (जात्यादि) आभासात व त्या आभासांत काही फरक नसल्यामुळे विज्ञानाचे आभासहि तसेच असतात. ॥५०॥

विज्ञाने स्पन्दमाने वै नाभासा अन्यतो भुवः ।
न ततोऽन्यत्र निस्पन्दान्न विज्ञानं विशन्ति ते ॥५१॥
न निर्गतास्ते विज्ञानाद् द्रव्यत्वाभावयोगतः ।
कार्यकारणताभावाद्यतोऽचिन्त्याः सदैव ते ॥५२॥

अर्थ - विज्ञानाचे स्पन्दन होत असता त्याचे आभास दुसऱ्या कारणापासून होत नाहीत. त्याचे स्पन्दन बंद झाल्यावर ते आभास दुसरे कोठे जात नाहीत किंवा विज्ञानात प्रवेश करीत नाहीत. ॥५१॥

त्यांचे ठिकाणी द्रव्यत्वाचा अभाव असल्यामुळे विज्ञानापासून निघालेले नाहीत. त्यांच्यात कार्य-कारणतेचा अभाव असल्यामुळे ते आभास अचिन्तनीय आहेत ॥५२॥

द्रव्यं द्रव्यस्य हेतुः स्यादन्यदन्यस्य चैव हि ।
द्रव्यत्वमन्यभावो वा धर्माणां नोपपद्यते ॥५३॥

अर्थ - द्रव्याचे कारण द्रव्यच असते आणि तेहि अन्य द्रव्याचे अन्य द्रव्यच कारण असते. आत्म्यांचे ठिकाणी द्रव्यत्व किंवा अन्यत्व असूं शकत नाही. ॥५३॥

चित्तस्पन्दितमेवेदं ग्राह्यग्राहकवद् द्वयम् ।
चित्तं निर्विषयं नित्यमसङ्गं तेन कीर्तितम् ॥७२॥

अर्थ - हा सर्व ग्राह्य-ग्राहक भाव द्वैत चित्ताचेच स्फुरण होय (परमार्थतः) चित्त निर्विषय आहे. म्हणून ते नेहमी असंग म्हटले आहे ॥७२॥

१९. उपजीव्य - निर्वाहउपयोगी, आश्रयदाता, निर्वाहसाधन.

२०. उपजीवक - निर्वाह करणारा, आश्रित, सेवक (गीर्वाण लघुकोश - संस्कृत मराठी - ज. वि. ओक)

२१. जीवन्मुक्तांच्या मौनाचा साधक जो उपेक्षारूप समन्वय - येथील मौन शब्दाचा अर्थ प्रस्तुत ''वेदान्तपदार्थोद्देशदीपिका'' (आवृत्ति १ पृष्ठ ५१) ग्रंथात पहावा. येथे पुढे दिला - (ब्रह्महि शब्दरहित आहे आणि मायाहि अनिर्वाच्य आहे म्हणून दोघांच्याही ठिकाणी शब्द व्यर्थ आहे असा जो निश्चय ते मौन.)

तदपि भक्ति शिवकृष्णकी नहीं तजिये मत मोर ।
बारबार यह कहत हूं बाल धिटाई तौर ॥६॥

दोहा ६ चा अर्थ - तथापि माझे मत असे आहे की शिव-कृष्णाची भक्ति सोडून देऊ नये. हेच मी वारंवार बालहट्टाने सांगत आहे. ॥६॥

प्रश्न - मग शांकरमताचें ग्रहण केलें म्हणजे झालें मग मधुराद्वैताचें पालन यानें कसें होईल असे म्हणणें असेल तर सांगतों.

इतर मताचा परित्याग केला तरी शिव आणि श्रीकृष्ण यांची भक्ति न टाकली म्हणजे माझ्या मधुराद्वैताचें पालन होऊं शकतें ही माझी बालहठानें केलेली विनंती आहे, आज्ञा नाहीं.

द्वीपान्तर-जन-वचन जें गद्यग्रंथ में मोर ॥
ते जनकारज कारने नही मानके ठौर ॥७॥

दोहा ७ चा अर्थ - माझ्या गद्य ग्रंथात (द्वीपांतर - जनवचन) जी अन्य द्वीपातील म्लेंच्छ इंग्रजादिकांची वचने आहेत ती मी प्रमाण म्हणून घेतली नाहीत. ती (मूर्ख) लोकांच्या कार्याला उपयोगी पडावीत म्हणून घेतलेली आहेत. (मूर्ख लोक तीं वचने पाहून आमचे मत मानतील म्हणून घेतली आहेत.)

प्रश्न :- तुम्ही म्लेंच्छ भाषेंतूनही पुष्कळ वचनें घेतलीं आहेत त्याविषयी समन्वय भावना करावी काय? (य१३.८)

उत्तर :- तेथें समन्वयभावनेची जरूरी नाहीं. कारण अनुकूल अशींच तीं वेंचून घेतलीं आहेत आणि त्यांचा उपयोगही मला किंवा माझ्या मित्रांनां कांहीं नाहीं. तर - वैदिक सिद्धान्त जे सम्यक् जाणत नाहींत त्यांनीं मूर्खतोषणन्यायानें कोणत्या तरी रीतीनें त्या वचनांचा उपयोग करून घ्यावा म्हणजे झालें. ती वचनें **अलोकव्याख्यानमालेंत** जरी मी घेतलीं आहेत तरीं तीं प्रमाण नाहीं. आमच्या सिद्धान्ताला अनायासें अनुकूल आहेत ह्मणून घेतलीं आहेत.

वचनांप्रमाणें आपलें मत करून घेणें याचें नांव **अनुकूलग्रहण** आहे.

पद्यग्रंथ सब मान है, गद्य सन्निहित मान ।
केवलगद्य मरेठिसों, पद अनुसार प्रमाण ॥८॥

*दोहा ८ चा अर्थ - * पद्यग्रंथ सर्व प्रमाण आहेत.*

** पद्याबरोबर असलेली गद्यवचनेही तशीच प्रमाण आहेत.*

** मराठी भाषेंत असलेले केवल गद्यग्रंथ पद्यग्रंथाशी अविरुद्ध असतील तर प्रमाण समजावे ॥८॥*

जें गद्य पद्यानुसार असेल तेंच प्रमाण मानावें असा जरी वरील दोह्याचा अर्थ होतो तरी *जें गद्य संन्निहित गद्यानुसार आहे तें प्रमाण नाहीं असें समजूं नये. कारण संन्निहित गद्य हें पद्यानुसार असल्यामुळें प्रमाण आहेच व *संन्निहित गद्यानुसार जें गद्य असेल तें अर्थात् पद्यानुसार असल्यामुळे तेही प्रमाण होय.

हें गद्य दोन प्रकारचें आहे. **समयोपदेश** व **उद्धृत-समयोपदेश.**

उद्धृत-समयोपदेशांत मंडळीनें वेळोवेळीं टिप्पणें घेऊन केलेल्या विस्ताराचा समावेश होतो. योगसारादि ग्रंथ या प्रकारचे आहेत.

जें जें कंठरवानें वादिविनोदनार्थ ह्मटलें असेल तेंच तसें [२२] समजावें. बाकीचें समजूं नये. कदाचित् कोणी असें म्हणेल कीं अमुक एक प्रकरण वादिविनोदनार्थच आहे पण तें वादिविनोदनार्थ आहे असें ज्या ग्रंथांत लिहावयाचें होतें तो ग्रंथ लिहिणें तसेंच राहीलें पण ह्या शंकेचे [२३] समाधान करणारे एक श्री तातच समर्थ आहेत.

२२. तेच तसे - वादि विनोदार्थ (समजावे)
३३. ह्या शंकेचे - ही कुशंका आहे असा भाव.

माझे ग्रंथ कसे मानावे?

आतां माझे ग्रंथ कसे मानावे याविषयीं सांगतें. -

पद्य ग्रंथांत मी आपलें मत बरोबर लिहिले आहे व त्याप्रमाणें सन्निहितगद्य म्हणजे **'निदिध्यासन प्रकाशाच्या'** सहाव्या समुल्लासाचे आरंभीं, आठव्या समुल्लासामध्यें असणारें व प्रियसमागमादिकात असणारें तें अर्थ स्पष्ट करण्याकरितां असल्यामुळें व पद्याच्या सन्निहित असल्यामुळे

सन्निहित गद्य म्हटले आहे. त्यांतही मी आपलें मत बरोबर लिहीलें आहे. (य१३.९)

केवळ गद्य जें **'अलोकव्याख्यानमालेंत'** लिहीलें आहे तें पूर्व ग्रंथाशी अविरुद्ध असतां प्रमाण समजावें.

मराठी म्हटल्यावरून हिंदी **'स्वमतंव्यांशसिद्धांततुषार'** **'गद्यभक्तिभाष्य'** इत्यादिकांची व्यावृत्ति झाली. अर्थांतच त्यामध्येंही मीं आपलें मत उत्तम लिहिले आहे.

मधुर माधुकरी रहस्य तवं साच मानहूं सार ।
परं च बिनु मम समप्रति कबहूं न सके संभार ॥९॥

दोहा ९ चा अर्थ - (मधुर माधुकरी इ.) - 'माधुर्य माधुकरीतील' जी रहस्यें त्यांचे सार खरोखर मीच सांगू शकते. परंतु माझ्या बरोबरीचे जे कोणी नाहीत असे लोक कधीही त्या रहस्यांना सांभाळू शकणार नाहीत. (त्यांना त्यांचे सार समजणार नाही ह्याचा टीकेतच स्पष्ट उल्लेख आहे.)

माधूर्यमाधुकरी

आतां **माधूर्यमाधुकरी** म्हणजे नाना शास्त्रांतील वचने घेऊन त्यावर मी रहस्यें लिहीलीं आहेत.

* तीं रहस्यें कोठें तर ज्या मतावर लिहीली आहेत तें मत स्पष्ट करण्याकरितां,
* कोठें आपल्या मताला मिळतात म्हणून लिहलीं आहेत.
* कोठें खंडणाकरितां लिहिलीं आहेत.
* कोठें निश्चय नसल्यामुळें त्या वाक्याची एकाद्या मताशीं सांगड घालतां येईल काय या आशयानें लिहिलीं आहेत व
* कोठें गूढाशयानें लिहीलीं आहेत.

त्या सर्वांतून मी उचित अर्थ काढून घेऊं शकतें पण माझ्याप्रमाणें ज्यांची मति नाहीं त्यांनी मजजवळून अर्थ समजून घेतल्याशिवाय उलटपुलट रहस्य समजून त्या रहस्याप्रमाणें माझें मत होतें असा अर्थ समजूं नये.

समय समय पै सहजमें कियो जनन उपदेश ।

९

सो बिचारी अपने हिय समुझी मान उद्देश ॥१०॥

दोहा १० चा अर्थ - मी निरनिराळ्या समयी जो लोकांना सहज उपदेश केला आहे. त्याचा आपले अंतःकरणात विचार करून त्याचे प्रामाण्य व उद्देश समजून घ्यावा. ॥१०॥

पत्र व एकाद्या ग्रंथावर व्याख्यानें हा **समयीं समयीं केलेला उपदेश** समजावा तो वरील ग्रंथाला अनुरूप असल्यास प्रमाण आहेच याविषयीं सांगणें नकोच.

परंतु कोठें कोठें कोणत्या कोणत्या उद्देशानेंही केलेला आहे. तो उद्देश जवळील मंडळीला कळण्याचा संभव आहे व न कळल्यास त्याविषयीं उपेक्ष्य राहावें.

शिवाय समयीं केलेला उपदेश निरनिराळ्या लोकांना मार्गावर आणण्याकरिता असल्यामुळें तो एकसारखा प्रमाण होत नसतो.

जे लोक ग्रंथ न करतां समयोपदेशावरच कार्य भागवितात त्यांच्या मताचा कित्ता घेणें फारच घोटाळ्याचें होतें.

*जसें **विवेकानंदस्वामीनीं 'माय मास्टर'** मध्यें *ब्राह्मणजातीची स्तुति केली असून,

*'**रिफॉर्म ऑफ कास्ट्स**' या व्याख्यानांत हिंदुस्थानातील एका मित्राला पाठविलेल्या पत्रांत ब्राह्मण जातीची निंदा केली आहे व

*एका पत्रांत मांस खाण्याची स्तुती केली आहे; (य१३.१०)

*पुनः भक्तियोगांत पतिपत्नी-भक्तीची वरिष्ठता दाखवून एका पत्रांत कृष्ण चैतन्याची व पतिपत्नी-भक्तीची बंगाली लोकांना उद्देशून उत्तम प्रकारें निंदा केली आहे;

*पुनः बौद्धमताकडे कल दाखवून मी बौद्ध मताचा नाहीं असें म्हटले आहे.

– या सर्व गोष्टीचें कारण कार्यव्यग्रता, समयोचित उपदेश व वेदमार्गावर **साधारण श्रद्धा** हें आहे.

*अशीच गोष्ट **स्वामी रामतीर्थांची** झाली आहे. यांची उर्दू कविता

वेदान्तामध्यें अगदीं उत्तम असून अंग्रेजी कविता व गद्यें अगदीं रद्दी झालेलीं आहेत.

- म्हणून मीही समयीं केलेला उपदेश त्याचा उद्देश जाणून त्याचें व्याख्यान करावयाचे असल्यास करावे.

***श्रीशंकराचार्यांनींही** षट्चक्रमार्गच वेदान्तापेक्षा श्रेष्ठ आहे असें एका वैष्णवाला वाद करून दाखविलें, अशी शांकर दिग्विजयांत कथा आहे.

एवढ्याकरितां समयोपदेशाचा विचार करताना उपदेशकालीन त्या लोकांची स्थिती मनांत आणल्यास माझा प्रत्यवाय नाहीं.

या, मी आपल्या समयोपदेशाची कांहीं उदाहरणें देतें.

१. ईश्वराला मानून जे पाप करण्याला प्रवृत्त होतात त्या ठिकाणी मी कर्मच प्रधान आहे असें सांगत असतें हें सर्वांना ठाऊक आहे.

२. मूर्तिजापुरांत एका मनुष्याला परमेश्वर नाहीं असें सिद्ध करून दाखवून कर्म मानावयाला लावलें होतें, हें नानादि मंडळीस ठाऊक आहे.

या समयोपदेशांत व इतर माझ्या ग्रंथांत विरोध असतां ग्रंथच प्रमाण समजावे.

समयबचन मम आन लियो अपनी गिरा उतार ।
सो भजिये जन जथा रुचि मैं नहि कहूं बिचार ॥११॥

(दोहा ११ चा अर्थ - समयोपदेश करीत असतां कोणी इतर लोकांनी आपल्या भाषेंत ते उतरून घेतले असल्यास ते त्यांनी आपल्या मनाने केले असल्यामुळे त्याविषयी मी कांही सांगू शकत नाही. ॥११॥

मी अकस्मात् स्फूर्तीनें कविता किंवा समयोपदेश करीत असतां माझे शब्द बरोबर न समजून तो उपदेश आपल्या भाषेंत कोणी उतरून घेतला असेल तर तो पूर्वीप्रमाणें बरोबर आहे किंवा नाही हे तपासून पाहण्याचे काम मंडळींचे आहे. त्याविषयी मी कांही सांगू शकत नाही.

दुसऱ्यानें जें कांहीं लिहिलें असेल त्याविषयींचा भार मी आपल्यावर

१०

घेऊं इच्छीत नाही.

हुये ग्रंथ जे ते कछु आगे हों गे जाये ।
तिने सिखाईये भाँति अस अनरथ कबहुं न होय ॥१२॥

दोहा १२ चा अर्थ - जे कांही ग्रंथ पुरे झाले आहेत व जे पुढे होतील त्या सर्व ग्रंथांचे अध्ययन पूर्वापार ग्रंथाच्या अनुरोधाने करावे. एखाद्या वचनावरून भलताच अर्थ काढून अनर्थ करून घेऊं नये ॥१२॥

या प्रमाणें जे कांहीं ग्रंथ पूर्ण झाले आहेत व (य१३.११) पुढें प्रियलीला महोत्सवादि जे कांहीं पूर्ण होतील त्या सर्वच ग्रंथांचे अध्ययन पूर्वापार ग्रंथाच्या अनुरोधानें करवावें. एकाद्या वचनावरून एकादा विशेष अर्थ काढून करवूं नये.

जसें, मी आपल्याला ज्ञानेश्वरकन्या म्हणवून घेतें म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांचें लग्न झालें होतें असें अनुमान काढूं नये.

त्याचप्रमाणे माझी दुष्टचरित्रें असल्यास तींही प्रमाण समजूं नयेत.

समय [२४] तीन हियमें धरो उमाराज ब्रजराज ।
मोरे हितकू सब हि चहत नाहीं कहनको काज ॥१३॥

दोहा १३ चा अर्थ - सदा सर्वकाळ शंकर व विष्णु यांचे अंतःकरणात स्मरण असूं द्या. माझ्या हिताची सर्वांनाच इच्छा आहे हे सांगण्याची गरज नाही. ॥१३॥

२४. समय तीन - त्रिकाळ, ('सर्वकाळ' असा भाव टिकेत स्पष्ट केला आहे.)

आता थोडक्यांत पुनः मी आपली आभिलाषा प्रगट करितें

* ज्ञानाभिमान-नाशाला विष्णुभक्ति व
* अवैराग्यविनाशाला शिवभक्ति अवश्य सर्वकाल करावी.

प्रश्न - तुम्ही जर कोणाला शिष्य समजत नाहीं व आज्ञा देत नाहीं तर याप्रमाणें कोणी ऐकेल काय?

उत्तर - अशी शंका असेल तर सांगतों.

माझ्या जवळचे व दूर असूनहि संबंध ठेवणारे, सर्व महात्मे माझ्या प्रेमामुळें माझ्या प्रेमाची इच्छा करीत आहेत. हें मी पूर्णपणें जाणून आहें. म्हणून मला आज्ञा देऊन कोणाला बांधण्याची आवश्यकता नाहीं. इतकेंही करून कार्य न झाल्यास तातांची इच्छा !

माझ्या हिताची ज्याला इच्छा असेल त्यांनीं - **माझ्या ह्या मधुराद्वैताचा प्रसार करावा.**

अलकावतिपतिकुंवरी कहे मधुराद्वैत सु-रीत ।
मोर मति यहि राखिये और न नमन[२५] भनीत ॥१४॥

दोहा १४ चा अर्थ - श्री ज्ञानेश्वरकन्या म्हणते - मधुराद्वैताचा हा सुंदर मार्ग मी जसा कथन केला, त्याप्रमाणे रक्षण करावा. हीच माझी प्रार्थना आहे. दुसरी प्रार्थना करीत नाही. ॥१४॥

२५. और न नमन भनीत - दुसरी प्रार्थना करीत नाही.

मधुराद्वैत सप्रंदायांत वात्सल्यभक्ति करणारे सासूसासऱ्याप्रमाणें असून लालनभक्ति करणारे पुत्राप्रमाणें व माधूर्याविष्ट बहिणीप्रमाणें आहेत म्हणून सर्वांना मित्र मी म्हणत आहें.

या संप्रदायांत महात्म्यांविषयीं सखीप्रमाणेंच प्रेम आहे हें मी **भगवद्भक्ति सौरभांत** [२६] तृतीय परागांत सांगितले आहे.

यद्यपि माझे ठिकाणीं वात्सल्य करणाऱ्या स्त्रीपुरुषांना सासूसासऱ्या प्रमाणें मी समजत नाहीं तरी त्यांना उमा-शिव याप्रमाणें समजून मान देतें म्हणूनहि उत्कृष्ट मित्रपक्षांत ते येऊं शकतातच. **''मैत्री सर्वत्र चार्जवं''** हा मधुराद्वैतसंप्रदाय याप्रमाणें अविच्छिन्न चालवावा.

इतर संप्रदायांतील महात्म्यांना स्तुतींनी व नमस्कारांनी संतुष्ट करावें त्यांचे सिद्धान्त घेण्याची जरूर नाहीं. यालाच **इष्टनिष्ठा** म्हणतात. (य१३.१२)

तुकाराम महाराजांनींही -

''जग देव तरी पायांची पडावें, त्याचिया स्वभावें काज नाहीं''

असें स्पष्ट म्हटले आहे. आणि सुंदरदासही म्हणतात :-

कोउक गोरखकूं गुरु थापत ।
कोउक दत्त दिगंबर आदू[२७]॥
कोऊक कंथर कोउक भर्थर ।
कोउक कबीरकि राखत नादू [२८] ॥
कोउ कहै हरदास हमार जु ।
यूं करि ठानत [२९] वादविवादू ॥
ओर तु संत सबैं शिरऊपर ।
सुंदरके उर हैं गुरु दादू ॥५॥

तात्पर्य माझीं वचनें गोड करून घेण्याची ज्याची इच्छा आहे त्यांनी या विनंतीला मान द्यावा.

---

२६. सौरभ - भगद्भक्तिसौरभ - रुक्मिणीपत्रिका ग्रंथात.(यष्टी२) २७. आदु - आदि. २८. नादु - वचन

२९. यूं करिठानत वाद विवादु - ह्या प्रमाणे वादविवाद करण्यास तयार होतात

श्री ज्ञानेश्वरचरणनख प्रणवुहुं बारंबार ।
ज्याकी कृपा हियमे भयो मधुरभक्तिबिस्तार ॥१५॥

दोहा १५ चा अर्थ - ज्यांचे कृपेने अंतःकरणात मधूरभक्तीचा विस्तार झाला त्या श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणांना वारंवार नमस्कार करतो ॥१५॥

॥श्रीमत् सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

ooo

(प. पू. श्री दत्तात्रेय गणपतराव उर्फ भाऊसाहेब खापरे ह्यांची लेखन तिथी. नागपूर फाल्गुन कृष्ण १२ शके १८६०
(इ.स. १९३८)

- इति स्वाध्याय'विचार' भाष्य ॥

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजकृत त्रयोदश यष्टी

अथ

वेदान्तपदार्थोद्देशदीपिका

श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ

ओव्या

ॐ नमोजी ज्ञानेश्वरा । पूर्णब्रह्म विश्वंभरा ।

गणेशशारदा गुरुसंताकारा । सच्छिष्यरक्षका जनक जननी ॥१॥

अध्यारोपापवादें करून । होय प्रपंचाचें भान ।

पूर्वाचार्यदर्शित संज्ञाप्रकरण । बालबोधार्थ रचितों मी ॥२॥

सत्याचे ठायीं मिथ्यापण । त्या नांव बोलिजे अध्यारोपण ।

मिथ्या वारुनी सत्यदर्शन । अपवाद जाण या नांव ॥३॥

दोन प्रकारें अज्ञान । द्विविध प्रपंच जाण ।

स्थूल सूक्ष्म शरीरें दोन । ते एकैक दो प्रकारें ॥४॥

योनी चतुर्विधपण । परिणाम द्विविध जाण ।

द्विविध विवर्तलक्षण । आणि मतें जाण चतुर्विध ॥५॥

अज्ञानशक्ति द्विविध । संशयाचेही दोन भेद ।

असंभावना द्विविध । मोक्षही प्रकार द्वय ॥६॥

द्विप्रकार विपरीत भावना । प्रज्ञा द्वयलक्षणा ।

विवेचन द्विविध जाणा । समाधि द्वय ॥७॥

ब्रह्म जीव देहावस्था । करण कर्म आणि कर्ता ।

हे सकळही तत्वता । तीन तीन प्रकारचे ॥८॥ (य१३-१४)

१२

स्वांगाश्रित कर्म । नवविध असे परम ।

प्रतिबंध धर्म । चतुर्विध ॥९॥

संबंध तो त्रिप्रकार । त्रिविध ताप साचार ।

चिन्निरोध त्रिप्रकार । कारण द्वय ॥१०॥

तीन प्रकारें परिच्छेद । पुटी ते असे त्रिविध ।

अंतरंग साधन त्रिविध । वाक्य द्विविध तद्वृत्ति त्रिधा ॥११॥

त्रिप्रकार बोलिजे वासना । जग त्रैविध्य जाणा ।

बाधवृत्ति त्रयलक्षणा । भावना त्रय ॥१२॥

षोडश महावाक्यप्रतिबंध । अविद्या आणि अध्यास द्विविध ।

तत्सामग्री पंचविध । भेदद्वय ॥१३॥

सांग जीवन्मुक्ति-अंश द्विविध । योग बोलिजे द्विविध ।

श्रवणविधि त्रिविध । अधिकारी त्रय ॥१४॥

सिद्धि बोलिजे द्विविध । संस्काराचे दोन भेद ।

वृत्ति तेहि त्रिविध । चैतन्य द्वय ॥१५॥

महावाक्य तें द्विविध । उपासनेचे दोन भेद ।

गुरु आणि संकेत एकएकविध । शिष्य त्रिविध असती पैं ॥१६॥

प्रवृत्ति पंचविध आणि षड्विध । चतुष्कें बोलिजेत अनुबंध ।

ख्याति बोलिजे षड्विध । उत्पत्ति द्विविध निवृत्ति द्विविध ॥१७॥

शास्त्रचिंतन द्विविध देख । आणि परिचायक षट्क ।

तैसे उपसाद चतुष्क । मार्ग पंचक ते जाण ॥१८॥ (य१३.१५)

॥ श्री ज्ञानेश्वर माउली ॥

वेदान्तपदार्थोद्देशदीपिका

मूळ ओवी १

ॐ नमोजी ज्ञानेश्वरा । पूर्ण ब्रह्म विश्वंभरा ।
गणेश शारदा गुरु संताकारा ।
सच्छिष्य रक्षका जनकजननी ॥१॥

ग्रंथ समाप्त्यर्थ मंगलाचरण करून प्राकृत वेदान्तसंज्ञेस आरंभ करितो.

पूर्वपक्ष - ननु (१) संज्ञासंज्ञीचा (२) अभेद ग्रहण केल्यामुळें आणि श्रुतीनीं आकाशादि (३) ब्रह्मसंज्ञा धारण केल्यामुळें शिष्यबुद्ध्यनुसार भिन्न भिन्न संज्ञासंभव होतो. म्हणून समस्त संज्ञा इतक्याच आहेत असा निश्चय होत नाही. जसें **वेदान्तपरिभाषेंत** अनुपलब्धि प्रमाण सांगितलें. त्याचेंच टीकाकारांनीं सामुग्रीउपलब्धक योग्यानुपलंभक आणि अयोग्यानुपलंभक असे विभाग केले. याचप्रमाणें सर्वदां नूतन संज्ञा होतात आणि अद्वैतबोध झाला असतां कोणत्याच शब्दांचे प्रयोजन नाहीं म्हणून संज्ञाग्रंथारंभ निष्फल आहे. आणि संस्कृत संज्ञाग्रंथही उपलब्ध आहे. तो फार कठीण नाहीं. या व अन्य कारणावरून ग्रंथाचे ठायीं वाचकप्रवृत्ति संभवत नाही म्हणून ग्रंथारंभ निष्फळ आहे.

श्रीगुलाबरावमहाराजांच्या शिष्यपंचकातील
श्री भाऊसाहेबजी खापरे
यांनी लिहिलेल्या अर्थ स्पष्ट करणाऱ्या टीपा

॥ स्वाध्याय विचार ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

माता मे पंचलतिका वासुदेवः पिता मम ।
मातामहश्च ज्ञानेशो भ्राता नारायणस्तथा ॥
उमामहेश्वरावाद्यौ मम वंशधरावुभौ ।
कुर्वन्तु मंगलं सर्वे चिदानंद स्वरूपिणः ॥१॥

१३

मातेच्या चरणाचे परंपरेने तरी स्मरण व्हावे म्हणून ह्या ग्रंथाचा (स्वाध्याय) विचार करण्याचा प्रयत्न करतो.

१.ननु - संस्कृतभाषेतील प्रश्नार्थक अव्यय

२. संज्ञासंज्ञीचा अभेद ग्रहण केल्यामुळे -

''वाचारंभणं विकारो नामधेयम्'' (छां. उ. ६।१।४)

''तदस्येदं वाचातन्त्या नामाभिर्दामभिः सर्वसितम् सर्वहीदं नामनि''

''विकार केवळ वाणीचा विलास आणि नाममात्र आहे.''

''हे त्या ब्रह्माचे संपूर्ण जगत वाणीस्वरूप सूत्राने नाममय दोरीने व्याप्त आहे''

''हे सर्वच नाम आहे''

या श्रुतींच्या प्रमाणाने वाच्य व वाचक यांचा अभेद माण्डुक्योपनिषदात वरील भाष्यात व इतरत्रही श्रीमच्छंकराचार्य ह्यांनी प्रतिपादन केला आहे. (संज्ञा-नांव, संज्ञी - ज्याचे नांव तो पदार्थ)

३. श्रुतींनी आकाशादि ब्रह्मसंज्ञा धारण केल्यामुळे - श्रुतींनी आकाशादि शब्दांना ब्रह्माचीच नांवे म्हणून ग्रहण केल्यामुळे जसे

''ॐ कं ब्रह्म खं'' (छां.उ. ४।१०।५)

''मनो ब्रह्मेत्युपासीत'' (छां. उ. ३।१८।१).

''आदित्यो ब्रह्मेत्यादेशः'' (छां.उ.३।१९।१) इत्यादि ब्रह्मसंज्ञा - ब्रह्माची नांवे.

मूळ ओवी २

अध्यारोपापवादेंकरून । होय प्रपंचाचें भान ।
पूर्वाचार्यदर्शित संज्ञाप्रकरण । बालबोधार्थ रचितों मी ॥

टीका - हे वादिन् तूं संज्ञासंज्ञीचा अभेद बोलिलास तो यद्यपि सत्य आहे, तथापि ग्रंथारंभ निष्फल मानण्याला तूं चार आक्षेप पुढें ठेविलेस त्यांचें क्रमशः उत्तर श्रवण कर.

(१) **प्रथम** तुझा **आक्षेप** संज्ञासंज्ञीचा अभेददर्शक आहे तो यद्यपि सत्य आहे तथापि अध्यारोप (४) आणि अपवादें ब्रह्मीं जगद्भान होतें असे सुरेश्वराचार्य ह्मणतात ह्मणून अभेदाचे ठायीं भेदग्रहण कल्पित असल्यामुळें तन्निरासार्थ आप्तसांकेतिक (५) संज्ञा आहेत; ह्मणून ग्रंथारंभ निष्फल नाहीं.

(२) तुझा **द्वितीय आक्षेप** भिन्न शिष्योपदेशार्थ भिन्न संज्ञा होतात

असा आहे तो सत्य आहे तथापि पुरातन संज्ञेला सोडून नूतन संज्ञा होत नाहींत **(य१३-१६)** आणि श्रुतींनीं ज्या आकाशादि संज्ञा धारण केल्या त्यांचाही समन्वयात[६] समुाय आहे. आणि शंकराचार्यांपासून सर्वारंभक वेदान्त[७] ग्रंथांत कांहीं संज्ञाचा समुाय आहे ह्मणून समुायित तेवढ्याच संज्ञांचें येथे ग्रहण करून **स्वकृत-संज्ञा** त्याही सांगतों.

(३) तृतीयाक्षेप 'अद्वैतबोधाचे ठायीं शब्दाचें प्रयोजन नाहीं' असा आहे; तो फलदर्शक [८] असल्यामुळें साधनाचें ठायीं त्याचा अंगीकार नाहीं आणि असें न मानलें तर श्रुत्यादि प्रमाणें मिथ्या होतील. यद्यपि ब्रह्मबोधानंतर शब्दांचा स्वीकार नाहीं तथापि गुरूवाक्येंकरून ब्रह्मश्रवणाचे ठायीं लक्षणावृत्तीनें [९] श्रुत्यंगिकार असल्यामुळे ब्रह्मसाधनविषयक शब्दनिषेध संभवत नाहीं.

(४) आतां चवथा आक्षेप 'संस्कृत भाषेंत संज्ञाग्रंथ असून तो कठिण नसल्यामुळे प्राकृत भाषेत ग्रंथ करण्याचें प्रयोजन नाहीं'- हे बोलणें सम्यक् नाहीं. कारण संस्कृत भाषाज्ञान या कालाचे ठायीं सर्वांस दिसत नाहीं. त्यामुळें संस्कृत भाषांतररूप वेदान्तग्रंथांत, अथवा **मुकुंदराजा**दिकृत ओवीबद्ध स्वानुभव[१०] वेदान्तग्रंथांत, संस्कृत संज्ञांचा उपयोग केला त्याचा अर्थ कळत नाहीं. म्हणून बिचाऱ्या मंदबुद्धि मुमुक्षूंची प्राकृत ग्रंथाकडेही प्रवृत्ति होत नाहीं. ती जनांची प्रवृत्ति साधुग्रंथाकडे वळेल असें अल्पस्वल्प तरी कार्य आपले हातून व्हावें आणि संस्कृतानधीत [११] मंदबुद्धि पुरुषांनां वेदान्तग्रंथ-समुच्चित-संज्ञांचा [१२] स्पष्ट बोध व्हावा या हेतूनेंच मी हें लेखन करीत आहे ह्मणून ग्रंथारंभ सफल आहे.

आतां प्रथम ज्याच्या योगानें ब्रह्मी प्रपंचाचें ग्रहण केले आहे त्या अध्यारोपापवादापासनू आरंभ करितों.

---

४. अध्यारोप आणि अपवादे करून ब्रह्मी जगद्भान होते असे सुरेश्वराचार्य म्हणतात - ब्रह्माचे ठिकाणी खरेपणाने जे जगद्भान तो अध्यारोप व खोटेपणाने जे जगद्भान तो अपवाद. ह्यांचे योगाने ब्रह्माचे ठिकाणी अज्ञान्याला सत्यपणाने व ज्ञात्याला मिथ्यापणाने जगद्भान होते.

५. आप्तसांकेतिक संज्ञा - आप्तांच्या संकेताने झालेल्या संज्ञा असा अर्थ . आप्ताचे लक्षण ओवी १५ खाली पहावे.

आप्त - यथार्थ व हितवक्ता, खरे सांगणारा, परमेश्वर, ऋषि, गुरु;

संकेत - ''अमूक शब्दाचा अमूक अर्थ घ्यावा अशी जी इच्छा. ओवी ११ खाली ह्या शब्दांचे अर्थ अधिक स्पष्ट होतील.

६. समन्वयात समुाय आहे - समन्वय म्हणजे साक्षात् किंवा परंपरेने एकाच अर्थाचे ठायी तात्पर्य असणे. समुाय म्हणजे संग्रह.

७. सर्वारंभक वेदान्तग्रंथात - सर्व मूळ वेदान्तग्रंथात.

८. फलदर्शक असल्यामुळे - फल जे ब्रह्मबोध त्याचे दृष्टीने असल्यामुळे.

९. लक्षणावृत्ती- त्याचा अर्थ ओवी ११ खाली येईल.

१०. स्वानुभववेदान्तग्रंथात - स्वतःचे अनुभवयुक्त वेदान्तग्रंथात. वेदान्ताचा स्वतः अनुभव घेऊन रचलेल्या ग्रंथात असा अर्थ.

११. संस्कृतानधीत - संस्कृताचे अध्ययन ज्यांनी केले नाही असे.

१२. वेदान्तग्रंथसमुाति - वेदान्ताचे ग्रंथात संग्रह केलेल्या.

मूळ ओवी ३.

सत्याचे ठायीं मिथ्यापण । त्या नांव बोलिजे अध्यारोपण।
मिथ्या वारुनी सत्यदर्शन । अपवाद जाण या नांव ॥३॥

टीका

१/३. आरोप :- अन्यथा [१३] वस्तूचें भान त्याला **आरोप** असें म्हणतात.

२/३. आणि अधिष्ठानज्ञानानें [१४] त्याचा बाध त्याला **अपवाद** म्हणतात. **(य१३-१७)**

पूर्वपक्ष :- ननु संसाराचें संस्कारानें ग्रहण होतें आणि संस्कारांचे[१५] अनादित्व आहे म्हणून संसार सत्य आहे तो अध्यारोपापवादेंकरून झाला असें कसें म्हणता?

उत्तरपक्ष :- हे वादी अस्मद्वाक्यरहस्य[१६] तुला कळलें नाहीं. संस्कार दिक्कालवस्त्वपेक्षेनें[१७] होतो आणि वस्तूचें याथार्थ्यें[१८] संस्कारानें अनुमित असतें म्हणून संस्कारकार्यानुमेयापवाद[१९] आणि तत्परिणामी

(२०) कारणाध्यारोप संस्कारप्राक्(२१) सत् असल्यामुळें प्रपंचावस्थेंत(२२) तन्निराकरण महावाक्या(२३) वांचून होत नाहीं, आणि अध्यारोपापवाद(२४) कार्यप्रपंच असल्यामुळें तो ससंस्कार सत्य नाहीं. तथापि आरोपेंकरून यथार्थ भासतो तन्निषेधार्थ श्रेष्ठाप्तसांकेतिक समुति संज्ञांचें प्राकृत भाषेंत निरूपण आहे. त्या अध्यारोपापवादासह ब्रह्मीं जगत्कारणाज्ञान(२५) ग्रहण करितात; म्हणून तदादिकरून (२६) संज्ञा सांगतों :-

---

१३. अन्यथा - निराळ्या, खऱ्या नाही अशा, खोट्या.

१४. अधिष्ठानज्ञानाने त्याचा बाध, अधिष्ठान म्हणजे ज्याचे ठिकाणी अन्यथा वस्तूचे भान होते ते अधिष्ठान. त्याचे ज्ञानाने त्याचा - त्या आरोपाचा म्हणजे अन्यथाभानाचा जो बाध म्हणजे निवारण, नाहीसे करणे, खोटे आहे असे जाणणे (त्याला अपवाद म्हणतात.) टीप क्र. ४९ अ. पहा.

१५. संस्काराचे अनादित्व आहे इ. - संस्कार अनादि आहेत. संस्काराचा अर्थ ओवी १५ खाली दिला आहे. संस्कार अनादि आहेत म्हणून कल्पित नाही. तेव्हां संस्काराने ग्रहण केलेला जो संसार तोही कल्पित म्हणता येत नाही. अध्यारोपापवादाने संसार होतो म्हणजे तो कल्पित आहे असे कसे म्हणता येईल? असा प्रश्न.

१६. अस्मद्वाक्यरहस्य - आमच्या (ग्रंथकर्त्याच्या) म्हणण्याचे रहस्य

१७. दिक्कालवस्त्वपेक्षेने - दिक्, काल व वस्तु ह्यांचे अपेक्षेने. ''अमूक स्थळी, अमूक काळी व अमूक वस्तूचा होतो'' असा अर्थ.

१८. वस्तूचे याथार्थ्य संस्काराने अनुमित असते - वस्तूच्या खरेपणाचे संस्काराने अनुमान होते - संस्कार झाल्यास वस्तु खरी आहे असे अनुमान होते असा अर्थ; जसे हात पोळल्यास अग्नि खरा आहे हे अनुमान.

१९. संस्कारकार्यानुमेयापवाद - संस्काररूप जे कार्य त्यावरून ज्याचे अनुमान होते असा अपवाद म्हणजे संस्कारावरून जगताचे कल्पितपणाने भान. ज्या संस्कारावरून अज्ञान्याला संसार यथार्थ आहे असे अनुमान होते त्याच संस्कारावरून ज्ञान्याला कल्पित संसाराचे म्हणजे अपवादाचे अनुमान होते असा अर्थ.

२०. तत्परिणामी कारणाध्यारोप - तत् म्हणजे संस्कार ह्याचे जे परिणामी कारण तो अध्यारोप; अध्यारोप (सत्यपणाने जगद्भान) हे संस्काराचे परिणामी कारण होय. परिणामी कारणाचे लक्षण ओवी क्र. ५ खाली पहावे.

२१. संस्कारप्राक् सत् असल्यामुळे - संस्काराचे पूर्वी राहात असल्यामुळे, संसार, खोटेपणाने भासो किंवा खरेपणाने भासो, संस्कार होण्यापूर्वी तो अध्यारोप राहत असल्यामुळे असा अर्थ.

२२. प्रपंचावस्थेत तन्निराकरण - प्रपंचावस्थेत प्रपंच खरा भासतो तो पर्यंत, तन्निराकरण - तत् म्हणजे प्रपंच (संसार) त्याचे निराकरण

२३. महावाक्यावाचून - 'तत्त्वमसि' वगैरे वेदातील प्रसिद्ध महावाक्ये, त्यावाचून.

२४. अध्यारोपापवाद कार्यप्रपंच असल्यामुळे तो ससंस्कार सत्य नाही - अध्यारोप व अपवाद यांचे कार्य प्रपंच असल्यामुळे प्रपंच व त्यापासून होणारे संस्कार हे दोन्ही सत्य नाहीत.

२५. जगत्कारणाज्ञान - जगताचे कारण असे जे अज्ञान

२६. तदादिकरून- तत् म्हणजे अज्ञान आदिकरून

मूळ ओवी ४.

दोन प्रकारें अज्ञान । द्विविध प्रपंच जाण ।
स्थूल सूक्ष्म शरीरें दोन । ते एकैक दो प्रकारें ॥४॥

टीका - प्रपंचकारण अज्ञान दोन प्रकारचें आहे. *समिष्टिरूप आणि *व्यष्टिरूप. (तक्ता १०१)

३/४. समष्टि अज्ञान - मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत जें मूलाविद्येनें (२७) सर्वांस एक विस्मरण (२८) तें समष्टि अज्ञान म्हणावें.

४/४. व्यष्टि अज्ञान - आणि मनुष्य पशुपक्षी स्वभावानें (२९) स्वतःची स्वतःलाच जी आत्मविस्मरणबुद्धि तें व्यष्टि अज्ञान.

समष्टि(३०) म्हणजे एकत्व आणि व्यष्टि म्हणजे त्याचे प्रकार.

तत्कार्यप्रपंचही(३१) दोन प्रकारचा आहे. बाह्यप्रपंच आणि अंतःप्रपंच. (तक्ता १०२)

५/४. बाह्यप्रपंच - समष्टि अज्ञानेंकरून झालेला ब्रह्मांडरूप बाह्यप्रपंच आणि

६/४. अंतःप्रपंच - व्यष्टि अज्ञानेंकरून झालेला पिंड व तत्संस्थ (३२) मानसरूप अंतःप्रपंच.

पुनः तद्भोक्तृकरणचेष्टाश्रयरूप (३३) शरीरें दोन आहेत.

७/४. हिरण्यगर्भ - सर्व ब्रह्मांडांचे जें समष्टि सूक्ष्म शरीर तें हिरण्यगर्भ[३४] होय. आणि

८/४. लिंगशरीर- प्रत्येक व्यक्तीचें एक एक व्यष्टिसूक्ष्म शरीर त्याला लिंग शरीर म्हणतात. तदाश्रित[३५] स्थूल शरीरही दोन प्रकारचें आहे.

९/४. विराट् शरीर - सर्व ब्रह्मांडाचें समष्टि जें स्थूल शरीर तें विराट्[३६] शरीर होय आणि.

१०/४. योनिज शरीर - व्यक्तिपुरतें जे व्यष्टि स्थूल शरीर ते योनिज होय.

मूळ तक्ता क्र.१
ओवी ४ पा.१९



---

२७. मूलाविद्येने - जिचे योगाने समष्टि अज्ञान होते तिला मूलाविद्या (मूल+अविद्या) व व्यष्टि अज्ञान होते तिला तुलाविद्या (तुल+अविद्या) म्हणतात. ह्यांची लक्षणे ओवी तेरा खाली पहा.

२८. एक विस्मरण - आपल्या ब्रह्मपणाचे सर्वांना एकसारखे विस्मरण.

२९. स्व-भावाने - मी मनुष्य, मी पक्षी अशा भावाने.

३०. समष्टि, व्यष्टि - ह्यांची लक्षणे ओवी ८ खाली पहावी.

३१. तत्कार्यप्रपंचही - तत् म्हणजे समष्टि व व्यष्टि अज्ञान; ह्यांचे कार्य जो प्रपंच तोही.

३२. तत्संस्थ - पिंडाचे ठिकाणी असलेला.

३३. तद्भोक्तृकरण चेष्टाश्रयरूप - तत् म्हणजे प्रपंच. त्या प्रपंचाचा जो भोक्ता जीव

त्या भोक्त्याचे जे करण म्हणजे मन इंद्रियादिक. त्यांच्या ज्या चेष्टा म्हणजे क्रिया. त्यांना आश्रय असणारे; करणाचे लक्षण ओवी ८ खाली पहावे.

३४. हिरण्यगर्भ - हा शब्द येथे शरीराला लावला आहे. बहुधा तो ते ज्याचे शरीर त्याला लावतात. ओवी ८ खाली पहा. सर्व ब्रह्माण्डाचे जे समष्टि सूक्ष्म शरीर ते हिरण्यगर्भ होय - सर्व ब्रह्माण्डाचे ठिकाणी असणारे जे समष्टि सूक्ष्म शरीर ते हिरण्यगर्भ शरीर होय. शरीर व शरीरी ह्या दोहोंनाही एकच हिरण्यगर्भ हे नांव दिले आहे. संदर्भावरून अर्थ घ्यावा. येथे शरीराला हिरण्यगर्भ म्हटले आहे व ओवी ८ मध्ये शरीरीला हिरण्यगर्भ म्हटले आहे.

ब्रह्माण्ड म्हणजेच शरीर, त्या ब्रह्माण्ड शरीराचे दोन भेद स्थूल व सूक्ष्म, असा अर्थ समजावा.

३५. तदाश्रित स्थूल शरीर - त्या सूक्ष्म शरीराच्या आश्रयाने असणारे स्थूल शरीर.

३६. विराट् शरीर - येथेही सर्वब्रह्माण्डाचे म्हणजे- सर्वब्रह्माण्डाचे ठिकाणी असणारे, असा अर्थ घ्यावा. तसेच विराट् शब्द येथे शरीर अर्थाने वापरला आहे. तो कधी शरीरी ह्या अर्थातही वापरतात असे समजावे. ओवी ८ खाली शरीरी ह्या अर्थात वैश्वानर शब्द वापरला आहे.

मूळ ओवी ५.

योनी चतुर्विधपण । परिणाम द्विविध जाण ।
द्विविध विवर्तलक्षण । आणि मतें जाण चतुर्विध ॥५॥

टीका - त्या शरीराच्या योनी चार प्रकारच्या आहेत. जरायुज, अंडज, उद्भिज्ज, आणि संशोकज. (तक्ता १०४)

११/५. जरायुज - मातृगर्भांत जरायु (जार) नांवाच्या त्वचेनें जें व्याप्त शरीर ती जरायुज योनी म्हणावी. **(य१३-१९)**

१२/५. अंडज - अंडस्थ जीवांची अंडज योनी.

१३/५. उद्भिज्ज - धातु वृक्षादिकांची उद्भिज्ज योनी.

१४/५. संशोकज- आणि कीटकादिकांची संशोकज[३७] योनी होय.

योनी[३८] म्हणजे कारण. अपरापेक्षे[३९] करून पूर्व पूर्व योनित्व असल्यामुळे तज्ज्ञ[४०] योनित्व बोलिलें.

परिणाम

तत्साधक[४१] परिणाम दोन प्रकारचा आहे. सर्वविकृत आणि अर्धविकृत. (तक्ता १०५)

१५/५. सर्वविकृत परिणाम - कार्य होऊन पुनः कारणांत न मिळणें हा सर्वविकृत परिणाम होय. जसें दुधाचें दहीं झाल्यानंतर पुनः दूध होत नाहीं.

१६/५. अर्धविकृत परिणाम - स्वरूपांत विकार पाऊन पुनः स्वरूप होतो त्याला अर्धविकृत परिणाम ह्मणतात. जसें सर्पाच्या लांबपणाची कुंडलाकृति झाल्यानंतर पुनः सर्पाचा लांबपणा होतो.

१७/५. परिणाम - उपादानाचें जें स्वयं अवस्थान्तर[४२] त्याला परिणाम म्हणतात.

विवर्त[४३] दोन प्रकारचा आहे. **अध्यस्त** आणि **अनध्यस्त.** (तक्ता १०६)

१८/५. अध्यस्त विवर्त *- भ्रमेंकरून वस्तूचें अन्यथा[४४]ज्ञान याला अध्यस्त विवर्त ह्मणतात.

(मूळ ग्रंथातील टीप - *अध्यस्त विवर्त :-
अपर रूपत्वे सति भेदभानपूर्वकमधिष्ठानज्ञानावरकत्वे सति च अधिष्ठानज्ञान-निवर्त्यम् अध्यस्तविवर्तत्वम् ॥)

१९/५. अनध्यस्त विवर्त - आणि ज्ञानेंकरून प्रीत्यनुसार वस्तूचें विशेष याथार्थ्य[४५] अनध्यस्त विवर्त म्हणावा.

रज्जुसर्प[४६] अध्यस्त[४७]विवर्त आणि कनकभूषण[४८] अनध्यस्त[४९] विवर्त आहेत.

(मूळ ग्रंथातील टीप - *अनध्यस्त विवर्त :- अभिन्नसत्याऽपररूपत्वे सति भेदाभानपूर्वकम् अधिष्ठानज्ञानानावरकत्वे सति च प्रीतिमात्रत्वादधिष्ठानज्ञाना ऽ निवर्त्यम् अनध्यस्तविवर्तलक्षणम् ॥)

२०/५. विवर्त - स्वरूपांत विकार न पावून जो अपररूप होतो त्याला विवर्त म्हणतात.

२१/५. वेदान्तमत - उपनिषदें, ब्रह्मसूत्र, गीता आणि भागवत या

प्रस्थान-चतुष्टयाधारें*[५०] जें रचिलें तें वेदान्तमत म्हणावें.

(* शांकर मतांत यद्यपि श्रुति- व्याससूत्र- गीता हें प्रस्थानत्रय घेतलें आहे तथापि वाल्लभमतांत भागवतासह प्रस्थानचतुष्टय घेतलें आहे. मला वेदान्तात ज्या संज्ञा पूर्वोक्त मत-चतुष्टया ऽ विरोधी स्फुरतील त्यांचें ग्रहण करितों.)

तीं मतें चार आहेत. द्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, व केवलाद्वैत. (तक्ता १०७)

२२/५. द्वैतमत - पूर्णप्रज्ञाचार्यप्रणीत जीवेश्वरभेद[५१] नित्यस्थापक द्वैतमत म्हणावे. (य१३-२०)

२३/५. विशिष्टाद्वैतमत - जीव, सृष्टि आणि ईश्वर हे तिन्ही ब्रह्म असून ईश्वर सर्वशक्तिमान् विशेष आहे आणि जीव व सृष्टि अल्पशक्तिमान् नित्य आहेत असें, भेद[५२] व अभेद प्रतिपादक रामानुज मत विशिष्टाद्वैत म्हणावे.

२४/५. शुद्धाद्वैतमत - जगत्कारण माया नसून ब्रह्मच सत्सुख[५३] अंशानें आविर्भावतिरोभावरूप जडजीवईश्वररूप झालें आहे आणि तें साकार गोपालकृष्णरूप आहे.

जडांत ब्रह्माचा सदंश आविर्भूत आहे आणि चिदानंद तिरोभूत आहे.

जीवांत ब्रह्माचे सदिंश आविर्भूत आहेत आणि आनंदांश तिरोभूत आहे.

ईश्वर सदानंद पूर्णरूप आहे आणि तो साकार आहे.

त्याच्या गणितानंदरूप[५४] अक्षरत्वापासून अविकृत (पूर्वोक्त अर्ध-विकृत) परिणामरूप जगत् झालें आहे आणि

त्याच्याच पूर्णपरमानंदरूप गोपालकृष्णेच्छेपासून अक्षरांशांचे जीवाणु[५५]रूप नानात्व उत्पन्न झालें आहे;

अशा प्रकारचें ब्रह्मावर भिस्त ठेवणारें व विष्णुस्वामीसंप्रदायानुसारी वल्लभप्रणीत जगज्जीवब्रह्मा[५६]साकृत्यैक्यप्रतिपादक शुद्धाद्वैतमत म्हणावें.

२५/५. मधुराद्वैत - रसाद्वैत, भागवताद्वैत हे एकाच अर्थाचे

पर्याय[५७] आहेत.

शांकर वेदान्तांत भक्तीचा समन्वय[५८] केल्यामुळे या दर्शनाचा पृथक् निर्देश केला आहे.

कणादानीं जसा गुरुत्वाचा नियम शोधला, गुरुत्व शोधलें नाहीं, त्याप्रमाणें या सनातन दर्शनाचा ध्वनी प्रभुनें माझ्या मुखमृदंगांतून प्रगट केला आहे.

जीवन्मुक्तींत भक्ति पाहिजे एवढेंच या दर्शनाचें म्हणणें आहे व विचारांती हेंच दर्शन सनातन ठरतें. **वामन** (पंडित) विदेहमुक्तीतही भक्ति ठरवितो तितकी भक्ति कबूल करण्याचें धाडस या दर्शनांत नाहीं.

निदिध्यासनप्रकाशादि ग्रंथात विदेहमुक्तीतही भक्ति ठरतें असें जें ह्मटलें आहे; तें वादीजयार्थ[५९] आहे. (य१३-२१)

जीवन्मुक्तींत भक्तीची अपेक्षा नाहीं असें म्हणणारे जे वेदान्ती आहेत त्यांचा हें दर्शन तिरस्कार करतें.

प्राचीन केवलाद्वैत[६०] भाण्डारांत या दर्शनाला अनुकूल अशीं वचनें मधून मधून चमकतात त्यांचा संग्रह दर्शनोद्भासकांनी[६१] घेतलेलाच आहे.

२६/५. कैलास हें **माहेर**;

२७/५. त्याचा आळंदीशी समन्वय व ब्रज हें **सासर;**

२८/५. व शेवटीं सासरमाहेराचा अभेद हें या दर्शनांतील **ध्येय**[६२] आहे.

२९/५. सर्व शांकरवेदान्तांत दृष्टिसृष्टिवादच उत्तम[६३] असून त्यांतही ईश्वर[६४] व तद्भक्ति हीं अबाधित राहतात हे या दर्शनाचें **ज्ञेय** आहे.

३०/५. गुरूचे ठिकाणीं पतिभक्ति आचार्या[६५] वांचून इतरांला नाहीं ही यांतील **मर्यादा** आहे.

माधुर्या[६६]वांचून इतर भावानें गुरुभक्ति मात्र सर्वांस आहे.

३१/५. दर्शनाला विरोध न येईल अशा रीतीनें नाना प्रक्रियांची[६७] रचना हें यांतील **प्राविण्य** आहे.

३२/५. धर्मभेदसहिष्णुता **दृश्य**[६८] आहे. आणि -

३३/५. **प्राप्य**[६९] तर शांकर मताचें व याचें एकच[७०] आहे. म्हणून तें सांगितलें नाही.

या दर्शनाविषयीं एकटी ज्ञानेश्वरकन्याच[७१] सध्या निष्ठावान्[७२] आहे.

३४/५. प्रामाण्य-विचार शांकरमतांतील व आमच्यांतील एक आहे

३५/५. परंतु पुराणें वेदतुल्य असून ईश्वरप्रणीत आहेत ह्मणून वेदांचा जसा कशानें बाध[७३] होत नाहीं तसा पुराणांचाही बाध कशानें होत नाही ह्मणजे पुराणांचा व वेदाचा विरोध वाटल्यास समन्वयच केला पाहिजे, किंवा समजत नाहीं ह्मणून सोडून दिलें पाहिजे हा आमच्यांत **विशेष** आहे.

३६/५. वेद आह्मी **परम प्रमाण**[७४] मानतो.

३७/५. केवलाद्वैत - ब्रह्माचा अंश कोणताही पृथक नसून वेद लक्षणावृत्तिग्राह्य[७५] आहे.

जगत् तद्विवर्त,[७६] आणि मायापरिणामरूप[७७] आहे.

मायारूढत्वापेक्षेनें[७८] जीव आभास आणि मायाताटस्थ्यलक्षणापेक्षेनें[७९] ईश्वर आभास असून अध्यारोपापवादे[८०] करून मायेचें ग्रहण आहे. व्यतिरेकानें[८१] वस्तुतः नाहीं; तर अन्वयेंकरून[८२] भगवद्भक्तिग्राहक ब्रह्म स्फुरते असे शुद्धस्वानुभूत श्रुति-वसिष्ठ-व्यासप्रणीत व शंकराचार्याविष्कृत केवलाद्वैत म्हणावें.

या अद्वैत मतांत ग्रहण केलेल्या अज्ञानाच्या शक्तीचे प्रकार सांगतो. (य१३-२२)

---

३७. संशोकज योनी - संशोजक योनीला स्वेदज योनी असेही म्हणतात. स्वेदापासून उत्पन्न होणाऱ्यांची योनी ती स्वेदज योनी.

३८. योनी म्हणजे कारण. कारणाचे लक्षण ओवी १० खाली दिले आहे.

३९. अपरापेक्षेकरून पूर्व पूर्व योनित्व असल्यामुळे - पूर्व पूर्व म्हणजे जे पूर्वी पूर्वी असतात. त्यांचे ठिकाणी योनित्व असल्यामुळे म्हणजे तेच पदार्थ योनी किंवा कारण असल्यामुळे असा वाक्याचा अर्थ. नेहमी पूर्वी असणारे ह्याला कारण

म्हणतात तेच लक्षण येथे योनीचे दिले आहे.

४०. तज्ज योनित्व बोलिले - तत् म्हणजे पूर्व पूर्व त्यापासून उत्पन्न झालेले ते तज्ज म्हणावे. म्हणून योनित्व हे पूर्वी असलेल्या पदार्थापासून उत्पन्न होणारे आहे. म्हणूनच अंडज, स्वेदज इत्यादिकांनाच अंडापासून उत्पन्न होणारी, स्वेदापासून उत्पन्न होणारी; ह्या अर्थात योनी असे म्हटले आहे असा अर्थ. (स्वेद=घाम)

४१. तत्साधक परिणाम - तत् म्हणजे योनित्व तिला साधक म्हणजे साधणारा; घडवून आणणारा. परिणामाचे पूर्वी दिसून येणाऱ्या पदार्थाला त्या पदार्थाचे कारण म्हणावे. म्हणून परिणाम हाच कारणत्वाला किंवा योनित्वाला साधक आहे असा भाव.

४२. अवस्थान्तर - दुसरी अवस्था

४३. विवर्त - स्वरूपात विकार न पावून जो अपररूप (दुसरे रूप) होतो त्याला विवर्त म्हणतात.

४४. अन्यथा - खोटे म्हणजे खरे नसलेले, दुसरे.

४५. याथार्थ्य - खरेपणा.

४६. रज्जूसर्प - रज्जूचे ठिकाणी भासणारा सर्प.

४७. अध्यस्तविवर्त - अध्यस्त (भ्रमाने भासलेले) विवर्त (दुसरे रूप)

४८. कनकभूषण - कनक (सोन्याचे ठिकाणी भासणारे) भूषण (अलंकार)

४९. अनध्यस्तविवर्त - अनध्यस्त (भ्रमाने न भासलेले) विवर्त (दुसरे रूप)

टीप १ चा अर्थ - अपररूपत्वे सति इत्यादि - ह्याचा अर्थ - ज्या रूपाचे ठिकाणी (१) अपर (मूळरूपाहून इतर) रूपत्व आहे (२) भेदभान आहे. (मूळ वस्तू नव्हे असे भान आहे) (३) मूळ जे अधिष्ठान त्याचे ज्ञानाचे आवरकत्व आहे (ज्या रूपाने मूळ अधिष्ठानाचे ज्ञानाला आवरण केले आहे म्हणजे झाकले आहे. (४) आणि अधिष्ठान ज्ञानाने जे रूप निवर्त्य (नाहीसे होणार) आहे. त्या रूपाचे ठिकाणी अध्यस्त विवर्तत्व आहे (ते रूप अध्यस्त विवर्त आहे.)

उदाहरण - रज्जूचे ठिकाणी भासणारा सर्प हा अध्यस्त विवर्त आहे. कारण सर्परूपाचे ठिकाणी (१) मूळ जे दोरीचे रूप त्या रूपाहून इतर जे सर्परूपत्व ते आहे. (२) ह्या सर्परूपाचे ठिकाणी मूळ जी दोरी ती नव्हे असे भेदभान आहे (ही दोरी आहे असे भान नाही तर दोरीहून भिन्न जो सर्प तो आहे असे भान आहे. (३) मूळ दोरी जे अधिष्ठान (म्हणजे ज्याचेवर अपररूप - सर्परूप आहे ते) त्या दोरीच्या ज्ञानाला ज्या सर्परूपाने झांकले आहे. (४) आणि अधिष्ठान जी दोरी तिचे ज्ञानाने जे सर्परूप निवर्त्य आहे म्हणजे नाहीसे होणारे आहे त्या सर्परूपाचे ठिकाणी अध्यस्त विवर्त आहे म्हणजे ते सर्परूप अध्यस्त विवर्त आहे.

१९

टीप २ चा अर्थ -

'अभिन्नसत्याऽ पररूपत्वे सति' इत्यादिचा अर्थ -

ज्या रूपाचे ठिकाणी (१) अभिन्नसत्याचे ठायी अपर (मूळ रूपाहून इतर असे रूपत्व आहे) (२) भेदभान (मूळ वस्तु नव्हे असे भान) नाही. (३) मूळ जे अधिष्ठान त्याचे ज्ञानाचे आवरकत्व नाही (ज्या रूपाने मूळ अधिष्ठानाचे ज्ञानाला आवरण केले नाही म्हणजे झांकले नाही.) (४) आणि ज्याचे ठिकाणी प्रीति मात्रत्व (केवळ प्रीति) असल्यामुळे अधिष्ठान ज्ञानाने जे रूप निवर्त्य (नाहीसे होणारे) नाही त्या रूपाचे ठिकाणी अनध्यस्त विवर्तत्व आहे. (ते रूप अनध्यस्त विवर्त आहे.) सत्य=सत्ता.

उदाहरण - सुवर्णाचा अलंकार हा अनध्यस्त विवर्त आहे. कारण अलंकाराचे रूपाचे ठिकाणी

(१) अभिन्नसत्य (तेच सत्य) असे जे सुवर्ण त्याचे ठायी मूळ जे फास (लगड, कांब) वगैरेचे रूप त्या रूपाहून इतर अलंकाररूपत्व ते आहे.

(२) ह्या अलंकाराचे रूपाचे ठिकाणी मूळ जे सुवर्ण ते नव्हे असे भेदभान नाही (हे सुवर्ण आहे असेच भान आहे)

(३) मूळ सुवर्ण जे अधिष्ठान (म्हणजे ज्याचे वर अपररूप- अलंकाररूप आहे ते) त्या सुवर्णाचे ज्ञानाला त्या अलंकाराच्या रूपाने झाकले नाही.

(४) आणि त्या अलंकाराचे रूपाचे ठिकाणी केवळ प्रीति असल्यामुळे अधिष्ठान जे सुवर्ण त्याचे ज्ञानाने जे अलंकाराचे रूप निवर्त्य (नाहीसे होणारे) नाही त्या अलंकार रूपाचे ठिकाणी अनध्यस्त विवर्तत्व आहे. म्हणजे ते अलंकाररूप अनध्यस्त विवर्त आहे.

अनध्यस्त विवर्ताचे लक्षणात अभिन्न-सत्याचे ठिकाणी अपररूपत्व आहे असे म्हटले आहे, अध्यस्त विवर्ताचे लक्षणात तसे म्हटले नाही कारण अध्यस्त विवर्तात सत्याचा भेद आहे. रज्जूची सत्ता व सर्पाची सत्ता निराळी आहे पण अनध्यस्त विवर्तात सुवर्णाची व अलंकाराची सत्ता एकच आहे. म्हणून एकाच सत्याचे ठायी अपररूप आहे.

एका वस्तुवर जेव्हा दुसऱ्या वस्तूचा भ्रम होतो तेव्हा त्या पहिल्या वस्तूचे सामान्यरूप कायम राहून विशेषरूपाचा त्यावेळी लोप होतो. जसे दोरीवर जेव्हा सर्पाचा भ्रम होतो तेव्हा लांबपणा हे जे दोरीचे सर्पाशी सामान्य स्वरूप ते कायम राहून त्या दोरीचे पीळ वगैरे जे विशेष स्वरूप त्याचा लोप होतो. त्या दोन स्वरूपापैकी सामान्य स्वरूपाला आधार म्हणतात व विशेष स्वरूपाला अधिष्ठान

म्हणतात.

५०. प्रस्थान चतुष्टयाधारे - चार प्रस्थानांच्या आधाराने, प्रस्थान - विद्येच्या अंगांना प्रस्थान म्हणतात.

५१. जीवेश्वर भेद नित्यतास्थापक - जीव व ईश्वर यांचा भेद नित्य आहे असे स्थापन करणारे.

५२. भेद व अभेद प्रतिपादक - जीव, सृष्टि आणि ईश्वर ह्यांचा शक्तिदृष्टीने भेद व ब्रह्मदृष्टीने अभेद प्रतिपादन करणारे.

५३. ब्रह्मच सृत्तिसुख अंशाने आविर्भाव तिरोभाव रूप इ. आविर्भाव म्हणजे प्रकट होणे. तिरोभाव - गुप्त होणे. सत् चित् व सुख ह्या तीन अंशांचा जो आविर्भाव व तिरोभाव त्याचे (टीपा.पा.१५) योगाने ब्रह्म जडजीव व ईश्वररूप झाले आहे आणि ते ब्रह्म साकार गोपाळकृष्णरूप आहे.

५४. गणितानंद - परिमित आनंद

५५. जीवाणुरूपनानात्व - अणुस्वरूप नाना जीव.

५६. जगज्जीवब्रह्मासाकृत्यैक प्रतिपादक - ('ब्रह्मासाकृति' येथे 'ब्रह्मसाकृति' असे वाचावे. परमपूज्य बंधु वासुदेवराव मुळे यांनी मुळावरून लिहून घेतलेल्या ग्रंथात 'ब्रह्मा' नसून ब्रह्म लिहले आहे. येथे छपाईची चूक असावी, (नवीन संस्करण (द्वितीय आवृत्ति) बहुधा यष्टिवरून केल्यामुळे तेथेही ही चूक राहून गेली असावी) अर्थ - जगत् जीव आणि (साकार गोपाल - कृष्णरूप) ब्रह्म ह्यांचे, आकृतिसह ऐक्य प्रतिपादन करणारे.

५७. पर्याय - निराळे शब्द.

५८. समन्वय - अविरोधपूर्वक संग्रह. ह्या शब्दाचा विशेष अर्थ मातेच्या (श्रींच्या) सुखवरसुधेत (त्रयोदश यष्टि पृ. ८) पहावा.

५९. वादीजयार्थ - वादीला निरुत्तर करण्याकरता.

६०. केवलाद्वैत भाण्डारात - केवलाद्वैत मताच्या अनेक ग्रंथात.

६१. दर्शनोद्भासकांनी - मधुराद्वैत दर्शन प्रकट करणाऱ्यांनी म्हणजे आमच्या मातेने.

६२. ध्येय-ध्यान साध्य म्हणजे ध्यानाने प्राप्त करून घ्यावयाचे.

६३. उत्तम - दोषरहित.

६४. त्यातही ईश्वर व तद्भक्ति अबाधित राहतात हे या दर्शनाचे ज्ञेय आहे - दृष्टिसृष्टिवादाहून म्हणजे शांकर वेदान्तातील इतर वाद सदोष असल्यामुळे ईश्वर व ईश्वरभक्ति ह्यांचा त्या वादांशी विरोध न येणे अशक्य नाहीच पण

सृष्टिदृष्टिवादातही त्यांचा विरोध येत नाही. हे या दर्शनात ज्ञानसाध्य ज्ञानाने सिद्ध करून दिले आहे.

६५. आचार्यावाचून - मधुराद्वैतदर्शनाचे उद्भासक आचार्य - आमची माता.

६६. माधुर्यावाचून - पतिभक्तिवाचून म्हणजे इतर भावाने उदा. पितृभावाने, मातृभावाने, पुत्रभावाने वगैरे.

६७. प्रक्रिया - साधन.

६८. दृश्य - प्रत्यक्ष दिसून येणारे.

६९. प्राप्य - प्राप्त करून घ्यावयाचे.

७०. एकच - जीव ब्रह्माचे ऐक्य.

७१. ज्ञानेश्वरकन्या - श्रीज्ञानेश्वरानुगृहीत व श्रीकृष्णपत्नि म्हणून ज्ञानेश्वरकन्या - प्रस्तुत लेखक (श्री गुलाबराव महाराज)

७२. निष्ठावान् - श्रद्धा व अनुष्ठान ह्या दोन्ही रूपाने ग्रहण करणारी.

७३. बाध - उच्छेद म्हणजे खोटे ठरविणे.

७४. परम प्रमाण - पुराण व वेदाचा विरोध वाटल्यास उत्पत्तिक्रमाचे दृष्टीने मूळ प्रमाण.

७५. वेदलक्षणावृत्तिग्राह्य - ब्रह्म वेदाच्या लक्षणावृत्तीने ग्रहण केल्या जाणारे. (एक सामासिक शब्द) लक्षणावृत्तीचा अर्थ ओवी ११ खाली पहावा. ''ब्रह्म'' शब्द अध्याहृत घ्यावा.

७६. जगत् तद्विवर्त - तत् म्हणजे ब्रह्म त्याचे विवर्त म्हणजे जगत्.

७७. मायापरिणामरूप - मायेचा परिणाम म्हणजे तद्रूप - मायारूप. जग हे मायेचा परिणाम आहे असा अर्थ.

७८. मायारूढत्वापेक्षेने जीव आभास - मायारूप उपाधीचे ठिकाणी जीव आरूढ असल्यामुळे म्हणजे तादात्म्याने असल्यामुळे त्याला मायारूढ म्हणतात म्हणून जीवाचे ठिकाणी जे मायारूढत्व आहे, त्याचे अपेक्षेने तो जीव आभास म्हणजे मिथ्या, खोटा आहे. (ओवी ८ खाली 'आरुढ'त्वाचा अर्थ पहावा.)

७९. मायाताटस्थलक्षणापेक्षेने ईश्वर आभास - मायारूप उपाधीचे ठिकाणी ईश्वर तटस्थ असल्यामुळे म्हणजे उपाधीहन निराळा असल्यामुळे ईश्वर हा माया तटस्थ्य आहे म्हणून मायाताटस्थ्य ह्या त्याच्या लक्षणाच्या अपेक्षेने ईश्वर आभास म्हणजे मिथ्या आहे. (ओवी ८ खाली तटस्थ ह्याचा अर्थ पहावा.)

८०. अध्यारोपापवादेकरून मायेचे ग्रहण आहे - ब्रह्माचे ठिकाणी होणारे जगद्भान हा जो अध्यारोप व जगताचा बाध करून जे ब्रह्मभान हा जो अपवाद ह्यांच्या

योगाने म्हणजे अध्यारोपापवादाला कारण म्हणून मायेचे ग्रहण आहे. (ओवी ३ (टीपा.पा.१७) खाली पहा.) माया ही कार्यानुमेय आहे असा भाव.

८१. व्यतिरेकाने वस्तुतः नाही - व्यतिरेकाने - जगताला अलग करून . वस्तुतः- सद्रूपाने, मायेचे ग्रहण नाही.

८२. तर अन्वये करून भगवद्भक्तिग्राहक ब्रह्म स्फुरते - अन्वयेकरून म्हणजे ब्रह्माचीच प्रतीति आहे आणि अन्वयाने सर्वत्र स्फुरणारे हे ब्रह्म भगवद्भक्ति ग्रहण करणारे आहे. ह्या ब्रह्माचीच भक्ति होते.

मूळ ओवी ६.

अज्ञानशक्ति द्विविध । संशयाचेही दोन भेद ।
असंभावना द्विविध । मोक्षही प्रकार द्वय ॥६॥

टीका :- अज्ञानाच्या शक्ति दोन आहेत. **आवरण** आणि **विक्षेप.**

३८/६. आवरण - वस्तूचें विस्मरण त्याला आवरण म्हणतात. तें दोन प्रकारचें आहे. असत्वापादक आणि अभानापादक.

३९/६. असत्वापादक - वस्तु नाहीं असें वाटणें असत्वापादक होय.

४०/६. अभानापादक - आणि वस्तु आहे ती मला कळत नाही हे अभानापादक होय.

मूळ तक्ता क्र.२
ओवी ६ पा.२३



४१/६. मलयुक्त विक्षेप - आवरणनिवृत्तिबरोबर ज्याची निवृत्ति होते तो मलयुक्त विक्षेप ह्मणावा.

४२/६. अमलयुक्त विक्षेप - ज्ञानविरोधी[८३] नसल्यामुळें आवरणनिवृत्ति बरोबर ज्याची निवृत्ति होत नाहीं तो अमलयुक्त विक्षेप

ह्मणावा.

४३/६. विक्षेप - बाधक[८४] व अन्यरूपानें जी उपलब्धि[८५] त्याला विक्षेप ह्मणावें.—

संशय दोन प्रकारचा आहे. **वाचकगत** आणि **वाच्यगत.** (तक्ता १०९)

४४/६. वाचकगत संशय - वेद ब्रह्मप्रतिपादक आहेत किंवा कर्मप्रतिपादक आहेत अशी मीमांसाद्वय[८६]-संहृतचित्तवृत्ति वाचकगत संशय आहे. (य१३-२३)

४५/६. वाच्यगत संशय - जगत्कारण ब्रह्म आहे अथवा प्रधानादिक आहेत अशी सांख्यद्वयसंहृत[८७] चित्तवृत्ति वाच्यगत संशय होय.

४६/६. संशय - पूर्वपक्षसिद्धांत बीजप्रवाही[८८] वृत्ति संशय ह्मणावा.

असंभावना दोन प्रकारची आहे. **प्रमाण असंभावना** आणि **प्रमेय असंभावना**. (तक्ता ११०)

४७/६. प्रमाण असंभावना - ब्रह्माचें न्यायसांख्यदिकेंकरून प्रत्यक्षादिप्रमाणग्राह्यत्व आहे म्हणून श्रुतीचें ब्रह्मप्रतिपादन फल नाहीं अशा प्रकारची निश्चयवृत्ति तिला प्रमाणअसंभावना[८९] ह्मणतात.

४८/६. प्रमेय असंभावना - ब्रह्म आणि जगत् विलक्षण[९०] आहेत म्हणून जगत्कारण ब्रह्म नाहीं अशी जी निश्चयवृत्ति तिला प्रमेयअसंभावना म्हणतात.

४९/६. असंभावना - वस्त्वास्तिक्यसंबंधबाधक[९२] युक्तिद्वारा झालेल्या निश्चयास असंभावना म्हणावें.

तद्विरहित[९२] मोक्ष दोन प्रकारचा आहे. **अनर्थनिवृत्तिरूप** आणि **परमानंदप्राप्तिरूप.** (तक्ता १११)

५०/६. अनर्थनिवृत्तिरूप मोक्ष - आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक या त्रिविध दुःखासहित जगदनर्थक[९३] होय. त्याचा सकारणात्यन्तिक[९४] नाश म्हणजे भूतभविष्यवर्तमानकालीं नसणें याला अनर्थनिवृत्तिरूप मोक्ष म्हणतात. तो ज्ञानानें प्राप्त होतो.

५१/६. परमानंदप्राप्तिरूप मोक्ष - निवृत्तानर्थ [९५] बाधितानुवृत्तीनें[९६]

अमलविक्षेपरूपें करून भासमान न होतां **अखंडैकरसत्वभवन**[९७] त्याला परमानंदप्राप्तिरूप मोक्ष ह्मणतात. तो हरिभक्ति आणि सद्‌गुरुसेवाप्रेमानें प्राप्त होतो.

५२/६. मोक्ष - बंधनापासून सुटणें याला मोक्ष* म्हणतात.

(मूळ टीप - वेदान्तयोगेकरून सर्वथात्याज्यसंज्ञावाच्य[९८] बंध आणि सर्वथाग्राह्य[९९]संज्ञावाच्य मोक्ष)*

---

८३. ज्ञानविरोधी - ज्ञानाला विरोधी

८४. बाधक - वस्तुचे विशेष अंशाला बाधक

८५. उपलब्धि - प्रतीति

८६. मीमांसाद्वय संहृत चित्तवृत्ति - (मीमांसा - विचार) दोन विचारांनी हरण केलेली व्याप्त चित्तवृत्ति

८७. सांख्यद्वयसंहृत - (सांख्य - ज्ञान) दोन ज्ञानांनी हरण केलेली (व्याप्त) सांख्य शब्दाने येथे वेदान्त व कापिल सांख्य दोन्ही घ्यावेत.

८८. पूर्वपक्षसिद्धान्तबीजप्रवाही - (एक सामासिक शब्द) सिद्धान्त विरोधीपक्ष व सिद्धान्तपक्ष ह्यांचे बीज (सूक्ष्मरूप) धारण करणारी

८९. प्रमाण असंभावना - प्रमाणाविषयी असंभावना

९०. विलक्षण - विरुद्ध लक्षणाचे.

९१. वस्त्वास्तिक्यसंबंधबाधकयुक्तिद्वारा - वस्तुशी तिच्या आस्तिक्याचा जो संबंध म्हणजे 'वस्तु आहे' असा जो संबंध त्याला बाध करणाऱ्या म्हणजे खंडण करणाऱ्या युक्तींच्या म्हणजे हेतुंच्या योगाने.

९२. तद्विरहित- असंभावनारहित.

९३. जगदनर्थक - जगत् अनर्थक अशी पदे तोडून अर्थ करावा. अनर्थक - वस्तुतः अर्थ नसणारे.

९४. सकारणात्यंतिक - (सकारण आत्यंतिक)- त्यांच्या कारणासह तिन्ही काळी.

९५. निवृत्तानर्थ - निवृत्त आहे अनर्थ ज्यात असा म्हणजे अनर्थनिवृत्तीरूप मोक्षासह

९६. बाधितानुवृत्तीने इ. ब्रह्मज्ञानाने बाधित जो प्रपंच त्याची अनुवृत्ति म्हणजे प्रतीति ही बाधितानुवृत्ति तोच जो अमल विक्षेप (मिथ्यारूपाने भासणारा प्रपंच) तोही भासमान न होता म्हणजे न भासता.

९७. अखंडैकरसत्वभवन - अखंड म्हणजे त्रिकालाबाधित; एकरस - सच्चिदानंदरूप जो ब्रह्मरस त्याहून दुसऱ्या कोणत्याही रसाने संमिश्र नसणारा असा जो अखंडैकरस

त्याचे भवन म्हणजे स्थिति ज्याचे ठिकाणी असा जो मोक्ष ज्याचे ठिकाणी परमानंदाहून दुसरे कशाचेच केव्हाही भान नाही असा.

९८. वेदान्तयोगेकरून सर्वथा त्याज्य संज्ञावाच्य - वेदान्त व योगशास्त्र ह्यांनी ठरविलेले जे सर्वथा त्याज्य विषय त्यांच्या ज्या संज्ञा त्यांनी जे वाच्यपदार्थ- ते बंध

९९. सर्वथाग्राह्यसंज्ञावाच्य - वेदान्त व योगशास्त्र ह्यांनी ठरविलेले जे सर्वथा ग्राह्य विषय त्यांच्या ज्या संज्ञा त्यांनी जे वाच्य पदार्थ - सच्चिदानंदरूप अनध्यस्त विवर्त सगुण निर्गुण परब्रह्म - तो मोक्ष

मूळ ओवी ७

द्विप्रकार विपरीत भावना । प्रज्ञा द्वयलक्षणा ।
विवेचन द्विविध जाणा । समाधि द्वय ॥७॥

(य१३-२४)

टीका

५३/७. विपरीत भावना - वस्तूच्या उलट ध्यानास विपरीत भावना म्हणतात. ती दोन प्रकारची आहे. **शब्दरूप** आणि **अर्थरूप.** (तक्ता ११२)

५४/७. शब्दरूप विपरीत भावना - आपल्या शब्दस्तोमानें आप्तशब्दाचे ग्रहण न करणें ही प्रथम भावना होय.

५५/७. अर्थरूप विपरीत भावना[१] - ब्रह्म खोटें आहे आणि देहादिकच विषय सत्य आहेत असें मानून ते भोगणें ही अर्थरूप विपरीत भावना होय. *(टीप १. मागील पृष्ठावर सांगितलेले संशय, असंभावना आणि विपरीत भावना हे तीन बाधवृत्तीचे भेद आहेत.)*

तदनुकूल[१००] प्रतिकूल प्रज्ञा दोन प्रकारची आहे. **स्थित** आणि **अस्थित**. *(तक्ता ११३)*

५६/७. स्थित प्रज्ञा - कामनारहित शुद्धसमाधाननिश्चयरूपिणी[१०१] स्थितप्रज्ञा.

५७/७. अस्थित प्रज्ञा - सकामविषयफलतृष्णावान्[१०२] अस्थित

प्रज्ञा.

५८/७. प्रज्ञा - सामान्याचें विशेषरूपानें ग्रहण करणारी जी ज्ञावृत्ति[१०३] तिला प्रज्ञा ह्मणतात.

विवेचन दोन प्रकारचे आहे. साधनरूप आणि साध्यरूप.

मूळ तक्ता क्र.३
ओवी ७ पा.२६



५९/७. परोक्षज्ञानपूर्वक तें **साधनरूप** आणि

६०/७. अपरोक्ष ज्ञानपूर्वक ते **साध्यरूप.**

६१/७. साधनचतुष्टय - विवेक, वैराग्य, शमादि षटक् आणि मुमुक्षा हें साधनचतुष्टय आहे.

६२/७. विवेक - ब्रह्म सत्य आणि जगन्मिथ्या अशा प्रकारचा जो निर्धार त्याला विवेक[१०४] ह्मणतात.

६३/७. वैराग्य - या लोकीच्या आणि परलोकीच्या भोगांचा जो त्याग त्याला वैराग्य म्हणतात.

६४/७. शम - मनाच्या निग्रहाला शम म्हणतात.

६५/७. दम - बाह्येंद्रियनिग्रह तो दम.

६६/७. उपरम - विषयांपासून काढलेली बुद्धि पुनः विषयांवर न जाऊ देणें हा उपरम.

(तक्ता ३ पान२६)

६७/७. तितिक्षा - शीतोष्ण सुखदुःखादि[१०५] द्वंद्वसहन तितिक्षा.

६८/७. श्रद्धा - वेदमुनिगुरुवाक्यांचे ठायीं जो विश्वास ती श्रद्धा.

६९/७. समाधान - फल होवो अथवा न होवो कर्तव्यपराङ्मुख न होणें त्याचें नांव समाधान.

७०/७. मुमुक्षा - जन्ममृत्युजरेपासून सुटण्याची अतीच्छाधारा[१०६] ती मुमुक्षा.

अपरोक्ष ज्ञानपूर्वक साध्य विवेचनही दोन प्रकारचें आहे **व्यतिरेकरूप** आणि **अन्वयरूप.**

७१/७. व्यतिरेकरूप विवेचन - माझे ठायीं शरीरादिक नाहींत आणि ब्रह्माचें ठायीं भूतादिक नाहींत अशी जी वृत्तिधारा[१०७] ते व्यतिरेकरूप विवेचन होय.

७२/७. अन्वयरूप विवेचन - शरीरादिकांत मी अहंरूपानें स्फुरतो आणि भूतांदिकांत ब्रह्म चिद्रूपानें स्फुरतें अशी जी वृत्तिधारा तें अन्वयरूप विवेचन होय.

७३/७. विवेचन - साधकबाधक प्रमाणांनी सत्यवस्तूचें यथार्थ चिंतन त्याला विवेचन ह्मणतात. (य१३-२६)

मूळ तक्ता क्र.४
ओवी ७ पा.२७



७४/७. चिंतनाची साक्षात्काररूप जी परिपू दशा तिचें नांव **समाधि.** ती दोन प्रकारची आहे. **भावनारूप**[१०८] आणि **संविद्रूप.**[१०९]

७५/७. भावनारूप - पतंजलीनें योगांत जी समाधि ग्रहण केली

आहे तिचें नांव भावनारूप.

ती दोन प्रकारची आहे. **संप्रज्ञात** आणि **असंप्रज्ञात.**

७६/७. संप्रज्ञात-ध्येयैकरूप[११०] एकाग्रतावृत्ति संप्रज्ञातसमाधि होय.

ती चार प्रकारची आहे. सवितर्क, सविचार, सानंद आणि सास्मित.

७७/७. सवितर्क समाधि-स्थूलभूत[१११]ध्येयैकाग्रता सवितर्क समाधि होय.

७८/७. सविचार समाधि- तन्मात्राध्येयैकाग्रता[११२] सविचार समाधि.

७९/७. सानंद समाधि - समाधानध्येयैकाग्रता[११३] सानंद समाधि.

८०/७. सास्मित समाधि - तादात्म्यध्येयैकाग्रता[११४] सास्मित समाधि होय हिलाच संप्रज्ञात व सविकल्प ह्मणतात.

८१/७. असंप्रज्ञात समाधि - गुणवैतृष्ण्यरूप[११५] परवैराग्यानें सर्वैकाग्र्य सोडून निरोधदशेंत द्रष्टृस्वरूपावस्थित संस्कारमात्र चित्तसत्ता (य१३-२७) ती असंप्रज्ञात अथवा निर्विकल्पसमाधि होय.

८२/७. (योगातील समाधि) - स्वत्व[११६] विसरून ध्येयभावनारूपत्वाला **योगात** समाधि म्हणतात.

८३/७. (वेदान्तातील समाधि) संविद्रूप समाधीचें वेदान्तात संक्षेपशारीरकारादिकांनीं ग्रहण केलें आहे. विवेचनपरिप्र दशेंत अखंडैक रसानें संवित् स्फुरण्यास **वेदान्तात** समाधि म्हणतात.

ती दोन प्रकारची आहे. **दृश्यानुविद्ध** आणि **शब्दानुविद्ध.**

८४/७. दृश्यानुविद्ध समाधि - वृत्तींतून नामरूपें काढून टाकून अस्तिभातिप्रिय-स्फूर्तींचें जें धारण त्याला दृश्यानुविद्ध समाधि ह्मणतात. ती दोन प्रकारची आहे. बाह्य आणि आंतर !

८५/७. बाह्य दृश्यानुविद्ध - पृथिव्यादि भूतभौतिक नामरूपांचा त्याग करून अस्तिभातिप्रियरूपानें[११७] जें ब्रह्मधारण ती बाह्य दृश्यानुविद्ध[११८] समाधि.

८६/७. आंतर् दृश्यानुविद्ध - देहेंद्रिय मन प्राण बुद्धि इत्यादि स्थूल सूक्ष्म व्यष्टि[११९] नामरूपें काढून जें स्वास्तिभातिप्रियरूप[१२०] ब्रह्मधारण ती आंतरदृश्यानुविद्ध समाधि ह्मणावी.

२४

८७/७. शब्दानुविद्ध - श्रवणसंयोगीवाक्यानुरोधार्थ[१२१] वाच्यांश[१२२] काढून टाकून जें स्वासंगत्वधारण[१२३] ती शब्दानुविद्ध.

तीही पुनः दोन प्रकारची आहे. **बाह्य** आणि **आंतर्.**

८८/७. बाह्यशब्दानुविद्ध - 'तत्त्वं'[१२४] पदांचे जीवेश्वरवाच्यांश त्याग करून जहदजहल्लक्षणेनें[१२५] 'असि' पदलश्यांशैक्यासंगत्वधारण[१२६] ती बाह्यशब्दानुविद्ध समाधि.

८९/७. अंतःशब्दानुविद्ध - साक्षी होऊन वृत्तिनिरीक्षण करीत असतांना मध्यें जें प्रदेशप्रभान[१२७] तत्त्यागपूर्वक जे स्वासंगधारण तो अंतःशब्दानुविद्ध समाधि म्हणावा.

---

१००. तदनुकूल प्रतिकूल - त्या विपरीत भावनेला अनुकूल व प्रतिकूल.

१०१ स्थितप्रज्ञा - ह्याचे लक्षण ''प्रजहाति यदा कामान्सर्वान् पार्थ मनोगतान् । आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।। गीता अ.२.श्लो.५५. ह्या भगवद्वचनाप्रमाणे केले आहे. ''तो काम सर्वथा जाये । जयाचे आत्मसंतोषी मन राहे । तोचि स्थितप्रज्ञ होये । पुरुष जाणे ।।'' श्रीज्ञानेश्वरी अ.२.ओ.२९३.

१०२. सकामविषयकफलतृष्णावान् - कामनेसह विषयफलाची तृष्णा असणारी.

१०३. ज्ञानवृत्ति - बुद्धिवृत्ति, निश्चयवृत्ति.

१०४. विवेक - हा शब्द येथे ''नित्यानित्यविवेक'' ह्या विशेष अर्थाचा घ्यावा. सामान्य अर्थाने 'विवेकाचे' लक्षण ओवी ८ खाली केले आहे. (टीपा.पा.१९)

१०५. शीतोष्णसुखदुःखादिद्वंद्वसहन - (एक सामासिक शब्द) शीत व उष्ण, सुख व दुःख इत्यादि जी द्वंद्वे म्हणजे जोड्या त्यांना सहन करणे.

१०६. अतीच्छाधारा- अखंडदृढ इच्छा.

१०७. वृत्तिधारा - अखंडवृत्ति.

१०८. भावनारूप - कर्तृतंत्र म्हणजे ध्यानगम्य

१०९. संविद्रूप - वस्तुतंत्र म्हणजे ज्ञानगम्य.

११०. ध्येयैकरूप - ध्येयाशी एकरूप असणारी,

१११. स्थूळभूत ध्येयैकाग्रता - स्थूलभूतरूप जे ध्येय त्याशी एकाग्रता.

११२. तन्मात्राध्येयैकाग्रता - तन्मात्रा म्हणजे सूक्ष्मविषय (शब्दस्पर्शादि) हेच ध्येय त्याशी एकाग्रता.

११३. समाधान ध्येयैकाग्रता - समाधान, आनंद हेच ध्येय त्याशी एकाग्रता.

११४. तादात्म्यध्येयैकाग्रता - तत् - ध्येय आहे आत्मा ज्याचा असा जो ध्याता तो तदात्मा, त्याचा जो भाव ते तादात्म्य, म्हणजे ध्येयाचे ध्यात्याशी ऐक्य, म्हणजे अस्मिता तेच ध्येय त्याशी एकाग्रता म्हणजे अस्मितामात्र असा अर्थ.

११५. गुणवैतृष्ण्यरूप ई. - तम, रज व सत्त्व ह्या तीन्ही गुणांचे जे वैतृष्ण्य म्हणजे तृष्णाराहित्य तेच परवैराग्य. ह्याचे मुळे सर्व ध्येयाशी चित्ताची एकाग्रता सोडून देऊन कोणत्याहि ध्येयाशी चित्त एकाग्र न होता म्हणजे विरोध दशेत (सर्व चित्तवृत्तींच्या निरोध स्थितीत) द्रष्ट्याचे स्वरूपाचे ठिकाणी असलेली (स्वरूपाच्या ठिकाणी असणे ह्या वृत्तीचा जो संस्कार केवळ त्या रूपाची) जी चित्ताची सत्ता - ती - असंप्रज्ञात समाधी. ह्या स्थितीत कोणतीही वृत्ति राहत नाही. संप्रज्ञात समाधीनंतर व असंप्रज्ञात समाधीपूर्वी, स्वरूपाचे ठिकाणी रहावे, अशी जी योग्याची वृत्ति ती असंप्रज्ञात समाधीनंतर निरूद्ध होऊन त्या वृत्तीचा जो संस्कार त्या रूपाने केवळ चित्त असते.

११६. स्वत्व विसरून ध्येय भावनारूपत्वाला योगात समाधि म्हणतात — ध्यात्याने स्वत्व म्हणजे आपलेपणा विसरून ध्येयाची जी चित्ताचे ठिकाणी भावना तद्रूपत्व ध्यात्याचे ठिकाणी येणे म्हणजे ध्यात्याने केवळ ध्येयभावनारूप होणे ह्याला योगात समाधि म्हणतात. समाधीचे हे लक्षण साध्याचे दृष्टीने असून पूर्वी जे 'चिंतनाची साक्षात्काररूप परिप्र दशा' असे लक्षण केले ते साधन दृष्टीने केले. फलतः दोहोंचाही अर्थ ''ध्येयरूप चित्त होणे'' हाच आहे.

११७. अस्तिभातिप्रियस्फूर्तीचे - दृश्याचे ठिकाणी असलेले 'असणे, भासणे व प्रिय' ह्या स्फुरणाचे

११८. दृश्यानुविद्ध - दृश्याचे अनुरोधाने होणारी

११९. व्यष्टिनामरूपे - स्वतः आपली नामरूपे

१२०. स्वास्तिभातिप्रियरूप - स्वतःचे अस्तिभातिप्रयरूप.

१२१. श्रवण संयोगी वाक्यानुरोधार्थ - श्रवणेंद्रियाशी संयोग करणारे जे वाक्य त्याचा जो अनुरोधार्थ म्हणजे त्या वाक्याच्या अनुरोधाने होणारा अर्थ म्हणजे वाच्यार्थ.

१२२. ''वाच्यांश'' हे शब्द नवीन संस्करणात (आवृत्ति २ री) आले आहेत ते प्रथम आवृत्तीत नाहीत. श्री. वासुदेवराव मुळे यांच्या लेखी प्रतीतही हे शब्द नाहीत. शब्द मूळात असल्यास किंवा आहेत असे मानल्यास वाक्याच अनुरोधार्थ म्हणजे वाच्यांश' असा अर्थ करावा.

१२३. स्वासंगत्वधारण - स्वतःच्या असंगत्वाचे धारण.

१२४. 'तत्वं'पदाचे जीवेश्वरवाच्यांश त्याग करून - ''तत्त्वमसि'' ह्या महावाक्यातील

जे 'तत्' पद त्याचा जो 'ईश्वर' असा वाच्यार्थ व 'त्वं' पदाचा 'जीव' असा वाच्यार्थ ह्या अर्थाचे दोन्ही अंश सोडून देऊन.

१२५. जहदजहल्लक्षणेने - वर प्रमाणे वाच्यांशाचा त्याग करून व त्या पदांच्या 'सच्चिदानंद' ह्या अर्थाचे जहद्-अजहद् लक्षणावृत्तीने ग्रहण करून. जहत-सोडणे, अजहत् - न सोडणे. ह्यांचे अर्थ ओवी ११ खाली पहावे.

१२६. 'असि' पदलक्ष्यांशैक्यासंगत्वधारण - 'तत्वमसि' ह्या (टीपा.पा.२१)महावाक्यातील जे 'असि' पद त्याचे ठिकाणी 'तत्' व 'त्वं' ह्या पदांचे जे लक्षणावृत्तीने घेतलेले (लक्ष्यांशाने) त्या अंशाचे जे ऐक्य त्या ऐक्याने ''तत्त्वमसि'' ह्या महावाक्याच्या लक्ष्यार्थाचे जे असंगत्व त्याचे धारण.

१२७. मध्ये जे प्रदेश प्रमान - साक्षी व वृत्ति ह्यांचे मध्ये प्रदेश प्रभान - अंतराचे किंवा अवकाशाचे भान - भेदभान

मूळ ओवी ८

ब्रह्म जीव देहावस्था । करण कर्म आणि कर्ता ।
हे सकळही तत्वता । तीन तीन प्रकारचे ॥८॥

टीका :-

९०/८. ब्रह्म तीन प्रकारचें - निराकार, साकार, आणि औपाधिक.

मु.त.क्र.५
ओवी ८ पा.३०



९१/८. निराकार - व्यतिरेकानें संविज्ञगद्भिन्नता[१२८] तें निराकार ब्रह्म.

९२/८. साकार - अन्वयें करून जगद्रूपानें[१२९] स्फुरण तें साकार ब्रह्म. **(य१३-२८)**

ते साकार दोन प्रकारचें. **संकोचप्रधान** आणि **स्थितिप्रधान.**

९३/८. जगत् ब्रह्मरूप असूनही ब्रह्माचे ठायीं लयरूप[१३०] संकोच होतो ह्मणून **जगद्रूप ब्रह्म संकोचप्रधान**. आणि

९४/८. रामकृष्णादि ब्रह्माचा अनध्यस्त[१३१] असल्यामुळें लयरूप संकोच घटत नांहीं व ते भक्तांना नेहमीं दर्शन देतात. म्हणून तें **ब्रह्म स्थितिप्रधान**.

९५/८. उपाधि दृष्टीनें ज्यावर आरोप घडतो तें **औपाधिक ब्रह्म.**

तें दोन प्रकारचें आहे. **तटस्थ** आणि **आरूढ.**

९६/८. तटस्थलक्षण तेंच साकार अथवा निराकार परमेश्वराचा **वाच्यांश**.

ज्याचे ठायीं उपाधि[१३२] असून उपाधीहून जें निराळें असतें त्याला **तटस्थ** म्हणतात.

९७/८. ज्याचे ठायीं उपाधी असून उपाधीशीं जें तादात्म्य पावतें तें **आरूढ ब्रह्म**. त्यालाच **जीव** म्हणतात.

उपाधी दोन प्रकारची आहे. **समष्टि** आणि **व्यष्टि**. *(तक्ता ११७)*

९८/८. सर्व-वाच्य[१३३] असून एकात्मता असणे याला **समष्टि** म्हणतात.

९९/८. आणि एकवाच्य[१३४] असून सर्वात्मता असणें याला **व्यष्टि** म्हणतात.

१००/८. तटस्थ[१३५] लक्षणाभास **ईश्वर** आणि

१०१/८. आरूढ[१३६] लक्षणाभास **जीव**. *(तक्ता ११९)*

तो जीव तीन प्रकारचा आहे. **प्राज्ञ, तैजस** आणि **विश्व.** *(तक्ता ११९)*

१०२/८.व्यष्ट्युपाधि[१३७] अविद्यारूप कारणशरीरावर जो अहंतादात्म्यानें आरूढ तो **प्राज्ञ** ह्मणावा.

कारण शरीर

१०३/८.तें **कारणशरीरही** द्विविध आहे. समष्टिरूप आणि व्यष्टिरूप. *(तक्ता ११८)*

१०४/८.समष्टिरूप कारण - सर्व ब्रह्मांडाची जी मूलाविद्या ते **समष्टिरूप कारण.**

१०५/८.व्यष्टिरूप कारण - आणि पिंडाची जी मूलाविद्या तें **व्यष्टिरूप कारण**

१०६/८.प्राज्ञ (संधिप्राज्ञ)- समष्टिरूप कारणशरीरावर जो आरूढ तो संधिप्राज्ञ म्हणावा. (य१३-२९)

१०७/८.तैजस - अविद्यापरिणत[१३८]-अन्तःकरणारूढ तो **तैजस** ह्मणावा.

१०८/८. तत्समष्टी[१३९] **हिरण्यगर्भ**

१०९/८.विश्व - सप्रतिबंध-अन्तःकरणपरिणत[१४०] स्थूलारूढ तो **विश्व** म्हणावा.

११०/८.वैश्वानर - तत्समष्टि विराटारूढ[१४१] तो **वैश्वानर**.

शरीर

शरीर (देह) तीन प्रकारचें आहे. योनिज, अयोनिज आणि स्वयमुत्पन्न. *(तक्ता १२०)*

१११/८.योनिज - भौतिक[१४२] स्त्रीपुरुषांदि पासून उत्पन्न होणारें योनिज.

११२/८.अयोनिज - दैविक[१४३] सत्कर्मभावनेपासून उत्पन्न होणारें अयोनिज.

११३/८.स्वयमुत्पन्न - रामकृष्णादिकां प्रमाणें केवळ चैतन्यमय ते स्वयमुत्पन्न

अवस्था

तदाश्रित[१४४] अवस्था तीन प्रकारच्या आहेत. जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति. *(तक्ता १२१)*

११४/८.जागृती - भोग्यपदार्थानुसार देहेंद्रियादिकांचें जें वर्तन[१४५]

ती जागृती. **(य१३-३०)**

११५/८.स्वप्न - निद्रापरिणत[१४६] भोग्यानुसार वासनावर्तन तें स्वप्न.

११६/८.सुषुप्ति - भोग्याभावसुखानुसार[१४७] प्रज्ञावर्तन[१४८] ती सुषुप्ति (प्रज्ञा संस्कार)

११७/८.उत्पत्ति - जागृतसमष्टि[१४९] उत्पत्ति.

११८/८.स्थिति - स्वप्नसमष्टि[१५०] स्थिति. आणि

११९/८.लय - सुषुप्तिसमष्टि[१५१] लय.

मूळ तक्ता क्र.६
ओवी ८ पा.३१

करण

ज्ञानरूप	क्रियारूप	अंतररूप
१ श्रोत्र, २ त्वक्, ३ चक्षु, ४ जिव्हा, ५ घ्राण	१ वाक्, २ पणि, ३ पाद, ४ शिश्न ५ गुद.	१ अंतःकरण, २ मन, ३ बुद्धि ४ चित्त, ५ अहंकार

करण

१२०/८.करण - व्यापारवान्[१५२] असाधारण[१५३] कारण[१५४] तें करण. व्यष्ट्याश्रित[१५५] करण तीन प्रकारचें. **ज्ञानरूप, क्रियारूप आणि अंतररूप.**

१२१/८.ज्ञानरूप - ज्याच्या योगानें भोग्यज्ञान मिळतें तें ज्ञानरूप. त्याचे प्रकार पांच श्रोत्रादि.

१२२/८.क्रियारूप - पुरुषप्रवृत्ति ज्याच्या योगानें होते तें क्रियारूप. त्याचेही प्रकार वागादि पांच.

या दश करणांच्या व्याख्या सुलभ आहेत ह्मणून केल्या नाहींत.

१२३/८.अंतःकरण - संस्कारज्ञान[१५६] ज्याच्या योगानें ग्रहण होतें तें अंतःकरण[१५७] तें अंतःकरणादि पांच प्रकारचें आहे.

(य१३-३१)

१२४/८.निर्विषय व्यष्टिस्फुरण ते **अंतःकरण.**

१२५/८.संशय तें **मन.**

१२६/८.निश्चय ती **बुद्धि.**

१२७/८.चिंतन तें **चित्त** आणि

१२८/८.अहंग्रह[१५७] तो **अहंकार.**

१२९/८.चित्त - चित्त[१६०] दोन प्रकारचें आहे. **शुद्ध** आणि **अशुद्ध,**

शुद्ध चित्ताचे तीन भाग[१६१] किंवा विकार ह्मणतां येतील. ते असे :- विवेक, बुद्धि व अहंकार.

१३०/८.मिश्र झालेल्या दोन वृत्तीचें किंवा पदार्थांचे पृथक्करण करणें याला **विवेक** ह्मणतात.

१३१/८.मिश्र अथवा पृथक् वृत्ति तत्तदाकृत्यवधारणामात्रेंकरून[१६२] जाणणारी अहंप्रत्ययावच्छिन्नावलंबी[१६३] वृत्ति तिला **बुद्धि** म्हणतात. व

१३२/८.चित्तांत[१६४] प्रतिबिंबित आत्मा अल्पचितविशिष्ट झाला ह्मणजे त्यावर आरूढ होतो; या आरूढ दशेला **अहंकार** म्हणतात.

१३३/८.अशुद्धचित्ताचे कामादि[१६५]विकार आहेत. ह्यांना **मिश्रविकार** म्हणतात व

१३४/८.विवेकादि तीन **केवल विकार** होत.

असे केवल व मिश्र हे विकाराचे दोन भेद झाले.

१३५/८.मिश्र विकारांपेक्षा **केवल विकार** अधिक स्थिर आहेत. यांना विकारपणा जो आला आहे तो व्यापक[१६६] चित्ताच्या अपेक्षेने. मात्र एऱ्हवीं हे तिन्ही विकार जर व्यापक झाले तर त्यांना **शुद्ध चित्ताचे तीन भाग** ह्मणतां येतील. आणि म्हणूनच विवेक, बुद्धि, अहंकार यांची आत्मलाभकालींही[१६७] आवश्यकता वेदान्तशास्त्रवेत्ते ग्रहण करतात.

१३६/८.अहंकार - चित्तांत प्रतिबिंबित आत्मा अल्पचित्तविशिष्ट झाला म्हणजे त्यावर आरूढ होतो या आरूढ दशेला अहंकार ह्मणतात.

१३७/८.या करणांमध्ये **प्राणसंयोग व्यापार**[१६८] आहे.

कर्म तीन प्रकारचें आहे. **कर्त्राश्रित, भोक्त्राश्रित** आणि **स्वांगाश्रित.**

(य१३-३२)

मूळ तक्ता क्र.७
ओवी ८ पा.३३



१३८/८.कर्त्राश्रित[१६९] **कर्म** – कर्त्यावरच ज्याचें अस्तित्व अवलंबून असतें.

तें तीन प्रकारचें आहे. **शारिरिक, वाचिक** व **मानसिक.**

१३९/८.भोक्त्राश्रित कर्म – जीवाला जें प्रवृत्त करतें तें भोक्त्राश्रित कर्म.

तें तीन प्रकारचें आहे. संचित, प्रारब्ध व क्रियमाण.

१४०/८.संचित – केलेल्या कर्माची ब्रह्मदेवास जी स्मृति तें संचित.

१४१/८.प्रारब्ध – ब्रह्मदेवानें फलोन्मुख केलेलें जें कर्म तें प्रारब्ध. तें स्वेच्छा अनिच्छा भेदानें दोन प्रकारचें आहे.*

*(मूळातील टीप - * कोणी परेच्छाकृत तिसरें प्रारब्ध घेतात, त्यांतही अनिच्छा मूळ असल्यामुळे मी तें ग्रहण केलें नाही.)*

१४२/८.स्वेच्छा प्रारब्ध – भोगानुकूल आपली इच्छा होणें तें स्वेच्छा-प्रारब्ध.

१४३/८.अनिच्छा प्रारब्ध – भोगप्रतिकूल इच्छा असणें ते अनिच्छा-प्रारब्ध.

१४४/८.क्रियमाण[१६९] – परिस्थित्यनुसार क्रिया घडणें तें क्रियमाण.

भोग

१४५/८.भोग्यतृप्ति[१७०] तो **भोग.** तो तीन प्रकारचा. दुःखरूप, सुखरूप आणि मिश्ररूप. (य१३-३३)

२८

१४६/८.स्वांगाश्रित कर्म – स्वतः ज्या स्थितींत कर्माला अस्तित्व असतें तें स्वांगाश्रित कर्म.

ते तीन प्रकारचें. पुण्य, पाप आणि मिश्र.

१४७/८.पुण्य कर्म – सद्भावनेनें घडलेलें आणि सुखजनक तें पुण्य कर्म.

१४८/८.पाप कर्म – असद्भावनेनें घडलेलें आणि दुःखजनक ते पाप कर्म.

१४९/८.मिश्रकर्म – मिश्र[१७१] भावनेनें घडलेलें आणि मिश्रजनक[१७२] तें मिश्र कर्म.

१५०/८.सत् – आप्तदर्शित[१७३] नीत्यनुसार सत् आणि अननुसार **असत्.**

कर्ता

१५१/८.कर्ता, तीन प्रकारचा. लौकिक, सिद्ध आणि दैविक.

१५२/८.लौकिक कर्ता – स्वकामनाफलासाठी[१७४] जो कर्म करितो तो लौकिक कर्ता. *(तक्ता १२४)*

१५३/८.सिद्ध – परोपकारासाठी जो कर्म करितो तो सिद्ध.

१५४/८.दैविक – अंतवाहक[१७५] शरीरानें जो सृष्टीच्या सृष्टी निर्माण करितो तो दैविक कर्ता.

हे या श्लोकांत (ओवीत) सांगितलेले सात तीन तीन प्रकारचे आहेत.॥८॥

---

१२८. संविज्जगद्विभन्नता. संवित चे जगताहून भिन्न असणे - जगताहून भिन्न अशी संवित्.

१२९. जगद्रूपानेस्फुरण - संवितचे जगत् रूपाने स्फुरण.

१३०. लयरूप संकोच - जगताचा लयरूप संकोच, अधिष्ठान ज्ञानाने निवृत्ति

१३१. अनध्यस्त - अनध्यस्त विवर्त (अनध्यस्त विवर्ताचे लक्षण ओवी ५ खाली आले आहे.)

१३२. उपाधि - वस्तूचे स्वरूपात ज्याचा प्रवेश नसून जो त्या वस्तूला व्यावर्तक (वेगळे करणारा) आहे त्याला उपाधि म्हणावे. जसे घटाकाशाला घट हा उपाधि

आहे. घटाकाशाचे स्वरूपात घटाचा स्पर्श नसून फक्त घट हा घटाकाशाला बाह्य आकाशापासून व्यावर्तक आहे.

१३३. सर्ववाच्य असून एकात्मता असणे - सर्व शब्दांचा जो एक वाच्य आहे व ज्याचे ठिकाणी एकात्मता म्हणजे एकार्थता आहे. जसे सर्व झाडे शब्दांचे जे वाच्य तद्रूप जंगल असून जंगल ह्या शब्दाचा प्रत्येक झाड हा अर्थ नसून सर्व झाडे मिळून एक अर्थ आहे. म्हणून जंगल समष्टि.

१३४. एक वाच्य असून सर्वात्मता असणे - एक शब्दाचा जो एकच वाच्य आहे व ज्याचे ठिकाणी सार्वत्मता म्हणजे सर्वार्थता आहे. जसे झाड ह्या एकच शब्दाचे झाड हेच वाच्य असून त्या झाड शब्दाचा एक एक अशी निरनिराळी सर्व झाडे असा अर्थ आहे.

१३५. तटस्थलक्षणाभास ईश्वर - (वर टीप क्र. ७९ पहा)

१३६. आरूढलक्षणाभास जीव - (वर टीप क्र. ७८ पहा) (टीपा.पा.२२)

१३७. व्यष्ट्युपाधी अविद्यारूप कारण शरीरावर जो अहं तादात्म्याने आरूढ - पिंडाची जी मूल अविद्या ते व्यष्टि कारण शरीर असे पुढे दिले आहे. हे व्यष्टि अविद्यारूप कारण शरीर ज्या चेतनाची उपाधी असून जे चेतन त्या उपाधीलाच अहं म्हणून तादात्म्याने असते म्हणजे जे चेतन त्या उपाधीचे ठिकाणी (अहंतादात्म्य ह्या अर्थाने) आरूढ असते त्या चेतनाला प्राज्ञ म्हणावे. (उपाधीशी तादात्म्याने असणे ह्यालाच वर मूळात आरूढ म्हटले आहे.)

१३८. अविद्यापरिणतान्तःकरणारूढ - अविद्येपासून परिणाम पावलेले जे अंतःकरण त्याचेवर आरूढ म्हणजे त्याच्याशी तादात्म्य पावणारे जे ब्रह्म.

१३९. तत्समष्टि हिरण्यगर्भ - त्या तैजस जीवांची जी समष्टि तो हिरण्यगर्भ.

१४०. सप्रतिबंधान्तःकरण परिणतस्थूळारूढ - सप्रतिबंध म्हणजे महावाक्य बोधरहित जे अंतःकरण त्यापासून परिणाम पावलेले जे स्थूल शरीर त्यावर आरूढ म्हणजे त्याचेशी तादात्म्याने असणारे. महावाक्य बोध झालेल्या अंतःकरणाशी ब्रह्माचे तादात्म्य होत नाही व जीव मुक्त होतो असा भाव. प्रतिबंध शब्दाचा अर्थ ओवी १३ खाली पहावा.

१४१. तत्समष्टि विराटारूढ - तत् म्हणजे स्थूल शरीर त्यांची जी समष्टि ते विराट शरीर त्यावर आरूढ.

१४२. भौतिक स्त्री पुरुषादिपासून होणारे योनिज - स्त्री पुरुषादिपासून उत्पन्न होणारे जे भौतिक शरीर ते योनिज असा अन्वय. (भौतिक शब्दापुढे विराम घ्यावा.)

२९

१४३. दैविक. सत्कर्मभावनेपासून उत्पन्न होणारे अयोनिज सत्कर्माच्या भावनेपासून उत्पन्न होणारे म्हणजे सत्कर्मरूप फळ होण्याकरता जे सकर्म चिंतन त्यापासून उत्पन्न होणारे जे दैविक शरीर ते अयोनिज. भावना शब्दाचा अर्थ. ओवी १२ खाली पहावा. (दैविक शब्दापुढे विराम घ्यावा.)

१४४. तदाश्रित अवस्था - तत् म्हणजे (देह) शरीर त्याचा आश्रय केला आहे. ज्यांनी अशा अवस्था. (टीपा.पा.२३)

१४५. वर्तन - वागणूक, आचरण, अनुकूल भोग्याचे ग्रहणाची प्रवृत्ति व प्रतिकूल भोग्याचे त्यागाची प्रवृत्ति. भोग्य म्हणजे सुखदुःख देणारे पदार्थ

१४६. निद्रा परिणत इ. निद्रेपासून परिणाम पावलेले जे भोग्य पदार्थ त्यांना अनुसरून जे वासनेचे वर्तन.

१४७. भोग्याभावसुखानुसार - भोग्याभावविशिष्टसुखानुसार - भोग्याचा अभाव असलेले सुख म्हणजे भोग्यावाचून जे सुख, त्याला अनुसरून.

१४८. प्रज्ञावर्तन - बुद्धीचे वर्तन, येथे 'वर्तन' शब्द जागृत स्वप्न सुषुप्ति ह्यांच्या लक्षणातील शब्द साम्याकरता घेतला आहे. वस्तुतः 'वर्तन' शब्दाचा अर्थ असणे किंवा संस्कार असा घ्यावा. सुषुप्तिमध्ये आचरण नसते, सुखसंस्कारमात्र (केवळ सुखाचा संस्कार असलेली) म्हणजे सुख असलेली बुद्धी असते. सुखाचे ग्रहण देखील नसते.

१४९. जागृतसमष्टि :- (महाप्रलयानंतर पुन्हा) सर्व जीवांची जागृति म्हणजे उत्थान. म्हणजे भोग्यपदार्थानुसार त्यांच्या देहेंद्रियादिकांचे वर्तन तेच जगदुत्पत्ति.

१५० स्वप्नसमष्टि - सर्व जीवांचे स्वप्न; महाप्रलयरूप समष्टि निद्रेनंतर सर्व जीवांचे उत्थान झाल्यावर त्या समष्टि निद्रेपासून परिणत असे जे जगद्रूप भोग्य त्याला अनुसरून सर्व जीवांची जी वासनाप्रवृत्ति तीच जगतस्थिति. जगत् हे समष्टि जीवांचे स्वप्न आहे. असा अभिप्राय.

१५१.सुषुप्ति समष्टि - सर्व जीवांची सुषुप्ति म्हणजे महाप्रलय.

१५२. व्यापारवान - व्यापार असणारे. व्यापार - जो कारणापासून उत्पन्न होऊन कार्याला उत्पन्न करतो त्याला व्यापार म्हणतात. जसे जेथे मडक्याचे दोन भाग जुळवून मडके करतात तेथे मडक्याचे भाग हे कारण आहे, मडके हे कार्य आहे व मडक्यांच्या भागांची जुळणी हा व्यापार आहे. ही जुळणी मडक्यांच्या भागापासून (कारणापासून) स्वतः उत्पन्न होते व मडक्याला (कार्याला) उत्पन्न करते - म्हणून.

१५३. असाधारण - सर्व कार्यांचे कारण त्याला साधारण कारण म्हणावे व कोण्या

एका कार्याचे कारणाला असाधारण कारण म्हणावे.

१५४. कारण - कारणाचे लक्षण ओवी १० खाली दिले आहे.

१५५. व्यष्टयाश्रित - व्यष्टीच्या आश्रयाने असलेले; व्यष्टि म्हणजे व्यष्टि जीव चेतन.

१५६. संस्कारज्ञान - पदार्थाच्या संस्काराचे ज्ञान.

१५७. अंतःकरण - येथे पहिले अंतःकरण हा शब्द अंतररूप करण ह्या सामान्य व्यापक अर्थाने घेतला. देहाचे आत म्हणून अंतर, ज्ञानसाधन म्हणून करण.

१५८. निर्विषय व्यष्टिस्फुरण - व्यष्टीचे (व्यष्टिचेतनाचे) व्यष्टि जीवाचे जे विषय रहित स्फुरण.

१५९. अहंग्रह - आत्म्याचे आत्म्याने 'अहं' असे जेम ग्रहण तो अहंकार हे अहंकाराचे लक्षण खाली अधिक स्पष्ट केले आहे. (टीप क्रमांक १६४ पहा)

२६०. चित्तदोष प्रकारचे - येथे चित्त शब्द केवळ चिंतन ह्या अर्थात घेतला नसून 'अंतररूपकरण' ह्या सामान्य अर्थात घेतला आहे. ह्याच सामान्य अर्थात अंतःकरण, बुद्धि, मन, चित्त हे शब्द वेदान्त ग्रंथातून वापरलेले आढळतात. येथेही सामान्य अर्थात वापरलेले 'अंतःकरण व 'चित्त' हे शब्द वरील आशय सुचवितात.

१६१. भाग किंवा विकार - असे म्हणण्याचे कारण पुढे स्पष्ट केले आहे.

१६२. तत्तदाकृत्यवधारणामात्रे करून जाणारी - निरनिराळ्या आकृतीचा निश्चय करणारी. अवधारणा निश्चय. ह्यात बुद्धीचे स्वरूप दाखविले.

१६३. अहंप्रत्ययावच्छिन्नावलंबी - 'अहं' असा जो प्रत्यय त्याने अवछिन्न म्हणजे मर्यादित असा जो आत्मा त्याचा अवलंब करणारी. ह्यात बुद्धीचे स्थान दाखविले.

१६४. चित्तात प्रतिबिंबित आत्मा ई. - चित्तात प्रतिबिंबित आत्मा तेवढ्याच भागापुरता म्हणून चित्ताच्या (टीपा.पा.२४) थोड्या भागाने विशिष्ट म्हणजे युक्त होऊन त्यावर आरूढ होतो म्हणजे त्या भागाशी तादात्म्य करतो म्हणजे त्यालाच मी म्हणतो तेव्हा त्या अशा आत्म्याला 'अहंकार' म्हणतात. वर जे अहंकाराचे लक्षण थोडक्यात 'अहंग्रह' असे केले त्याचा हाच अर्थ आहे. आत्म्याने चित्ताला अहं' म्हणून ग्रहण करणे तो अहंग्रह म्हणजे अहंकार. (टीप क्रमांक १५९ पहा)

१६५ कामादि - काम, क्रोध, लोभ वगैरे.

१६६. व्यापक चित्ताच्या अपेक्षेने - चित्तव्यापक असून त्यापैकी मर्यादित चित्ताच्या अल्पतेने युक्त झाल्यामुळे.

१६७. आत्मलाभ - आत्मज्ञान.

१६८. प्राणसंयोग व्यापार आहे - प्राण करणांशी संयुक्त होऊन त्या करणांचे कार्य घडवितो म्हणून करणाशी प्राणाचा संयोग हा व्यापार.

३०

१६९. क्रियमाण व कर्त्राश्रित कर्म ह्यातील भेद - कर्त्राश्रित कर्म कर्त्याचे स्वाधीन असते. (करील किंवा न करील.) क्रियमाण कर्म परिस्थितीचे स्वाधीन असते (केलेच पाहिजे असे.)

१७०. भोग्यतृप्ति - भोग्याची तृप्ति म्हणजे प्रयोजन पूर्ति. जो भोग्य पदार्थ भोक्त्याला ज्या करता पाहिजे असेल ते प्रयोजन पूर्ण होणे तोच भोग.

१७१. मिश्रभावनेने - सदसत् भावनेने.

१७२. मिश्रजनक - सुखदुःखजनक.

१७३. आप्तदर्शितनित्यनुसार - आप्ताने सांगितलेल्या नीतीप्रमाणे. आप्ताचे लक्षण ओवी १५ खाली पहावे.

१७४. फलासाठी - सिद्धिसाठी.

१७५. अंतवाहक - सूक्ष्म.

मूळ ओवी ९

स्वांगाश्रित कर्म । नवविध असें परम ॥
प्रतिबंध धर्म । चतुर्विध ॥९॥

टीका

स्वांगाश्रित कर्म जे पापपुण्यविमिश्रभेदांनी सांगितलें तें प्रत्येक तीन प्रकारचें आहे. त्रिविध मिळून नवविध आहे. फलावरून त्याचें अनुमान होते. आणि कर्तृकालीं प्रत्यक्ष असतें. *(तक्ता १२५)*

पुण्य

१५५/९.पुण्य- उत्तम, मध्यम सामान्य भेदानें तीन प्रकारचें आहे.
१५६/९.उत्तमपुण्यानें हिरण्यगर्भशरीर फल प्राप्त होते.
१५७/९.मध्यमपुण्यानें इंद्रादिशरीरफलप्राप्ति होते. आणि
१५८/९.सामान्य पुण्यानें यक्षगंधर्वादिशरीरफलप्राप्ति होते.

पाप

तसेंच पापही तीन प्रकारचें आहे.
१५९/९.उत्कृष्ट पापानें नरकप्राप्ति होते.
१६०/९.मध्यम पापानें परपीडादायक प्राण्यांची प्राप्ति[१७६] होते.
१६१/९.सामान्य पापानें गवाश्वपशुपक्षीशरीरफलप्राप्ति होते.

मिश्रकर्म तीन प्रकारचें आहे.

मिश्रकर्म

१६२/९.उत्तम मिश्रकर्मानें मोक्षसामग्न्यनुरूप मनुष्यशरीरप्राप्ति होतें.

१६३/९.मध्यम मिश्रकर्मानें वर्णाश्रमकर्मानुकूल नरशरीरप्राप्ति होते.(य१३-३४)

१६४/९.सामान्य मिश्रकर्मानें पापकर्मानुकूल चाण्डालादि मनुष्यशरीर प्राप्त होतें.

प्रतिबंध

प्रतिबंध[१७७] चार प्रकारचा आहे. *(तक्ता १२६)*

भूतप्रतिबंध, वर्तमानप्रतिबंध, भावीप्रतिबंध आणि प्रवृत्ति प्रतिबंध.

१६५/९.भूतप्रतिबंध -

श्रवणकालीं[१७८] जो पूर्वानुभूतविषयासंप्रमोष[१७९] तो भूतप्रतिबंध.

१६६/९.बुद्धिमाद्यांदिक **वर्तमानप्रतिबंध.**

१६७/९.शरीरादिकांची प्रतिकूलता आणि प्रारब्धशेषता[१८०] तो **भावी प्रतिबंध.**

१६८/९.वेदान्त श्रवण करीत असतांनाही सत्य-वैकुंठ-कैलासादि लोकांची इच्छा होणे तो **प्रवृत्तिप्रतिबंध.**

१७६. प्राण्यांची प्राप्ति - प्राण्यांच्या शरीराची प्राप्ति असा अर्थ.

१७७. प्रतिबंध - 'महावाक्याच्या बोधाला अडथळा करणारे' असा अर्थ ओवी १३ खाली केला आहे.

१७८. श्रवणकाली - वेदान्तश्रवण काली.

१७९. पूर्वानुभूतविषयासंप्रमोष - पूर्वी अनुभवलेल्या विषयांची स्मृति. असंप्रमोष = स्मृति.

१८०. प्रारब्धशेषता - प्रारब्ध उरले असणे.

मूळ ओवी १०

संबंध तो त्रिप्रकार । त्रिविध ताप साचार ।
चिन्निरोध त्रिप्रकार । कारण द्वय ॥१०॥

टीका

१६९/१०.वस्तूची जुळणी **संबंध** म्हणावा.*(तक्ता १२९)*

तो तीन प्रकारचा आहे. **संयोग, समवाय आणि तादात्म्य.**

१७०/१०.संयोगसंबंध - वस्त्वेकदेश[१८१] वस्त्वन्यदेश समानाधिकरण तो संयोगसंबंध म्हणावा.

१७१/१०.समवायसंबंध - कारणाचे ठायीं कार्य होण्याचा जो संबंध तो समवायसंबंध[१८२].

१७२/१०.तादात्म्यसंबंध - अन्यस्वरूपाला[१८३] व्यापून अंतर्बाह्य संबंध तो तादात्म्यसंबंध.

तत्पुरस्कारी[१८४] ताप तीन प्रकारचा -

आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक.**(य१३-३५)**

मूळ तक्ता क्र.८
ओवी १० पा.३६



१७३/१०.स्वतःपासून स्वतःला जो ताप तो **आध्यात्मिक.**

तो चतुर्विध आहे. शारिरिक, ऐंद्रिक, वायवीय आणि मानसिक.

१७४/१०.शारीरिक - वातपित्तकफक्षोभानें जो ताप तो शारिरिक.

१७५/१०.ऐंद्रिक - बधिरांधत्वादिक जो इंद्रियाशक्तिप्रादुर्भाव[१८५] तो ऐंद्रिक.

१७६/१०.वायवीय - क्षुधातृषादिजन्य जो ताप तो वायवीय.[१८६]

१७७/१०.मानसिक - प्रियवियोग[१८७] आणि अप्रियसंयोगजन्य जो ताप तो मानसिक.

१७८/१०.सर्व भूतांपासून जो ताप तो **आधिभौतिक.**

सर्प व्याघ्र चोर इत्यादि साधनें करून त्याचे अनंत प्रकार आहेत.

१७९/१०.देवताक्षोभापासून जो ताप तो **आधिदैविक** म्हणावा.

ऐहिक आणि आमुष्मिक भेदानें त्याचे दोन प्रकार आहेत.

१८०/१०.ऐहिक - या लोकीं ग्रहपीडादिकांनीं[१८८] होणारा ऐहिक ताप होय.

१८१/१०.आमुष्मिक - आणि मरणपश्चाद्यमयातना तो आमुष्मिक ताप.

१८२/१०.ताप -

सद्वेषभोक्तृसंबंधहेतुक-[१८९]प्रतिकूलवेदना-[१९०]परिणाम ताप म्हणावा. तत्पुरस्कारि चिन्निरोध[१९१] तीन प्रकारचा आहे.

चिन्निरोध

१८३/१०.चिन्निरोध - परब्रह्माचें अध्यारोपापवादांनीं जें नानात्व तो चिन्निरोध [१९२] ह्मणावा. *(तक्ता १२९)*

त्याचें त्रैविध्य आहे. अध्यात्म,अधिभूत आणि अधिदैव.**(य१३-३६)**

१८४/१०.अध्यात्मचिन्निरोध - प्रतिबंधानें[१९३] मर्यादित होऊन जो साहंचिन्निरोध तो अध्यात्म.

१८५/१०.अधिभूत चिन्निरोध- प्रतिबंधरूप[१९४] आणि दृष्ट निरहंचिन्निरोध तो अधिभूत.

१८६/१०.अधिदैव चिन्निरोध- प्रतिबंधानें[१९५] अमर्यादित असून सज्ञानसाहंपूर्वक चिन्निरोध तो अधिदैव.

तद्धेतु[१९६] कारण द्विविध आहे.

कारण

१८७/१०.कारण - कार्यलैन्याधिष्ठाननियतपूर्ववृत्ति[१९७] अनन्यथा[१९८] सिद्ध वस्तूस कारण ह्मणावें.

त्याचे उपादान आणि निमित्त हे दोन भेद आहेत.

१८८/१०.उपादान कारण - कार्याचे उत्पत्ति स्थिति आणि लय ज्या कारणाचे ठायीं राहतात ते उपादान कारण.

तेंही त्रिविध आहे. आरंभक, परिणामी आणि विवर्ती.

३२

मूळ तक्ता क्र.९
ओवी १० पा.३७



१८९/१०.आरंभक - समवायसंबंधाने स्वसंयोगारंभ[१९९] करणें तें आरंभक यथा परमाणुद्वैणुकादि.

१९०/१०.परिणामविवर्त[२००] व्याख्या पूर्वी केल्याआहेत त्या पाहाव्या.(ओवी ५ पहा)

१९१/१०.निमित्त कारण - उपादाहून भिन्न आणि कार्यास अवश्य लागणारें निमित्त कारण. ते दोन प्रकारचे आहे. दृष्ट आणि अदृष्ट.

१९२/१०.दृष्ट - रूपपदार्थसदृश[२०१] जें निमित्तकारण तें दृष्ट, जसें घटप्रति कुलाल. (य१३-३७)

१९३/१०.अदृष्ट - सरूप कार्यास रूपरहित जें निमित्त कारण तें अदृष्ट[२०२] जसा समुद्रतरंगाप्रत वायु.

---

१८१. वस्त्वेकदेश वस्त्वन्यदेश समानाधिकरण - वस्तूचा एक देश व वस्तुचा दुसरा देश त्यांचे समान अधिकरण असणे. एका वस्तुचा एक भाग व त्याच किंवा दुसऱ्या वस्तुचा दुसरा भाग ह्यांचे समान म्हणजे एकच अधिकरण म्हणजे स्थान असणे. एकाच ठिकाणी (एकाच किंवा दोन वस्तुंचे) दोन भाग येणे. (वस्तूच्या जवळजवळच्या अवयवांचा एकमेकाशी संयोग संबंध असतो.)

१८२. समवायसंबंध - समवायसंबंध म्हणजे नित्यसंबंध. कारणाचे ठिकाणी कार्य होण्याचा नित्य संबंध आहे अशा अभिप्रायाने त्याचा समवाय संबंध येथे घेतला. अवयव-अवयवी; जाति-व्यक्ति; गुण-गुणी ह्यांचा समवाय संबंध नैय्यायिक मानतात. पण येथे कारण व कार्य ह्या पदार्थाच्या संबंधाचे समवाय म्हणून ग्रहण केले आहे व ह्यात वरील तिन्ही पदार्थाचे संबंध अंतर्भूत होतात.

१८३. अन्य स्वरूपाला व्यापून - एका स्वरूपाने दुसऱ्या स्वरूपाला व्यापून त्या

दोन स्वरूपांचा जो परस्पर अंतर्बाह्य संबंध तो.

१८४. तत्पुरस्कारी - त्याला अनुसरणारा; संबंधामुळे होणारा असा अर्थ.

१८५. इन्द्रियाशक्तिप्रादुर्भाव- इंद्रियांची अशक्ति उत्पन्न होणे.इंद्रिये अशक्त होणे.

१८६. वायवीय - वायूपासून उत्पन्न होणारा.

१८७. प्रियवियोग - प्रियवियोगजन्य.

१८८. ग्रहपीडादिकांनी - ग्रह - नवग्रह. आदिशब्दाने इतर देवतापासून होणाऱ्या पीडा घ्याव्या.

१८९. सद्वेषभोक्तृसंबंधहेतुक - द्वेषासह भोग्याचा जो भोक्त्याशी संबंध तो (संबंध) आहे हेतु म्हणजे कारण ज्याचे. भोक्त्याला द्वेष्य अशा भोग्याचे प्राप्तीने होणारा.

१९०. प्रतिकूलवेदनापरिणाम - भोक्त्याला प्रतिकूल अशा वेदनेचा म्हणजे जाणिवेचा परिणाम.

१९१. तत्पुरस्कारी चिन्निरोध - तापपुरस्कारी चिन्निरोध

१९२. चिन्निरोध - चित् म्हणजे ब्रह्म त्याचा निरोध म्हणजे अभान ज्याने होते असे नानात्व; अध्यारोपापवादाने ब्रह्माचे ठिकाणी प्रपंचाचे भान होणे असे मागे ओवी २ खाली सांगितले आहे त्या प्रमाणे. संपूर्ण प्रपंच हाच चिन्निरोध होय.

१९३. प्रतिबंधाने मर्यादित. होऊन जो साहंचिन्निरोध तो अध्यात्म - 'महावाक्याच्या बोधाला अडथळा करणारे' त्याला प्रतिबंध असे ओवी १३ खाली म्हटले आहे व चिन्निरोध म्हणजे नानात्व तेव्हा वरील लक्षणाचा अर्थ असा :- महावाक्याचा बोध होऊ न देणाऱ्या अशा प्रतिबंधाने चेतन मर्यादीत होऊन अहं प्रतीति असून जे नानात्व त्याला अध्यात्म चिन्निरोध म्हणावे. आध्यात्मिक सृष्टि हाच अध्यात्म चिन्निरोध होय.

१९४. प्रतिबंधरूप आणि दृष्ट निरहंचिन्निरोध तो अधिभूत - आधिभौतिकसृष्टि हा अधिभूत चिन्निरोध होय. ती सृष्टि स्वतःच महावाक्य बोधाला अडथळा करणारी आहे, दृष्ट आहे. तिच्यात अहंची प्रतीति नाही व नानात्व आहे म्हणून.

१९५. प्रतिबंधाने अमर्यादित असून सज्ञानसाहंपूर्वक चिन्निरोध ज्या नानात्वात महावाक्याचे बोधाला अडथळा होत नाही, महावाक्याचा बोध आहे व अहंची प्रतीति आहे तो अधिदैव चिन्निरोध म्हणावा. महावाक्याच्या बोधाने अन्वयाने जे नानात्वाचे भान.

१९६. तद्धेतुकारण - तत् म्हणजे चिन्निरोध त्याला जे हेतु ते कारण. सर्व कार्य कारणव्यवहार हा चिन्निरोधाला म्हणजे ब्रह्माचे ठिकाणी नानात्व भान होण्यालाच हेतु होतो असा भाव.

१९७. कार्यलैन्याधिष्ठान नियतपूर्ववृत्ति - कार्यलैन्याधिष्ठान व नियतपूर्ववृत्ति अशी

दोन पदे अलग घ्यावीत. कार्यलैन्याधिष्ठान - कार्याचे लैन्य म्हणजे लीनता ज्याचे ठिकाणी होते असे अधिष्ठान. (ज्या अधिष्ठानाचे ठिकाणी कार्य लीन होते असे) (टीपा.पा.२८)

नियतपूर्ववृत्ति - कार्याच्या (नियत) नेहमी (पूर्ववृत्ति) पूर्वी असणारे. कारणाच्या लक्षणात येथे 'कार्यलैन्याधिष्ठान' हे जे पद घातले आहे ह्याचा उद्देश, ज्ञायावत् सर्व कार्यांचे 'ब्रह्म' हेच विवर्तोपादान व निमित्त कारण असून सर्व कार्ये ब्रह्माचेच ठिकाणी लीन होतात, हे सुचविण्याचा आहे.

१९८. अनन्यथासिद्ध - अन्यथासिद्ध म्हणजे कार्य होण्यास अनावश्यक; व अनन्यथासिद्ध म्हणजे कार्य होण्यास आवश्यक. एखादा पदार्थ कार्याला जरी नियतपूर्ववृत्ति असला पण ते कार्य होण्यास जर तो आवश्यक नसला तर तो अन्यथासिद्ध म्हणावा. जसे घटाला कुंभाराचा बाप वगैरे.

१९९. स्वसंयोगारंभ करणे - स्व म्हणजे परमाणु द्वैणुक वगैरे त्यांच्या संयोगाचा आरंभ करणारे जे कारण परमाणु द्वैणुक वगैरे. संयोगाचा आरंभ करणे हे जे कार्य ते होण्याचा संबंध परमाणु द्वैणुक वगैरे कारणांचे ठिकाणी असल्यामुळे समवाय संबंधाने असे म्हटले आहे. समवाय संबंधाचे लक्षण ह्याच ओवीत वर आले आहे.

२००. परिणामविवर्तव्याख्या - परिणाम व विवर्त ह्यांच्या व्याख्या.

२०१. रूपपदार्थसदृश - ज्या पदार्थास रूप आहे ते रूपपदार्थ. त्या रूपपदार्थासारखे. कुलाला - कुंभार हा वस्तुतः जीव-रूपाने रूपपदार्थ नाही. ज्या शरीराचा तो अभिमान धारण करतो त्या शरीराच्या रूपाने त्याला रूप आले आहे म्हणून येथे रूपपदार्थासदृश असे म्हटले आहे.

२०२. अदृष्टनिमित्तकारण - जेथे अरूपकार्यास रूपसहित निमित्त कारण असते तेथे कार्यच अदृष्ट असल्यामुळे कारणही रूपरहित म्हणून अदृष्ट आहेच पण जेथे कार्य सरूप आहे व कारण मात्र रूपरहित आहे तेथेही ते रूपरहित कारण अदृष्ट होय असा भाव.

मूळ ओवी ११

तीन प्रकारें परिच्छेद । पुटी ते असे त्रिविध ।
अंतरंग साधन त्रिविध । वाक्य द्विविध तत्वृत्ति त्रिधा ॥११॥

टीका

१९४/११.चिन्निरोधास(२०३) जी मर्यादा लागते तिला **परिच्छेद**

म्हणतात.

तो (**परिच्छेद**) देश, काल, वस्तुभेदानें तीन प्रकारचा आहे.

मूळ तक्ता क्र.१०
ओवी ११ पा.३८



देश परिच्छेद

१९५/११.देशपरिच्छेद - पदार्थांस बाह्यांतरकक्षा[२०४] तो देशपरिच्छेद.

त्याचे पुन्हा तीन प्रकार आहेत.

*** अधिष्ठानरूप, आधाररूप** आणि **विजनरूप.**

१९६/११.पदार्थधारी[२०५] तो **अधिष्ठानरूप.**

१९७/११.सोपादान[२०६] पदार्थाभिन्न प्रतीयमान तो **आधाररूप.** आणि

१९८/११.पदार्थानें[२०७] जो रिक्त तो **विजनरूप.**

काल परिच्छेद

१९९/११.कालपरिच्छेद - साद्यंत[२०८] मर्यादा बांधणारा तो कालपरिच्छेद.

तो **अतीत, वर्तमान, अनागत**[२०९] भेदानें त्रिविध आहे.

२००/११.झालेल्या क्रियेचा मर्यादास्थापक[२१०] तो **अतीत.**

२०१/११.चालू क्रियेचा मर्यादास्थापक तो **वर्तमान.** आणि -

२०२/११.भावी क्रियेचा मर्यादास्थापक तो **भविष्य.**

वस्तु परिच्छेद

२०३/११.वस्तुपरिच्छेद -

ब्रह्मविवर्त[२११] मायापरिणत[२१२]मात्रामर्यादित[२१३] तो वस्तुपरिच्छेद. तो द्विविध आहे. दृश्यरूप आणि द्रष्टृरूप.

२०४/११.दृश्यरूप - इदंत्वेंकरून[२१४] अहंप्रत्ययानवच्छिन्न[२१५] साक्षिभास्य[२१६] तो दृश्यरूप.

तो पुन्हा द्विविध आहे. **शक्तिरूप** आणि **गुणरूप.**

२०५/११. शक्ति - वस्तुप्राकट्यस्थित्याद्यन्तर[२१७] ती शक्ति ह्मणावी.

तिचे द्रव्य क्रिया इच्छा भेदानें तीन प्रकार आहेत.

२०६/११. कार्यरूप आणि दृष्ट अचल **द्रव्यशक्ति.**

२०७/११. कार्यरूप आणि दृष्ट चल **क्रियाशक्ति.**

२०८/११. कार्यरूप आणि अहंतादात्म्यविषयिणी[२१८] **इच्छाशक्ति.**

२०९/११.या शक्तींचें जें अव्यक्तत्व[२१९] तो **गुणरूप वस्तुपरिच्छेद** म्हणावा.

त्याचें सत्त्वरजतमभेदानें त्रैविध्य आहे.

२१०/११. सत्त्व गुणरूप - विषयरहित जें भावतादात्म्येंकरून वृत्तिस्फुरण तें सत्त्व[२२०]

२११/११. रज गुणरूप - सविषय भाव-तादात्म्येंकरून वृत्तिस्फुरण तें रज.[२२१]

२१२/११. तम गुणरूप - स्थापनासहित[२२२] सविषय भावतादात्म्येंकरून दृष्टाहं लुप्त तत्तेदंताप्रतीयमान तें तम.[२२३]

२१३/११. द्रष्टृरूप वस्तुपरिच्छेद - फलव्याप्तिसहित[२२४] वृत्तिनिष्ठचेतनाभास[२२५] द्रष्टृरूप वस्तुपरिच्छेद ह्मणावा. कारण साक्षीचे ठिकाणीं द्रष्टादृश्याचा बाध होतो ह्मणून. ''तैसें दृश्य कां द्रष्टा । या

दोन्ही दशा वांजटा ॥'' अमृ॰ तात. **(य१३-३९)**

२१४/११. पुटी - चिन्निरोध[२२६] जी परस्परसापेक्ष मर्यादा ती पुटी म्हणावी.

ती ज्ञाता-ज्ञान-ज्ञेयादि भेदानें त्रिविध आहे. *(तक्ता १३२)*

२१५/११. पदार्थांस जाणणारा तो **ज्ञाता.**

२१६/११. ज्ञातृशक्ति[२२७] तें **ज्ञान.** आणि

२१७/११. ज्ञानसंस्कारपरिणामी[२२८] **ज्ञेय.**

२१८/११. अंतरंग - ज्ञात्यास स्वरूपज्ञान[२२९] करून देणारें जें साक्षात् साधन तें अंतरंग ह्मणावे. *(तक्ता.१३३)*

त्याचे तीन प्रकार आहेत. श्रवण, मनन आणि निदिध्यास.

२१९/११. श्रवण - गुरुशास्त्रांच्या योगानें श्रोत्रकर्णवाक्यसंयोग[२३०] ते श्रवण.

२२०/११. गुरु - श्रोत्रिय[२३१] ब्रह्मनिष्ठ पूर्णानुभवी तो गुरु.

२२१/११. शास्त्र - आप्तप्रणीत[२३२] आणि श्रुत्यनुकूल तें शास्त्र.

२२२/११. शांकर वेदान्तात प्रस्थानत्रयास **शास्त्र** ह्मणतात.

२२३/११. विशिष्टाद्वैतांत विष्णुपुराण आणि प्रस्थानत्रय या चतुष्टयास **शास्त्र** ह्मणतात.

२२४/११. शुद्धाद्वैतांत प्रस्थानत्रय आणि भागवत या चतुष्टयास **शास्त्र** म्हणतात.

२२५/११. द्वैतमतांत वेद, भारत, पंचरात्रागम, रामायण आणि एतदनुकूल जें अन्य त्यास **शास्त्र** ह्मणतात.

ही व्याख्या स्कंदपुराणानुसार द्वैतवादीयांनी घेतली आहे ह्मणून ग्राह्य आहे.

२२६/११. श्रुतिसमन्वय[२३३] अर्थाशी साधक आणि विरोधार्थबाधक[२३४] ह्यांच्या योगानें असंभावना[२३५] निवृत्तिपूर्वक श्रुतार्थाचें[२३६] स्थापन तें **मनन.**

२२७/११. मनन केलेल्या अर्थाचें ठायी विपरीतभावनानिवृत्तिपूर्वक जी वृत्तिधारा[२३७] तो **निदिध्यास.**

हे साधनत्रय पूर्वोक्त विवेकादि[२३८] साधनचतुष्टयापेक्षेनें अंतरंग आहे.

तद्योग्य श्रुतिवाक्यें दोन प्रकारची आहेत.

अवांतर वाक्यें आणि महावाक्ये. *(तक्ता १३४)*

२२८/११. परोक्षब्रह्मबोधक[२३९] तीं **अवांतर वाक्यें** आणि

२२९/११. अपरोक्ष[२४०] ब्रह्मबोधक तीं **महावाक्यें** होत.

२३०/११. वाक्य - पूर्णार्थ सांकेतिक[२४१] कार्यबोधक[२४२] शब्दसमुहास वाक्य ह्मणतात.

महावाक्याश्रित[२४३] वृत्ती तीन प्रकारच्या आहेत.

शक्ति, लक्षणा आणि गौणी.

मु.त.क्र.११
ओवी १० पा.४१



२३१/११. शक्तिवृत्ति - वाक्याचा स्पष्ट अर्थ जो मनांत येतो ती शक्तिवृत्ती.

ती दोन प्रकारची आहे. रूढी आणि योग.

२३२/११. रूढी - संज्ञासंज्ञीसंकेतप्रवृत्ति[२४४] ती रूढी.

२३३/११. योगवृत्ति - प्रकृतिप्रत्यययोजनारूप[२४५] ती योगवृत्ति. जसें पंकज पाचक इत्यादि.

२३४/११. शक्यसंबंधी[२४६] **लक्षणावृत्ति**. ती चार प्रकारची आहे. जहत्, अजहत्, जहदजहत् आणि लक्षित.

२३५/११. १.समस्त शक्त्यर्थत्याग ती **जहत्.**

२३६/११. २.शक्त्यर्थासहित अन्यसंबंधी[२४७] अर्थाचें ग्रहण ती **अजहत्.**

२३७/११. ३.भागत्याग[२४८] ती **जहदजहत्,**

२३८/११. ४.वाचकशब्दान्तरबोध[२४९]पूर्वक शक्यसंबंधी ती **लक्षितलक्षणा** ह्मणावी.

२३९/११. उदाहरण - द्विरेफ = भ्रमर तो कमलाचे ठायीं वर्तन करतो इत्यादि.

इतर लक्षणांच्या व्याख्या अन्य ग्रंथांत प्रसिद्ध आहेत त्या पहाव्या.

२४०/११. गुणोत्साहउद्देशवाच्यबोधक[२५०] ती **गौणी.** जसें सिंह देवदत्त.

२४१/११. वृत्ती - शब्दाचे ठायीं अर्थाचें वर्तन[२५१] ती वृत्ति होय. **(य१३-४१)**

---

२०३. चिन्निरोधास - ब्रह्माचे ठिकाणी भासणाऱ्या नानात्वास.

२०४. बाह्यांतरकक्षा - बाहेरची व आतील मर्यादा.(टीपा.पा.२९)

२०५. पदार्थधारी - पदार्थाला धारण करणारा, ज्या ठिकाणी पदार्थ राहतो तो.

२०६. सोपादान पदार्थाभिन्नप्रतीयमान - आपल्या उपादान कारणासह जो पदार्थ त्या पदार्थाशी अभिन्नपणे ज्याची प्रतीति असते तो. (पदार्था एवढा)

२०७. पदार्थाने जो रिक्त- पदार्थ नसलेला.

२०८. साद्यंतमर्यादा - आदि, मध्य व अंत अशा मर्यादा.

२०९. अनागत - भविष्य.

२१०. मर्यादास्थापक - मर्यादा बांधणारा.

२११. ब्रह्मविवर्त - ब्रह्माचा विवर्त म्हणजे दुसरे रूप. (विवर्ताचे लक्षण ओवी ५ खाली आले आहे.) पुढे माया परिणत म्हटल्यामुळे येथे अध्यस्त विवर्त समजावे.

२१२. मायापरिणत - मायेपासून परिणाम पावलेला (परिणामाचे लक्षण ओवी ५ खाली आले आहे.) माया परिणत ह्याचे पुढे शब्द तोडावा.

२१३. मात्रामर्यादित - 'मातृ' म्हणजे 'प्रमातृ' त्या शब्दाची तृतीया 'मात्रा'. प्रमात्याने मर्यादित असा अर्थ. (अथवा मात्रा म्हणजे शब्द; स्पर्श वगैरे जे सूक्ष्म विषय त्यांनी मर्यादित. ह्या अर्थात 'प्रमेयाने मर्यादित' असे होईल. प्रमाता व

३६

प्रमेय हे एकमेकाला मर्यादा करणारे असल्यामुळे कोणताही अर्थ घेता येईल. दृश्यरूप वस्तुपरिच्छेदात मात्रा म्हणजे शब्दादि विषय असा अर्थ व द्रष्ट्रुरूप परिच्छेदात मात्रा म्हणजे प्रमात्याने असा अर्थ घ्यावा.

२१४. इदंत्वेकरून - 'इदं' म्हणजे 'हे' अशा प्रत्ययाने साक्षीभास्य असा समन्वय.

२१५. अहंप्रत्ययानवच्छिन्न - 'अहं' म्हणजे 'मी' असा जो प्रत्यय त्याने अनवच्छिन्न म्हणजे मर्यादित नसलेला. ज्याचे ठिकाणी 'अहं' 'मी' असा प्रत्यय नाही. परन्तु 'इदं' 'हा' असा प्रत्यय आहे.

२१६. साक्षीभास्य - साक्षीला भासणारा.

२१७. वस्तुप्राकट्यास्थित्याद्यंतर - प्राकट्य म्हणजे अविर्भाव, (टीपा.पा.३०) उत्पत्ति, स्थिती व आदि म्हणजे लय वगैरे. ह्या रूपाने जे वस्तूचे अंतर म्हणजे भेद; उत्पत्ति, स्थिति, लय वगैरे रूपाने जे वस्तूचे भान ती शक्ति म्हणावी.

२१८. अहंतादात्म्य विषयिणी - पदार्थाशी 'अहं' चे जे तादात्म्य ते आहे विषय जिचा. 'मला हे असावे' ह्यात 'मी' व हे ह्यांचे तादात्म्य हा विषय आहे म्हणून 'मला हे असावे' ह्या आकाराची जी - ती इच्छा म्हणावी.

२१९. अव्यक्तत्व - वस्तुरूप परिच्छेद हा मायेचा परिणाम आहे. असे वर म्हटले आहे. माया, सत्व रज व तम अशा रूपाची असून अव्यक्त आहे. सत्व, रज व तम ह्या आपल्या रूपांनी माया जीवास बंधन करते म्हणून सत्व, रज व तम हे बंधन करणारे असल्यामुळे त्यांना गुण म्हणजे 'दोरी' म्हणतात. सत्व; रज तम रूपी माया ही स्वतः अव्यक्त आहे व ह्या मायेचा जो परिणाम ती तिची शक्ति आहे. म्हणून गुण हे शक्तीचे अव्यक्तत्व होय. अव्यक्त गुण हे कारण व व्यक्त शक्ति त्या गुणांचा परिणाम असा अर्थ.

२२०. सत्व - ज्या वृत्तीचे स्फुरणात विषयाचे भान नसते व जी वृत्ति भावाशी म्हणजे केवळ सत्तेशी तादात्मे करून म्हणजे अभिन्न रूपाने स्फुरते त्या वृत्ति स्फुरणास म्हणजे ते वृत्ति स्फुरण ज्याचे योगाने होते त्या अव्यक्त स्वरूपास सत्व म्हणावे. सत्व वृत्तीचे स्फुरण ही अव्यक्त सत्व गुणाची कार्यरूप शक्ति असल्यामुळे त्या वृत्तीलाच सत्व म्हटले आहे.

२२१. रज - विषयाचे भान असून जी सत्तेशी तादात्म्ये करून स्फुरणारी वृत्ति ती रजोगुणाची वृत्ति समजावी.

२२२. स्थापनासहित - स्थापना ह्या शब्दाने स्थिरता असा अर्थ घ्यावा. रजोगुणात जे चांचल्य असते ते तमोगुणात नसते असा भाव.

२२३. दृष्टाहंलुप्ततत्तेदंताप्रतीयमान ते तम - दृष्ट म्हणजे प्रतीत असा जो अहं तो

लुप्त आहे 'तत्तेत' किंवा 'इदंतेत' ('ते' किंवा 'हे' अशा भावात) त्या 'तत्ते' नी किंवा 'इदं'तेनी प्रतीत होणारा जो गुण तो, 'अहं' हे स्फुरण नसलेले (टीपा.पा.३१) 'ते' 'हे' ह्या रूपाने होणारे जे दृष्य विषयाचे भान ते तयाचे व्यक्त स्वरूप समजावे. ह्यात वृत्तीचे सत्तेशी जरी दातात्म्य असले तरी वृत्तिस्फुरण नसते. तम विषयाचे भान, वृत्तीचे सत्तेशी तादात्म्य.

२२४. फलव्याप्तिसहित - वृत्तीत प्रतिबिंबित जे चैतन्य त्याला फल म्हणतात. फलाची जी विषयाचे ठिकाणी व्याप्ति ती फलव्याप्ति म्हणावी. ह्या फलव्याप्तिसह म्हणजे विषयाला (व्यापणारे) प्रकाशित करणारे असे जे वृत्तीत प्रतिबिंबित झालेले चैतन्य त्यासह.

२२५. वृत्तिनिष्ठचेतनाभास - वृत्तीचे ठिकाणी असणारा जो चेतनाचा आभास; म्हणजे विषयाला प्रकाशित करणारा जो वृत्तीत प्रतिबिंबित झालेला चेतनाचा आभास (अहंकार) त्याला द्रष्टा म्हणावे असा अर्थ. कारण शुद्धचेतन जो साक्षी त्याचे ठिकाणी दृष्य किंवा द्रष्टा ह्या दोन्ही दशा नसतात, असे श्रीज्ञानेश्वर महासराज म्हणतात.

२२६. चिन्निरोध जी परस्पर सापेक्ष मर्यादा - परब्रह्माचे जे अध्यारोपापवादाने नानात्व त्याला चिन्निरोध असे ओवी १० खाली म्हटले आहे. हा जो चिन्निरोध म्हणजे नानात्व त्याची एकमेकाने एकमेकाला जी मर्यादा तिला पुटी म्हणावे. ह्या नानात्वाचे ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय असे भेद आहेत म्हणून परस्पराला मर्यादा करणारे हे तीन पुटी म्हणावे.

२२७. ज्ञातृशक्ति - ज्ञात्याची शक्ति. ज्ञान हे ज्ञात्याचीच शक्ति होय असा भाव.

२२८. ज्ञान संस्कार परिणामी - ज्ञानाच्या संस्काराचे परिणामी कारण. ज्ञेयाचे ज्ञान होऊन बुद्धीवर संस्कार होतो म्हणून ज्ञेय हे त्या ज्ञानाच्या संस्काराचे परिणामी कारण होय असा अर्थ.

२२९. स्वरूपज्ञान - (एक सामासिक शब्द) स्वतःच्या स्वरूपाचे ज्ञान.

२३०. श्रोतृकर्णवाक्यसंयोग - श्रोत्याच्या कर्णाशी गुरूच्या किंवा शास्त्रातील वाक्याचा संयोग.

२३१. श्रोत्रीय - शास्त्रज्ञ = अध्यात्मशास्त्राचा (म्ह० प्रस्थानत्रयाचा) अनुभवी)

२३२. आप्त - ओवी. १५ खाली पहावे.

२३३. श्रुतिसमन्वय अर्थाशी साधक - निरनिराळ्या वेदवाक्यांशी एक वाक्यता करून जो अर्थ निष्पन्न होतो त्याला पुष्टि देणारे म्हणजे अनुकूल.

२३४. विरोधार्थबाधक - त्या अर्थाला विरूद्ध अशा अर्थाला बाधक म्हणजे प्रतिकूल.

२३५. असंभावनानिवृत्तिपूर्वक - असंभावनेची निवृत्ति करून.

२३६. श्रुतार्थाचे स्थापन - गुरूशास्त्रापासून ऐकलेल्या अर्थाला निश्चित करणे, कायम करणे.

२३७. वृत्तिधारा - वृत्तीचा अखंड ओघ.

२३८. विवेकादिसाधन चतुष्टयापेक्षेने - विवेकादि जे साधनचतुष्टय त्यांच्या अपेक्षेने.

२३९. परोक्षब्रह्मबोधक - मी ब्रह्म आहे असा अनुभव न येतो ब्रह्माचा बोध करून देणारे. (परोक्ष-अनुभवरहित)

२४०. अपरोक्षब्रह्मबोधक - मी ब्रह्म आहे असा अनुभव येऊन ब्रह्माचा बोध करून देणारे. (अपरोक्ष - अनुभवसहित)

२४१. सांकेतिक शब्द समूह - अमुक शब्दाचा अमुक अर्थ घ्यावा अशी जी इच्छा त्याला संकेत म्हणतात. अशा संकेताने ठरलेले जे शब्द त्यांचा समूह.

२४२. कार्यबोधक - कार्याचा बोध करून देणारा. १ पूर्णार्थ २ सांकेतिक ३ कार्यबोधक ही तीन्ही शब्दसमुहाची विशेषणे आहेत.

२४३. महावाक्याश्रित - महावाक्याचा आश्रय करणाऱ्या.

२४४. संज्ञासंज्ञीसंकेत प्रवृत्ति - संज्ञा (शब्द), संज्ञी (अर्थ) ह्यांचा जो संकेत त्याचे ठिकाणी प्रवृत्ति; शब्दाचा संकेताने ठरलेला जो अर्थ त्याचे ठिकाणी जी शब्दाची प्रवृत्ति.

२४५. प्रकृतिप्रत्यययोजनारूप - शब्दाचे मूळरूप (प्रकृति) व त्यास लागणारा प्रत्यय ह्यांची जी योजना.

पंकज - पंकापासून (चिखलापासून) उत्पन्न होणारे म्हणून कमळ. पाचक - पचविणारे. येथे पंकशब्द, पच्धातु ह्यांना संस्कृतातील प्रत्यय लागून पंकज, पाचक हे शब्द झाले आहेत. (टीपा.पा.३३)

२४६. शक्यसंबंधी - शब्दाच्या शक्तिवृत्तीने जो शब्दाचा अर्थ म्हणजे शब्दांचा जो नेहमी ठरलेला अर्थ त्याला त्या शब्दाचा शक्यार्थ म्हणावे. शक्यार्थाशी संबंध असणारा जो अर्थ त्याचा बोध करणारी शक्यसंबंधी लक्षणा म्हणावी. (टीपा.पा.३४)

२४७. अन्य संबंधी अर्थाचे - शक्त्यर्थाशी (शक्यार्थाशी) संबंध ठेवणाऱ्या अन्य (दुसऱ्या) अर्थाचे उदा. 'भालेजात आहेत' (भाले धारण करणारी माणसे जात आहेत.)

(ह्या वाक्यात 'भाले' हा अर्थ घेऊन त्याशिवाय 'भाले धरणारे' हाही अर्थ आला आहे म्हणून अजहत् व गंगेवरील गौळवाडा' ह्या वाक्यांत 'गंगेवरील' ह्या शब्दाचा सर्वच अर्थ सोडून त्या शब्दाचा 'गंगेच्या तीरावरील' असा अर्थ घेतला

म्हणून जहत्.)

२४८. भागत्याग - जेथे शब्दाच्या शक्य अर्थापैकी एका भागाचा त्याग व एका भागाचे ग्रहण होते तेथे भागत्याग किंवा जहदजहत् (जहत्+अजहत्) लक्षणा म्हणावी. ('तो हा आहे' ह्या वाक्यांत 'तो' ह्या शब्दाचा अर्थ. 'त्या काळचा' किंवा त्या ठिकाणचा मनुष्य' असा आहे. त्यापैकी 'त्या काळचा' 'त्या ठिकाणचा' हा अर्थ सोडला असून 'मनुष्य' तोच घेतला आहे. म्हणून भागत्याग'.)

२४९. वाचक शब्दांतर बोधपूर्वक शक्यसंबंधी - वाचक शब्दाहून इतर जो शब्द तो वाचक शब्दांतर म्हणावा. त्या इतर शब्दाचा बोध करून देऊन शक्यार्थाशी संबंध असणाऱ्या अर्थाचे ठिकाणी प्रवृत्त होणारी लक्षित लक्षणा म्हणावी. उदाहरण - 'द्विरेफ कमळाचे ठायी वर्तन करतो.' ह्या वाक्यांतील द्विरेफ शब्दाचा अर्थ दोन रेफ (रकार) असणारा असा आहे. ह्या अर्थाशी वाक्यांतील बाकीच्या शब्दार्थाशी संबंध जमण्याकरता 'द्विरेफ' शब्दाने दोन रेफ असणाऱ्या अशा दुसऱ्या 'भ्रमर' शब्दाचा बोध करून देऊन द्विरेफ शब्दाच्या शक्यार्थाशी परंपरेने असणाऱ्या 'भ्रमर', 'भुंगा' ह्या अर्थाचा बोध होतो.(टीपा.पा.३५)

२५०. गुणोत्साहउद्देशवाच्य बोधक - 'सिंहो माणवकः' 'माणवक (माणवक नांवाचा मनुष्य) सिंह आहे' ह्या वाक्यांत 'सिंह' शब्दाने वाच्य जो पशुविशेष त्याशी संबंध असणारे जे गुण - उत्साह वगैरे तद्रूप जे वाच्य त्याचा बोध करून देणारी जी वृत्ति ती गौणी म्हणावी.

२५१. अर्थाचे वर्तन - अर्थ असणे.

मूळ ओवी १२

त्रिप्रकार बोलिजे वासना । जग त्रैविध्य जाणा ।
बाधवृत्ति त्रयलक्षणा । भावना त्रय ॥१२॥

टीका

२४२/१२. वासना - स्थूल सूक्ष्म कारण प्रपंचाचे ठायीं संस्कारानुरूप बाह्यवृत्तीची[२५२] धाव ती वासना. *(तक्ता १३६)*

ती तीन प्रकारची आहे. **देहवासना, लोकवासना** आणि **शास्त्रवासना.**

२४३/१२. अहंत्वेंकरून देहरक्षणविषयक जी वृत्ति ती **देहवासना.**

२४४/१२. ममत्वेकरून इह-परत्रभोग्यसुखेच्छा ती **लोकवासना.**

२४५/१२. मोक्षविषयक वृत्ति ती **शास्त्रवासना.**

लोक त्रैविध्य

२४६/१२. वासनाश्रित[२५६] **लोकत्रैविध्य** (जगत्रैविध्य) आहे. - भुः, भुवः, स्वः.*(तक्ता १३७)*

२४७/१२. भूर्लोक - सप्तपातालादिसहित मनुष्यादि प्राण्यांचे स्थूल आणि आधारमणिपुरादि[२५७] **समष्टिरूप** स्थान तो भूर्लोक.

२४८/१२. भुवर्लोक - यक्षगंधर्वादिकांचें आणि अनाहत[२५८] विशुद्ध समष्टिरूप स्थान तो भुवर्लोक.

२४९/१२. स्वर्लोक -
ब्रह्मादि देवांचे आणि आज्ञासहस्रदलसमष्टिरूप[२५९] स्थान तो स्वर्लोक.

२५०/१२. या लोकत्रयांतच **सप्त लोकांचा** अथवा **अनंत लोकांचा** अंतर्भाव होतो.

तें निरूपण अस्मत्कृत '**निगमांतपथसंदीपक**' चतुर्थाध्यायांत पहावें.

२५१/१२. बाधवृत्ति - ब्रह्मस्मरणाचा तिरोभाव करणारी जी प्रवृत्ति ती बाधवृत्ति ह्मणावी. *(तक्ता १३८)*

तिचे संशय, असंभावना आणि विपरीत भावना हे तीन भेद आहेत. त्यांचें निरूपण पूर्वी (ओवी ६ व ७ टीका) केले आहे ह्मणून पुनरुक्ति करीत नाहीं.

२५२/१२. भावना - सकर्म[२६१] वासनादाढर्यरूप फलांचे जें चिंतन त्याला भावना[२६२] ह्मणतात.

ती तीन प्रकारची आहे. लौकिक, दैविकी, आणि जिज्ञासा.

मूळ तक्ता क्र.१२
ओवी १२ पा.४३



२५३/१२. लौकिकी भावना -विषयभोगचिंतनरूप भावना ती लौकिकी.

ती पुन्हा दोन प्रकारची आहे. निकृष्टा आणि श्रोत्रीया.

२५४/१२. ऐहिक भोगभावना ती **निकृष्टा.** आणि

२५५/१२. यज्ञादिकें करून पारलौकिक भोगभावना **श्रोत्रीया.**

२५६/१२. दैविकी भावना - सालोक्य, सारूप्य, सामीप्य, सायुज्य इत्यादि मुक्तींची उपासना करून जें चिंतन ती दैविकी भावना.

२५७/१२. जिज्ञासा भावना - साधनचतुष्टयें करून मोक्षचिंतन ती जिज्ञासाभावना.

तिचें मंद, तीव्र, तीव्रतर भेदांनी त्रैविध्य आहे.

२५८/१२. मंद जिज्ञासा - साधनचतुष्टयसंपन्न झाल्यानंतरही लौकिक वैदिक कर्मांचे ठायीं जी प्रवृत्ति ती मंद जिज्ञासा.

२५९/१२. तीव्र जिज्ञासा - साधनचतुष्टयानंतर कर्मन्यासपूर्वक[२६३] श्रवण मनन करणें ती तीव्र जिज्ञासा.

२६०/१२. तीव्रतर जिज्ञासा - साधनचतुष्टयानंतर गुरुसेवेसहित श्रवण, मनन, न्यासपूर्वक जें निदिध्यासनधारारूप ब्रह्मचिंतन तिला तीव्रतर जिज्ञासा ह्मणतात. **(य१३-४३)**

---

२५२. बाह्य वृत्तीची - बाहेर निघणाऱ्या वृत्तीची; वृत्तीची बाह्य (बाहेर) धाव असा अर्थः

२५३. अहंत्वेकरून - देहाच्या ठिकाणी 'अहंत्व' ठेऊन; देहालाच 'मी' म्हणून.

२५४. ममत्वेकरून - भोग्याचे ठिकाणी 'ममत्व' ठेऊन; भोग्य पदार्थांना माझे म्हणून.

२५५. इहपरत्रभोग्यसुखेच्छा - ह्या लोकांतील व पर लोकांतील भोग्य पदार्थांच्या सुखाची इच्छा.

२५६. वासनाश्रित (जग) लोक त्रैविध्य - वासनेच्या आश्रयाने असलेले तीन प्रकारचे लोक.

२५७. आधार मणि पुरादिसमष्टि रूप स्थान - आधार मणिपुरादि आपल्या व्यष्टि चक्रावर असणाऱ्या योग्याला ज्या समष्टि स्थानाचा प्रत्यय असतो ते.

२५८. अनाहत विशुद्ध समष्टिरूप स्थान - अनाहत विशुद्धचक्रावर स्थित असणाऱ्या योग्यांचे समष्टिस्थान.

२५९. आज्ञासहस्रदलसमष्टिरूपस्थान - वरप्रमाणेः आज्ञासहस्रदलाचे समष्टिस्थान.

२६०. तिरोभाव करणारी - लोप करणारी.

२६१. सकर्म वासनादार्ढ्यरूप फळांचे जे चिंतन - दृढ वासनेचे सक्रिय चिंतन. वासना केवळ (टीपा.पा.३६) अंतःकरणांत न राहता क्रियारूपाने बाहेर पडते तेव्हा तिला भावना म्हणावी. ओवी १५ खाली संस्काराचे लक्षण दिले आहे त्याप्रमाणे विषयाचे जे बुद्धिरूप सूक्ष्मरूप' तो संस्कार; त्याच संस्काराप्रमाणे. वृत्तीची बाह्यधाव ती वासना व ती वासना दृढ होऊन क्रियारूपाने बाहेर पडते तेव्हा ती वासना भावना म्हणावी.

२६२. भावना - इच्छित फलप्राप्तिकरता जें जें कर्म अवश्य आहे तें तें करीत असता त्या फळाचे जे (मानसिक) चिंतन त्याला येथे भावना म्हटले आहे. काही एक न करता केवळ मानसिक. चिंतन भावना नव्हे.

२६३. न्यास - संन्यास; कर्मन्यास - काम्यकर्माचा त्याग.

मूळ ओवी १३

षोडश महावाक्यप्रतिबंध । अविद्या आणि अध्यास द्विविध।
तत्सामग्री पंचविध । भेद द्वय ॥१३॥

टीका -

प्रतिबंध

२६१/१३. प्रतिबंध - महावाक्याच्या बोधाला अडथळे करणारे प्रतिबंध ह्मणावेत. ते क्रमानें

तत्पदार्थाचे ठिकाणी **पांच;**

त्वंपदार्थाचे ठिकाणी **पांच;** व

असि-पदार्थाच्या ठिकाणीं **पांच** असे पंधरा आहेत.

आणि सर्वांचा मिळून **एक** असे **सोळा प्रतिबंध** आहेत. *(तक्ता१४०)*

तत्पदवाच्यांश[२६४] जो ईश्वर त्याचें ज्ञान होण्याला पांच प्रतिबंध कारण आहेत. ते हे :-

२६२/१३. १.सगुण सायुज्याद्यपेक्षी भक्ति, २.सशास्त्र व्यक्तिदार्ढ्य,

३.निर्गुणशक्त्यसंभव, ४.साविश्वास गुरुनरदर्शन, ५.मुक्तकर्तृत्वादि संकोच;

आतां ह्या पांचाही प्रतिबंधाच्या क्रमानें व्याख्या सांगतों.

१.सगुण सायुज्याद्यपेक्षी भक्ति

मुक्ति चार प्रकारच्या आहेत.

२६३/१३. सलोकता, ह्मणजे स्वर्गादि लोकांत जाणें.

२६४/१३. समीपता, ह्मणजे भगवत् जे शिवविष्णु त्यांच्या समीप राहणें.

२६५/१३. सरूपता, ह्मणजे चतुर्भुज अथवा दशभुजादि रूपें होऊन राहणें.

२६६/१३. सायुज्यता, ह्मणजे उपास्योपासकांचें मिश्रण.

या मुक्तींचीं लक्षणें श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजकृत **'चतुर्विधामुक्तिलक्षण'*** ग्रंथांत सांगितलीं आहेत तीं पहावीं.

२६७/१३. या मुक्तिसाठींच जी परमेश्वराची भक्ति, तो **सायुज्याद्यपेक्षी**(२६५) नामक प्रथम प्रतिबंध ह्मणावा.

२.सशास्त्र व्यक्तिदार्ढ्य

२६८/१३. परमात्मा सगुण असून तो वैकुंठादि लोकांत राहतो आणि केव्हांच निर्गुणरूपी नांहीं व जीवांचें आणि त्याचें ऐक्यहि होणें शक्य नाहीं अशा द्वैतवादांत श्रुतींचा समन्वय(२६६) आणि स्मृतींचा अविरोध करून(१) परमेश्वर एकदेशी व्यक्त आहे अशी जी दृढबुद्धि ठेवणें हा **सशास्त्रव्यक्तिदार्ढ्य**(२६७) नामक द्वितीय प्रतिबंध आहे. *(१. यावरील पूर्णप्रज्ञदर्शन नामक ब्रह्मसूत्रावरील मध्वभाष्य पहावें.)*

३.निर्गुणशक्त्यसंभव –

२६९/१३. परमेश्वर जर निर्गुण असेल तर तो साकार जगताचा उत्पत्तिस्थितिलय-कर्ता होणार नाहीं या प्रमाणें तर्के करून परमेश्वरव्याप्तिहनन(२६८) तो **निर्गुणशक्त्ययसंभव**(२६९) तृतीय प्रतिबंध होय.

४.साविश्वास गुरुनरदर्शन

२७०/१३. परमेश्वरानें जर आपल्या जवळ येऊन सांगितलें नाहीं तर आपणास कधींही मुक्ति व्हावयाची नाहीं. गुरु हे केवळ शास्त्र

पढून झालेले असतात, ह्मणून ते मनुष्य आहेत व त्यांचे ठायी विश्वास ठेवणें बरोबर नाही.[1] *(१. योगवासिष्ठांत केवळ शास्त्रानें किंवा केवळ गुरूनें मोक्ष प्राप्त होत नाही, या पूर्वार्ध श्लोकावरच मध्वानें गुरूचा निषेध केला आहे आणि याच श्लोकाच्या उत्तरार्धात गुरूपदेशपूर्वक शिष्यमननानें परमप्राप्ति बोलिली आहे, ती माध्व घेत नाहीत.)* आणि ईश्वरबोधावांचून कधींही मोक्ष होत नाही अशा प्रकारची जी दृढ बुद्धि तो **साविश्वास गुरुनरदर्शन**(२७०) चतुर्थ प्रतिबंध ह्मणावा.

५.मुक्तकर्तृत्वादि संकोच

२७१/१३. मुक्त जीवांना सर्वात्मत्व आणि सर्वज्ञत्व प्राप्त होऊनही जगत्कर्तृत्वादि सर्वत्र होत नाहींत तर मग काय अर्थ? अशा प्रकारची जी बुद्धि तो पांचवा **मुक्तकर्तृत्वादिसंकोच**(२७१) प्रतिबंध म्हणावा.

याप्रमाणें तत्पदार्थाचे(२७२) ठिकाणी जसे पांच प्रतिबंध सांगितले,

त्याप्रमाणें त्वंपदवाच्य जो जीव तज्ज्ञानाचे ठिकाणींही पांच प्रतिबंध आहेत.

१. **इहपरस्थूलसूक्ष्मविषयाशा,** २. **देहव्याप्तिलक्षितशास्त्राभाव,**
३. **आत्मविषयक प्रमाणयुक्त्यभाव,** ४. **कर्मोपासनाप्रवृत्ति, आणि**
५. **मोक्षस्थाभोक्तृसुखाभाव.**

यांच्या क्रमानें व्याख्या सांगतोः –

२७२/१३. (१) इहपरस्थूलसूक्ष्मविषयाशा

२७३/१३. या लोकींचे रूपधनदारादि जे भोग त्यांच्या योगाने धन्यता मानून त्यांचीच इच्छा करणें ती **इहस्थूल विषयाशा.**(२७४)

२७४/१३. स्वर्गांत रंभादिकांच्या प्राप्तीची जी इच्छा ती **परस्थूल विषयाशा.**

२७५/१३. मंत्रौषधिसिद्धिजन्य(२७५) दैविक भोगांची या लोकांत जी इच्छा ती **इहसूक्ष्मविषयाशा.**(२७६) आणि –

२७६/१३. अहंग्रहोपासनेने(२७७) हिरण्यगर्भस्थ(२७८) सूत्रात्माद्यानंदभोगेच्छा ती **परसूक्ष्मविषयाशा.**(२७९)

२७७/१३. ह्या चारी आशा मिळून **कर्मकांड**(२८०)**प्रवर्तक**

जीवांविषयी[२८१] वर सांगितलेला **प्रथम प्रतिबंध** ह्मणावा.

२७८/१३. (२) देहव्याप्तिलक्षित[२८२] **शास्त्राभाव** - अहो, मनुष्यांचे देह काळे गोरे प्रत्यक्ष दिसतात मग ह्याहून जीवाविषयी शास्त्रांचे प्रमाण कशाला पाहिजे? अशा प्रकारची जी दृढ बुद्धि तो जीवाविषयीं वर सांगितल्यापैकीं **दुसरा प्रतिबंध** ह्मणावा.

या प्रतिबंधाचें निरूपण सर्वदर्शनसंग्रहांतील चार्वाकदर्शनानें चांगलें केलें आहे तें पहावें. **(य१३-४५)**

२७९/१३. (३) आत्मविषयक प्रमाण युक्त्यभाव[२८३] - आत्मा जर चेतन आहे. तर मग प्रत्यक्षादि[२८४] प्रमाणांचा नाश होईल आणि प्रमाणांचा नाश झाल्यामुळें आत्मा चेतन आहे अशा विषयी कोणी तादृश युक्तीही सांपडत नाही म्हणून आत्मा जड आहे ह्मणा किंवा चिज्जड आहे म्हणा असा जो **भाट्ट प्रभाकर** प्रभृतींचा सिद्धांत तो जीवस्थानीं वर सांगितलेला **तृतीय प्रतिबंध** म्हणावा.

२८०/१३. (४) कर्मोपासना प्रवृत्ति[२८५] - मोक्ष कर्मउपासनाज्ञानानें होतो किंवा शुद्धज्ञानानें होतो अशा प्रकारचे जें संशयदार्ढ्य तो वरील जीवांचा **चतुर्थ प्रतिबंध** म्हणावा.

२८१/१३. (५) मोक्षस्थाभोक्तृसुखाभाव[२८६] - मोक्षाचे ठिकाणीं अद्वैत असल्यामुळें भोक्ता कोणीच नाहीं म्हणून त्याला आनंद प्राप्तीही नाहीं कारण आनंदाला भोग्यत्व आहे असें चिंतन करून अरेरे देवा ! काय असें अद्वैतबंड ! असा प्रकारचा जो शोक तो जीवाविषयी वर सांगितलेला **पंचम प्रतिबंध** होय.

जीवेश्वरऐक्यबोध करणारें जें असिपद[२८७] तदर्थ ब्रह्मज्ञानासही पांच प्रतिबंध आहेत ते सांगतो :- **ज्ञानानंतर्यान्तचिंता, मतबोधोपरम, ऐक्यतर्काभाव, जीवन्मुक्त्यभावपूर्वक विदेहपरोक्षता व अभेदस्थ भेद नित्यता.** यांच्या क्रमानें व्याख्या :-

२८२/१३. (१) ज्ञानानंतर्यान्तचिन्ता[२८८] - विदेहमुक्ति तीर्थांत मरण पावल्यानें होईल अथवा गुरुसंनिध शास्त्रसंनिध[२८९] मेल्याने होईल अशा प्रकारची जी विव्हलता तो ऐक्यबोधीं **प्रथम प्रतिबंध** म्हणावा.

२८३/१३. (२) मतबोधोपरम[२९०] - अद्वैतवाद्यांनी जसा श्रुतींचा समन्वयार्थ केला आहे तसाच द्वैत, विशिष्टाद्वैतवाद्यांनींही स्वपक्षानुकूल केला आहे अशाप्रमाणें जी अविश्वास-वृद्धि तो ब्रह्मबोधी वरील **द्वितीय प्रतिबंध** म्हणावा.

२८४/१३. (३) ऐक्यतर्काभाव[२९१] - ईश्वराचे जीव होणें अथवा जीवाचें ईश्वर होणें कल्पांतीं तरी कसें संभवेल आणि संभवतें मानल्यास येथें कांहीं तर्क दिसत नाहीं असा दृढनिश्चय तो ऐक्यबोधीं वरील **तृतीय प्रतिबंध** म्हणावा. **(य१३-४६)**

२८५/१३. (४) जीवन्मुक्त्यभाव[२९२]**पूर्वक विदेहपरोक्षता**- अद्वैतज्ञानापासूनही[२९३] तूर्यगा नामक सातव्या भूमिकेवर गेल्यानंतर मेल्यावरच विदेह मुक्ति सांगितली आहे. मग ती कधीं ना कधीं[२९४] आपणाला होईलच. जीवन्मुक्तीचें काय करावयाचें आहे असा जो हठ तो ऐक्यबोधीं वरील **चतुर्थ प्रतिबंध** म्हणावा.

२८६/१३. (५) अभेदस्थभेदनित्यता[२९५] - आत्मा सर्वांचा साक्षी आहे आणि नित्यानंदरूप आहे तरी मैथुनादि सुख दृष्टीस पडतें म्हणून साक्षीभास्य द्वैतही नित्य आहे असा जो निश्चय तो वरील ऐक्यबोधी **पंचम प्रतिबंध** जाणावा.

२८७/१३. याप्रमाणें महावाक्याच्या प्रत्येक पदार्थाच्या ठिकाणी पांच पांच मिळून पंधरा आणि ग्रंथिभेद[२९६] झाल्यानंतरही प्रारब्धाच्या योगानें इच्छा होतात असा अंगीकार आहे[१]*(१. या विषयी पंचदशीच्या चित्रदीप नामक षष्ठम प्रकरणांतील २६३ [२९७]श्लोक पहावा- ग्रन्थिभेदेऽपि संभाव्या इच्छा प्रारब्धदोषतः॥)* म्हणून इच्छा व्युत्थानकालीं[२९८] हे सर्वच प्रतिबंध विचारशेषरूपाने[२९९] उठतात म्हणून पूर्ण महावाक्यार्थाचे ठायीं **सविचारव्युत्थानसमुदाय**[३००] संज्ञक **सोळावा प्रतिबंध** आहे.

अविद्या

२८८/१३. या सर्व प्रतिबंधांस कारण जी **अविद्या** ती दोन प्रकारची आहे. *(तक्ता १४१)*

२८९/१३. मूलाविद्या - ब्रह्मज्ञानावांचून ज्या भ्रमाचा[३०१] बाध होत

नाहीं तो भ्रम मूलाविद्या (मूल+अविद्या). आणि -

२९०/१३. व्यावहारिक ज्ञानानें ज्या भ्रमाचा बाध होऊ शकतो तो भ्रम **तुलाविद्या** होय. तदधिष्ठित[३०२] अध्यासही दोन प्रकारचा आहे.

कार्याध्यास[३०३] आणि **कारणाध्यास.**[३०४] *(तक्ता १४२)*

२९१/१३. कार्याध्यास - निःसामग्रीप्रत्यभिज्ञारूप कार्याध्यास म्हणावा.

२९२/१३. कारणाध्यास[३०५] - अधिष्ठानाऽविरोधकपूर्वक[३०६] अनियत सामग्री ज्ञान[३०७] भावाभावप्रत्यभिज्ञाप्रतिभास[३०८] तो कारणाध्यास ह्मणावा.

तत्सामग्री[३०९] पंचप्रकार आहे. *(तक्ता १४३)*

वस्तुज्ञानसंस्कार,[३१०] **प्रमातृदोष,**[३११] **प्रमाणदोष,**[३१२] **प्रमेयदोष**[३१३] **आणि विशेषाज्ञान.**[३१४] यांच्या व्याख्या अन्य ग्रंथाचे ठायीं केल्या आहेत त्या पाहाव्या.

तत्साध्यजनित भेद[३१५] दोन आहेत. **श्रुतिनिराकृत** आणि **युक्तिनिराकृत.(य१३-४७)**

मु.त.क्र.१३
ओवी १३ पा.४८

भेद

- **श्रुतिनिराकृत**
  - **१ सजातीय**
  - **२ विजातीय**
  - **३ स्वगत**
- **युक्तिनिराकृत**
  - **१ जीवेश्वरपरस्परता**
  - **२ जीवजीवपरस्परता**
  - **३ जीवजडपरस्परता**
  - **४ जडेश्वरपरस्परता**
  - **५ जडजड परस्परता**

२९३/१३. श्रुतिनिराकृत भेद - 'एकमेवाद्वितीयम्' या श्रुतीनें ज्याचें निराकारण केलें आहे तो श्रुतिनिराकृत भेद म्हणवा.

तो तीन प्रकारचा आहे. सजातीय, विजातीय आणि स्वगत.

२९४/१३. एकाच जातींत जो भेद तो **सजातीय.** जसें आम्र आणि निंब यांचे ठिकाणीं एकजातित्व ह्मणजे वृक्षत्व असूनही दोनपणा आहे.

२९५/१३. दोन जतींतला जो भेद तो **विजातीय.** हा वृक्षमातींत.[३१६] दगडसुवर्णांत अथवा लोहकाष्टादिकांत स्पष्ट आहे.

२९६/१३. स्वतःपासूनच उत्पन्न होणारा भेद **स्वगत** ह्मणावा. जसें एकाच वृक्षाच्या फांद्यांचे आकार निराळे, फळांचे आकार निराळे, फुलांचे आकार निराळे. आतां युक्तिनिराकृत भेद सांगतो.

युक्तिनिराकृत भेद

२९७/१३. युक्तिनिराकृतभेद - महावाक्यसाधक आणि द्वैतबाधक युक्ति सद्गुरुमुखातून श्रवण करून ज्याचे निराकरण होतें तो युक्तिनिराकृत भेद ह्मणावा.

त्याचे प्रकार पांच आहेत. **१.जीवेश्वरपरस्परता, २.जीवजीवपरस्परता, ३.जीवजडपरस्परता, ४.जडेश्वरपरस्परता, आणि ५.जडजडपरस्परता.**

२९८/१३. जीवेश्वरपरस्परता - जीव अल्पज्ञ आहे, दुःखी आहे, ईश्वर सर्वज्ञ व सुखी आहे ह्याची जी नित्यता तो जीवेश्वरपरस्परता[३१७] भेद ह्मणावा.

२९९/१३. जीवजीवपरस्परता - एक मेला असतां सर्वच मरत नाहींत अथवा एक जन्मला असतां सर्वच जन्मत नाहींत ह्मणून जीव नाना आहेत, यांचे नित्यत्व[३१८] तो जीवजीवपरस्परताभेद ह्मणावा.

३००/१३. जीवजडपरस्परता - मनुष्याला ज्ञान आहे आणि दगडास नाहीं अशा प्रकारचें नित्यत्व तो जीवजडपरस्परता भेद म्हणावा.

३०१/१३. जडेश्वरपरस्परता - पृथिव्यादि जड पदार्थ कार्य आहेत आणि सर्व ईश्वर त्यांचा कुलालवन्निमित्तकारणरूप[३१९] कर्ता आहे याचे जें नित्यत्व तो जडेश्वरपरस्परताभेद म्हणावा.

३०२/१३. जडजडपरस्परता - तेज, जल, पृथ्वी, भूतांस रूपत्व असून वायूमध्यें तें नाहीं तो स्पर्शगुणयुक्तच आहे इत्यादि वैधर्म्यनित्यत्व

तो जडजडपरस्परताधर्म होय.

३०३/१३. भेद - विकृतिवैशेष्यावच्छिन्न[३२०]धर्मीभावनानात्वाला[३२१] भेद संज्ञा आहे.

---

२६४. तत्पदवाच्यांश - 'तत्त्वमसि' ह्या महावाक्यांतील 'तत्' ह्या पदाचा जो वाच्य अंश म्हणजे केवळ शक्ति वृत्तीने होणारा अर्थ.

२६५. सायुज्याद्यपेक्षी (सायुज्य+आदि+अपेक्षी) - सायुज्य वगैरे मुक्तींची अपेक्षा करणारी वृत्ति महावाक्याचे बोधास अडथळा करते म्हणून प्रतिबंध.

२६६. समन्वय - एकवाक्यता.

२६७. सशास्त्रव्यक्तिदार्ढ्य - शास्त्रावरून परमेश्वर एकदेशी व्यक्त आहे; अशी दृढ बुद्धि महावाक्य बोधास प्रतिबंध आहे.

२६८. परमेश्वर व्याप्तिहनन - परमेश्वराची व्याप्ति नाहीशी करणे.

२६९. निर्गुण शक्त्यसंभव (शक्ति+असंभव) - निर्गुण परमेश्वराचे शक्तीचा असंभव मानणारी वृत्ति प्रतिबंध आहे.

२७०. साविश्वास गुरूनर दर्शन - गुरूला नर (मनुष्य) समजून गुरुवाक्याचे ठिकाणी विश्वास न ठेवणे - त्यामुळे ब्रह्मबोध होतच नाही म्हणून प्रतिबंध.(टीपा.पा.३७)

२७१. मुक्तकर्तृत्वादि संकोच - मुक्तांचे ठिकाणी जगताच्या कर्तृत्वादिकाचा संकोच आहे म्हणजे जगत्कर्तृत्व नाही असे समजून ब्रह्मबोध न घेणे.

२७२. तत् पदार्थाचे ठिकाणी - पूर्वी सांगितलेल्या प्रतिबंधामुळे 'तत्त्वमसि' महावाक्यांतील जे 'तत्' पद त्याचा लक्षणावृत्तीने होणारा जो अर्थ त्या अर्थाचे ग्रहण होत नाही म्हणून प्रतिबंध.

२७३. तज्ज्ञानाचे ठिकाणी - त्याचे (जीवाचे शुद्ध स्वरूपाचे) ज्ञानाचे ठिकाणी.

२७४. इहस्थूल विषयाशा - इहलोकांतील स्थूल विषयांची आशा.

२७५. मंत्रौषधिसिद्धिजन्य - मंत्र व औषधी ह्यांच्या सिद्धीने उत्पन्न होणारी.

२७६. इहसूक्ष्मविषयाशा - ह्या लोकांतील विषायांची आशा.

२७७. अहंग्रहोपासनेने - ओवी १६ खाली अहंग्रहोपासनेचा अर्थ पहावा. (अव्यक्तादि धर्मी ब्रह्म मी आहे अशी संकेतावाचून (संकेत =ज्ञान) जी भावना तिला अहंग्रहोपासना म्हणतात.)

२७८. हिरण्यगर्भस्थसूत्रात्माद्यनंदभोगेच्छा (सूत्रात्मा+आदि+आनंद) - हिरण्यगर्भाचे ठिकाणी असणाऱ्या सूत्रात्मादिकांच्या आनंदाच्या भोगाची इच्छा. सूत्रात्मा -

अपंचीकृत भूतकार्य समष्टिसूक्ष्म शरीराचा ज्याला योग (भोग?) होतो त्याला सूत्रात्मा म्हणावे. (अहंग्रहोपासनेने प्राप्त झालेले जें हिरण्यगर्भाचे शरीर त्याचे ठिकाणी अभिमान धारण करणारा जो सूत्रात्मा त्याचा जो आनंद त्या आनंदाच्या भोगाची इच्छा.) (टीपा.पा.३८)

२७९. परसूक्ष्म विषयाशा - परलोकांतील सूक्ष्म विषयाची आशा.

२८०. कर्मकांडप्रवर्तक - कर्मकांडाला प्रवृत्त करणारा प्रतिबंध.

२८१. जीवाविषयी - जीवाच्या शुद्ध स्वरूपाच्या ज्ञानाविषयी.

२८२. देहव्याप्तिलक्षित शास्त्राभाव (शास्त्र+अभाव) - जीवाची देहाएवढीच जी व्याप्ति त्यावरून दिसून येणारा (जीवाच्या स्वरूपाविषयी) शास्त्राचा अभाव (शास्त्राची जरूरी नाही असा समज)

२८३. प्रमाण युक्त्यभाव (युक्ति+अभाव) - प्रमाण किंवा युक्ती यांचा अभाव.

२८४. प्रत्यक्षादि प्रमाणांचा नाश होईल - आत्मा जर स्वतः चेतन आहे तर त्याला स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या ज्ञानाकरता प्रमाणांतराची म्हणजे प्रत्यक्षादि प्रमाणांची गरज नाही. म्हणून इतरांचे ठिकाणी प्रमाणत्वच येत नाही.

२८५. कर्मोपासना प्रवृत्ति - कर्म व उपासना ह्यांचे ठिकाणी असणारी प्रवृत्ति. ही प्रवृत्ति शुद्ध ज्ञानाचे ठिकाणी मोक्षाविषयी संशय उत्पन्न करून महावाक्य ज्ञानाला प्रतिबंध करते.

२८६. मोक्षस्थाभोक्तृसुखाभाव (मोक्षस्थ अभोक्तृ सुख अभाव) - मोक्षस्थ - अभोक्तृ (भोक्ता नसणे) - त्यामुळे सुख अभाव.

२८७. असिपद तदर्थ ब्रह्मज्ञानास - 'तत्त्वमसि' ह्या महावाक्यांतील जे 'असि' हे पद त्याचा जो लक्ष्यार्थ - ब्रह्म - त्याचे ज्ञानास.

२८८. ज्ञानानंतर्यांतचिंता - ज्ञानानंतर्य म्हणजे ज्ञानानंतर प्राप्त होणारी जी विदेह मुक्ती तिच्या करता जी अंत चिंता म्हणजे मरणाची चिंता.

२८९. शास्त्र संनिध - वेदान्तशास्त्राचे अध्ययन करीत.

२९०. मतबोधोपरम - स्वमतबोधाविषयी उपरम (थांबणे, विश्राम)

२९१. ऐक्य तर्काभाव - जीवेश्वरांच्या ऐक्याविषयी तर्काचा अभाव.

२९२. जीवन्मुक्त्यभावपूर्वक (जीवन्मुक्तिअभाव) विदेहपरोक्षता - जीवन्मुक्तीचा अभाव असूनहि (जीवन्मुक्ति नसली तरी) विदेहमुक्तीची परोक्षता - परोक्षतेने (मेल्यावर) विदेहमुक्तीचा निश्चय. जीवन्मुक्तस्थिति प्राप्त झाली नाही तर तो ऐक्य बोधच नव्हे म्हणून वरील निश्चय प्रतिबंध होय.

२९३. अद्वैतज्ञानापासूनही - अद्वैतज्ञानापासून विदेहमुक्ति प्राप्त होत असली तरी

देखील.

२९४. कधी ना कधी, जीवन्मुक्तीकरिता प्रयत्न न केला तरी.

२९५. अभेदस्थभेदनित्यता - अभेदाचे ठिकाणी भेद नित्य आहे असा निश्चय. जो पर्यंत असे भेद ज्ञान आहे तोपर्यंत ते भेदज्ञान अभेद ज्ञानच होऊ देत नाही. म्हणून प्रतिबंध.

२९६. ग्रंथिभेद - ग्रंथि म्हणजे चित् व जड यांची गांठ; आत्मा व शरीर ह्यांचे ऐक्य; मन मी आहे, अहंकार आत्मा आहे अशी बुद्धि. ही बुद्धी नष्ट होणे म्हणजे ग्रंथिभेद (ओवी १४ खाली ग्रंथि शब्दाचा अर्थ पहावा.)

२९७. पंचदशीतील श्लोक - 'ग्रंथिभेदेऽपि संभाव्या इच्छाः प्रारब्धदोषतः।'

२९८. इच्छाव्युत्थानकालीं - इच्छा उठत असतांना.

२९९. विचारशेषरूपाने - ज्ञान होण्यापूर्वी उठत असलेले. १५ प्रतिबंध निवारण करण्यासाठी केलेले जे विचार ते प्रतिबंध दूर करून सूक्ष्मस्थितीत शेष असतात. ते ग्रंथिभेदानंतर (ज्ञानानंतर) प्रारब्धदोषाने जेव्हां उठतात; त्यावेळी ते प्रतिबंधच ह्या विचार शेषरूपाने म्हणजे प्रतिबंध खोटे आहेत अशा रूपाने प्रगट होतात असा अर्थ. (टीपा.पा.४०)

३००. सविचार व्युत्थान समुदाय - विचारासह प्रतिबंधाच्या व्युत्थानाचा समुदाय; हे व्युत्थान जरी खोट्या रूपाने असले तरी ते महावाक्याच्या अर्थाचे पूर्णज्ञान (तन्मयता) होऊ देत नाही व म्हणूनच व्युत्थान. (पूर्ण स्थितीतून बाहेर पडणे.)

३०१. ज्या भ्रमाचा बाध होत नाही - जो भ्रम नाहीसा होत नाही.

३०२. तदधिष्ठित अध्यास - तत् - अविद्येने अधिष्ठित अध्यास; अविद्येमुळे झालेला अध्यास.

३०३. कार्याध्यास - कार्य म्हणजे स्थूल-सूक्ष्म प्रपंच. तद्रूप जो अध्यास तो कार्याध्यास. प्रपंच हे अज्ञानाचे कार्य असल्यामुळे प्रपंचास कार्याध्यास म्हटले आहे.

३०४. निःसामग्री प्रत्यभिज्ञारूप - प्रत्यभिज्ञेच्या सामग्री वाचून जी प्रत्यभिज्ञा तद्रूप. प्रत्यभिज्ञा म्हणजे पूर्वी अनुभव घेतलेल्या वस्तूचे पुन्हा ज्ञान म्हणून (१) पूर्वज्ञानाचे संस्कार व (२) ह्या वेळच्या ज्ञानाची सामग्री - वृत्तीचा विषयाशी संबंध ही प्रत्यभिज्ञेची सामग्री असून, ही सामग्री नसून जेव्हा प्रत्यभिज्ञा आहे असे वाटते तेव्हां तो अध्यास होय. स्थूलसूक्ष्म प्रपंचाचे भान प्रत्यभिज्ञा रूपाने होत असते. पण त्याला प्रत्यभिज्ञेची सामग्री नसते असा अर्थ.

३०५. कारणाध्यास - प्रपंचरूप कार्याचे जे कारण - ब्रह्माच्या सामान्यरूपाचे म्हणजे सद्रूपाचे ज्ञान व विशेषरूपाचे म्हणजे चिदानंदरूपाचे अज्ञान - तद्रूप जो

अध्यास .

३०६. अधिष्ठानअविरोध पूर्वक - अधिष्ठानाशी विरोध न येता, ब्रह्मरूप जे अधिष्ठान त्याच्याशी कारणरूप अध्यासाचा म्हणजे ब्रह्माच्या विशेष स्वरूपाच्या अज्ञानाचा (चिदानंदाचे अज्ञानाचा) विरोध नाही असा अर्थ. (टीपा.पा.४१)

३०७. अनियत सामग्री - (प्रत्यभिज्ञेचे विशेषण) ज्या प्रत्यभिज्ञेची सामग्री नियत नाही अशी प्रत्यभिज्ञा. (प्रत्यभिज्ञेला जरूर असलेली सामग्री नसूनही प्रत्यभिज्ञेचा प्रतिभास होतो - प्रत्यभिज्ञेचे भान होते म्हणून अध्यास.)

३०८. ज्ञानभावाभाव प्रत्यभिज्ञा प्रतिभास - ब्रह्माचे सामान्य ज्ञानाचा म्हणजे सद्रूपाचे ज्ञानाचा भाव व ब्रह्माचे विशेष ज्ञानाचा म्हणजे चिदानंदाचे ज्ञानाचा अभाव. त्याची जी प्रत्यभिज्ञा तिचा प्रतिभास - ह्याला कारणाध्यास म्हणतात. (वरील टीप क्रमांक ३०५ पहा.)

३०९. तत्सामग्री - अध्यासाची सामग्री.

३१०. वस्तुज्ञानसंस्कार - ज्या वस्तूचा अध्यास होतो त्या वस्तूच्या पूर्वीच्या ज्ञानाचा संस्कार; त्या वस्तूचे पूर्वी कधी (खरे खोटे कसेही) ज्ञान होऊन संस्कार झाला नसला तर त्या वस्तूचा अध्यास होणार नाही.

३११. प्रमातृ दोष - प्रमात्याचा दोष - लोभ, भय वगैरे.

३१२. प्रमाण दोष - प्रमाण जे नेत्रादिक त्यांचे ठिकाणी असलेले पित्त, कावीळ वगैरे दोष.

३१३. प्रमेय दोष - ज्या पदार्थाचे ठिकाणी अध्यास होतो ते प्रमेय. त्या प्रमेयाचे ठिकाणी ज्याचा अध्यास होतो त्याशी जे सादृश्य तो प्रमेय दोष.

३१४. विशेषाज्ञान - अधिष्ठानाच्या विशेषरूपाचे अज्ञान.

३१५. तत्साध्य जनित - तत् म्हणजे अध्यास. त्याने साध्य जो प्रपंच त्यापासून उत्पन्न होणारा.

३१६. वृक्षमातींत - वृक्ष व माती ह्यांत वृक्षपणा व मातीपणा ह्या निराळ्या जाती असल्यामुळे. तसेच दगड, सुवर्ण वगैरे विजातीय भेदाची उदाहरणे.

३१७. जीवेश्वर परस्परता - जीव व ईश्वर ह्यांचे एकमेकाशी भेदरूपाने असणे.(टीपा.पा.४२)

३१८. (भेद) नियत्यत्व - काही काळ दोनपणा असणे हा भेद नसून नेहमी दोनपणा असणे ह्याला भेद म्हणतात असा अर्थ.

३१९. कुलालवन्निमित्तकारणरूप - घटादिकांचा जसा निमित्त कारण कुलाल म्हणजे कुंभार त्याप्रमाणे जगताचा निमित्त कारण ईश्वर म्हणून जगताहून भिन्न

असा अर्थ.

३२०. विकृत वैशेष्यावच्छिन्न - (विशेषाचा जो भाव ते वैशेष्य) विकृतीच्या वैशेष्याने मर्यादित; निरनिराळ्या विकृतींनी युक्त.

३२१. धर्मीभावनानात्व - निरनिराळे धर्मी असणे. निरनिराळ्या विकारांनी मर्यादित निरनिराळे धर्मी असणे; नाना धर्माचे नाना पदार्थ असणे असा अर्थ.

मूळ ओवी १४.

सांग जीवन्मुक्तिअंश द्विविध । योग बोलिजे द्विविध ।
श्रवणविधि त्रिविध । अधिकारी त्रय ॥१४॥

३०४/१४. पूर्वोक्त मोक्षलक्षण ज्याचे ठायीं देहसत्कालीन[३२२] संभवतें तो **जीवन्मुक्त** म्हणावा आणि

३०५/१४. तदधिष्ठित[३२३] अप्रतिबद्धानंदवृत्ति ती **मुक्ति** ह्मणावी. तिचे दोन अंश आहेत. स्वांगरूप आणि साह्यरूप.



३०६/१४. जीवन्मुक्तीला जो स्वयंप्रतीक तो **स्वांग** ह्मणावा. तो अंश ज्ञान होय.

३०७/१४. वस्तुतंत्र प्रकाशाला **ज्ञान** म्हणतात.

प्रत्येक जीवन्मुक्तीच्या अंशाला हेतु, स्वरूप आणि कार्य असे तीन अंग आहेत. त्यांचें क्रमशः निरूपण करितों. त्यांत प्रथम ज्ञानाचें अंग सांगतो.

३०८/१४. श्रवण-मनन-निदिध्यासादि जें साधनत्रय तें ज्ञानाचें **हेतुरूप अंग** होय.

३०९/१४. सत्यमिथ्याविवेचन[३२४] हे ज्ञानाचें **स्वरूप** आहे. **(य१३-४९)**

३१०/१४. एकवेळ झालेला ग्रंथिभेद पुन्हा उदय न होणें हें त्याचें **कार्य** आहें.

ज्या ग्रंथीचा भेद करावयाचा ती ग्रंथि तीन प्रकारची आहे. **चिज्जडरूप, संशयरूप** आणि **अहंरूप.**

३११/१४. चिज्जड ग्रंथि - अविवेकानें देह आणि आत्म्याचें एकीकरण करणें ती चिज्जड ग्रंथि म्हणावी.

३१२/१४. संशयरूप ग्रंथि - मन आणि चिदात्मा यांचें अविवेकें करून विक्षेपपूर्वक जें एकीकरण ती पूर्वपक्षसिद्धान्ताधिष्ठानरूप[३२५] संशयग्रंथि ह्मणावी.

३१३/१४. अहं ग्रंथि - विषयीवर्जित विषयरूप मीपण आणि चिदात्मा यांचें जें एकीकरण तिला अहंग्रंथी[३२६] ह्मणतात. ही सर्व कामांना अधिष्ठान आहे.

आतां दुसरा जीवन्मुक्तीचा जो साह्यभूत अंश तो दोन प्रकारचा आहे. **वैराग्यरूप** आणि **उपरमरूप.** यांसच विरक्ति आणि उपरति ह्मणतात.

३१४/१४. भोग्य वस्तूच्या तिरस्कारास **वैराग्य** ह्मणतात.

त्याचेंही (वैराग्याचें) अंगत्रैविध्य आहे.

३१५/१४. ऐहिकामुष्मिक[३२७] विषयसंबंधिनी[३२८] दोषदृष्टी[१]

वैराग्यहेतु होय. (य१३.५०)

३१६/१४. इह-पर विषयत्याग तें **वैराग्याचें स्वरूप** होय. आणि

३१७/१४. पुन्हा भोगाचे ठायीं उदित न होणें हें त्याचें **कार्य** होय.*(१. ही दोषदृष्टी वृहद्योगवासिष्ठारंभी सुरुची नामक अप्सरेस एका देवदूतानें सांगितली आहे ती पहावी.)*

३१८/१४. यमनियमादिक उपरमाचे **हेतु** आहेत.

३१९/१४. पातंजलसूत्रभाष्यात व्यासकथित निरुद्धनामक पंचभूमिका[३२९] **तत्स्वरूप** आहे. आणि

३२०/१४. व्यवहाराचा आत्यंतिक नाश तें **कार्य** आहे.

या जीवन्मुक्ति-अंशत्रयांचे[३३०] निरूपण पंचदशीस्थ चित्रदीपांत श्लोक २७६ ते २७९ पर्यंत सविस्तर केले आहे तें पहावें.

३२१/१४. योग- तत्साधन योग दोन प्रकारचा आहे. निरोधरूप आणि स्थापनरूप. *(तक्ता १४६)*

३२२/१४. निरोधरूप योग - अभ्यास आणि वैराग्याच्या योगानें जो वृत्तीचा रोध तो निरोधरूप योग ह्मणावा.

३२३/१४. त्याचें अंग[३३१] आठ आहेत :- **१.यम, २.नियम, ३. आसन, ४. प्राणायाम, ५. प्रत्याहार, ६. धारणा, ७. ध्यान आणि ८. समाधि.** या सर्वांगांचें प्रकारनिरूपण हठप्रदीपिकादि योग ग्रंथांत केलें आहे तें पहावें.

३२४/१४. स्थापनरूप योग - चित्प्रतीतिबलें[३३२]करून स्वानुभवस्थैर्यार्थ[३३३] निर्गतचित्ताचें[३३४] क्षणोक्षणीं निक्षेपण[३३५] तो स्थापनरूप योग म्हणावा.

याला **कृत्रिम ज्ञानाभ्यासही** ह्मणतात.

हा योग **रूपकरूप**[३३६] आहे ह्मणून तदनुसार त्याची १५अंगें[३३७] आहेतः-

१.यम, २.नियम, ३.त्याग, ४.मौन, ५.देश, ६.काल, ७.आसन, ८.मूलबंध, ९.देहसाम्य, १०.दृक्स्थिति, ११.प्राणसंयम, १२.प्रत्याहार, १३.धारणा, १४.ध्यान आणि १५.समाधि.

४६

३२५/१४. यम - सर्व ब्रह्म जाणून इंद्रियांचें जें संयमन तो यम[३३८] ह्मणावा.

३२६/१४. नियम - आत्मसजातीय[३३९] वृत्तिप्रवाह आणि विजातीय[३४०] देहवृत्ति-तिरस्कार तो नियम.

३२७/१४. त्याग - चिदात्मत्वदर्शनानें जें प्रपंचाचें न पाहणें तो त्याग.[३४१]

३२८/१४. मौन - ब्रह्मही शब्दरहित आहे आणि मायाही अनिर्वाच्य[३४२] आहे ह्मणून दोघांच्याही ठिकाणीं शब्द व्यर्थ आहे असा जो निश्चय तें मौन. **(य१३-५१)**

३२९/१४. देश - आदिमध्यांतीं जन न दिसून ज्यानें हें सर्व व्यापिले आहे तो निर्जन देश.[३४३]

३३०/१४. काल- ज्याच्या निमिषमात्रानें कोटी ब्रह्मादिकांचे कल्प होतात असें जें अखंडदंडायमान अद्वयानंद ब्रह्म तें कालशब्दानें[३४४] निर्दिष्ट आहे.

३३१/१४. आसन - ज्या ब्रह्मप्रदेशाचे ठायीं सुखानें वृत्तीचें स्थापन होतें तें आसन.[३४५] याच ठिकाणी सर्व सिद्ध समाविष्ट आहेत ह्मणून यास सिद्धासनही ह्मणतात.

३३२/१४. मूलबंध - जें सर्व भूतांचें आदिकारण आणि चित्ताला ज्याच्या योगानें बंधन तो मूलबंध.[३४६]

३३३/१४. देहसाम्य - सर्व अंगें ब्रह्माच्या मूर्ति आहेत असें जाणून लयचिंतन तें देहसाम्य.[३४७]

३३४/१४. दृक्स्थिति - द्रष्टा, दर्शन आणि दृश्य या तिहींचें जें अधिष्ठान चिंतन ती दृक्स्थिति.[३४८]

३३५/१४. प्राणायाम - पूर्वप्रतीत सर्व वृत्तींचा निरोध तो प्राणायाम.[३४९]

त्याचे भेद तीन. रेचक, पूरक आणि कुंभक.

३३६/१४. सप्रतीत प्रपंचनिषेध तो **रेचक.**

३३७/१४. मी ब्रह्म अशी वृत्ति तो **पूरक.**

३३८/१४. त्याच वृत्तीची निश्चलता तो **कुंभक.**

३३९/१४. प्रत्याहार - मनानेंच विषयांचे ठायीं चितिमत्वदर्शन तो प्रत्याहार.(३५०)

३४०/१४. धारणा - जेथें जेथें मन जाईल तेथें तेथें ब्रह्म आहे असें मनानें धरणें ती धारणा.(३५१)

३४१/१४. ध्यान - मी ब्रह्म आहें अशा सद्वृत्तीनें देहविस्मरणपूर्वक संतोषवृत्ति तें ध्यान.(३५२)

३४२/१४. समाधि - या वृत्तीची विस्मृति तो सम्यक् समाधि.(३५३)

या स्थापनरूप योगाचें लक्षण **अपरोक्षानुभूतींत** १०२ ते १२४ श्लोकांमध्ये आणि **अमृतधारा** ग्रंथामध्ये निषेध-वैपरित्यपूर्वक(३५४) स्पष्ट सांगितले आहे ते पहावे.

३४३/१४. तदाश्रय(३५५) श्रवणरूप **साधनविधि** तीन प्रकारचा आहे.

साधन विधि

३४४/१४.अज्ञातार्थज्ञापक(३५६) त्यास **विधि** ह्मणतात.**(य१३-५२)**

३४५/१४. बृहदारण्यकोपनिषदस्थ याज्ञवल्क्यमैत्रेयीसंवादांतर्गत. **श्रोतव्य(३५७) वाक्यस्थलीं विधि** बोलिला तो त्रिविध आहे. **अपूर्वविधि, नियमविधि आणि परिसंख्याविधि.** *(तक्ता १४७)*

३४६/१४. अपूर्व विधी - अप्राप्तीची(३५८) प्राप्तिरूप जो तो अपूर्वविधि ह्मणावा.

३४७/१४. नियम विधि - प्राप्तीची(३५९) प्राप्ति तो नियमविधि ह्मणावा.

३४८/१४. परिसंख्याविधि - अनियतनिषेधपूर्वक(३६०) सकालतात्पर्य तो परिसंख्या विधि होय.

अधिकारी

३४९/१४. तदाश्रय **अधिकारी** तीन प्रकारचे आहेत. कनिष्ठ, मध्यम आणि उत्तम. *(तक्ता १४८)*

३५०/१४. कनिष्ठ अधिकारी - तर्कवाक्येंकरून त्याची बोधग्रहणीं

प्रवृत्तिपात्रता तो कनिष्ठ अधिकारी.(३६१)

३५१/१४. मध्यमाधिकारी(३६२) - अभ्यासवाक्येंकरून ज्याची बोधग्रहणीं निरोधपात्रता तो मध्यम.

३५२/१४. उत्तमाधिकारी - सिद्धवाक्यें करून(३६३) ज्याची बोधग्रहणीं प्राप्तिपात्रता(३६४) तो उत्तमाधिकारी(३६५) ह्मणावा.

---

३२२. देहसत्कालीन - देह असतांना, जीवंतपणी.

३२३. तदधिष्ठित अप्रतिबद्धानंदवृत्ति - जीवन्मुक्तीने युक्त अखंड आनंदवृत्ति.

३२४. सत्यमिथ्या विवेचन - सत्य व मिथ्या वस्तूचे यथार्थ चिंतन.

३२५. पूर्वपक्ष सिद्धान्ताधिष्ठानरूप संशयग्रंथि. (संशयरूपग्रंथि) - मन व चिदात्मा यांचा पूर्ण विवेक न झाल्यामुळे पुन्हा पुन्हा मनच मी आहे अशी चिदात्म्याचा बाध करणारी जी विक्षेप वृत्ति, मन मी आहे (हा पूर्वपक्ष) व मी चिदात्मा आहे (हा सिद्धांत) ह्या दोन्ही वृत्तींना जागा देते तिला संशयरूप ग्रंथि म्हणावे.

३२६. अहंग्रंथि - अहंकारातील एक अंशविषयी जो साक्षी चिदात्मा त्याला सोडून दुसरा अंश जो वृत्तींत प्रतिबिंबित चैतन्याचा आभास जो साक्षीचा विषय ''मीपणा'' त्या सहज चिदात्म्याचे ऐक्य ती अहंग्रंथि. वृत्तिस्थ चिदाभास हा वस्तुतः चिदात्मा नसून तो साक्षीरूप चिदात्म्याचा विषय आहे. पण त्यालाच ''मी'' म्हणणे हा अहंग्रंथि होय.

''अर्जुनपण न घेता । मी ऐसे जे पंडुसुता ।
उठे तें तत्वता । तयाचे रूप ॥''

ह्या श्री ज्ञानेश्वरीतील ओवीत जे 'अर्जुनपण' तो चिदाभास विषय. त्याचा विषयी जे विषयास सोडून असणारे केवळ ''मीपण'' तो साक्षी चिदात्मा. ह्या दोहोंचे 'मी अर्जुन' असे जें एकीकरण तो अहंग्रथि समजावा.

३२७. ऐहिकामुष्मिक (ऐहिक + आमुष्मिक) - ह्या लोकांतील व परलोकांतील.

३२८. विषय संबंधिनी - विषया संबंधी.

३२९. पंचमभूमिका - पाचवी भूमिका.

३३०. अंशत्रय - ज्ञान, वैराग्य व उपरम. पंचदशीस्थ चित्रदीप श्लो. २७६ ते २८०.

वैराग्यबोधोपरमाः सहायास्ते परस्परम् ।
प्रायेण सहवर्तन्ते वियुज्यन्ते,, चित्,, चित् ॥२७६॥
हेतुस्वरूपकार्याणि भिन्नान्येषामसङ्करः ।

यथावदवगन्तव्यः शास्त्रार्थं प्रविविच्यता ॥२७७॥
दोषदृष्टिर्जिहासा च पुनर्भोगेष्वदीनता ।
असाधारणहेत्वाद्या वैराग्यस्य त्रयोऽप्यमी ॥२७८॥
श्रवणादित्रयं तद्वत्तत्त्वमिथ्याविवेचनम् ।
पुनर्ग्रन्थेरनुदयो बोधस्यैते त्रयो मतः ॥२७९॥
यमादिर्धीनिरोधश्च व्यवहारस्य संक्षयः ।
स्युर्हेत्वाद्या उपरतेरित्यसङ्कर ईरितः ॥२८०॥

ह्या पंचदशीतील श्लोकांचा जरूरीचा अर्थ ह्या ग्रंथातच श्रीसद्गुरुमातेने स्पष्ट केला आहे.

३३१. निरोधरूपयोगाचे आठ अंग -

(१) यम -

अहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्या परिग्रहा यमाः ।
(पातंजल योगसूत्र, साधनपाद सूत्र ३०)

अर्थ - अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे यम होत.

अहिंसादिकावरील भाष्यार्थ -

(अ) कोणत्याहि प्रकाराने व कोणत्याहि प्राण्याचा द्रोह न करणे ह्याला अहिंसा म्हणतात.

(ब) यथार्थ जी वाणी व मन ह्यांना सत्य म्हणतात. यथार्थ म्हणजे जसे पाहिले असेल, जसे अनुमानाने जाणले असेल व जसे ऐकले असेल तसे, वाणी व मन असणे. दुसऱ्याला समजावून देण्याकरता जे आपण भाषण करतो ते दुसऱ्याला फसविण्याजोगे नसावे, भ्रमयुक्त नसावे किंवा न समजण्याजोगे नसावे. आणि ही वाणी भूतमात्रांच्या उपकाराकरता प्रवृत्त केली आहे, नाशाकरता नाही. म्हणून त्या वाणीने जर प्राण्याचा घात होत असेल तर त्यालाही सत्य म्हणू नये. त्यावाणीने पापच होईल आणि ह्या पुण्यासारख्या भासणाऱ्या वाणीने कष्टकारक नरक प्राप्त होईल म्हणून सर्व विचार करून सर्व प्राण्यांचे ज्यांत हित असेल असे सत्य भाषण करावे.

(क) दुसऱ्याचे द्रव्याचा अशास्त्रपूर्वक स्वीकार करणे ह्यास स्तेय म्हणतात. तसे न करता त्याविषयी अस्पृहा (निरिच्छ) असणे ह्यास अस्तेय म्हणावे.

(ड) गुप्त इंद्रिय जे उपस्थ त्याचा संगम करणे (स्वाधीन ठेवणे) ह्यास ब्रह्मचर्य म्हणतात.

(इ) विषयाचे ठिकाणी अर्जन, रक्षण, क्षय, संग व हिंसा हे दोष पाहून त्यांचा स्वीकार न करणे ह्यास अपरिग्रह म्हणतात.

(२) नियम -

शौचसन्तोषतपःस्वाध्यायेश्वर प्रणिधानानि नियमाः ॥३२॥
(पातंजलयोगदर्शन साधनपाद)

भाष्यार्थ - (अ) शौच - मृत्तिका, जल वगैरेनी होणारे. तसेच पवित्र पदार्थाचे भक्षण व उपवासादिकांनी होणारे हे बाह्यशौच व चित्ताच्या रागद्वेषादि मळांचे क्षालन हे आभ्यंतर शौच म्हणावे. (टीपा.पा.४५)

(ब) सन्तोष - प्राप्तसाधनाहून अधिक साधनांच्या प्राप्तीची इच्छा नसणे ह्यास सन्तोष म्हणावे.

(क) तप - द्वंद्व सहन करणे, भूक व तहान, शीत व ऊष्ण, उठणे व बसणे ह्या द्वद्वांना सहन करणे; तसेच काष्ठ मौन (संकेताने सुद्धा अभिप्राय प्रकट न करणे) व आकार मौन (कांही एक न बोलणे) आणि व्रते, कृच्छ्र चांद्रायण, सान्तयन वगैरेचे आचरण करणे.

(ड) स्वाध्याय - मोक्षशास्त्रांचे अध्ययन किंवा प्रणव जप.

(इ) ईश्वरप्रणिधान - परम गुरु जो ईश्वर त्याला सर्व कर्म अर्पण करणे.

(३) आसन

स्थिरसुखमासनम् । (योगसूत्र ४६ साधनपाद)

सूत्रार्थ - स्थिर, सुखप्राप्त होईल असे बसणे.

भाष्यार्थ - पद्मासन, वीरासन, भद्रासन, स्वस्तिकासन, दण्डासन, सोपाश्रय, पर्यंक, क्रौंचनिषदन, हस्तिनिषदन, उष्ट्रनिषदन, समसंस्थान इत्यादिकापैकी ज्यापासून शरीर कंपरहित स्थिर राहील व सुख होईल असे. (ह्या आसनांचे वर्णन 'हठयोगप्रदीपिका' वगैरे मध्ये केले आहे.)

(४) प्राणायाम -

तस्मिन्सतिश्वासप्रश्वासयोर्गतिविच्छेदः प्राणायामः॥(योगसूत्र साधनपाद४९)

सूत्रार्थ - आसनजय झाल्यानंतर बाहेरचा वायु आंत येणे हा श्वास व आंतील वायु बाहेर जाणे हा प्रश्वास. ह्यांच्या गतीचा रोध करणे ह्यास प्राणायाम म्हणतात. (प्राणायामाचे विस्ताराने वर्णन पुढील सूत्र ५०,५१ मध्ये तसेच हठयोगप्रदीपिकादि ग्रंथात केले आहे.) बाहेरील वायु आंत घेणे ह्यास पूरक म्हणतात, आंतील वायु बाहेर सोडणे ह्यांस रेचक म्हणतात आणि दोन्हीचा रोध करणे ह्यास कुंभक म्हणतात.

(५) प्रत्याहार -

स्वविषयासम्प्रयोगे चित्तस्वरूपानुकारइवेन्द्रियाणां प्रत्याहारः ॥५४॥
(योगसूत्र, साधनपाद)

सूत्रार्थ - इन्द्रियें आपापल्या विषयांचा त्याग करून चित्ताच्या स्वरूपाचे अनुकरण करतात त्यास प्रत्याहार म्हणतात.

भाष्यार्थ - वरील सूत्राचा अर्थ असा कीं चित्त निरूद्ध झाले म्हणजे इन्द्रियेसुद्धा चित्ताचे अनुकरण करतात म्हणजे तीही, रूद्ध होतात. इतर इन्द्रियजयाप्रमाणे त्यांना स्वाधीन करण्याला दुसऱ्या उपायांची गरज लागत नाही.

(६) धारणा -

देशबन्धश्चित्तस्य धारणा ॥ (योगसूत्र १ विभूतिपाद)

भाष्यार्थ - नाभिचक्र, हृदयकमल, मस्तक, ज्योति, नासिकाग्र, जिव्हाग्र इत्यादि देशांचे ठिकाणी किंवा बाह्य विषयाचे ठिकाणी चित्ताचें वृत्तीचा बंध करणे धारणा म्हणतात.

(७) ध्यान -

तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम् । (विभूतिपाद, सूत्र २)

भाष्यार्थ - धारणेच्या देशाचे ठिकाणी ध्येयाच्या आलंबनाचा जो प्रत्यय त्या प्रत्ययाची एकतानता (एकाग्रता) असणे म्हणजे दुसरा प्रत्यय न येता तसाच प्रवाह असणे ह्यास ध्यान म्हणतात.

(८) समाधि -

तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः । (सूत्र ३. विभूतिपाद)

भाष्यार्थ- ध्यानच ध्येयाच्या आकाराचे भासू लागते व ध्येयाचे स्वरूपाच्या आवेशाने 'मी ध्यान करतो' ह्या प्रत्ययाचे स्वरूप राहत नाही. तेव्हा त्या ध्यानालाच समाधि (टीपा.पा.४७) म्हणतात. ह्याचा अर्थ असा कीं ध्याता, ध्यान व ध्येय असा जेव्हा प्रत्यय असतो, तेव्हा ते ध्यान व त्या विरहित केवळ ध्येयाकार तो समाधि.

हठयोप्रदीपिकेत दिलेले समाधीचे वर्णन -

सलिले सैंधव यद्वत्साम्यं भजति योगतः ।
तथात्ममनसोरैक्यं समाधिरभिधीयते ॥५॥ (चतुर्थोपदेश)
यदा संक्षीयतेप्राणो मानसं च प्रलीयते ।
तदा समरसत्वं च समाधिरभिधीयते ॥६॥
तत्समंच द्वयोरैक्यं जीवात्मपरमात्मनोः ।
प्रनष्ट सर्वसंकल्पः समाधिः सोऽभिधीयते ॥७॥

अर्थ - ज्याप्रमाणे पाण्यांत टाकलेले सैंधव (मीठ) पाण्यासारखे होते त्याप्रमाणे आत्मा व मन ह्यांचे जे ऐक्य त्याला समाधि म्हणतात. ॥५॥

जेव्हा प्राण क्षीण होतो व मनांत त्याचा लय होतो तेव्हा होणारे जे समरसत्व

(ऐक्य) त्याला समाधि म्हणतात ॥६॥

जीवात्मा व परमात्मा ह्यांचे समरस ऐक्य होऊन सर्व संकल्प नष्ट होतात तेव्हा त्यास समाधि असे म्हणतात ॥७॥

३३२. चित् प्रतीतिबलेकरून - चैतन्याचे प्रतीतीच्या जोरावर.

३३३. स्वानुभवस्थैर्यार्थ - तीच चित् प्रतीति स्थिर होण्याकरता.

३३४. निर्गतचित्ताचे - बाह्य विषयावर गेलेल्या चित्ताचे.

३३५. निक्षेपण - स्थापन

३३६. रूपकरूप आहे - रूपक- ज्याला उपमा द्यावयाची आहे त्याशी (उपमेयाशी) अभेदाने ज्याची उपमा देणे आहे त्याीच (उपमानाची) योजना करणे ह्यास रूपक म्हणतात. जसे मुखचंद्र (मुख उपमेय व चंद्र उपमान) (पातंजल योगदर्शन शास्त्रांत जो चित्तवृत्ति निरोध (टीपा.पा.४८) सांगितला आहे त्यास योग म्हणतात. ह्या योगाची जी यमनियमादि अष्टांगे त्यांच्या सारखीच निदिध्यासनाची अंगे असल्यामुळे त्या अंगानाच यम नियमादि नांवे देऊन निदिध्यासनाचे योग म्हणून वर्णन केल्यामुळे हा निदिधसन रूप योग रूपकरूप म्हटला आहे.)

३३७. निदिध्यासनाची पंधरा अंगे -

आद्यशंकराचार्यकृत अपरोक्षानुभूतीतील श्लोक -

नित्याभ्यांसादृते प्राप्तिर्न भवेत्सृदात्मनः ।
तस्मात्ब्रह्म निदिध्यासेत् जिज्ञासुः श्रेयसेचिरम् ॥१०१॥
यमोहि नियमस्त्यागो मौनं देशश्च कालतः ।
आसनं मूलबंधश्च देहसाम्यंच. दृक्स्थितिः ॥१०२॥
प्राणसंयमनं चैव प्रत्याहारश्च धारणा ।
आत्मध्यानं समाधिश्च प्रोक्ता न्यङ्गानि वै क्रमात् ॥१०३॥

अर्थ - सतत अभ्यास केल्या वाचून सृद्रिूप आत्म्याची प्राप्ति होत नाही म्हणून जिज्ञासूने आपल्या कल्याणाकरता दीर्घकालपर्यंत ब्रह्माचे निदिध्यासन (सतत चिंतन) करावे. ॥१०१॥

निदिध्यासनाची क्रमाने यम, नियम, त्याग, मौन, देश, कालता, आसन, मूलबंध, देहसाम्य, दृक्स्थिति, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, आत्मध्यान आणि समाधि अशी पंधरा अंगे आहेत असे सांगितले आहे. ॥१०२,१०३॥

३३८. यम -

श्लोक - सर्वं ब्रह्मेति विज्ञानादिन्द्रियग्रामसंयमः ।
यमोऽयमिति सम्प्रोक्तोऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः ॥१०४॥

अर्थ - सर्व ब्रह्म आहे, अशा ज्ञानाने श्रोत्रादि सर्व इंद्रियांचा संयम (रोध) तोच यम होय, असे सांगितले आहे.

यास्तव त्याचा वारंवार अभ्यास करावा.

३३९. आत्मसजातीयवृत्तिप्रवाह - आत्मसाक्षात्काराला अनुरूप अशा वृत्तींचा प्रवाह.

३४०. विजातीय देहवृत्ति तिरस्कार - आत्मसाक्षात्काराला प्रतिकूल अशा देहसंबंधी वृत्तींचा तिरस्कार.

श्लोक - सजातीय प्रवाहश्च विजातीय तिरस्कृतिः ।
नियमो हि परानन्दो नियमात् क्रियते बुधैः ॥१०५॥

अर्थ - सजातीय वृत्तींचा प्रवाह ठेवणे व विजातीय वृत्तींचा तिरस्कार करणे हाच परमानन्द देणारा नियम होय. शहाणे त्याचे नियमाने अनुष्ठान करतात.

३४१. त्याग - श्लोक.

त्याग : प्रपञ्चरूपस्य चिदात्मत्वावलोकनात् ।
त्यागो हि महतां पूज्यः सद्यो मोक्षमयो यतः ॥१०६॥

अर्थ - सर्वत्र (चिदात्मत्व) ब्रह्मदृष्टिमुळे प्रपंचाचा त्याग करणे हाच त्याग होय. हा तात्काळमोक्षमय असल्यामुळे महात्म्यांना पूज्य आहे.

३४२. अनिर्वाच्य - शब्दाने वर्णन न करता येण्यासारखी.

श्लोक - यस्माद्वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह ।
यन्मौनं योगिभिर्गम्यं तद्भवेत्सर्वदा बुधः ॥१०७॥

अर्थ - ज्याला प्राप्त केल्यावाचून मनासह वाणी परत फिरतात, व जे योग्यांना प्राप्त होणारे आहे ते मौन शहाण्याने नेहमी होऊन रहावे.

श्लोक - वाचो यस्मिन्निवर्तन्ते तद्वक्तुं केन शक्यते ।
प्रपञ्चो यदि वक्तव्यः सोऽपि शब्द विवर्जितः ॥१०८॥

अर्थ - ज्यापासून वाणी निवृत्त होतात त्याविषयी कोणाला बोलता येईल? प्रपंचाविषयी बोलावे तर तो देखील अनिर्वचनीय आहे.

इति वा तद्भवेन्मौनं सतां सहजसंज्ञितम् । (स्यात्)
गिरा मौनं तु बालानां प्रयुक्तं ब्रह्मवादिभिः ॥१०९॥

अर्थ - अथवा तें हें मौन होय ज्याला सहजःस्थिति म्हणतात व वाणीचे मौन हे अज्ञ पुरुषाकरता ब्रह्मवादी लोकांनी सांगितले आहे.

३४३. देश -

श्लोक - आदावन्ते च मध्ये च जनो यस्मिन्नविद्यते ।

येनेदं सततं व्याप्तं सदेशो विजनः स्मृतः ॥११०॥

अर्थ - दीपिकेत स्पष्ट आहे.

३४४. काल - श्लोक -

कलनातसर्व भूतानां ब्रह्मादीनां निमेषतः ।
कालशब्देन निर्दिष्टो ह्यखंडानंद अद्वयः ॥१११॥

अर्थ - दीपिकेत स्पष्ट आहे.

कल्पहोतात - ब्रह्मादि सर्व भूते कल्पच्या कल्प धारण केल्या जातात.

३४५. आसन - श्लोक -

सुखेनैव भवेद्यस्मिन्नजस्रं ब्रह्म चिंतनम् ।
आसनं तद्विजानीयान्नेतरत्सुखनाशनम् ॥११२॥

अर्थ - जेथे सुखाने सतत ब्रह्मचिंतन होते ते आसन समजावे. दुसरे कोणतेही आसन सुखाचा नाश करणारे असल्यामुळे ते आसन नव्हे.

श्लोक - सिद्धंयत् सर्वभूतादि विश्वाधिष्ठानमव्ययम् ।
यस्मिन् सिद्धाः समाविष्टास्तद्वै सिद्धासनं विदुः ॥११३॥

अर्थ - जे सिद्ध, सर्वभूतांना आदि, विश्वाला अधिष्ठान व अव्यय असून ज्यामध्ये सर्व सिद्ध समाविष्ठ असतात त्याला सिद्धासन समजतात.

३४६. मूलबंध आदिकारण.

श्लोक - यन्मूलं सर्वभूतानां यन्मूलं चित्तबंधनम् ।
मूलबंधः सदा सेव्यो योग्योऽसौ राजयोगिनाम् ॥११४॥

अर्थ - सर्वभूतांचे जे मूळ व ज्याचेमुळे चित्ताला बंधन आहे तो मूळबंध म्हणावा. राजयोग्यांना योग्य असा हा सदा सेवनीय आहे.

३४७. देहसाम्य - श्लोक -

अङ्गानां समतां विद्यात् समेब्रह्मणि लीयते ।
नो चेन्नैव समानत्वमृजुत्वं शुष्कवृक्षवत् ॥११५॥

अर्थ - सर्व अंगे सम आहेत व ती सम अशा ब्रह्माचे ठायीं लीन होतात असे जाणावे. असे न मानले तर समानत्वच होणार नाही. इतर सरलत्व शुष्क वृक्षाप्रमाणे समजावे.

३४८. दृक्स्थिति - तिहींचे जे अधिष्ठान चिंतन म्हणजे तिहींच्या (द्रष्टा,दर्शन, दृश्य) अधिष्ठानाचे जे चिंतन.

श्लोक - दृष्टिं ज्ञानमयीं कृत्वा पश्येद् ब्रह्ममयं जगत् ।
सा दृष्टिः परमोदारा न नासाग्रावलोकिनी ॥११६॥

अर्थ - ज्ञानमय दृष्टि करून जगत् ब्रह्ममय पहावे. परम उदार अशी हीच दृष्टि होय, नासिकेचे अग्र पाहणे ही दृष्टि नव्हे. श्लोक -

(द्रष्टृं) दृष्टिदर्शनदृश्यानां विरामो यत्र वा भवेत् ।
दृष्टिस्तत्रैव कर्तव्या न नासाग्रावलोकिनी ॥११७॥

अर्थ - किंवा दृष्टि, दर्शन व दृश्य ह्यांचा जेथे विराम होतो तेथेच दृष्टि ठेवावी. नासाग्र पहाणे ही दृष्टि नव्हे.

३४९. प्राणायाम -

चित्तादिसर्वभावेषु ब्रह्मत्वेनैव भावनात् ।
निरोधः सर्ववृत्तींनां प्राणायामः स उच्यते ॥११८॥

अर्थ - चित्तादि सर्व भाव पदार्थाचे ठिकाणी ब्रह्मत्वाने भावना केल्यामुळे सर्व वृत्तींचा जो निरोध होतो त्याला प्राणायाम म्हणतात.

श्लोक - निषेधनं प्रपञ्चस्य रेचकाख्य समीरणः ।
ब्रह्मैवास्मीति या वृत्तिः पूरको वायुरीरितः ॥११९॥

अर्थ - प्रपंच्याचा निषेध करणे हाच रेचक नावाचा वायु असून 'मी ब्रह्म आहे' अशी वृत्ति तो पूरक वायु होय.

ततस्तद्वृत्तिनैश्चल्यं कुंभकः प्राणसंयमः ।
अयं चापि प्रबुद्धानामज्ञानां घ्राणपीडनम् ॥१२०॥

अर्थ - नंतर ती वृत्ति निश्चल करणे हा कुंभक नावाचा प्राणायम होय. हा ज्ञान्यांचा प्राणायाम असून नाक दाबणे हा अज्ञान्यांचा प्राणायाम आहे.

३५०. प्रत्याहार - चितिमत्वदर्शन म्हणजे सर्वविषय ज्ञानरूप आहेत असे पाहणे. श्लोक -

विषयेष्वात्मनां दृष्ट्वा मनसश्चिति मज्जनम् ।
प्रत्याहारः स विज्ञेयो ऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः (मुमुक्षुभिः) ॥१२१॥

अर्थ - सर्व विषय आत्मा आहेत असे पाहून मनाला आत्म्यांत मिळविणे त्याला प्रत्याहार समजावे. ह्याचा पुन्हा पुन्हा अभ्यास करावा.

३५१. धारणा - श्लोक -

यत्र यत्र मनो याति ब्रह्मणस्तत्र दर्शनात् ।
मनसो धारणं चैव धारणा सा परा मता ॥१२२॥

अर्थ - जेथे जेथे मन जाते तेथे तेथे ब्रह्म दिसल्यामुळे मनाचे तसे धारण करणे त्याला श्रेष्ठ धारणा मानतात.

३५२. ध्यान - श्लोक -

ब्रह्मैवास्मीति सद्वृत्या निरालम्बतयास्थिति : ।
ध्यानशब्देन विख्याता परमानन्ददायिनी ॥१२३॥

अर्थ - 'मी ब्रह्मच आहे' ह्या सद्वृत्तीने जे आलंबनरहित राहणे. तेच परमानंद देणारे ध्यान म्हणून प्रसिद्ध आहे.

३५३. समाधि - यावृत्तीची विस्मृति - 'मी ब्रह्म आहे' या वृत्तीची विस्मृति.

श्लोक - निर्विकारतया वृत्त्या ब्रह्माकारतयापुनः ।
वृत्तिविस्मरणं सम्यग् समाधिर्ज्ञानसंज्ञकः ॥१२४॥

अर्थ - वृत्ति निर्विकार करून पुन्हा ती वृत्ति ब्रह्माकार करून नंतर त्या वृत्तीचे विस्मरण ती ज्ञान नावाची उत्तम समाधि होय.

३५४. निषेधवैपरित्यपूर्वक - निषेधाच्या विपरीत पणाने. ज्या वस्तूचा बोध करून देणे असेल त्या वस्तूचे ठिकाणी शब्दाची साक्षात् प्रवृत्ति होत नसली तर त्या वस्तूचा निषेध करणाऱ्या ज्या इतर सर्व वस्तु त्यांच्या विपरीतपणाने त्या वस्तूचा बोध करून देतात, त्यालाच 'अतद्व्यावृत्ति' असेही म्हणतात. ब्रह्माचा निषेधरूप जो प्रपंच त्याच्या व्यावृत्तीने ब्रह्मबोध करून देणे हें निशेध वैपरित्य समजावे. दुसऱ्या शब्दांत तत् जे ब्रह्म त्याहून इतर जे अतत् (प्रपंच) त्याची व्यावृत्ति करून तत् जे ब्रह्म त्याचा बोध करून देणे ही 'अतद्व्यावृत्ति' समजावी. दोहोंचाही अर्थ एकच. (टीपा.पा.५३)

३५५. तदाश्रय - त्या स्थापनरूप योगाला आश्रय.

३५६. अज्ञातार्थज्ञापक - अज्ञात (माहित नसलेल्या) अर्थाला ज्ञापक (समजून देणारा). माहित नसलेली गोष्ट सांगणारा असा अर्थ.

३५७. श्रोतव्यवाक्यस्थलीं - श्रोतव्य - श्रवण करण्याला योग्य अशा वाक्यांचे ठिकाणी.

३५८. अप्राप्तीची प्राप्तिरूप जो - अप्राप्तीची म्हणजे इतर कोणत्याही प्रमाणाने प्राप्त न होणाऱ्या अर्थाची प्राप्ति करून देणारा जो विधि जसे 'स्वर्गाची इच्छा असणाऱ्याने यजन करावे.' ह्यांत 'स्वर्गाकरता यजन करावे' हे दुसऱ्या कोणत्याही प्रमाणाने समजण्यासारखे नाही. म्हणून हें वेदवाक्य अपूर्वविधि समजावे.

३५९. प्राप्तीची प्राप्ति - प्राप्तीची म्हणजे रागतः (आसक्तीने) प्राप्त होणाऱ्या अर्थाची प्राप्ति करून देणारा जो विधि. दुसऱ्याने - कोणत्याही साधनाने सहज प्राप्त होणारा असा अर्थ. अमुकच साधनाने प्राप्त करा असे सांगणारे नियम ह्याच प्रकारचे आहेत.

३६०. अनियत निषेधपूर्वक सकालतात्पर्य -

(ह्याचा शब्दशः अर्थ समजत नाही पण) जेथे 'अनियत - निषेधपूर्वक सकाल तात्पर्य' असते तेथे परिसंख्या विधि म्हणतात म्हणजे जेथे साधनांची रागतः अनियत प्राप्ति आहे तेथे त्या त्या अनियत प्राप्तीचा निषेध करून सकाल तात्पर्य असते तेथे परिसंख्या विधि असतो. जसे सुरापानाची प्राप्ति अनियत आहे. कोठेही प्राशन करता येईल असे असून 'सौत्रामणी यज्ञांत सुरापान करावे' ह्यावाक्याने अनियत सुरापानाचा निषेध जरी केला असला तरी सुरापान करणेच असल्यास सौत्रामणी यज्ञात करावे असे सकाल म्हणजे अमुक काळीच करावे असे त्या वाक्याचे तात्पर्य आहे. (टीपा.पा.५४) ''सुरापान कोठेच करू नये करणेच असल्यास सौत्रामणी यज्ञांत करावे.'' असा त्या वाक्याचा तात्पर्यार्थ.

३६१. कनिष्ठ अधिकारी - ज्याला तर्काने ब्रह्मबोध व्हावा अशी इच्छा असून जो तसा तर्कयुक्त बोध ग्रहण करण्याकरता प्रवृत्त होण्यास योग्य असतो.

३६२. मध्यमाधिकारी - ब्रह्मबोध होण्याकरता ज्याला अभ्यास करण्याची इच्छा असून ज्याला त्यासाठी अभ्यास सांगणारा बोध पाहिजे आहे व त्यासाठी जो आपल्या चित्तवृत्तींचा निरोध करण्यास योग्य आहे.

३६३. सिद्धवाक्ये - वेदान्ताची केवळ सिद्धान्तवाक्ये - महावाक्ये

३६४. प्राप्तिप्रात्रता - ज्ञान प्राप्तीची योग्यता.

३६५. उत्तमाधिकारी - महावाक्याचे श्रवण होताच ज्याला ब्रह्मबोध होतो असा.

मूळ ओवी १५

सिद्धि बोलिजे द्विविध । संस्काराचे दोन भेद ।
वृत्ति तेही त्रिविध । चैतन्य द्वय ॥१५॥

टीका

३५३/१५. सिद्धि - इच्छानुसार भोग्यप्राप्तीस सिद्धि ह्मणतात. त्या दोन प्रकारच्या आहेत. संयमजन्य आणि संस्कारजन्य.

३५४/१५. संयम - धारणा, ध्यान आणि समाधि हे एका ठिकाणीं[३६६] करण्यास संयम म्हणतात, त्या पासून उत्पन्न होणारी सिद्धि ती **संयमजन्य**[३६७] ह्मणावी.

३५५/१५. तिचे आठ प्रकार आहेत :- **१.अणिमा,**[३६८] **२.महिमा,**[३६९] **३.लघिमा,**[३७०] **४.गरिमा,**[३७१] **५.प्राप्ति,**[३७२] **६.प्राकाम्य,**[३७३] **७.ईशत्व**[३७४] आणि **८.वशित्व.**[३७५]

या सिद्धींचे लक्षण श्रीमद्भागवत एकादशस्कंध अध्याय १५ यांत केलें आहे तें पहावें.

मूळ तक्ता क्र.१५
ओवी १५ पा.५४

सिद्धि

संयमजन्य	**संस्कारजन्य**
१ अणिमा, २ महिमा, ३ लघिता,	**१ ऊह, २ शब्दज्ञान, ३ शास्त्रज्ञान**
४ गरिमा, ५ प्राप्ति, ६ प्राकाम्य,	**४ आध्यात्मिक ताप सहनशक्ति,**
७ ईशत्व, ८ वशित्व.	**५ आधिभौतिकताप सहनशक्ति,**
	६ आधिदैविक ताप सहनशक्ति ७ सुहृत्प्राप्ति, ८ दान.

३५६/१५. ऋतंभराप्रज्ञेपासून[३७६] जी उत्पन्न होते ती **संस्कारजन्य**[३७७] सिद्धि ह्मणावी.

३५७/१५. तीही आठ प्रकारची आहे. **१.ऊह**[३७८] **२.शब्दज्ञान**[३७९] **३.शास्त्रज्ञान**[३८०] **४.आध्यात्मिक तापसहनशक्ति,**[३८१] **५.आधिभौतिक तापसहनशक्ति, ६.आधिदैविक तापसहनशक्ति, ७.सुहृत्प्राप्ति** [३८२] आणि **८.दान.**[३८३]

यांची लक्षणें सांख्यकारिकेवरील गौडपादीय भाष्यांत पहावीं.

(य१३-५३)

संस्कार

साक्षीस्थानापन्न आणि विषयस्थानापन्न याप्रमाणें संस्कार दोन प्रकारचे आहेत.

३५८/१५. साक्षीस्थानापन्न संस्कार- अविद्यायोगें करून साक्षीमात्राचा रोध अहमादि- आरूढत्वानें प्रतीत होतो त्यास साक्षीस्थानापन्न[३८४] संस्कार ह्मणतात.*(तक्ता १५०)*

३५९/१५. विषयस्थानापन्न संस्कार - इंद्रियद्वारा विषयांचें सूक्ष्म रूप मनोमय रुद्ध होतें त्यास विषयस्थानापन्नसंस्कार[३८५] म्हणतात.

३६०/१५. संस्कार - ज्ञेयरूप गोचरतेवरून ज्ञामात्र गोचरतेची

संस्कार[३८६] संज्ञा आहे.

वृत्ति

३६१/१५. वृत्ति - चिद्घनत्वेंकरून संस्कारोन्मुखचिन्निरोधचरणास वृत्ति[३८७] ह्मणतात. ती त्रिविध आहे. प्रमा,अप्रमा आणि भ्रम.*(तक्का १५१)*

३६२/१५. प्रमावृत्ति - प्रमातृप्रेरणेनें[३८८] प्रमाणग्राह्य[३८९] प्रमेयबलपूर्वक[३९०] ज्ञामात्रगोचरोन्मुख[३९१] चिद्घनविचरणचरण[३९२] ती प्रमावृत्ति ह्मणावी.

प्रमाता

तदाश्रय[३९३] प्रमाता दोन प्रकारचा आहे. **क्रमभावग्राहक** आणि **युगपद्भावग्राहक.** (य१३-५४)

३६३/१५. क्रमभावग्राहक प्रमाता - आरूढ[३९४] होऊन इंद्रियावच्छिन्न[३९५] विषयांचें ग्रहण करणारा जो अहंप्रत्यय तो क्रमभावग्राहक[३९६]प्रमाता ह्मणावा.

३६४/१५. युगपद्भावग्राहक प्रमाता - ज्याचे ठायीं एक-समयावच्छिन्न[३९७] सर्वविषयप्रतीति होते तो अहंप्रत्यय युगपद्भावग्राहक[३९८] प्रमाता ह्मणावा.

३६५/१५. प्रमाता -

प्रमाकर्त्यास[३९९] प्रमाता ह्मणतात.*(तक्का १५२)*

प्रमाण

तत्प्रेर्य[४००] प्रमाण षड्विध आहे. **प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शाब्द, अर्थापत्ति, आणि अनुपलब्धि.** *(तक्का १५३)*

३६६/१५. प्रत्यक्षप्रमाण - इंद्रियार्थसन्निकर्षज्ञानास[४०१] प्रत्यक्षप्रमाण ह्मणतात.

३६७/१५. ते षड्विध[४०२] आहे. **१.श्रोत्र, २.त्वक्, ३.चक्षु, ४.जिव्हा ५.घ्राण** आणि **६.मन.** मिश्रवाचस्पतींच्या मतांत मनालाही इंद्रियता आहे. ह्यांचें लक्षण पुष्कळ ग्रंथांचे ठायीं प्रसिद्ध आहे.

तत्पूर्वक[४०३] अनुमान त्रिविध आहे. १.**पूर्ववत्,**[४०४] **२.शेषवत्,** आणि **३.सामन्यतो दृष्ट.**

५३

३६८/१५. अनुमान - व्याप्तिपूर्वक पश्चात्पदार्थमापनाला अनुमान[४०५] ह्मणतात.

३६९/१५. व्याप्ति - नियतधर्मास[४०६] व्याप्ति ह्मणतात.

हिचें लक्षण **सांख्यप्रवचनदर्शनपंचमाध्यायीं** सांगितले आहे तें पहावें.

३७०/१५. उपमान - प्रसिद्ध साधर्म्य असून साध्यसाधन होण्यास उपमान[४०७] ह्मणतात.

ह्याचें लक्षण **विश्वनाथकृत न्यायसूत्रवृत्तींत** प्रसिद्ध आहे तें पहावें.

३७१/१५. शब्द - आप्तोपदेशास शब्द ह्मणतात.

३७२/१५. तो दोन प्रकारचा आहे. **दृष्टार्थक**[४०८] आणि **अदृष्टार्थक**[४०९] त्यांचें लक्षण शब्दशक्तिप्रकाशिकादि ग्रंथांचे ठायीं प्रसिद्ध आहे.

३७३/१५. पदार्थविवक्षामात्रनादयोजनेस[४१०] **शब्द** म्हणतात.

३७४/१५. आप्त - यथार्थ व हितवक्ता तो आप्त[४११] ह्मणावा. तल्लक्षण वात्सायनमुनिकृत **न्यायभाष्यप्रथमाध्यायीं** कथिलें आहे.

३७५/१५. अर्थापत्ति - अर्थनियमावरून[४१२] ज्याचें ग्रहण होतें ती अर्थापत्ति होय.

तिचें निरूपण **वृत्तिप्रभाकराचे** ठायीं केलें आहे.

३७६/१५. अनुपलब्धि - १.अतिदूर,२.सामीप्य, ३.इंद्रियघात, ४.मनो नैकाग्र्य, ५.सूक्ष्मत्व, ६.व्यवधान, ७.अभिभव, ८.समानाभिहार, ९.अभाव; (य१३-५५)

३७७/१५. या नऊ प्रकारें करून अदर्शनप्रत्ययावलंबन तें **अनुपलब्धिप्रमाण**[४१३] ह्मणावें.

या षट्प्रमाणांचें लक्षण 'वेदान्तपरिभाषेंत' बोलिलें आहे.

३७८/१५. ही षट्प्रमाणें व सातवें **७.ऐतिह्य आणि ८.असंभव** अशीं आठ प्रमाणें **रामानुजांनी आपल्या यतीन्द्रदीपिकेंत** सांगितली आहेत. या अष्टप्रमाणांच्याच योगानीं प्रमाव्यवहार होतो.

३७९/१५. अप्रमावृत्ति - प्रमाणरहितास[४१४] अप्रमावृत्ति ह्मणतात.

ती दोन प्रकारची आहे. जीवाश्रिता आणि ईश्वराश्रिता.

३८०/१५. सुखदुःखज्ञान ही **जीवाश्रिता अप्रमा** ह्मणावी. आणि

३८१/१५. ईश्वरज्ञान दुसरी **अप्रमा** होय.

३८२/१५. भ्रम - बाधितानुभवास[४१५] भ्रम म्हणतात.

तो **१.अध्यास** आणि **२.अधिकृत भेदानें** दोन प्रकारचा आहे.

मूळ तक्ता क्र.१६
ओवी १५ पा.५७



३८३/१५. अध्यास (भ्रम)- अधिष्ठानज्ञानेंकरून[४१६] ज्याची निवृत्ति होते त्यास अध्यास म्हणतात.

तो दोन प्रकारचा आहे. **१.संशयरूप** आणि **२.विपर्ययरूप.**

३८४/१५. संशयरूप - द्विकोटिक[४१७] अथवा चतुष्कोटिक[४१८] ज्ञानाचे ठायीं आधाराधेय-ऐक्यभावप्रतीतीस[४१९] प्रथम अध्यास भ्रम[४२०] ह्मणतात.

३८५/१५. विपर्ययभ्रम - रूपविशेषाज्ञानेंकरून[४२१] जें मिथ्या ज्ञान त्यास विपर्यय (-रूप द्वितीय अध्यास) भ्रम ह्मणतात.

३८६/१५. अधिकृतभ्रम - यथार्थज्ञानेंकरून ज्याची निवृत्ति होते तो अधिकृतभ्रम होय. तो १.निश्चयरूप आणि २.विकल्परूप या भेदानें दोन प्रकाचा आहे.

३८७/१५. निश्चयरूप - भ्रमज्ञानाज्ञानेंकरून[४२२] भ्रमसत्यप्रत्यय-निश्चय- रूप[४२३] भ्रम ह्मणावा.

३८८/१५. विकल्परूप - वस्तुशून्य शब्दमात्र व्यवहारास

विकल्प[४२४] ह्मणतात. तल्लक्षण विज्ञानभिक्षुप्रणीत 'योगसारसंग्रहांत' उत्तम कथिलें आहे. (य१३-५६)

चैतन्य

३८९/१५. सर्ववृत्त्याश्रय[४२५] चैतन्य दोन प्रकारचें आहे. सामान्य आणि विशेष.

३९०/१५. प्राचूर्यापेक्षी[४२६] चित् **सामान्य** ह्मणावें. तें दोन प्रकारचें आहे. तटस्थ आणि परम.

३९१/१५. मायाश्रय[४२७] ईश्वरचैतन्यास **तटस्थ** म्हणतात.

३९२/१५. सर्व व्यापक[४२८] ईश्वरचैतन्यास[४२९] **परम**[४३०] म्हणतात.

३९३/१५. रुद्धापेक्षी[४३१] **विशेष चैतन्य** ह्मणावे. तें दोन प्रकारचें आहे. प्रमातृचेतन[1] आणि विषय चेतन. *(१. येथें जें चार चेतन सांगितलें ते विद्यारण्य मतानुसारी आहेत, ओ.१६ चेतनत्रयावरील टीपण.)*

३९४/१५. प्रमाश्रयास[४३२] **प्रमातृचेतन** ह्मणतात. तें दोन प्रकारचें आहे. आरूढ आणि कूटस्थ.

३९५/१५. आरूढचेतन - कर्तृत्वभोक्तृत्वादि वृत्त्यभिमानी[४३३] आरूढचेतन ह्मणावें. साक्षीचैतन्य[४३४] कूटस्थ ह्मणावें.

३९६/१५. विषयचेतन - इदंप्रत्यगोचर[४३५] विवृतनानात्वास विषयचेतन ह्मणतात. तें दोन प्रकारचें आहे. शबल[४३६] आणि शुद्ध.

३९७/१५. शबल - भूतविवेकादि प्रकरणीं ज्याची पंचीकरणें करून मंद जिज्ञासू साठीं कल्पना केली जाते तें शबल आणि

३९८/१५. शुद्ध - नानात्वीं एकत्व प्रत्यय तें शुद्ध. **(य१३-५७)**

३९९/१५. चेतन - स्वसंवेद्य[४३७] सन्मात्रास चेतन म्हणतात.

ह्याचें लक्षण शारीरक ब्रह्मसूत्र समन्वयाध्यायीं केलें आहे.

४००/१५. ब्रह्म - अभिप्राय असा कीं गुरूपदेशानें या **सर्वचिदैक्यमात्र प्रत्ययास**[४३८] ब्रह्म ह्मणतात.

मूळ तक्ता क्र.१७
ओवी १५ पा.५८



३६६. एका ठिकाणी - एका विषयाचे ठिकाणी - ज्या विषयाची धारणा, त्याच विषयाचे ध्यान व त्याचीच समाधी.

३६७. सिद्धि संयमजन्य - ह्या सर्व सिद्धींचे वर्णन सप्तम यष्टि पत्र ७ पृष्ठ ६५ मध्ये आले आहे.

श्लोक :- अणिमा महिमा मूर्तेर्लघिमा प्राप्तिरिन्द्रियैः ।
प्राकाम्यं श्रुतदृष्टेषु शक्तिप्रेरणमीशिता ॥४॥
गुणेष्वसंगो वशिता यत्कामस्तदवस्यति ।
एता मे सिद्धयः सौम्य अष्टावौत्पत्तिका मताः ॥५॥ भागवत.स्कं११.अ.१५

टीका - नाथ भागवत -

आणिमा महिमा लघिमा स्थिति । या तिन्ही देहसिद्धीचे प्राप्ति ।
प्राप्तिरिन्द्रिय जे वदंती । ते जाण चौथी महासिद्धि ॥४३॥
प्राकाश्यश्रुतदृष्टांता । ते पाचवी सिद्धी गा सर्वथा ।
शक्ति प्रेरण असंग ईशिता । हे जाणतत्वता सहावी सिद्धी ॥४४॥
माझे धर्म जेथ वश होती । ते वशिता बोलिजे सिद्धांती ।
ते सातवी सिद्धि वदंती । जाण निश्चिती उद्धवा ॥४५॥
त्रिलोकी भोग जे निरूपम । ते नकरिता परिश्रम ।
इच्छामात्रे उत्तमोत्तम । भोग सुगम हो लागे ॥४६॥
(यत्कामस्तदवस्यति) इच्छिल्या कामसुखाची प्राप्ति ।
त्रिभुवनीची भोग संपत्ती । एकेच काळीं अवचिती ।
ते जाण पा ख्याति आठवी सिद्धी ॥४७॥

३६८. अणिमा - श्लोक - ११ वा स्कंध अध्याय १५ वा.

भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्रं धारयेन्मनः ।
आणिमानमवाप्नोति तन्मात्रोपासको मम ॥१०॥

टीका - नाथ भागवत.

मी अणुरेणुचाही अणुरेण । जीवाचाही हृदयस्थ जाण ।
तेथ अणुतन्मात्र करूनिमन । माझ्याठायी जाण जो राखे ॥६८॥
अणुतन्मात्र ध्यान सदाराहे । त्याचा अणुमात्रचि देह होये ।
किटकीभृंगीच्या ऐसे पाहे । अणिमेची लाहे तो सिद्धि ॥६९॥ (टीपा.पा.५६)
तो अछिद्रीं निघोनि जाये । जगाच्या डोळ्यामाजी समाये ।
कोठेही खुपेना पाहे । अणिमेची लाहे महा सिद्धि ॥७०॥

३६९. महिमा - श्लोक ११ अध्याय १५ एकादशस्कंध.

महत्यात्मन्मयि परे यथा संस्थं मनो दधत् ।
महिमानमवाप्नोति भूतानां च पृथक् पृथक् ॥११॥

टीका - नाथभागवत -

माझे स्वरूप अनंत अपार । महत्तत्वाहोनि अतिथोर ।
आणि महत्तत्वाचाही साचार । नियंता ईश्वर जो कां मी ॥७१॥
ते सिद्धि साधावया जो नर । माझी धारणा धरी अपरंपार ।
तेवढेच होय त्याचे शरीर । हे सिद्धी महाथोर महिमाने ॥७२॥
सूक्ष्म कापुसाचे तंतु पाहे । तो कल्पने ऐसा पटु होये ।
माझी महती धारणा वाहे । तो माझी सिद्धि लाहे महिमत्वे ॥७३॥
तुकीता त्याच्या समान भारा । न पुरे सपर्वत सगळी धरा ।
एवढ्या महत्तत्वाचा उभारा । सिद्धिद्वारा तो पावे ॥७४॥

३७०. लघिमा -

श्लोक - परमाणुमये चित्तं भूतानां मयि रंजयन् ।
काल सूक्ष्मार्थतां योगी लघिमानमवाप्नुयात् ॥१२॥

टीका - नाथभागवत -

वायु आदि प्राण प्रमाण । जेथे कालसूत्राचे गणन ।
तो परमाणुरूप भगवंत जाण । त्याचेचि दृढ ध्यान सदा जो करी ॥७५॥
परमाणु धारणेचा महिमा । त्याच्या देहासि ये अति लघिमा ।
तो मशकी चढोनी पहाया । उडे व्योमामाजी सुखें ॥७६॥
आणिमादि तीन्ही धारणा । या दोहीच्या सिद्धी जाणा ।
लहान थोर हळुपणा । हे लक्षणा उपजती ॥७७॥

३७१. गरिमा - जड होणे, हिच्या योगाने पृथ्वीला खाली दाबू शकतो. ही सिद्धी भागवतात दिलेली नाही.

कोणी ह्या सिद्धीचा अंतर्भाव 'महिमा' सिद्धीत करतात. महिमा म्हणजे मोठे होणे व गरिमा म्हणजे जड होणे. ही दोन्ही एकच असा ते अर्थ घेतात. पण ते बरोबर नाही. आकाशापेक्षा मोठा जरी योगी झाला तरी त्याचे शरीर पूर्वीप्रमाणेच किंबहुना त्याचे पेक्षाही हलके राहू शकेल. ही 'गरिमा' सिद्धी स्वतंत्रच घेतली पाहिजे. ह्याचे कारण मातेने सप्रम यष्टीत ७ वे पत्रांत दिले आहे. ते त्या यष्टीत पृष्ठ ७२ वर पहावे.

३७२. प्राप्ति -

धारयन्मय्यहंतत्त्वे मनो वैकारिकेऽखिलम् ।
सर्वेन्द्रियाणमात्मत्त्वं प्राप्तिं प्राप्नोति मन्मना ॥१३॥भाग.स्कंध ११/अ.१५

टीका - नाथ भागवत -

मुळीचा शुद्ध अहंकारू । ज्या पासूनि इन्द्रिय विकारू ।
इन्द्रिय अधिष्ठात्री सुरवरू । चेतविता ईश्वर जो का मी ॥७९॥
ज्या माझ्याठायीं धारणा धरिता । इन्द्रिय अधिष्ठात्री देवता ।
त्यासी पावोनि एकात्मता । इन्द्रिय प्रकाशतास्वये लाहे ॥८०॥
जे का इन्द्रियव्यापार जगाचे । प्रकाशूनि हा देखे साचे ।
येवढीये इंद्रियप्राप्तीचे । साधी सिद्धीचे वैभव ॥८१॥
तेव्हा ज्याचा जो जेथ पाहे । इंद्रियाचा व्यापारू होये ।
तो येणेचि केला आहे । ऐशी प्रतीति होये इन्द्रियप्राप्ति ॥८२॥

३७३. प्राकाम्य - ही सिद्धि मिळाली असता मनुष्य कोणत्याहि पदार्थाचे रूप घेऊ शकतो. त्याच्या इच्छेला कोठेच प्रतिबंध नसतो. प्राकाम्य सिद्धीचा असा अर्थ सप्तम यष्टीत पत्र ७ मध्ये मातेनेच (ग्रंथकार) केला आहे. भागवतात 'प्राकाश्य' नावाची सिद्धि दिली आहे. ती खाली प्रमाणे -

भागवत श्लोक - महत्यात्मनि यः सूत्रे धारयेन्मयि मानसम् ।
प्राकाश्ये पारमेष्ट्यं मे विन्दतेऽव्यक्त जन्मनः ॥१४॥ (स्कंध११.अ.१५)

टीका नाथांची - जे महत्तत्त्व गा जाण । ते मायेचे प्रथम स्फुरण ।
ज्यासि क्रियासूत्र प्रधान । नामाभिधान बोलती ॥८३॥
तेथे अजन्मा मी आपण । जाहलो सूत्राचा सूत्रात्मा जाण ।
त्या माझ्या स्वरूपाचे ध्यान । सावधान जो करी ॥८४॥
ज्या सूत्राचे नि प्रकाश प्रवाहे । ब्रह्माण्ड हिरण्यगर्भ प्रकाशला राहे ।

ते प्रकाशता त्यासी वश्य होये । येणे सूत्रात्मा पाहे निदिध्यासने ॥८५॥
त्या निदिध्यासनापोटीं । करू पाहे ब्रह्मांड कोटी ।
येवढी प्रकाश सिद्धी गोमटी । हे मजवीण नुठी साधका ॥८६॥

एकनाथांनी केलेले 'प्राकाश्य' सिद्धीचे वर्णन, मातेने केलेल्या 'प्राकाम्य' सिद्धीच्या वर्णनाशी कांहीसे जुळते. म्हणून 'प्राकाम्य' सिद्धी भागवतातील 'प्राकाश्य' सिद्धीच असावी. कोणी 'प्राकाम्य' सिद्धी भागवतांतील 'कामावसायित्व' सिद्धी समजतात. पण सप्तमयष्टीतील सातव्या पत्रावरून 'कामावसायित्व' ही सिद्धी 'प्राकाम्य' सिद्धीहून मातेला निराळी अभिप्रेत दिसते.

३७४ ईशत्व - (भागवत) श्लोक -

विष्णौ त्र्यधिश्वरे चित्तं धारयेत्काल विग्रहे ।
स ईशत्वमवाप्नोति क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनाम् ॥१५॥ स्कं११। अ. १५.

नाथांची टीका -

मायादित्रिगुणनियंता । जो कळिकाळातें आकळिता ।
उत्पत्तिस्थिति प्रळयकर्ता । जाण तत्त्वतां अंतर्यामी ॥८७॥
त्या मज विष्णूचे ध्यान । निरंतर जो करी जाण ।
त्यासी अदृष्ट द्रष्टेपण । शक्तिप्रेरण ईशत्व ये ॥८८॥
मिथ्या बुद्धीबळाच्या खेळाप्रती । स्वारीची जाणे गति निगुती ।
तेवी मिथ्या संसार प्रतीति । भूतांची आगति-निर्गती स्वये जाणे ॥८९॥
जो जीवादिशरीर प्रेरण । स्वयें करूं शके आपण ।
करिता अंतर्याम्याचे ध्यान । येवढी सिद्धी जाण उपतिष्ठे ॥९०॥
तो आपुलेनि प्रतापस्वभावीं । मशकाहातीं मेरू विभांडवी ।
कां इन्द्राते मारवी । उंदीराहाती ॥९१॥
यापरी एकाते मारवी । जीवे गेलिया जीववी ।
अचेत नाते पालेजवी । ये सिद्धीची पदवी ईशित्व ॥९२॥

३७५. वशित्व -

श्लोक भागवत - नारायणे तुरीयाख्ये भगवच्छब्दशब्दिते ।
मनो मय्यादधद्योगी मद्धर्मावशितामियात् ॥१६॥
(भाग. स्कंध.११/अ. १५)

टीका - नाथांची - जीवशिव आणि प्रकृति । याहूनि पर चौथी स्थिति ।
ज्याते नारायण म्हणती । जाण निश्चिती सज्ञान ॥९३॥
जागृतिस्वप्न सुषुप्ति । यावेगळी तुरीय स्थिति ।

त्याते नारायण म्हणती । यथा निगुती सज्ञान ॥९४॥
दृश्यद्रष्टादर्शन । या अतीत चौथा जाण ।
त्याते म्हणती नारायण । ज्ञान विचक्षण निजबोधे ॥९५॥
त्रिपुटी वेगळी जे मातू । असोनिया त्रिपुटी आंतू ।
जो कां त्रिपुटीशी अलिप्त । तो मी विख्यातु नारायण ॥९६॥
यश श्री वैराग्य ज्ञान । ऐश्वर्य औदार्य हे षड्गुण ।
नित्यवसति परिपूर्ण । तो मी नारायण भगवंत ॥९७॥
त्या मज नारायणातें ध्याता । माझी वशिता सिद्धी ये हाता ।
सर्व कर्मी अलिप्तता । भोगूनि अभोक्ता भोगाते ॥९८॥

वर दिलेल्या आठ सिद्धींपैकी 'गरिमा' ही सिद्धी वगळून श्री मद्भागवतात 'कामावसायित्व' ही आठवी सिद्धी दिलेली आहे. गरिमा ह्या सिद्धीची पृथक् जरूर असल्यामुळे 'कामावसायित्व' ही नववी सिद्धी घ्यावी असे मातेने सप्तम यष्टीतील सातव्या पत्रात म्हटले आहे.

कामावसायित्व - भागवत/ श्लोक / स्कंध ११ / अ. १५
निर्गुणे ब्रह्मणि मायिधारयन् विशद मनः ।
परमानन्द माप्नोति यत्र कामोंऽवसीयते ॥१७॥

नाथांची टीका -

चित्तदेवता सत्त्वगुण । इन्द्रिये तो रजोगुण ।
विषय केवळ तमोगुण । हे चि आवरण परमानंदा ॥९९॥
परमानंदासि आवरण । आडवे असती तीन्ही गुण ।
त्यांते सांडुनि निर्गुण । ब्रह्म परिपूर्ण मज जो ध्याये ॥१००॥
त्यासि माझिये ध्यान स्थिति । होय परमानंद अवाप्ती ।
ज्या आनंदामाजीं उपशांति । होय निश्चिती सकळ कामा ॥१०१॥
झालिया परमानन्द प्राप्ति । सकळकाम निमग्न होती ।
जेवी सूर्योदयाप्रती । तारा हारपती सचंद्र ॥१०२॥
तेवी परमानंदाच्या पोटीं । हारपती काम कोटी ।
तेथ इंद्रिय सुखाच्या गोठी । लाजोनी उठाउठी विरताती ॥१०३॥
उद्धवा ऐक पां निश्चिती । नव्हता परमानंदप्राप्ती ।
कदानव्हे काम निवृत्ति । नाना युक्ति करिताही ॥१०४॥

'कामावसायित्व' ह्या सिद्धीचा अर्थ कोणी 'सत्यसंकल्पवान्' होणे असा करतात. तो श्रुतिविरूद्ध असल्यामुळे आईला (श्रीमहाराजांना) सम्मत नाही असे सातवे यष्टीतील सातवे पत्रावरून दिसते. ''सर्व सिद्धींचा एकाचवेळी उपयोग करून

५७

घेता येणे'' असा त्या सिद्धीचा अर्थ मातेने त्या पत्रांत केला आहे. त्रिभुवनींची भोगसंपत्ती एकाचवेळी प्राप्त होणे असे ओवी ४७ मध्ये नाथांनी म्हटले असून पुढील ओवी ९९ ते १०४ मधील नाथांच्या टीकेप्रमाणे 'कामावसायित्व' म्हणजे 'ब्रह्मानंद प्राप्ति' असा अर्थ दिसतो. ब्रह्मानंदावाचून सर्व सिद्धींचा एकाचवेळी अनुभव येणे अशक्य आहे. 'अणोरणीयान् महतो महीयान्' इत्यादि श्रुतिवरून ब्रह्मानंदातच सर्व सिद्धि एकत्र होतात म्हणून आईने केलेल्या लक्षणाचे तात्पर्य नाथांच्या टीकेप्रमाणे 'परमानंदप्राप्ति' हेच आहे. निर्गुण ब्रह्माचे ध्यानाने हा परमानंद प्राप्त होणारा असल्यामुळे ही संयमजन्य गौण सिद्धी म्हटली आहे. ज्ञानाने ब्रह्मस्वरूप होणे संस्कारजन्य सिद्धीत येते.

३७६. ऋतंभराप्रज्ञा - ऋत म्हणजे सत्य धारणा करणारी जी प्रज्ञा. ह्या प्रज्ञेच्या ठिकाणी विपर्यास ज्ञानाचा गंधही नसतो. आणि ही प्रज्ञा अध्यात्म प्रसादांत उत्पन्न होते व हा अध्यात्मप्रसाद निर्विचारसमाधीच्या रज व तम यांनी रहित अशा स्वच्छ प्रवाहामुळे प्राप्त होतो (योगसूत्र४७.समाधिपाद१. पहावे.)

३७७. संस्कारजन्य सिद्धी - ह्या अष्टज्ञान सिद्धींचे वर्णन सप्तम् यष्टि पत्र ७ मध्ये आले आहे ते पुढे दिले आहे.

३७८. ऊह - गौडपादीय भाष्य -

ऊहो यथाकाश्चिन्नित्यमूहते किमिहसत्यं किं परं किं नैःश्रेयसम् किंकृत्वा कृतार्थास्याम् इति चिन्तयतो ज्ञानमुत्पद्यते प्रधानादन्य एव पुरूष इतोन्या बुद्धिरन्योऽहंकारोऽन्यानि तन्मात्राणिन्द्रियाणि पञ्चमहाभूतानीत्येवं तत्त्वज्ञानमुत्पद्यतें येन मोक्षो भवति, एषा ऊहाख्या प्रथमा सिद्धिः ।

पत्रांतील वर्णन - ऊह म्हणजे आपल्या तर्कानेच, कोणाची अपेक्षा न करताना, ज्ञान मिळवून मुक्त होणे. 'ऊहाच्या योगाने मनुष्य सर्वज्ञही होऊ शकतो' असे पतंजलींनी आपल्या सूत्रांत सांगितले आहे.

३७९. शब्दज्ञान - भाष्य - तथा शब्दज्ञानात् प्रधान बुद्ध्यहंकार तन्मात्रेन्द्रिय-पंचमहाभूतविषयज्ञानं भवति ततो मोक्ष इत्येषा शब्दाख्या सिद्धिः ।

पत्रांतील वर्णन - 'शब्द' म्हणजे योगवासिष्ठाच्या निर्वाण प्रकरणात सांगितल्या प्रमाणे, सिद्ध गाथा ऐकून जनक मुक्त झाला, तसे थोड्याशा शब्दावरून प्रबल स्फूर्तीच्या योगाने सर्वज्ञान होणे ही दुसरी सिद्धि होय.

३८०. शास्त्रज्ञान - वेदादि शास्त्राध्यायनात् पञ्चविंशति तत्त्वज्ञानं प्राप्यत इत्येषा तृतीया सिद्धिः ।

पत्रातील आशय - गुरूमुखाने शास्त्रा ध्ययन करून सर्वज्ञान होणे ही तिसरी.

३८१. आध्यात्मिक तापसहनशक्ति, आधिभौतिक तापसहनशक्ति, आधिदैविक तापसहनशक्ति -

भाष्य - आध्यात्मिकादि भौतिकाधिदैविक दुःखत्रयविधाताय गुरुं समुपगम्य तत् उपदेशान्मोक्षं याति एषा चतुर्थी सिद्धिः ।

एषैव दुःखत्रयभेदात् त्रिधा कल्पनीया इति षट् सिद्धयः ।

पत्रांतील वर्णन - जीवन्मुक्ति दशेत आध्यात्मिक, आधिभौतिक,आधिदैविक ही दुःखे प्रारब्धाने प्राप्त झाली असतां त्यांचा अभिभव करणे ह्या तीन मिळून सहा.

३८२. सुहृत्प्राप्ति - भाष्य - यथाकश्चित्सुहृज् ज्ञानमधिगम्य मोक्षं गच्छति, एषांसप्तम् सिद्धिः।

पत्रांतील वर्णन - काही खटपट न करता एखादा महात्मा आपल्यावर प्रसन्न होऊन मित्रपणाने सर्वज्ञान करून देतो ही सातवी सिद्धि.

३८३. दान - भाष्य - यथा कश्चित् भगवतां प्रत्याश्रयौषधि त्रिदण्डकुण्डिकादीनां ग्रासाच्छादनादीनां च दानेनोपकृत्य तेभ्यो ज्ञानमवाप्य मोक्षं याति एषाष्टमी सिद्धिः।

पत्रांतील वर्णन - जानश्रुति राजाने रैमुनीला कन्या देऊन ब्रह्मज्ञान करून घेतले अशी ज्याप्रमाणे छांदोग्य उपनिषदांत गाथा आहे त्याप्रमाणे यथाशक्ति कोणत्याहि पदार्थाचे दान करून एखाद्या महात्म्याजवळून जे ज्ञान मिळते ती आठवी सिद्धि होय.

३८४. साक्षीस्थानापन्न - साक्षीचा अंतःकरणाचे ठिकाणी प्राप्त होणारा संस्कार - तो आत्म्याचा अविद्येशी योग झाल्यामुळे होतो; शुद्ध साक्षिस्वरूप जो आत्मा त्याचा अंतःकरणाचे ठिकाणी जो रोध होतो तोच संस्कार; ह्या संस्काराची प्रतीति अहमादि-आरूढत्वाने होते म्हणजे आत्मा हा अंतःकरणाशी ऐक्य करून अहंकाररूपाने इंद्रियरूपाने वगैरे भासतो.

(अंतःकरण शब्दाचा अर्थ ओवी८व अंक १५६,१५७ मध्ये पहावा. अंतःकरणाचे पांच प्रकार सांगितले आहेत. त्यापैकी ज्याचे ठिकाणी साक्षीचा रोध होतो त्या रूपाने साक्षी भासत असतो.)

३८५. विषयस्थानापन्न - विषयाचा मनाचे ठिकाणी प्राप्त होणारा संस्कार - इन्द्रियद्वारा मनाने ग्रहण केलेले विषय मनाचे ठिकाणी रूद्ध होऊन सूक्ष्मरूपाने मनोरूप होऊन राहतात तेव्हा. (टीपा.पा.६३)

(येथे 'मन' शब्द केवळ संशय याअर्थी न घेता अंतःकरण ह्या व्यापक अर्थी घ्यावा. अंक १६० वरील विवरण पहावे.)

३८६. संस्कार - ज्ञेयरूपाने ग्रहण होणारा पदार्थ केवळ ज्ञानरूपाने ग्रहण होणे.

५८

बाह्य असणारा पदार्थ जेव्हा अंतःकरणरूप होऊन राहतो तेव्हा त्यास संस्कार म्हणतात.

(येथे ज्ञानमात्र असे न म्हणता 'ज्ञामात्र' असे म्हटले आहे. कारण वेदान्त ग्रंथांत बहुधा 'ज्ञान' शब्द शुद्ध चित ह्या अर्थी घेतला जातो. संस्कारज्ञान केवळ शुद्ध नसते.)

३८७. वृत्ति - चिद्घनत्वेकरून (चिद्घनरूपाने) असणारे जे परब्रह्म त्याचा जो संस्काराला उन्मुख होणारा चिन्निरोध म्हणजे नानात्व. (चिन्निरोधाचा अर्थ ओवी १० खाली पहावा.)

चिन्निरोधचरण - चिन्निरोध होणे; संस्कारोन्मुख - साक्षी स्थानापन्न किंवा विषय स्थानापन्न संस्काराला उन्मुख म्हणजे संस्कार ग्रहण करणारे जे ब्रह्माचे नानात्व. चिन्निरोध हा अध्यात्मादि तीन रूपाने असतो असे ओवी १० खाली म्हटले आहे व हा चिन्निरोध ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय ह्या परस्पर सापेक्ष मर्यादेने असतो. तिलाच पुटी म्हणतात, असे ओवी ११ खाली म्हटले आहे. ह्यापैकी जो संस्कारोन्मुख चिन्निरोध त्याला वृत्ति म्हणतात म्हणजे संस्काराला ग्रहण करणारे जे घन चेतनाचे नानात्व त्याला वृत्ति म्हणतात. चिन्निरोधात ब्रह्माचे चित् घनत्व नाहीसे न होता चिन्निरोध होतो म्हणजे भ्रमाने भासतो.

३८८. प्रमातृ प्रेरणेने - प्रमात्याच्या प्रेरणेने.

३८९. प्रमाण ग्राह्य - प्रमाणाने ग्रहण होणारे.

३९०. प्रमेयबलपूर्वक - प्रमेय जो पदार्थ त्याचे बलाने.

३९१. ज्ञामात्र गोचरोन्मुख - संस्कारोन्मुख - संस्कार ग्रहण करणारी. (टीपा.पा.६४)

३९२. चिद्घन विचरण चरण - चिद्घन जे ब्रह्म त्याचे जे विचरण, बाह्यस्फुरण, त्याचे चरण म्हणजे होणे; चैतन्याची बाह्य स्फूर्ति जेमव्हा प्रमाता प्रमाणाने बाह्य पदार्थाच्या संस्काराचें ग्रहण करतो तेव्हा त्या ग्रहणाकरता चैतन्याचे स्फुरण ज्या वृत्तीने होते तिला प्रमावृत्ति म्हणावी.

३९३. तदाश्रय प्रमाता - त्या प्रमावृत्तीला आश्रय असणारा प्रमाता.

३९४. आरूढ होऊन - अल्पचित्त विशिष्ट होऊन.

३९५. इन्द्रियावच्छिन्न - इंद्रियाने मर्यादित - इंद्रियाने ग्रहण केलेल्या.

३९६. क्रमभावग्राहक - एकामागून एका पदार्थाचे ग्रहण करणारा.

३९७. एक समयावच्छिन्न - एकाच वेळी.

३९८. युगपत् भावग्राहक - सर्व विषयांचे एकदम ग्रहण करणारा.

३९९. प्रमाकर्त्यास - प्रमावृत्ति ग्रहण करणाऱ्यास, प्रमावृत्तीला जो आश्रय त्यास. प्रमात्याचे ठिकाणी मी प्रमेय ग्रहण करतो अशी कर्तृत्व वृत्ति असते असा भाव.

४००. तत्प्रेर्य - प्रमात्याने प्रेरणा केलेले.

४०१. इन्द्रियार्थ सन्निकर्ष ज्ञानास - इन्द्रिय व अर्थ ह्यांचा जो सन्निकर्ष म्हणजे संबंध त्या संबंधाचे जे ज्ञान त्या ज्ञानास प्रत्यक्ष प्रमा म्हणतात. ही प्रत्यक्ष प्रमा ज्या करणांनी (इंद्रियांनी) होते त्यास प्रत्यक्ष प्रमाण म्हणतात.

४०२. ते षड्विध आहे - ते प्रमाण - प्रत्यक्ष प्रमा उत्पन्न करणारी इंद्रिये सहा आहेत.

४०३. तत्पूर्वक अनुमान - प्रत्यक्षप्रमापूर्वक अनुमान - अनुमान हें प्रत्यक्ष ज्ञानानंतर होणारे आहे असा अर्थ. (टीपा.पा.६५)

४०४. पूर्ववत्, शेषवत् आणि सामान्यतो दृष्ट (सामान्यतः) - ह्यांची लक्षणे, न्यायसूत्रभाष्य व विश्वनाथवृत्ति आणि सांख्यकारिकेचे गौडपादाचार्यांचे भाष्य ह्यांत दिली आहेत. गौडपादाचार्यांना अनुसरून खालील लक्षणे दिली आहेत -

पूर्ववत् - पूर्वी पाहिल्यावरून जे अनुमान ते पूर्ववत् अनुमान - जसे विशष मेघ आलेले पाहून वृष्टीचे अनुमान करणे.

शेषवत् - जसे समुद्राच्या थोड्या पाण्यात मीठ पाहून अवशिष्ट समुद्रात मीठ आहे असे अनुमान करणे.

सामान्यतो दृष्ट - जसे एखादा पुरुष एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी असलेला पाहून हा गतिमान आहे असे जाणून, त्याचप्रमाणे चंद्रतारका वगैरे तशाच गतिमान आहेत असे अनुमान करणे, तसेच आंब्याला मोहोर आलेला पाहून तसाच दुसऱ्या आंब्यालाही मोहोर आला असे सामान्यतः पहिल्यावरून अनुमान करणे.

विश्वनाथवृत्तिप्रमाणे लक्षणे -

पूर्ववत् - पूर्व जे कारण ते आहे लिंग (चिन्ह) ज्यांत तसे विशेष मेघ आलेले पाहून वृष्टीचे अनुमान करणे.

शेषवत् - शेष म्हणजे कार्य ते आहे लिंग (चिन्ह) ज्यांत - जसे नदीला पूर आलेला पाहून वृष्टीचे अनुमान करणे.

सामान्यतो दृष्ट - कार्य व कारण ह्याहून निराळे आहे लिंग (चिन्ह) ज्यांत जसे पृथ्वीत्वावरून द्रव्यत्वाचे अनुमान करणे.

किंवा

पूर्ववत् - पूर्व म्हणजे अन्वय आहे ज्यांत; म्हणजे केवलान्वयी असा अर्थ. जसे

प्रमेयत्वावरून अभिधेय असे अनुमान करणे.

शेषवत् - शेष म्हणजे व्यतिरेक आहे ज्यात, म्हणजे केवळ, व्यतिरेकी असा अर्थ. जसे गंधवत्त्व असल्यामुळे पृथ्वी इतराहून भिन्न आहे असे अनुमान करणे.

सामान्यतो दृष्ट - अन्वयाव्यतिरेकी - जसे धूमावरून वन्हिमान् आहे असे अनुमान करणे.

४०५. अनुमान - व्याप्तिपूर्वक - व्याप्तिज्ञानपूर्वक - व्याप्तीच्या ज्ञानाने जे पश्चात् - दृष्टीआड, अपरोक्ष असलेल्या पदार्थाचे मापन, ग्रहण होणे - ज्ञान होणे त्याला अनुमान - अनुमिति - म्हणतात.

अनुमितीचे जे करण त्याला अनुमान प्रमाण म्हणतात.

४०६. नियत धर्मास - धर्माच्या नित्य असण्यास व्याप्ति म्हणतात, म्हणजे साध्यवानाहून इतरत्र धर्माने न राहणे ह्यास व्याप्ति म्हणावे. जसे वन्हिमान अशा पदार्थाहून इतरत्र धूमाने नसणे म्हणजे वन्हिमानाचेच ठिकाणी धूमाचे नियत असणे ह्यास व्याप्ति म्हणावे. धर्म म्हणजे हेतु.

(सांख्य प्रवचन भाष्याप्रमाणे व्याप्तीचे लक्षण - नियतधर्मसाहित्य मुभयोरेकतरस्य वा व्याप्तिः ॥२९॥ सांख्यसूत्र अध्याय ५. भाष्य - धर्म साहित्यं धर्मतायां साहित्यं ।

सहचार इति यावत् ।

तथाचोभयोः साध्यसाधन योरेकतरस्य साधन मात्रस्य वा नियतः अव्यभिचारतः यः सहचारः सः व्याप्तिरित्यर्थः ।

उभयोरिति स मव्याप्ति पक्षेप्रोक्तं, नियमश्चानुकूल तर्केण ग्राह्य इति न व्याप्तिग्रऽसम्भव इति भावः ।)

४०७. उपमान - प्रसिद्ध म्हणजे पूर्वी ज्याचे ज्ञान झाले आहे असे जे गाय वगैरे त्याच्या साधर्म्यावरून म्हणजे सादृश्यावरून म्हणजे सादृश्य ज्ञानावरून साध्य जे गवय पदाने वाच्यत्व असणे त्याचे साधन (टीपा.पा.६७) म्हणजे सिद्धि होण्यास उपमान म्हणजे उपमिति म्हणतात व ज्यापासून उपमिति होते त्याला उपमान प्रमाण म्हणतात. हा अर्थ विश्वनाथवृत्ति प्रमाणे केला आहे.

४०८. दृष्टार्थक - ज्याचा अर्थ येथेच प्रतीत होतो तो दृष्टार्थक.

४०९. अदृष्टार्थक - ज्याचा अर्थ परलोकी प्रतीत होतो तो अदृष्टार्थक.

४१० पदार्थविवक्षामात्र नादयोजना - केवळ पदाचा अर्थ सांगण्याचे इच्छेने केलेली जी नादाची योजना.

४११. आप्त - वात्स्यायनभाष्य - आप्तः खलुसाक्षात्कृत धर्मा, यथादृष्टस्य

अर्थस्य चिरव्यापयिषया प्रयुक्ता उपदेष्टा ।
साक्षात्करणं अर्थ स्याप्तिस्तया प्रवर्तते इत्याप्तः ऋष्यार्थ म्लेच्छानां समानं लक्षणं तथा च सर्वेषां व्यवहाराः प्रवर्तन्तेम इति ।(न्यायसूत्र७ /अध्याय१/ आन्हिक १)

४१२. अर्थ नियमावरून - अर्थ म्हणजे संपादक त्याचे नियमावरून - म्हणजे संपादक संपाद्य ह्यांचे नियमावरून ज्या अर्थाची म्हणजे संपादकाची आपत्ति होते म्हणजे ग्रहण होते त्याला अर्थापत्ति प्रमा म्हणावी. ज्याने ती प्रमा होते त्याला अर्थापत्ति प्रमाण म्हणावे. प्रत्यक्ष अनुमान ह्या शब्दाप्रमाणे अर्थापत्ति शब्द प्रमा व प्रमाण ह्या दोहोचाही वाचक आहे.

ज्याचे वाचून जो संभवत नाही त्याचा तो उपपाद्य (संपाद्य) म्हणावा. जसे रात्री भोजनावाचून दिवसा न जेवणाराचे ठिकाणी. स्थूलता संभवत नाही. म्हणून रात्री रात्री भोजनाची स्थूलता उपपाद्य उपपाद्य आहे. ह्या उपपाद्य स्थूलतेवरून उपपादक जो अर्थ 'रात्री भोजन' ह्याची आपत्ति म्हणजे ग्रहण होते म्हणून अर्थापत्ति.

४१३. अनुपलब्धि -

अतिदूरात्सामिप्यादिन्द्रियघातान्मनोनवस्थानात् ।
सौक्ष्म्याद्व्यवधानादभिभवात्समाना भिहारा्‌ ॥७॥ (सांख्यकारिका)

सांख्य शास्त्रात प्रधान व पुरुष मानले आहेत पण त्यांची उपलब्धि नसल्यामुळे ते नाहीत असे म्हणण्याचे कारण नाही. कारण केवळ अभावानेच अनुपलब्धि होत नसून दुसऱ्याही कारणामुळे पदार्थांची अनुपलब्धि होते, असे सांगण्याकरिता अभावाशिवाय इतर अनुपलब्धिची कारणे वरील कारिकेत दिलेली आहेत. तीच अनुपलब्धिची कारणे दीपिकेत (यष्टि१३ प्रस्तुतग्रंथ) देऊन अभाव हेही अनुपलब्धिचे कारण दिपिकेत दिले आहे. म्हणूनच अनुपलब्धि प्रमाण 'अदर्शन प्रत्ययावलंबन आहे' म्हणजे अदर्शनाची - न दिसण्याची - प्रतीति ग्रहण करणारे आहे एवढेच म्हटले आहे. अनुपलब्धिने अभाव सिद्ध होतो असे म्हणण्याचे कारण नाही असा आशय. अतिदूर, सामिप्य वगैरेची उदाहरणे गौडपादाचार्यांनी वरील कारिकेच्या भाष्यांत दिली आहेत. ते भाष्य खालील प्रमाणे -

भाष्य - अत्र कश्चिदाह प्रधानं पुरूषो वा नोपलभ्यते ग्ना नोपलभ्यते लोके तन्नास्ति तस्मात् तावपि न स्तः ।
यथा द्वितीयं शिरस्तृतीयो बाहुरिति ।
तदुच्यते । अत्र सतामप्यर्था नामष्टधः उपलब्धिः नभवति । तद्यथा ।
इह सनामप्यर्थानामतिदूरादनुपलब्धिर्द्रष्टा यथा देशान्तरस्थानां चैत्र मैत्र विष्णु

६०

मित्राणाम् ।
सामिप्याद्यथा चक्षुषोऽञ्चनानुपलब्धिः ।
इंद्रियाभिघाताद्यथा बहिरान्धयोः शब्दरूपानुलब्धिः ।
मनोनवस्थानाद्यथा व्यग्रचित्तः सम्यक्कथितमपि नावधारयति ।
सौक्ष्म्याद्यथा कुड्येन विहितं वस्तु नोपलभ्यते ।
अभिभवाद्यथा सूर्यतेजसाभिभूता ग्रहनक्षत्रतारकादयो नोपलभ्यते ।
समानाभिहाराद्यथा मुद्रराशि मुद्रः क्षिप्तः कुवलयामलकमध्ये कुवलयामलके क्षिप्ते कपोतमध्ये कपोतो नोपलभ्यते ।
प्रधानद्रव्य मध्याहृत्त्वात् एवमष्टानुपलब्धिः सतामर्थानामिहद्दष्टा ॥७॥

४१४. प्रमाणरहितास - प्रमाणावाचून उत्पन्न होणाऱ्या वृत्तीस.

४१५. बाधितानुभवास - ज्याचा बाध होतो अशा अनुभवास.

४१६. अधिष्ठान ज्ञानेकरून - अधिष्ठानाच्या ज्ञानाने.

४१७. द्विकोटिक - ज्यांत (हा स्थाणु आहे किंवा पुरूष आहे असे) दोन प्रकार आहेत असे.

४१८. चतुष्कोटिक- ज्यांत (१ हा स्थाणु आहे २ हा पुरूष आहे ३ हा स्थाणु नसून पुरूष आहे ४ हा पुरूष नसून स्थाणु आहे असे) चार प्रकार आहेत असे. (ओवी १७ खाली पुन्हा संशयाचा अर्थ दिला आहे.)

४१९. आधाराधेयैक्यभाव प्रतीतीस - आधार व आधेय एकच भासणे. वस्तुतः स्थाणु किंवा पुरूष असून त्याच आधारावर पुरूषाचा किंवा स्थाणूचा भ्रम होऊन दोन्ही एकदम भासणे. हे द्विकोटिक ज्ञानात होते, चतुष्कोटीक ज्ञानातही अशीच ऐक्यभाव प्रतीती होते. फक्त बाकीच्या दोन कोटीत अभाव ज्ञानाने मर्यादित असे भाव ज्ञान असते. (ओवी १७ खाली हे अधिक स्पष्ट केले आहे.)

४२० प्रथमभ्रम - संशयरूपभ्रम (अध्यास)

४२१. रूपविशेषाज्ञाने करून- पदार्थाच्या अधिष्ठानाच्या विशेष रूपाच्या अज्ञानामुळे जेव्हा दोरीचे ठिकाणी सर्प भासतो तेव्हा दोरीचे सामान्यरूप जे लांबपणा त्याचे ज्ञान असते पण पीळ वगैरे जे विशेषरूप त्याचे अज्ञान असते त्यामुळे त्या सामान्य रूपाचे ठिकाणी मिथ्या जो सर्प त्याचे जे ज्ञान होते त्यास विपर्यय भ्रम म्हणतात.

४२२. भ्रमज्ञानाज्ञाने करून - भ्रमज्ञानाच्या अज्ञानामुळे.

४२३. भ्रमसत्य प्रत्यय - भ्रम सत्य आहे असा प्रत्यय. विपर्यय भ्रमाने भासणारा पदार्थच सत्य आहे असा निश्चय. विपर्यय भ्रम अधिष्ठानाचे ज्ञानाने निवृत्त होतो व विपर्यय भ्रमाचे ठिकाणी जो सत्यत्व निश्चय तो 'हा विपर्यय भ्रम होता' अशा ज्ञानाने निवृत्त होतो. केवळ मिथ्याज्ञान हा विपर्यय भ्रम व त्या भ्रमाच्या अज्ञानामुळे

त्याचे ठिकाणी जी सत्यत्व बुद्धि तो निश्चयरूप भ्रम समजावा.

४२४. विकल्परूपभ्रम - वस्तु नसून जो केवळ शब्दाचा व्यवहार त्यास विकल्प म्हणतात. राहू स्वतः शीरच असून राहूचे शीर म्हणणे; पुरूष म्हणजे चैतन्य असून पुरूषाचे चैतन्य म्हणणे ही विकल्परूपभ्रमाची उदाहरणे विज्ञानभिक्षूंनी दिली आहेत. विपर्यय व विकल्प ह्यातील भेद विज्ञान भिक्षूनी दिली आहे तो असा. विशेषरूपाच्या ज्ञानाने निवृत्त होणारा तो विपर्यय व निवृत्त न होणारा तो विकल्प.

४२५. सर्ववृत्त्याश्रय - सर्ववृत्तींना आश्रय असणारे.

४२६. प्राचुर्यापेक्षी - पुष्कळांच्या अपेक्षेने असणारे.

४२७. मायाश्रय - मायेला आश्रय असणाऱ्या.

४२८. सर्वव्यापक - सर्वत्र व्याप्त असणाऱ्या.

४२९. ईश्वर चैतन्यास - ईश्वररूप चैतन्यास.

४३०. परमब्रह्म - मायेला आश्रय असणारा ईश्वरच परमब्रह्म होय. मायाश्रय तें शबल व सर्वव्यापक ते शुद्धब्रह्म असा भेद करणे युक्त नाही असे सुचविण्याकरता ईश्वरचैतन्यासच परम म्हटले आहे. (ओवी ५ खाली अनध्यस्त विवर्ताचे जे लक्षण दिले आहे त्यावरून आणि मातेच्या इतर सर्व ग्रंथावरून हे लक्षांत येईल.)

४३१. रूद्धापेक्षी - चिन्निरोधाच्या अपेक्षेने असणारे. (ओवी १० खाली चिन्निरोध ह्याचा अर्थ पहावा.)

अध्यारोपापवादाने भासणाऱ्या नावात्वाने जो चैतन्याचा निरोध त्या अपेक्षेने असणारे.

४३२. प्रमाश्रयास - प्रमेला आश्रय असणाऱ्यास.

४३३. वृत्यभिमानी - कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादि वृत्ती मीच आहे म्हणणारे.

४३४. साक्षी चैतन्य - साक्षी असणारे, कर्तृत्व भोक्तृत्वादिकांचा अभिमान धारण न करणारे असे चैतन्य.

४३५. इदंप्रत्यय गोचर विवृत्तनानात्वास - इदम् (हें) असा जो प्रत्यय त्या प्रत्ययाने दिसणारे ब्रह्माचे जे विवर्तरूपाने भासणारे नानात्व त्यास.

४३६. शबल - वेदान्तग्रंथांच्या ज्या प्रकरणांत पंचमहाभूतांचा विवेक सांगितला असतो तेथे ज्ञानाची इच्छा असणाऱ्या मंदअधिकाऱ्याकरिता पंचमहाभूतांच्या पंचीकरणाने जगांतील ज्या नानात्वाची कल्पना दिली जाते त्या नानात्वास शबल चैतन्य म्हणतात. वस्तुतः त्या नानात्वांत एकच चैतन्य आहे अथवा एका चैतन्याचेच हे नानात्व आहे असा ज्या चैतन्याचा प्रत्यय तें शुद्ध.

४३७. स्वसंवेद्य सन्मात्रास - स्वतःच स्वतःला जाणली जाणारी जी केवळ सत्ता तिला.

६१

५०/१८.

४३८. या सर्व चिदैक्यमात्र प्रत्ययास - वर चैतन्याचे नाना प्रकार सांगितले. त्यांत अभिप्राय असा की त्या सर्वांत एक चैतन्यच आहे अशा गुरूपदेशाने येणाऱ्या प्रत्ययास ब्रह्म म्हणतात असे समजावे.

मूळ ओवी १६

महावाक्य ते द्विविध । उपासनेचे दोन भेद । गुरु आणि संकेत एक एकविध । शिष्य त्रिविध असती पैं ॥१६॥

टीका

महावाक्य

४०१/१६. महावाक्य -
लक्षणावृत्तिपूर्वक(४३९) ब्रह्मापरोक्षज्ञानकारक(४४०) ईशशब्दसमूहास(४४१) महावाक्य म्हणतात. *(तक्ता १५६)*

ते दोन प्रकारचें आहे. जीव ब्रह्मैक्यबोधक आणि ईश्वरब्रह्मैक्य बोधक.

४०२/१६. जीवब्रह्मैक्य बोधक - जीवाचें आणि ब्रह्माचें ऐक्य दाखविणाऱ्या शब्दास प्रथम महावाक्य ह्मणतात.

तें दोन प्रकारचें आहे. बाह्यज्ञानतः(४४२) जीवब्रह्मैक्यकरणरूप आणि अंतर्ज्ञानतः जीवब्रह्मैक्यकरणरूप. **(य१३-५८)**

४०३/१६. बाह्यज्ञानतो जीवब्रह्मैक्यकरणरूप - 'प्रज्ञानं ब्रह्म' यांत प्रज्ञान शब्दानें इंद्रियज्ञातृत्व(४४३) आणि ब्रह्म शब्दानें सर्वचेतन,(४४४) यांचें ऐक्य सांगितलें आहे म्हणून ह्यास -
बाह्यज्ञानतो(४४५) जीवब्रह्मैक्यकरणरूप महावाक्य म्हणावें.

४०४/१६. अन्तर्ज्ञानतो जीवब्रह्मैक्यकरणरूप - 'अहं ब्रह्मास्मि' यांत शरीरांत जी अहंवृत्ति तत्प्रत्यय आणि चेतनासीं ऐक्य सांगितलें आहे म्हणून जीवब्रह्मैक्यकरणरूप हे द्वितीय महावाक्य(४४६) म्हणावें.

४०५/१६. जीव - प्रवृत्तिकालीं(४४७) इच्छा(४४८) आणि फलकालीं(४४९) वासना इच्या योगाने बद्ध आणि वृत्त्यारूढ(४५०) जें रूद्धचेतन(४५१) त्यास जीव म्हणतात.

४०६/१६. ईश्वर - कारणोपाधि[४५२] विषयोपहित[४५३] ज्ञानाधिष्ठानास ईश्वर म्हणतात.

४०७/१६. त्याचें[४५४] आणि चेतनाचें ऐक्य असूनही बागुलजन्ममरणन्यायें[४५५] करून शिष्यबोधार्थ प्रथमभेदकल्पनापूर्वक[४५६] पुनरभेदस्थापन तें **ईश्वरब्रह्मैक्यबोधक महावाक्य** म्हणावें.

तें दोन प्रकारचें आहे. सारूढवृत्तिज्ञानकारक आणि अनारूढवृत्तिज्ञानकारक.

४०८/१६. सारूढवृत्तिज्ञानकारक - **'तत्त्वमसि,** यांत तच्छब्दानें ईश्वर सांगून त्वम् शब्दानें[४५७] पुनः जीवब्रह्मैक्य सांगितले. यांत आरूढ जो जीव तदनुग्रहण आहे म्हणून यास **'सारूढवृत्तिज्ञानकारक**[४५८] **ईश्वरब्रह्मैक्य बोधक महावाक्य'** म्हणतात.

४०९/१६. अनारूढवृत्तिज्ञानकारक - **'अयमात्मा ब्रह्म'** यांत अयमात्मा शब्दानें हृदयस्थ ईश्वर ग्रहण करून त्याचें चेतनासीं ऐक्य सांगितलें आहे म्हणून तें **'अनारूढवृत्तिज्ञानकारक ईश्वरब्रह्मैक्यबोधक महावाक्य'** म्हणावें,

या समस्त महावाक्यांचा मी बांधलेल्या[४६०] संज्ञारहित सामान्यार्थ **'द्वादश महावाक्यविवरण'*** *(*अनुपलब्ध)* नामक ग्रंथाचे ठायीं विस्तृत केला आहे. तो पहावा. ह्या ग्रंथातून सप्रक्रियसंज्ञा[४६१] मात्र घ्याव्यात. **(य१३-५९)**

अभिप्राय असा कीं तीन महावाक्यांत चेतनत्रयाविषयीं**[१] पृथक् ज्ञान[४६२] अपेक्षित आहे. आणि 'तत्त्वमसि' या सामवेदीय महावाक्यांत तिघांचे अपृथक्ज्ञान असून ऐक्यता होते म्हणून तेंच वाक्य श्रेष्ठ आहे. आणि वाक्यवृत्त्यादि ग्रंथकारांनी चार वाक्यांची खटपट न करिता केवल 'तत्त्वमसि, ह्या वाक्याचेंच निरूपण केले आहे.

*(**१. जीव, ईश्वर आणि ब्रह्म यांस चेतनत्रय म्हणावें. पूर्वी मी प्रमातृचेतनकालीं (ओवी १५ मधे) कूटस्थ घेऊन चार चेतन सांगितले ते विद्यारण्यमतानुसारीं आहेत. एक विद्यारण्यमत सोडून बाकी पंचदशसहस्त्र अद्वैतवादियांच्या मतांत चेतनत्रयाचाच स्वीकार आहे. या*

*सर्व मतांचें निरूपण मी **'प्रक्रिया'** (अनुपलब्ध?) ग्रंथांत करीन. आणि सामन्यचेतन निरूपण करतांना मी ईश्वरचेतन दोन प्रकारचें आहे असें सांगितलें त्यांतील व्यापक ईश्वरचेतन येथें 'ब्रह्म' शब्दाने घ्यावे -श्रीगुलाबरावमहाराज.)*

उपासना

४१०/१६. महावाक्यज्ञानाचे[४६३] ठिकाणी विक्षेपादि **प्रतिबंधनिवृत्तिकारक उपासना** दोन प्रकारची आहे. निर्गुण आणि सगुण.

(तक्ता मूळ१८/५७ पान६१)

४११/१६. निर्गुणोपासना - अदृश्य अव्यक्त अचिंत्य इत्यादि ब्रह्मधर्मभावनेस[४६४] निर्गुणोपासना म्हणतात. ती दोन प्रकारची आहे. अहंग्रहरूप आणि अवधिरूप.

४१२/१६. अहंग्रहोपासना - अव्यक्तादि धर्मी ब्रह्म मी आहें अशी संकेतावांचून जी भावना तिला अहंग्रहोपासना म्हणतात.

४१३/१६. अवधिरूप निर्गुणोपासना - अकार- उकार- मकार- या तिहींचा अनुच्चार्य[४६५] अर्धमात्रेचे ठायीं लय करून तदुपहित अव्यक्तादि धर्मी ब्रह्मधारणेस अवधिरूप निर्गुणोपासना म्हणतात.

इलाच **प्रणवोपासना** असेंही नांव आहे.

या प्रणवोपासनेचे प्रकार शंकराचार्यकृत[४६६] **पंचीकरण** ग्रंथांत आणि **मांडुक्योपनिषदांत**[४६७] सांगितले आहेत ते पहावें.

ही निर्गुणोपासना अंतवाहकपदार्थेकरून[४६८] ज्याला विक्षेप होतात त्याच्या उपयोगी आहे.

४१४/१६. भौतिक स्थूलपदार्थेकरून ज्याला विक्षेप होतात त्यासाठी **सगुणोपासना** बोलिली आहे. **(य१३-६०)**

सगुणोपासना

४१५/१६. सगुणोपासना - व्यक्तादिधर्मी [४६९] ईश्वरभावनेस सगुणोपासना ह्मणतात.

ती (सगुणोपसना) दोन प्रकारची आहे. वैराज आणि प्रतीक.

मूळ तक्ता क्र.१८
ओवी १६ पा.६१



४१६/१६. वैराजोपासना - चतुर्दश लोकही ज्याच्या शरीरावर आहेत असा सहस्त्रशीर्षादिमान् जो पुरुष त्याच्या धारणेस वैराजोपासना ह्मणतात.

इचें लक्षण पुरुषसूक्तांत आणि श्रीमद्भागवत द्वितीय स्कंधाचे ठायीं सांगितले आहे, ते पहावे.

४१७/१६. प्रतीकोपासना - ज्याच्या बुद्धीस ही भावना फावत नाहीं अशा पुरुषास एकदेशीय व्यक्तादिधर्मी जें ईश्वरचिंतन त्यास प्रतीकोपासना ह्मणतात.

ती तीन प्रकारची आहे. एकांगरूप, सर्वांगरूप आणि बिंदुरूप.

४१८/१६. एकांगरूप - आदित्य अग्नि वायु इत्यादिकांची उपासना एकांगरूप[४७०] ह्मणावी.

४१९/१६. प्रतिमांची उपासना **सर्वांगरूप**[४७१] होय. आणि

४२०/१६. शालिग्रामादि पंचायतनोपासना **बिंदुरूप**[४७२] आहे.

(य१३-६१)

या सर्व उपासनांची लक्षणें छांदोग्यादि उपनिषदांचे ठायीं आणि सर्व पुराणांचे ठायीं सांगितली आहेत ती पहावीं.

श्रीगुरु

४२१/१६. गुरु - शुद्धाचरण, शुद्धहेतु, शुद्धज्ञानसंपन्न, अहेतुक

दयालु[४७३] ईश्वरस्थानी[४७४] सेवायोग्य, ब्रह्मोपदेशक पुरुषास गुरु ह्मणतात. हा आचार्य [४७५] सर्वत्र एक आहे. *(तक्ता १५८)*

४२२/१६. सर्व शास्त्रें[४७६] व सर्व वेद या श्रीगुरूच्या निरूपणांतील देवतांनी चोरून घेतलेल्या शब्दांचे अर्थविस्तर होत.

हें गुरुत्व वेदांहूनही[४७७] अनादि आहे. याचें निरूपण पतंजलीनी आपल्या **समाधिपादांत** उत्तम केले आहे.

मागे सांगितलेल्या सर्व उपासनेचें फळ एका श्रीगुरुउपासनेनेंच होतें असे श्रीज्ञानेश्वरकृत **अमृतानुभव** ग्रंथांत म्हटले आहे.

श्रीमद्भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायाच्या सातव्या श्लोकांतील तिसऱ्या चरणाच्या पहिल्या **'आचार्योपासनं,** या शब्दावर भगवान् श्रीमत्सद्गुरु, ज्ञानेश्वराचार्यांनी टीकारूप ज्या ओव्या केल्या आहेत त्या सद्गुरूपासनारूप[४७८] रत्नमय अनंत ब्रह्माडांचे भक्तिरूप ब्रह्मभांडार होत.

४२३/१६. संकेत - गुरूपदेशपूर्वक[४७९] जीवजगदीश्वरसच्चिदानंदब्रह्म-व्यवहारपरमार्थैक्यभिन्नताऽविरोधावच्छिन्न ज्ञानास संकेत म्हणतात.

हा जाणला असतां पुढें जाणावयाची इच्छा[४८०] आणि अनिच्छा दोन्हीही होत नाहींत. हा एकविधच[४८१] आहे.

शिष्य

४२४/१६. शिष्य - सद्गुरुआज्ञा[४८२] सद्गुरुसेवापूर्वक गुरूपदेशग्रहणक्षम[४८३] पुरुषांनां शिष्य म्हणतात. ते तीन प्रकारचे आहेत. अपरोक्षोत्साही,[४८४] परोक्षोत्साही [४८५] आणि तर्कोत्साही.[४८६]

४२५/१६. अपरोक्षोत्साही - उपदेशमात्रे करून ज्याला अखंडानंदप्राप्ति तो प्रथम आणि उत्तम ह्मणावा.

४२६/१६. परोक्षोत्साही - उपदेशधारणा नंतर व्यवहित[४८७] अखंडानंदप्राप्ति ज्याला होते तो द्वितीय आणि मध्यम ह्मणावा.

४२७/१६. तर्कोत्साही - अनिष्टापादानपूर्वक[४८८] वादमात्र उपदेशधारणा नंतर पुनस्तत्वोपदेशसाधनादि पूर्वतः फलकालीन

विक्षेपासंभावनादि निवृत्तिपूर्वक व्यवहित अखंडानंदप्राप्ति ज्याला होते तो तृतीय आणि अधमाधिकारी म्हणावा.(य१३.६२)

४२८/१६. अभिप्राय विशेष - या तीन शिष्यांतील कोणताही असो पण तो साधनचतुष्टयसंपन्न मात्र पाहिजे. त्या वांचून इतरांस शास्त्रानें कल्पित[४८९] ब्रह्मप्राप्ति पाहिजे तर होवो, पण **गुरूपदेशाधिकार[४९०] नाही.** *(तक्ता १५९)*

---

४३९. लक्षणावृत्तिपूर्वक - लक्षणावृत्तीने.

४४०. ब्रह्मापरोक्ष ज्ञानकारक - ब्रह्माचे अपरोक्ष ज्ञान करून देणाऱ्या.

४४१. ईशशब्दसमूहास - वेदवाक्यास (शब्दसमूह - वाक्य)

४४२. बाह्यज्ञानतः - पिंडाच्या (शरीराच्या) अपेक्षेने बाह्य अशा ज्ञानाने.(टीपा.पा.७२)

४४३. इन्द्रियज्ञातृत्व - इन्द्रियाने ज्ञातृत्व आहे ज्याला असा जो जीव - इन्द्रियाने ज्ञान घेणारा.

४४४. सर्वचेतन - सर्वत्र ब्रह्मांडांत व्याप्त असणारे चेतन.

४४५. बाह्यज्ञानतः - बाह्य ब्रह्माण्डातील ज्ञानाने

४४६. द्वितीय - अंतर्ज्ञानतः - पिंडातील ज्ञानाने.

४४७. प्रवृत्तिकालीं. कर्माच्या प्रवृत्तिकाली.

४४८. इच्छा, वासना - (अंक २६१ पहावा) ज्ञेयानुरूप बुद्धीचे जे स्थूल प्रकटरूप ते ज्ञान व जे सूक्ष्मरूप तो संस्कार. संस्कारानुरूप बुद्धीची बाह्यधाव ती वासना. भोगकालीं हीच जागृत होते. पुन्हा भोगाकरता वासनेची जी बाह्यधाव ती इच्छा- इच्छेनुरूप जी वृत्तीची शरिराकडे बाह्यधाव ती प्रवृत्ति. ह्या प्रवृत्तीला अनुसरून जो शरीराचा व्यापार ती क्रिया म्हणावी. वासनेपासून क्रियेपर्यंत जी स्थिती तिला भावना म्हणावी.

४४९. फलकाली - फल भोगकाली.

४५०. वृत्त्यारूढ - वृत्तीशी तादात्म्य पावलेले - वृत्त्याभिमानी.

४५१. रूद्धचेतन - आरूढपणाने रूद्ध (वेष्टलेले, वेढलेले) चेतन.

४५२. कारणोपाधि - जगाचे परिणामी उपादान कारण जी माया ती आहे उपाधि ज्याला - मायाश्रय - जे तटस्थ चेतन. किंवा जगाचे विवर्त कारणत्वरूप उपाधि आहे ज्याला असे जे तटस्थ चेतन.

४५३. विषयोपहित ज्ञानाधिष्ठान - विषय आहे उपाधि ज्याला म्हणजे विषयाला

आधार जे ज्ञान - जे विशेष चेतन त्याला जे अधिष्ठान. सकारण जगत् व जीव ह्या दोहोंनाही अधिष्ठान असणारे चेतन त्यास ईश्वर म्हणावे असा अर्थ. (टीपा.पा.७३)

४५४. त्याचे आणि चेतनाचे - त्याचे - ईश्वराचे आणि चेतनाचे - ब्रह्माचे.

४५५. बागुल जन्ममरण न्याये करून - मुलाचे शिक्षणाकरता आईने म्हटलेले बागुल आला (बागुलाचा जन्म) व बागुल गेला (बागुलाचे मरण) हे दोन्ही खोटे त्याप्रमाणे.

४५६. प्रथम भेदकल्पना पूर्वक पुनरभेदस्थापन - ईश्वर व ब्रह्म ह्यांत प्रथम भेदाची कल्पना करून नंतर अभेद स्थापन करणे.

४५७. त्वम् शब्दाने पुनः जीवब्रह्मैक्य सांगितले - 'त्वम्' शब्दाने जीव सांगून, त्याचे 'असि' शब्दाने ब्रह्माशी ऐक्य सांगितले आहे. 'तत्' शब्दाने ईश्वर सांगून तेच 'असि' शब्दाने ब्रह्म आहे असे सांगितल्यावर सर्व चेतनाचे ग्रहण झालेच असून त्यांतच शुद्ध चेतन रूपाने जीवाचेही जे ऐक्य सांगितले ते सांगितलेच सांगितल्यामुळे 'पुनः' म्हटले आहे. हेच 'अनुग्रहण' 'पुनःग्रहण' होय. ह्यात जेम जीवाचे ग्रहण पुनः केले ते पूर्वीच झाले असल्यामुळे 'अपृथक' ग्रहण होते. पृथक होत नाही असा भाव पुढे सांगितला आहे.

४५८. सारूढवृत्तिज्ञानकारक - आरूढवृत्ति म्हणजे अंतःकरणाशी तादात्म्याने राहणारा जीव त्याचे सह ईश्वर व ब्रह्म ह्यांच्या ऐक्याचे ज्ञान करून देणारे महावाक्य.

४५९. अनारूढ वृत्ति ज्ञान कारक - अनारूढ वृत्ति अंतःकरणाशी तादात्म्याने नसणारा जो ईश्वर त्याचे ब्रह्माशी ऐक्याचे ज्ञान करून देणारे महावाक्य. चेतनाशी ऐक्य - ब्रह्माशी ऐक्य.

४६०. मी बांधिलेल्या संज्ञारहित सामान्यार्थ - मी बांधलेल्या नवीन निर्माण केलेल्या - ज्या संज्ञा त्यांना सोडून सामान्य असा जो महावाक्यांचा अर्थ तो. (टीपा.पा.७४)

४६१. ह्या ग्रंथातून सप्रक्रिय संज्ञा मात्र घ्याव्यात - ह्या 'पदार्थोद्देश दीपिका' ग्रंथात मी ज्या संज्ञा बांधल्या आहेत त्यांचे ग्रहण न करता जरी मी 'द्वादश महावाक्य विवरण' ह्या ग्रंथांत समस्त महावाक्यांचा सामान्य अर्थ विस्तृत केला आहे म्हणून तो ग्रंथ वाचतेवेळी ह्या 'पदार्थोद्देशदीपिका' ग्रंथांतील कांही संज्ञा न घेतल्या तरी चालतील. पण प्रक्रियेसह ज्या संज्ञा बांधल्या आहेत त्या मात्र संज्ञा त्या 'द्वादश महावाक्य विवरण' ह्या ग्रंथावरून समस्त महावाक्यांचा विचार

करतेवेळी अवश्य ग्रहण कराव्या कारण त्यांतील प्रक्रिया ब्रह्मबोध करण्याकरिता उपयोगी पडतील. 'तत्त्वमसि' ह्या महावाक्यास 'सारूढवृत्ति ज्ञानकारक' अशी संज्ञा दिली आहे. ह्या संज्ञेत ईश्वर व ब्रह्म ह्यांचे ऐक्य सांगतांना त्याबरोबरच अपृथक्पणाने जीवाचेही ऐक्य समजावे अशी प्रक्रिया सांगितली आहे. म्हणून ह्या संज्ञेचे अवश्य ग्रहण करावे असा अभिप्राय पुढे सांगितला आहे.

(हा 'द्वादश महावाक्य विवरण ग्रंथ' मातेच्या प्रज्ञासागरांतून अझून इहलोकांत प्रगट झाला किंवा नाही हे माहीत नाही.)

४६२. पृथक ज्ञान अपेक्षित आहे - 'अयमात्मा ब्रह्म' ह्या महावाक्यांत प्रथम 'अयमात्मा' ह्याचे पृथक् ज्ञान होऊन नंतर त्याचे ब्रह्माशी ऐक्य सांगितले आहे. तसेच 'प्रज्ञानं ब्रह्म' व 'अहंब्रह्म' ह्या महावाक्यांतही प्रथम 'प्रज्ञानं' व 'अहं' चे पृथक ज्ञान होऊन नंतर त्याचे ब्रह्माशी ऐक्य सांगितले आहे. पण 'तत्त्वमसि' ह्या वाक्यांत प्रथम जेव्हा 'तत्' पदाचे ज्ञान होते तेव्हाच सर्वव्यापक चेतनाचे ज्ञान होत असल्यामुळे पुढे 'त्वं' व 'असि' पदांच्या अर्थाच्या ज्ञानाला जागाच राहत नाही. (टीपा.पा.७५) 'तत्' पदाचे ज्ञानानेच अपृथक् पणाने ह्याही पदाचे तेव्हांच ज्ञान होते व 'त्वं' व 'असि' ह्यापुढे येणाऱ्या पदाने तेंच ज्ञान दृढ होते.

४६३. महावाक्य ज्ञानाचे ठिकाणी इः- महावाक्यांचे ज्ञान होत असतांना जे विक्षेपादि प्रतिबंध येतात त्यांची निवृत्ति करण्याकरता जी उपासना केली जाते ती दोन प्रकारची आहे.

४६४. ब्रह्मधर्मभावनेस - ब्रह्माच्या धर्माची भावना करण्यास. भावना शब्दाचा अर्थ ओवी १० खाली पहावा.

४६५. अन्नुार्य - जिचा ज्ञार होऊ शकत नाही अशी.

४६६. शंकराचार्यकृत पंचीकरण -

ॐ पञ्चीकृतपञ्चमहाभूतानि तत्कार्यं च सर्वं विराडित्युच्यते । एतत् स्थूलशरीरमात्मनः । इन्द्रियैरर्थोपलब्धिर्जागरितम् । तदुभयभिमान्यात्मा विश्वः । एतत् त्रयमकारः ॥१॥

अपञ्चीकृत पञ्च महाभूतानि पञ्चतन्मात्राणि, तत्कार्यंच पञ्चप्राणाः, दशेन्द्रियाणि, मनोबुद्धिश्चेति सप्तदशकं लिङ्गं भौतिकं हिरण्यगर्भ इत्युच्यते । एतत् सूक्ष्मशरीरमात्मनः ॥२॥

करणेषूपसंहृतेषु जागरितसंस्कारजः प्रत्ययः स विषयः स्वप्न इत्युच्यते । तदुभयाभिमान्यात्मा तैजसः । एतत् त्रयमुकारः ॥३॥

शरीरद्वयकारणमात्माज्ञानं साभासमव्याकृतमत्युच्यते । एतत् कारण

शरीरमात्मनः । न्ना न सत्, नासत्, नापि सदसत्, न भिन्नं, नाभिन्नं, नापि भिन्नाभिन्नं कुतश्चित् न निरवयवं, न सावयवं, नोभयं , किन्तु केवल ब्रह्मात्मैकत्व ज्ञानापनोद्यम् ॥४॥

सर्व प्रकार ज्ञानोपसंहारे बुद्धेः कारणात्मनाऽवस्थानं सुषुप्तिः । तदुभयाभिमान्यात्मा प्राज्ञः । एतत् त्रयं मकारः। ॥५॥

अकारउकारे उकारो मकारे, मकार ॐकारे, ॐकारोऽहम्येव । अहमात्मा साक्षी केवलश्चिन्मात्रस्वरूपः, नाज्ञानं नापि तत्कार्यं किन्तु नित्य शुद्ध बुद्ध-मुक्त-सत्य-स्वभावं परमानन्दाद्वयं प्रत्यग्भूत चैतन्यं ब्रह्मैवाहमस्मीत्यभेदेनावस्थानं समाधिः ॥६॥

''तत्त्वमसि'', ''ब्रह्माहमस्मि'', ''प्रज्ञानमानन्दं ब्रह्म'', ''अयमात्मा'ब्रह्म'' इत्यादि श्रुतिभ्यः ।

इति पञ्चीकरणम् भवति ॥७॥

वरील पंचीकरणाचा मराठी अर्थ -

१.पंचीकृत ही अवस्था प्राप्त झालेली पंचमहाभूते आणि त्यांचे जे कार्य ह्या सर्वांना विराट अशी संज्ञा आहे. यालाच आत्म्याचे स्थूल शरीर म्हणतात. इंद्रियांच्याकडून त्यांच्या अर्थाची म्हणजे विषयांची उपलब्धि म्हणजे प्राप्ति होणे याला जागरित म्हणतात. ज्याला आपल्या ज्ञानाची व ज्ञान विषयांची जाणीव आहे त्याला विश्व असे म्हणतात. ह्या तीन गोष्टी (विराट, जागरित, विश्व) म्हणजे अकार होय.

२. पंचीकृत अवस्था प्राप्त न झालेली जी पांच महाभूते त्यांना पंच तन्मात्रा असे म्हणतात. त्यांचे कार्य म्हणजे पंचप्राण (प्राण, अपान, उदान, व्यान, समान), दहा इंद्रिये तसेच मन, आणि बुद्धि ही जी १७ तत्त्वे ती ज्याला भौतिक म्हणजे महाभूतोत्पन्न म्हणजे लिंग (म्ह. ओळखण्याचे चिन्ह) म्हणतात. ह्या १७ तत्त्वांच्या समुदायाला हिरण्यगर्भ असे म्हणतात. यालाच आत्म्याचे सूक्ष्म शरीर असे म्हणतात.

३. स्वप्न ही अवस्था तेव्हा प्राप्त होते की ज्यावेळी ज्ञान करण असणारी साधने विश्रांत पावल्यानंतर जागरीत संस्कारापासून उत्पन्न होणारी जी जाणीव की जी त्या इंद्रियांच्या विषयासह असते त्याला स्वप्न असे म्हणतात. या दोघांच्या विषयी आत्मीय जाणीव बाळगणारा म्हणजे अभीमानी असा जो आत्मा त्याला तैजस असे म्हणतात. या तीन तत्त्वांच्या (सूक्ष्म शरीर १७ तत्त्वांचे, स्वप्न आणि स्वतः तैजस) एकीकरणाला 'उ' असे म्हणतात.

४. स्थूल आणि सूक्ष्म अशा दोन प्रकारच्या शरीराच्या ज्ञानामुळे उत्पन्न होणारे जे आत्म विषयक अज्ञान की जे आभासात्मक असते त्याला अव्याकृत म्हणजे शबलीत रूपातील म्हणतात. ते अव्याकृत असते म्ह. त्याचे व्यवच्छेदक किंवा वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान होत नाही. त्यालाच आत्म्याचे कारण शरीर म्हणतात. त्याला सत् म्हणजे नित्यविद्यमान असणारे, असत् म्हणजे कधीही नसणारे किंवा कधी असणार व कधी नसणार असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे ते भिन्न म्ह. इतरांच्याहून निराळे किंवा इतरांच्याशी अभिन्न आहे किंवा काही बाबतीत इतरांच्याहून निराळे आणि काही बाबतीत इतरांच्यासह असणारे म्हणजे भिन्नाभिन्न असेही म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे ते निरवयव किंवा सावयव किंवा काही बाबतीत सावयव आणि कांही अंशी निरवयव असेही म्हणता येत नाही. परंतु केवळ एकस्वरूप असणारे जे ब्रह्म त्याचे ज्ञान झाल्यानंतर अपनोद्य म्हणजे निरस्त, नाहीसे होणारे असे असते.

५. सर्व प्रकारच्या म्हणजे जागृति आणि स्वप्न ह्या दोनही अवस्थांतील ज्ञान ज्या वेळेला उपसंहृत होते म्हणजे त्याची जाणीव होत नाही आणि आत्म्याच्या कारण शरीरात ज्यावेळी बुद्धि अवस्थित म्हणजे विश्रांत पावते (विलीन होते) त्यावेळेला त्या अवस्थेला सुषुप्ति असे म्हणतात. या दोन तत्त्वांच्या विषयी अभिमानी असणाऱ्या आत्म्यालाच प्राज्ञ असे म्हणतात. सुषुप्ति, आत्म्याच कारण शरीर आणि त्याचा अभिमानी प्राज्ञ, या तीन तत्त्वांच्या समुदायाला ''म'' कार म्हणतात. या तीन वस्तू म्हणजे आत्म्याचें कारण शरीर, सुषुप्ति आणि ह्या स्थितीची जाणीव असणारा प्राज्ञ, या तीन तत्त्वांना मिळून 'म' कार म्हणतात.

६. 'अंकार 'उ' कारामध्ये, तो 'उ'कार मकारामध्ये आणि असा 'म' कार ओंकारामध्ये जेव्हा विलीन होतो तेव्हां तो ओंकारही 'अहमि' म्हणजे माझ्यातच (अहं मध्ये) विलीन होतो. हा तथाकथित 'अहम्' आत्मा साक्षी, केवळ म्हणजे एकमात्र आणि चिन्मात्र म्हणजे केवळ ज्ञानात्मक आहे. हे तथाकथित 'अहं' स्वरूपात्मक आत्मतत्त्व अज्ञान नाही, इतकेच नव्हे तर अज्ञानाचे कार्यही नाही. परंतु नित्य स्वरूप, शुद्ध स्वरूप, बुद्ध म्हणजे जाणीव स्वरूप, मुक्त म्हणजे असंगस्वरूप आणि सत्य म्हणजे नित्य सत् स्वरूप असे आणि परमानंदाशी, अद्वय म्हणजे अभिन्न असणारे, (टीपा.पा. ७७ब) आणि प्रत्यक्भूतचैतन्य म्हणजे नित्य जाणवणारे चैतन्य हे ज्याचे स्वरूप आहे असे जे ब्रह्मतत्त्व तेच मी आहे अशी अभिन्नतेने अनुभूत होणारी जी स्थिति ती समाधि होय.

७. 'तत्त्वमसि' (ते तूं आहेस), 'ब्रह्माहमस्मि' (मी ब्रह्म आहे), 'प्रज्ञानंआनन्दं

ब्रह्म' (ब्रह्म हे प्रज्ञान आणि आनन्द स्वरूप आहे) आणि 'अयमात्मा ब्रह्म' (हे आत्मतत्त्व ब्रह्मच आहे) इत्यादि श्रौत वाक्यांच्या कडून अशाप्रकारे पंचीकरण विषय विवेचन करण्यात आले आहे. इत्यादि श्रुतीतील महावाक्यांच्या कडून करण्यात आलेल्या विवेचनाला पंचीकरण असे म्हणतात.

॥ इति श्री शंकराचार्य विरचितं पञ्चीकरणम् ॥

४६७. माण्डुक्योपनिषदात - मांडुक्योपनिषदांतील मूळ व मूळाचा अर्थ पुढील प्रमाणे आहे. - श्लोक १-१२

ॐ इत्येतदक्षरमिदँ सर्वं तस्योपख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोङ्कार एव । यच्चान्यत्त्रिकालातीत तदप्योङ्कार एव ॥१॥

सर्वं ह्येतद् ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥२॥

जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथम पादः ॥३॥

स्वप्नस्थानोऽन्तः प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक्तैजसो द्वितीयः पादः ॥४॥

यत्र सुप्तोन कञ्चन कामं कामयते न कञ्चन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् ।

सुषप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवानन्दमयो ह्यानन्दभुक्चेतोमुखः प्राज्ञस्तृतीय पादः ॥५॥

एष सर्वेश्वर एष सर्वज्ञः एषोऽन्तर्याम्येष योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥६॥

नान्तः प्रज्ञं न बहिष्प्रज्ञं नोभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ।

अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥७॥

सोऽयमात्माध्यक्षरमोङ्कारो ऽधिमात्रं पादा मात्रा

मात्राश्च पादा अकार उकारो मकार इति ॥८॥

जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राप्तेरादिमत्त्वाद्वाप्नोति ह वै सर्वान्कामानादिश्च भवति य एवं वेद ॥९॥

स्वप्नस्थानस्तैजस उकारो द्वितीया मात्रोत्कर्षादुभयत्वा द्वोत्कर्षति ह वै ज्ञानसन्ततिं समानश्च भवति नास्याब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥१०॥

सुषुप्तस्थानः प्राज्ञो मकारस्तृतीया मात्रा मितेरपीतेर्वा मिनोति ह वा इदं सर्वमपीतिश्च भवति य एवं वेद ॥११॥

अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपञ्चोपशमः शिवोऽद्वैत एवमोङ्कार आत्मैव

संविशत्यात्मनात्मानं य एवं वेद ॥१२॥

वरील संस्कृताचा अर्थ -

ॐ हें अक्षर जे सर्व आहे त्याचे उपव्याख्यान करतो. भूत, वर्तमान व भविष्य हे सर्व ॐकार आहे आणि जे काही ह्या त्रिकालावाचून आहे ते सुद्धा ॐकार आहे ॥१॥

हे सर्व ब्रह्म आहे, हा आत्मा देखील ब्रह्म आहे. त्या ह्या आत्म्याचे चार पाद आहे. ॥२॥

जागृत स्थान, बाह्य पदार्थांचे जाणणे, सात अंगे, एकोणवीस मुखे, स्थूल भोगाचा भोक्ता आणि वैश्वानर हा प्रथमपाद आहे. ॥३॥

द्युलोक - मूर्धा, सूर्य-नेत्र, वायु - प्राण, आकाश-धड, अन्न-मूत्रस्थान, पृथ्वी - पाद व अग्नि - मुख ही सात अंगे आणि पांचप्राण, पांच कर्मेन्द्रिये, पांच ज्ञानेंद्रिये व चार अंतःकरण भेद, मन, बुद्धि, अहंकार व चित्त ही एकोणवीस मुखे होत. ही एकोणवीस भोगाला साधन असल्यामुळे ह्या मुखांनीच स्थूल शब्दादिकांच्या बाह्यवृत्तीने जागृदवस्थेत भोग होतो. स्वप्नावस्था, अंतःप्रज्ञ, सात अंगवाला, एकोणवीस मुखवाला, सूक्ष्म भोगांचा भोक्ता, आणि तैजस हा आत्म्याचा द्वितीय पाद आहे ॥४॥

ज्या अवस्थेत निजलेला काही एक इच्छित नाही व काही एक स्वप्न पहात नाही त्या अवस्थेत त्याला सुषुप्त असे म्हणतात. सुषुप्ती अवस्था, एकीभूत, प्रज्ञानघन, आनंदमय, आनंदभोक्ता, चेतोमुख, आणि प्राज्ञ हा आत्म्याचा तृतीय पाद आहे ॥५॥

हाच सर्वेश्वर, हाच सर्वज्ञ, हाच अंतर्यामी, हाच भूतांची उत्पत्ती व लय व हाच सर्वांचा कारण आहे. ॥६॥

जो अंतःप्रज्ञ, बहिःप्रज्ञ, उभयतः प्रज्ञ, प्रज्ञानघन, प्रज्ञ व अप्रज्ञही नाही जो अदृष्ट अव्यवहार्य, अग्राह्य, अलक्षण, अचिंत्य, अव्यपदेश्य, एकात्म प्रत्ययसार, प्रपंचोपशम, शांत, शिव व अद्वैत असा आहे, हा आत्म्याचा चतुर्थ पाद मानतात. तोच आत्मा व तोच जाणण्यास योग्य आहे. ॥७॥

तो हा आत्मा अक्षर दृष्टीने ॐकार आहे. तोच अधिमात्र (मात्रांचा आश्रय करणारा) आहे. मात्रा आत्म्याचे पाद आहेत. व पाद मात्रा आहेत. अकार, उकार व मकार ह्या मात्रा आहेत. ॥८॥

जागरित स्थान वैश्वानर हा अकार आहे. व्याप्ति व आदिमत्वामुळे वैश्वानर अकारॐकाराची प्रथम मात्रा आहे, जो हे जाणतो त्याच्या सर्वकामना पूर्ण

होतात. आणि तो सर्वांत मुख्य होतो. ॥९॥

स्वप्नस्थान तैजस् उकार हा उत्कर्षामुळे आणि उभयपणामुळे द्वितीय मात्रा आहे हे जो जाणतो तो ज्ञानसंततीचा उत्कर्ष करतो. तो समान होतो व त्याच्या कुळांत ब्रह्मज्ञानरहित असा कोणी होत नाही. ॥१०॥

सुषुप्तस्थान प्राज्ञ मकारमान व एकपणामुळे ॐकाराची तृतीय मात्रा आहे. हे जो जाणतो तो ह्या सर्वांचे माप घेतो व ऐक्य पावतो. ॥११॥

अमात्र (मात्रारहित) चौथा आहे. तो अव्यवहार्य प्रपंचोपशम, शिव व अद्वैत असा आहे. ह्याप्रमाणे ॐकार आत्माच आहे. हे जो जाणतो तो स्वतः आत्म्याचे ठिकाणी प्रवेश करतो. ॥१२॥

४६८. अंतवाहक पदार्थेकरून - सूक्ष्म पदार्थामुळे.
(अंतवाहक - स्थूलाचे आंत वाहणारे)

४६९. व्यक्तादिधर्मी ईश्वर भावनेस - व्यक्त वगैरे यश, श्री, किर्ती वगैरे षड्गुणैश्वर्य धर्म ज्याचे ठिकाणी आहेत अशा ईश्वराच्या भावनेस. (भावना शब्दाचा अर्थ ओवी १२ खाली दिला आहे तसा करावा.)

४७०. एकांगरूप - आदित्य, अग्नि, वायु इत्यादिकांचे दृश्य जे एकच अंग त्यांचे ग्रहण करून जी उपासना ती - प्रतीक म्हणजे चिन्ह.

४७१. सर्वांगरूप - मूर्तीची हस्तपादादि दृश्य जी सर्व अंगे त्यांचे ग्रहण करून जी.

४७२. बिंदुरूप - शालिग्रामादि शीलेने केवळ बिंदूचे ग्रहण करून जी.

४७३. अहेतुक दयालु - कोणताही हेतु न ठेवता दया करणे हे शील आहे ज्याचे असा.

४७४. ईश्वरस्थानी सेवा योग्य - ईश्वर समजून सेवा करण्यास योग्य.

४७५. हा आचार्य सर्वत्र एक आहे - अविद्येने होरपळत असलेल्या अनादि जीवांना त्रिविध दुःखापासून सुटून अखंड परमानंद प्राप्ति व्हावी अशी जी इच्छा ती पूर्ण करणारे, निर्दिष्ट केलेल्या शुद्धाचरणादि गुणांनी युक्त जे अनादि सगुण सच्चिदानंद परब्रह्म तेच श्री गुरू होत. अर्थातच ते एक आहेत व तेच सर्वत्र शिष्यांच्या उद्धाराकरिता अनेक मूर्त स्वरूपे धारण करून प्रगट होतात.

४७६. सर्वशास्त्रे व सर्ववेद इत्यादि - मुमुक्षु जीवाच्या उद्धारा करता अनादि सिद्ध सद्गुरूपासून अखंड होत असलेले जे स्वतःचे अनादि निरूपण ब्रह्मदेवादि देवतांच्या ठिकाणी स्फुरण पावते व जे त्या देवता स्वतः करता धारण करून ठेवतात (चोरून घेतात) तेच वेदांचे मूळ असून सर्व शास्त्रे त्याच निरूपणांतील शब्दांच्या अर्थाचे विस्तृत स्वरूप होत.

याचे निरूपण पतंजलींनी आपल्या समाधिपादांत उत्तम केले आहे. पतंजलीनी आपल्या समाधि - पादांत ईश्वरच सर्वांचा आद्य गुरु होय असे म्हटले आहे. ती सूत्रें अशी -

क्लेशकर्म विपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ॥२४॥

अर्थ - अविद्यादि क्लेश, कुशल व अकुशल अशी कर्मे, त्यांचे जे फल तो विपाक आणि त्या विपाकाला अनुसरून असणाऱ्या ज्या वासना ते आशय, ह्यांच्या भोगाचा ज्याला संबंध नाही असा सर्वपुरूषांहून विशेष म्हणजे ज्याचे बरोबरीचा किंवा ज्याचेहून अतिशय असा दुसरा कोणी पुरूष नाही असा जो पुरूष त्याला ईश्वर म्हणतात.

सूत्र - तत्र निरतियशं सर्वज्ञबीजम् ॥२५॥

अर्थ - त्या ईश्वराचे ठिकाणी सर्वज्ञपणाचे बीज पराकाष्ठेचे आहे. ह्या सूत्रांवरील श्री व्यासांचे भाष्यात असे म्हटले आहे -

तस्यात्मानुग्रहाभावेऽपि भूतानुग्रहः प्रयोजनम् ।

ज्ञानधर्मोच देशेन कल्पप्रलयमहाप्रलयेषु संसारिणः पुरूषानुद्धरिष्यामीति ।

भाष्यार्थ - ईश्वरास स्वतःस जरी अनुग्रहाची गरज नाही तथापि भूतांवर अनुग्रह करणे हे प्रयोजन आहे.

त्याचा संकल्प असा आहे की ''ज्ञान व धर्म ह्यांच्या उपदेशाने कल्पप्रलय व महाप्रलय ह्यांत संसारी पुरूषांचा मी उद्धार करीन.'' (म्हणूनच गुरूला अहेतुक दयालु असे दीपिकेत - प्रस्तुत ग्रंथ यष्टि १३ म्हटले.)

सूत्र - स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥२६॥

सूत्रार्थ - तो ईश्वर ब्रह्मादिक जे पूर्व पुरुष त्यांचाही गुरू आहे, कारण त्याला काळाची मर्यादा नाही.

ह्यावरील सूत्रांवरून दिपिकेतील गुरूचे लक्षण स्पष्ट होते.

सूत्र - तस्य वाचकः प्रणवः ॥२७॥

सूत्रार्थ - त्या ईश्वराचा स्वरूप बोधक प्रणव आहे. गुरूत्व वेदाहून अनादि असून सर्व शास्त्रे व वेद श्री गुरूच्या निरूपणांतील शब्दाचे अर्थ विस्तर (टीपा.पा.८१) होत असे जें 'दिपिकेत' म्हटले आहे तेही वरील सूत्रांनी स्पष्ट होते. प्रणव गुरूचा वाचक म्हणून गुरूत्व अनादि आणि प्रणवच सर्व जगताचे मूळ असल्यामुळे वेद शास्त्रादि त्या प्रणवाचे अर्थ विस्तर आहेत. (टीपा क्रमांक ४६६, ४६७ पहा)

४७७. वेदाहूनहि अनादि आहे - सद्गुरुपासून अखंड प्रगट होत असलेलेच निरूपण देवतांनी जाणले म्हणून जे देवतांनी जाणले त्या निरूपणाला वेद

म्हणतात. (वेद - जाणले) म्हणून गुरुत्व हे वेदाहूनहि अनादि आहे असा अर्थ. अनादि सद्गुरूपासून अनादि प्रगट होत असलेलेच निरूपण देवतांनी जाणले म्हणून त्यांनी जे जाणले व ज्याला म्हणूनच वेद म्हणतात ते मूळात अनादि असल्यामुळे वेद हे अनादि. वेद जाणले त्या दृष्टीने ते सादि व जे जाणले ते अनादि म्हणून वेद हेही अनादि असा भाव.

४७८. सद्गुरूपासनारूप रत्नमय अनंत ब्रह्माण्डाचे -

सद्गुरूच्या उपासनारूपाने स्फुरण पावणारे म्हणूनच रत्नमय असे जे अनंत ब्रह्मांड त्याचे. (अनंत ब्रह्मांडाचे जे स्फुरण ते वस्तुतः सद्गुरूची उपासना होय. पण हा जो उपास्य उपासनारूपाने द्वैताभास तोही अद्वैत भक्ति निरूपण करणाऱ्या श्रीज्ञानेश्वरमाउलींच्या ओव्या निवृत्त करतात. म्हणून त्या ओव्या अद्वैताने प्रेमाचा आस्वाद घेणाऱ्या आनंदरूप परब्रह्माचे त्या ब्रह्मांडांतील भक्तिरूप भांडार होत.)

४७९. गुरूपदेशपूर्वक संकेत - जीव, जगत्, ईश्वर, सत्-चित्-आनंद ब्रह्म, व्यवहार (प्रपंच), परमार्थ (मोक्ष) ह्या सर्वांचे ऐक्य, तशीच त्यांची भिन्नता, ह्यांचेशी अविरोधाने युक्त असे जे गुरूच्या उपदेशाने होणारे ज्ञान, त्यास संकेत म्हणतात. श्री गुरूच्या उपदेशाने जेव्हा शिष्याला वरील सर्व पदार्थांच्या भिन्नतेने किंवा अभिन्नतेने विरोध वाटत नाही तेव्हा त्या ज्ञानास संकेत म्हणावे असा अर्थ.

४८० जाणावयाची इच्छा आणि अनिच्छा - मी न्यून आहे अशी वृत्ती किंवा पूर्ण आहे असा अहंकार.

४८१. हा एक विधच आहे - ह्यात प्रकार नाहीत. संकेत ज्ञानांत भेद असूच शकत नाहीत असा भाव.

४८२. सद्गुरू आज्ञा सद्गुरु सेवापूर्वक - सद्गुरूच्या आज्ञेनुसार सद्गुरूची सेवा करून - सद्गुरूची आज्ञा पालन करणे म्हणजेच सद्गुरूची सेवा होय. सद्गुरूच्या आज्ञेविरूद्ध आपल्या मनाप्रमाणे सेवा करणे ही सद्गुरू सेवा नव्हे असा भाव.

४८३. गुरूपदेश ग्रहणक्षम - गुरूचा उपदेश ग्रहण करण्याला योग्य.

४८४. अपरोक्षोत्साही - अपरोक्षज्ञान ग्रहण करण्याला पात्र असून त्या करता लालसा असणारा हाच ओवी १४ खाली सांगितलेला उत्तमाधिकारी होय.

४८५. परोक्षोत्साही - परोक्षज्ञानाला पात्र व उत्सुक. हा ओवी १४ खालील मध्यमाधिकारी होय; प्रत्यक्ष व अनुभव रहित जे प्रमाण जन्य ज्ञान तयस परोक्ष म्हणावे.

४८६. तर्कोत्साही - तर्कात उत्साह मानणारा ओवी १४ खालील कनिष्ठ अधिकारी.

४८७. व्यवहित - मनन व निदिध्यासनरूप अभ्यासानंतर.

४८८. अनिष्टापादान पूर्वक - शिष्याने आपल्या पूर्वपक्षाचे ठिकाणी अनिष्टापत्ति पाहून म्हणजे आपला पूर्वपक्ष खंडित होतो असे पाहून वादमात्र तर्काने आपल्या मताचे खंडन व सिद्धांताचे मंडनरूप उपदेश घेत - त्यावर पुन्हा तत्त्वमसि महावाक्याचा उपदेश घेऊन मनन निदिध्यासनादि साधन केल्यावर फलकालीन - साक्षात्कार होण्याचे वेळी - हे असंभावना, विपरीत भावना वगैरे विक्षेप उठतात त्यांची निवृत्ति झाल्यावर व्यवहित - महावाक्याचा उपदेश घेतल्यानंतर अशारितीने काही काळ गेल्यावर - अखंड आनंदाची प्राप्ति ज्याला होते तो तिसरा अध्यम अधिकारी म्हणावा.

४८९. शास्त्राने कल्पित ब्रह्मप्राप्ति पाहिजे तर होवो - स्वतः शास्त्रे वाचून मला ब्रह्मप्राप्ती झाली अशी कल्पना करून घेईल तर घेवो. कल्पित ब्रह्मप्राप्ती - ब्रह्माची कल्पनेने प्राप्ति- ब्रह्माच्या प्राप्तीची कल्पना असा अर्थ.

४९०. गुरूपदेशाधिकार - गुरूचा उपदेश ग्रहण करण्याला अधिकार.

मूळ ओवी १७

प्रवृत्ति पंचविध आणि षड्विध । चतुष्कें बोलिजेत अनुबंध ।
ख्याति बोलिजे षड्विध । उत्पत्ति द्विविध निवृत्ति द्विधा ॥

टीका

४२९/१७. प्रवृत्ति - अधिकारीजनांचे शास्त्रांचे ठायीं तैलधारावद् अविच्छिन्नधारण[४९१] त्याला प्रवृत्ति म्हणतात.

तिचें वात्सायनभाष्याचे[४९२] ठायीं सम्यक् निरूपण केलें आहे. परंतु ती न्यायशास्त्रविषयक असल्यामुळें येथें निरूपणीय नाहीं. म्हणून वैय्यासिकीन्याय-मालाकारादिकांनीं वेदान्तन्यायप्रवृत्ति[४९३] पंचविधा बोलिली. ती येणें प्रमाणें :- विषय, संशय, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष आणि प्रयोजन.

४३०/१७. विषय - अभिधेयसंबंधेंकरून[४९४] बोलिला जातो तो विषय म्हणावा.

४३१/१७. संशय - विषयांचे ठायीं पूर्वपक्षसिद्धांतबीजरूप[४९५] जी वृत्तिधारा तिला संशय म्हणतात. तो द्विविध आहे. प्रमाणगत आणि प्रमेयगत.

हे दोन्ही संशय असंभावनानिरूपणेंकरून पूर्वकथित आहेत. (ओवी ६ पहा) तथापि विशेष आहे तें सांगतों.

४३२/१७. प्रमाणगतसंशय - वाक्य श्रवण करून तद्विषयाचे ठायीं[४९६] भ्रांतिमूलकत्व[४९७] आहे वा प्रमाणमूलकत्व आहे अशा वृत्तीला प्रमाणगत संशय[४९८] ह्मणतात. (य१३.६३)

४३३/१७. प्रमेयगत संशय - प्रमेयसंबंधी द्विकोटिक अथवा चतुष्कोटिक जें ज्ञान तो द्वितीय (प्रमेयगत) संशय म्हणावा.

मूळ तक्ता क्र.१९
ओवी १७ पा.६४



४३४/१७. द्विकोटिक - भावावच्छिन्नभावनावच्छेदकतासंबंधें[४९९]करून वस्तूचे ठायीं कोटिद्वयप्रवेश भ्रमावच्छेदकत्वेंकरून होतो. तज्ज्ञान द्विकोटिक ज्ञानरूप संशय म्हणावा. यथा - स्थाणुर्वा पुरुषो वा । (य१३-६४)

४३५/१७. चतुष्कोटिक -
- अभावावच्छिन्नभावावच्छेदकतासंबंधेंकरून[५००] वस्तुकोटिकप्रविष्टज्ञान[५०१] तो प्रमेयगत[५०२] द्वितीय संशय ह्मणावा. यथा - स्थाणुर्वापुरुषो वा; स्थाणुर्न वा पुरुषो वा; पुरुषो न वा स्थाणुर्वा.

पूर्वपक्ष

४३६/१७. पूर्वपक्ष - विषयसहकारी[५०३] पदार्थाच्या मुख्यत्वानिश्चयास पूर्वपक्ष म्हणतात. तो द्विविध आहे. वेदैकदेशरूप आणि वेदबाह्यरूप.

४३७/१७. वेदैकदेशरूप - *श्रुत्यैकदेश[५०४] ग्रहण करून कापिलादि भेदवाद्यांनीं काढिलेला पूर्वपक्ष प्रथम म्हणावा. आणि

४३८/१७. वेदबाह्यरूप - चार्वाकादि नास्तिकांनीं काढिलेला पूर्वपक्ष द्वितीय म्हणावा.

*प्रथम पूर्वपक्ष श्रुतिसमन्वयनिराकरणीय[५०५] आहे.

*द्वितीय पूर्वपक्ष युक्तिमात्रनिराकरणीय[५०६] आहे.

उत्तरपक्ष

४३९/१७. उत्तरपक्ष - पूर्वपक्षखंडनपूर्वक[५०७] सम्यग्विषयनिर्धारणकथनास उत्तरपक्ष म्हणतात.

त्याचें जिज्ञासाशांतिरूप आणि विवादशांतिरूप अशा भेदानें द्वैविध्य आहे.

४४०/१७. जिज्ञासाशांतिरूप - ज्यामध्यें समाधानविषयक वाक्यें बहुत असून न्यूनानिष्टापत्ति[५०८] आहे तो प्रथम ह्मणावा.

४४१/१७. विवादशांतिरूप - ज्यामध्ये अनिष्टापत्तिविषयक वाक्यें बहुत असून न्यूनसमाधान असतें तो प्रथमतृतीयमध्यग[५०९] होय.

४४२/१७. उत्तरपक्षफलाला[५१०] **प्रयोजन** म्हणतात.

४४३/१७. या पंचविधप्रवृत्तीमध्यें **भेद** मिळविला म्हणजे **षड्विध** होते.

४४४/१७. भेद - पदार्थप्रकारसाधारनिर्धार[५११] करून अविच्छिन्न[५१२] सहचाराव्यभिचारपूर्वक कथनास भेद म्हणतात.

४४५/१७. अनुबंधचतुष्टय - प्रयोजन, अभिधेय, संबंध आणि अधिकारी हे मिळून अनुबंधचतुष्टय[५१३] होते.

प्रयोजन

४४६/१७. प्रयोजन - ज्या अर्थासाठी मनुष्यप्रवृत्ति[५१४] होते त्याला

प्रयोजन म्हणतात. तें द्विविध आहे. मुख्य आणि अवांतर.

४४७/१७. मुख्यप्रयोजन - अन्येच्छानधीनेच्छाविषयत्व[५१५] तें मुख्य प्रयोजन होय. जसी सुखेच्छा दुसऱ्या इच्छेच्या आधीन नसून स्वयम् आहे म्हणून सुख हें मुख्य प्रयोजन होय. **(य१३-६५)**

४४८/१७. अवांतरप्रयोजन - मुख्यप्रयोजनेच्छाधीनेच्छाविषयत्व[५१६] अवांतर प्रयोजन म्हणावें. यथा भोजनादि.



अधिकारी

४४९/१७. अधिकारी - द्विविधप्रयोजनप्राप्तिकाम[५१७] तो अधिकारी म्हणावा.

तो त्रिप्रकार आहे. कर्माधिकारी, ज्ञानाधिकारी आणि भक्त्यधिकारी.

४५०/१७. कर्माधिकारी - धनवान्[५१८] कुशल मी द्विज आहें अशी बुद्धि धरणारा तो धर्माधिकारी, (कर्माधिकारी)

४५१/१७. ज्ञानाधिकारी - साधनचतुष्टयसंपन्न[५१९] तो ज्ञानाधिकारी.

४५२/१७. भक्त्यधिकारी - मुक्ति ही बंधनसापेक्ष[५२०] आहे तस्मात् परमेश्वरच सेव्य अशी ज्याची बुद्धि आहे तो द्वितीय[५२१]-चतुर्थमध्यगामी म्हणावा.

अभिधेय

४५३/१७. अभिधेय - पूर्वाज्ञाननिवर्तक[५२२] पदार्थ व तत्त्वज्ञानोपयोगी निरूपणास अभिधेय म्हणतात. त्याचे *सिद्धांत आणि *तात्पर्य अशा भेदानें दोन प्रकार आहेत.**(य१३-६६)**

४५४/१७. सिद्धांत - अव्यभिचारी[५२३] निश्चयज्ञानगोचर[५२४] सिद्धांत म्हणावा अथवा तंत्राधिकरणाभ्युपगमार्थ [५२५] संस्थिति हाही सिद्धान्तपर्याय[५२६] आहे. चतुष्क आहे. सर्वतंत्रसिद्धांत, प्रतितंत्रसिद्धांत, अधिकरणसिद्धांत आणि अभ्युपगमसिद्धांत.

४५५/१७. सर्वतंत्रसिद्धांत - सर्व शास्त्रांचे ठायीं अविरोधानें[५२७] असणारा प्रथम ह्मणावा. जसें पाषाणादि जड आहेत; मनुष्यादि प्राणी आहेत इत्यादि गोष्टी सर्व शास्त्रांत समान निरूपणीय आहेत.

४५६/१७. प्रतितंत्रसिद्धांत - स्वशास्त्रांत ग्रहण केलेला आणि परशास्त्रांत ग्रहण न केलेला द्वितीय सिद्धांत ह्मणावा. जसें मन हे इंद्रिय आहे असें सांख्य ह्मणतात; वेदान्ती म्हणत नाहींत.

४५७/१७. अधिकरण सिद्धांत[५२८] - जो अर्थ सिद्ध झाल्यानें दुसरें अर्थ सिद्ध होतात. आणि त्या अर्थाचा तोच अर्थ अधिष्ठान असतो तो तृतीय म्हणावा. जसें - 'अहं' आहे कारण घ्राणाचें सुंगणें आणि जिभेंनें बोलणें या दोहोंचेही ज्ञान एकाच ठिकाणी होतें. मी गंध घेतला, मी बोललो इत्यादि.

४५८/१७. अभ्युपगमसिद्धांत - मनानें अथवा दुसऱ्या शास्त्रांतून गृहीत करून विशेष परीक्षा करून ठरविलेला तो चतुर्थ सिद्धांत म्हणावा. जसें मन हें इंद्रिय वेदान्तांत मानलें नाही तथापि तें विषयग्राही[५२९] असल्यामुळें इंद्रिय आहे अशी विशेष परीक्षा वाचस्पतीनें तदींद्रियत्व[५३०]

ग्रहण केलें आहे.

४५९/१७. तात्पर्य - षड्लिंगसिद्धवाक्यनिर्णयास[५३१] तात्पर्य ह्मणतात.

१.उपक्रम, २.उपसंहार, ३.अभ्यास, ४.अपूर्वताफल,[५३२] ५.अर्थवाद आणि ६.उपपत्ति; हे षड्लिंग होत.

४६०/१७. उपक्रम - संबंध बांधण्याकरितां विषयांचे प्रथम थोडक्यांत विवेचन उपक्रम होय.

४६१/१७. उपसंहार - मध्यें विस्तार करून पुनःसारांशानें शेवटी देणें उपसंहार ह्मणावा. **(य१३-६७)**

४६२/१७. अभ्यास - वारंवार कथन करणें अभ्यास.

४६३/१७. अपूर्वताफल - त्यावांचून दुसऱ्या कोणत्याही रीतीनें त्या विषयांचे फल होऊं नये हें चतुर्थ लिंग (अपूर्वताफल),

४६४/१७. अर्थवाद - विषयस्तुति हें पंचमलिंग (अर्थवाद.)

४६५/१७. उपपत्ति - विषय स्थापण्याकरितां परमतनिराकरण आणि स्वमतप्रतिष्ठापन हें सहावें लिंग - उपपत्ति ह्मणावें.

याचीं उदाहरणें ईशावास्यभाषादीपिकेंत आहेत. तीं पहावी.

४६६/१७. संबंध - गुंतलेल्या[५३३] दोन पदार्थास संबंध ह्मणतात. तो अनेक प्रकारचा आहे जसें अधिकारी आणि मोक्षाचा *प्राप्यप्रापकभावसंबंध,[५३४] *ग्रंथ आणि ज्ञानाचा जन्यजनकभावसंबंध इत्यादि.

४६७/१७. ख्याति - अन्याधिष्ठानस्थ[५३५] भ्रमभानकथनास ख्याति म्हणतात. ती षड्विध आहे :-

१.सत्ख्याति, २.असत्ख्याति, ३.आत्मख्याति, ४.अन्यथाख्याति, ५.आख्याति, आणि ६.अनिर्वचनीय ख्याति. *(तक्ता १६२)*

४६८/१७. सत्ख्याति - शुक्तीवर भासणाऱ्या रजताचे अवयव सत्य आहेत. नेत्रदोषाने शुक्ती आच्छादित[५३६] झाली म्हणजे रजत प्रत्यक्ष होते आणि शुक्तिज्ञान झाले म्हणजे रजताचा[५३७] आपल्या अवयवात ध्वंस होतो, ही प्रथम ख्याति म्हणावी.

४६९/१७. असत्ख्याति दोन प्रकारची आहे. नास्तिकोक्त आणि आस्तिकोक्त.

४७०/१७. रज्जूसहित रज्जूसर्प[५३८] शून्य[५३९] आहे. अधिष्ठानावांचून भ्रम होतो ही **नास्तिकोक्त असत् ख्याति** होय.

आस्तिकोक्त असत्ख्याति दोन प्रकारची आहे.

४७१/१७. रज्जूसर्प-भ्रम[५४०] **अत्यंत असत्** आहे ही पहिली. आणि

४७२/१७. सर्प प्रत्यक्ष असून रज्जूचे[५४१] ठायीं सर्पत्व **समवायमात्र असत्** आहे ही दुसरी.

४७३/१७. आत्मख्याति - सर्पादिक बुद्धींतच[५४२] उत्पन्न होतात आणि नेत्रदोषानें बाहेर भासतात ही आत्मख्याति होय.

४७४/१७. अन्यथाख्याति - बीळ आदि स्थानीं पाहिलेला सर्प रज्जूवर नेत्रदोषानें प्रतीत होतो ही प्राचीन **न्यायमतांत अन्यथाख्याति** आहे. आणि

४७५/१७. नेत्रदोषानें रज्जूच सर्पाकार होतो या भ्रमास चिंतामणीकृत **नवीन न्यायमतांत अन्यथाख्याति** ह्मणतात. **(य१३-६८)**

४७६/१७. अन्यस्थळीं[५४३] अन्य वस्तूचें भान किंवा अन्यरूपेंकरून[५४४] अन्यवस्तूचें भान याला **अन्यथाख्याति** ह्मणतात.

४७७/१७. प्रतीत होते[५४५] म्हणून **असत्ख्याति व्यर्थ** आहे.

४७८/१७. आत्मा म्हणजे क्षणिकविज्ञान- हें बुद्धांचें मत आहे. त्या क्षणिकविज्ञानानें जो भ्रम तो **आत्मख्याति** होय. ती आत्मख्यातिही असंगत[५४६] आहे; कारण रज्जूसर्पही[५४७] दीप आणीपर्यंत स्थिर राहूं शकतो ह्मणून आतां प्रथम अन्यथाख्याति तर चिंतामणीमतानें दूषित आहे.

४७९/१७. तशीच चिन्तामणीमन्तव्यान्यथाख्यातिही[५४८] दूषित आहे. कारण ज्ञेयानुसार[५४९] ज्ञान असतें. 'रज्जू ज्ञेय आणि सर्पाचे ज्ञान' हे ह्मणणे अति विरुद्ध आहे, म्हणून आख्याति मानणें उत्तम असें **सांख्य** आणि **प्रभाकर** ह्मणतात.

४८०/१७. आख्याति - रज्जूचें इदंत्वेंकरून[५५०] सामान्यज्ञान

आणि सर्पांची स्मृति या दोहोंचा जो दोषबलेंकरून अविवेक आणि एकत्वभान त्याला आख्याति ह्मणतात.

४८१/१७. आतां रज्जूचें सामान्यज्ञान आणि पूर्वदृष्ट सर्पाची स्मृति हे दोन्हीं अंतःकरणाला एकसमयावच्छेदेकरून[५५१] होणें संभवनीय नाहीं आणि सर्प जर रज्जूवर प्रत्यक्ष दिसणार नाहीं तर त्यापासून भयादिक होणार नाहींत व सर्पभानकाली केवळ सर्पज्ञानच असते, दोन ज्ञाने नसतात.

याप्रमाणें आख्यातिवादियांचें मत असंगत आहे. यांतील सत्ख्यातीचें प्रतिपादन खंडन **वृत्तिप्रभाकरांत** केले आहे आणि बाकींच्या[५५२] चार ख्यातींचे खंडन आणि प्रतिपादन-विवरण **सुरेश्वराचार्यकृत स्वाराज्यसिद्धीचे** ठायीं केलें आहे.

खंडनप्रतिपादनयुक्ति फार कठीण आहे ह्मणून येथें बोलिली नाही. जिज्ञासुसाठी रीति मात्र दाखविली आहे. **(य१३-६९)**

याप्रमाणें सर्व ख्यातिवाद असंगत पाहून वेदान्ती अनिर्वचनीय ख्याति मानतात. तिची रीति ही आहे :-

अनिर्वचनीय ख्याति

४८२/१७. अनिर्वचनीय ख्याति -

अंतःकरणाची वृत्ति नेत्रादिद्वारा बाहेर निघून पदार्थाचा आवरणभंग[५५३] करीत असते. त्याला प्रकाशही साह्य असतो. परंतु अंतःकरणाची वृत्ति नेत्रद्वारा बाहेर निघून रज्जूसी संबंधित झाली असतांही तिमिरादि[५५४] दोषांमुळें आवरणभंग[५५५] करीत नाही.

तदा,[५५६] रज्जूपहित[५५७] चैतन्यस्थ अविद्या क्षुब्ध[५५८] होऊन उपाधित्वें[५५९] करून जो पूर्वधृत स्वाकार जो रज्जूसंज्ञक, त्यातें दीर्घत्वादि[५६०] सदृशनियति[५६१] म्हणून सर्पाकारेण[५६२] उत्पन्न करिते अथवा सर्पाकारा होते.

तो सर्पाकार सत् ह्मणावा तर रज्जूज्ञानें[५६३] करून त्याचा बाध होतो; कालत्रयीं अबाधिताला सत् म्हणतात.

आणि सर्पाकार असत् म्हणावा तर असत् जे वंध्यापुत्रादि त्यांची

प्रतीति होत नाहीं. म्हणून तो सर्पाकार सदसद्विलक्षण[५६४] अनिर्वचनीय[५६५] आहे.

याप्रमाणें सर्व ख्यातिवादी आपापल्या मतानुसार जगताची उत्पत्ति सांगतात. त्यांतून वेदान्तियांची अनिर्वचनीय ख्याति ग्रहण केली असतां जगदुत्पत्ति दोन प्रकारची आहे.

वेदाननुसार जगदुत्पत्ति

१. युगपदुत्पत्ति आणि २. क्रमिक उत्पत्ति.

४८३/१७. एकदम उत्पत्ति होते ती **युगपत्** होय. आणि

४८४/१७. विकारधारानैमित्तिक[५६६] **क्रमिक** ह्मणावी.

यथा शुक्तौ [५६७] रुप्याची उत्पत्ति **युगपत्** आहे.

आणि तद्दर्शन[५६८] लोभादिकांची उत्पत्ति **क्रमिक** आहे.

अधिष्ठानावर प्रथम होते ती **युगपत्.**

आणि एकापासून एक होते ती **क्रमिक.** हेंही लक्षण समीचीन[५६९] आहे.

४८५/१७. हा **उत्पत्युपदेश** वेदान्तांत केवळ **लयचिन्तनार्थ**[५७०] आहे. उत्पत्ति-चिन्तनार्थ[५७१] नाहीं, कारण जगदनादित्वाचे[५७२] वेदान्ती अभ्युपगन्ते आहेत ह्मणून. तस्मात् त्यांना सकारण[५७३] जगन्निवृत्ति अपेक्षित आहे. हें **विचारसागरावरून**[५७४] कळते. सा निवृत्ति[५७५] ही द्विविध आहे. १.**लयरूप निवृत्ति** आणि २.**कल्पित निवृत्ति.** (य१३-७०) (तक्ता २१.पान ७१)

४८६/१७. लयरूपनिवृत्ति - अधिष्ठानज्ञानावांचून जी निवृत्ति ती लयरूप निवृत्ति.

ती दोन प्रकारची आहे. विलीनतारूप आणि नाशरूप.

४८७/१७. विलीनतारूप - कारणाचे ठायीं कार्याचें मिळून जाणें अथवा अन्यवस्तूनें वस्तूचें आच्छादित होणें ही प्रथम. जसें मीठ पाण्यांत किंवा साखर दुधांत मिळून जाते.

४८८/१७. नाशरूप - कार्यप्रध्वंस[५७६] होणे ही तृतीयपूर्वा[५७७] निवृत्ति. यथाः- मुद्गरादिकें करून घटध्वंस होतो.

४८९/१७. सादिरनंताभावाते[५७८] **ध्वंस** ह्मणतात.

४९०/१७. कल्पित निवृत्ति - भ्रमकार्याची[५७९] भ्रमासहित आणि पुनरुत्थानरहित[५८०] जी निवृत्ति अधिष्ठानज्ञानानें होते तिला कल्पित ह्मणतात.

रज्जूज्ञानें करून सर्पनिवृत्ति अथवा ब्रह्मज्ञानें करून जगन्निवृत्ति ही हिचीं उदाहरणें होत. त्या कल्पितनिवृत्तिकारण-अधिष्ठानज्ञानासाठी[५८१] शास्त्रचिंतन कर्तव्य आहे. तें सांगतों -

मूळ तक्ता क्र.२१
ओवी १७ पा.७१



४९१. तैलधारावदविच्छिन्नधारण - तेलाच्या धारेप्रमाणे अखंडप्रवाहाला धरून ठेवणे. ही 'अधिकारी जनांची शास्त्राचे ठिकाणी असणारी प्रवृत्ति' समजावी. कोठेही असलेली कोणाचीही 'सामान्य प्रवृत्ति' नव्हे.

४९२. तिचे वात्सायन भाष्याचे ठायी -

तिचे म्हणजे सामान्य प्रवृत्तीचे. गौतमाचे न्यायसूत्र २ पुढीलप्रमाणे आहे.

दुःखजन्मप्रवृत्तिदोष मिथ्याज्ञानानामुत्तरोत्तराऽपाये तदनन्तरापायादपवर्गः॥२॥

ह्यांत अपवर्गाकरता 'प्रवृत्तीचाही अपाय' सांगितला आहे.

ह्या सूत्रावरील वात्सायनांचे भाष्यांत 'अधर्माकरता' व धर्माकरता' दोन प्राकरची प्रवृत्ति सांगून अधर्मरूप प्रवृत्ति शारीरिक, मानसिक व वाचिक मिळून दहा प्रकारची सांगितली आहे. तशीच धार्मिक (शुभ) प्रवृत्तिही शारिरीक, मानसिक व वाचिक मिळून दहा प्रकारची सांगितली आहे.

पुढे सूत्र १७ मध्ये प्रवृत्तीचे लक्षण दिले आहे. ते सूत्र -

प्रवृत्तिर्वाग्बुद्धिशरीरारंभ इति ॥१७॥

ह्या सूत्रावरील वात्सायन भाष्यांत बुद्धीचा अर्थ मन असा करून सूत्र २ वरील भाष्यांत सांगितलेला जो पुण्य व पापरूप दहा प्रकारचा शरीर, वाचा व मन ह्यांचा आरंभ त्याला प्रवृत्ति म्हणावी असे म्हटले आहे. नंतर चतुर्थाध्याय आन्हिक १ सूत्र १ 'प्रवृत्तिर्यथोक्ता' ह्या सूत्रावरील भाष्याचे अवतरणांत धर्म व अधर्म. ह्यांना आश्रय असणाऱ्या शरीरादिकांची जी परीक्षा ती सर्व प्रवृत्तीचीच परीक्षा होय असे म्हटले आहे. सारांश न्यायसूत्रांना अनुसरून वात्सायनाचे भाष्याप्रमाणे शरीर, वाचा व मन ह्यांना जो धर्मरूप किंवा अधर्मरूप आरंभ त्याला प्रवृत्ति म्हणावी. हे सामान्य प्रवृत्तीचे लक्षण आहे.

४९३. वेदान्तन्याय प्रवृत्ति— वेदान्तांतील वाक्यांच्या अर्थाचा निश्चय करणारी जी ब्रह्मसूत्रावरील अधिकरणे त्यांना न्याय म्हणतात. ही अधिकरणे पांच प्रकारांनी प्रवृत्त होतात. म्हणून ही वाचिक प्रवृत्ति म्हणता येईल - व त्यालाच अनुसरून जी अधिकाऱ्याची प्रवृत्ति ती त्याची मानसिक प्रवृत्ति होय. अधिकरणांचे हे जे पांच प्रकार त्यांना अवयव म्हटले आहे. हें पंच अवयव वैय्यासिकी न्यायमालेत विषय, संदेह, संगति, पूर्वपक्ष आणि सिद्धांत ह्याप्रमाणे दिले आहेत. 'संगति' ग्रंथाला धरून असल्यामुळे येथे वगळून प्रयोजन हे पांचवे अवयव दिले आहे. प्रयोजनावाचून कोणाचीहि प्रवृत्ति होत नसल्यामुळे प्रयोजन हे प्रवृत्तीचे अवयव घेतले आहे.

४९४. अभिधेयसंबंधेकरून बोलिला जातो तो. ग्रंथातील 'अभिधेय' ह्या संबंधाने ज्याचे वर्णन केल्या जाते तो. म्हणजे ग्रंथांतील जो अभिधेय तो विषय. अभिधेय शब्दाचा अर्थ ह्याच ओवीत पुढे आला आहे. (टीप क्रमांक ५२२ पहा.)

४९५. पूर्वपक्ष सिद्धांत बीजरूप जी वृत्तिधारा - पूर्वपक्ष व सिद्धांत ह्या दोहींचे सूक्ष्मरूप ज्या वृत्तींत आहे अशी एकसारखी वृत्ति.

४९६. तद्विषयाचे ठायीं - वाक्याचा जो विषय त्याचे ठिकाणी.

४९७. भ्रांतिमूलकत्व आहे वा प्रमाण मूलकत्व आहे - हा विषय भ्रांतीने ग्रहण करून वाक्य ज्ञारले आहे किंवा प्रमाणाने ग्रहण करून वाक्य ज्ञारले आहे.

४९८. प्रमाणगत संशय - वाक्याच्या प्रामाण्या विषयी संशय

४९९. भावावच्छिन्न -

वस्तूचे ठायीं कोटिद्वय प्रवेश होतो तज्ज्ञान -

वस्तूचे ठिकाणी दोन प्रकार प्रविष्ट होतात त्या प्रकारांचे ज्ञान; हा दोन प्रकारचा प्रवेश - भ्रमावच्छेदकत्वेकरून. होतो म्हणजे त्या प्रवेशाचा (अवच्छेदक)

७४

मर्यादाकरणारा भ्रम असतो. तो प्रवेश भ्रमाने मर्यादित असतो- भ्रमाने होतो असा अर्थ आणि त्या प्रवेशाचा त्या वस्तूशी भावावच्छिन्न भावनावच्छेदकता संबंध असतो. भाव म्हणजे अस्तित्व. त्या अस्तित्वाने मर्यादित अशी जी भावना त्या भावनेने तो कोटिद्वय प्रवेश त्या वस्तूचा अवच्छेदक होतो. म्हणजे त्या वस्तूला मर्यादित करतो. म्हणजे ते दोन प्रकार त्या वस्तूचे ठिकाणी भावरूपाने भासतात म्हणून दोन प्रकार व वस्तु ह्यांचा भावावच्छिन्न भावावावच्छेदकता हा संबंध असतो; ती वस्तु त्या दोन प्रकारची भ्रमाने भासते असा अर्थ (टिपक्रमांक ४१७,४१८,४१९, पहा) ओवी १५ खाली संशयरूप भ्रमांत जी आधाराधेयैक्य भावप्रतीति म्हणजे आधार व आधेय ह्यांच्या ऐक्य भावाची जी प्रतीति सांगितली त्या प्रतीतींत आधार व आधेय ह्यांचा जसा ऐक्य संबंध सांगितला तसाच येथे सद्वस्तूचे ठिकाणी दोन्ही कोटींचा भावावच्छिन्न भावनावच्छेदकता संबंध सांगितला .

ओवी १५ खाली संशयरूप भ्रमाचे जे लक्षण केले त्याहून येथे थोडा विशेष सांगितला तो असा. संशयरूप भ्रमांत स्थाणूचे (खांब, खूंट) ठिकाणी ऐक्य भावाने पुरूष भासतो किंवा पुरूषाचे ठिकाणी ऐक्य भावाने स्थाणू भासतो असे पूर्वी म्हटले होते. येथे सद्रूप वस्तूचे ठिकाणी दोन्ही एकदम भावरूपाने भासतात असे म्हटले आहे.

पहिल्या म्हणण्याचा अर्थ असा कीं व्यावहारिक सत्य पुरूषाचे ठिकाणी त्याबरोबरच भ्रमाने स्थाणु भासतो किंवा व्यावहारिक स्थाणूचे ठिकाणी त्याबरोबरच भ्रमाने पुरूष भासतो. दुसऱ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं सद्रूप ब्रह्माचे ठिकाणी एकदम भावरूपाने स्थाणु व पुरूष भासतात. पहिल्यात व्यावहारिक सत्तेचा अंगिकार केला असून दुसऱ्यांत पारमार्थिक ब्रह्मसत्तेवरच संशयरूप भ्रम होतो असे सुचविले आहे.

५००. अभावावच्छिन्न भावावच्छेदकता संबंधेकरून - अभावाने मर्यादित असा जो भाव त्याने कोटिप्रवेश वस्तूचा अवच्छेदक होतो म्हणून तशा त्या अवच्छेदकता संबंधाने; स्थाणु नसून पुरुष आहे, पुरुष नसून स्थाणु आहे असे जे प्रकार ते अभावाने मर्यादित होऊन वस्तूचे ठिकाणी प्रविष्ट होतात. म्हणून त्या प्रकारांचा व वस्तूंचा तशा अवच्छेदकतेने संबंध सांगितला.

(टीप क्रमांक ४१७,४१८,४१९ पहा.)

५०१. वस्तुकोटिप्रविष्ट ज्ञान - वस्तु जी ब्रह्मसत्ता तिचे ठिकाणी कोटीनी - प्रकारांनी प्रविष्ट झालेले जें ज्ञान; वस्तूचे ठिकाणी भ्रमाने प्रविष्ट झालेले जे प्रकार

त्यांचे ज्ञान असा अर्थ.

५०२. प्रमेयगत संशय - प्रमाणाने भासणारे जे प्रमेय त्याविषयी संशय.

५०३. विषय सहकारी पदार्थाच्या मुखत्वानिश्चयास - ग्रंथांतील प्रतिपाद्य जो विषय त्या विषयाला सहकारी म्हणजे उपयोगी असणारे जे पदार्थ त्या पदार्थांच्या मुख्यत्वाच्या अनिश्चयास म्हणजे ते पदार्थ मुख्य नाहीत अशा निश्चयास.

५०४. श्रुत्यैकदेश - श्रुतीचा एक भाग.

५०५. श्रुतिसमन्वय निराकरणीय - निरनिराळ्या श्रुतींच्या एक वाक्यतेने निराकरण होणारा.

५०६. युक्तिमात्र निराकरणीय - केवळ युक्तीने म्हणजे विचाराने निराकरण होणारा.

५०७. पूर्वपक्षखंडनपूर्वक सम्यग्विषय निर्धारण कथनास - पूर्व पक्षाचे खंडन करून चांगल्यारीतीने विषयाचा निर्धार होईल अशा निरूपणास.

५०८. न्यूनानिष्टापत्ति - पूर्वपक्षाला अनिष्टापादान करणारी म्हणजे हानिकारक अशी थोडी वाक्ये.

५०९. प्रथमतृतीय मध्यग - द्वितीय.

५१०. उत्तरपक्षफलाला - उत्तरपवक्षाचे जे फल त्याला

५११. पदार्थ प्रकार साधार निर्धार करून - ग्रंथातील विषय सहकारी जे पदार्थ त्यांच्या प्रकारांचा आधारासह निर्धार करून.

५१२. अविच्छिन्न सहचाराव्यभिचारपूर्वक कथनास - त्या पदार्थांच्या प्रकारांचे अव्यभिचारपूर्वक (व्यभिचार न येता) अखंड सहचार सांगणे त्यास - येथे अनुबंध चतुष्टयाला भेद म्हटले आहे. - हे अनुबंध चतुष्टय म्हणजे विषय सहकारी पदार्थांचे प्रकार होत म्हणून हे जे प्रकार त्यांच्या आधारांचा निर्धार करून त्यांत व्यभिचार न येऊ देता म्हणजे निरपवाद अखंड एकमेकांचा सहचार दाखवून सांगणे त्यास भेद म्हणावे असे येथे त्या भेदाचे लक्षण केले आहे.

५१३. अनुबंधचतुष्टय - प्रयोजन, अभिधेय, संबंध आणि अधिकारी हे भेद मिळून अनुबंध चतुष्टय होते.

५१४. मनुष्य प्रवृत्ति- मनुष्याची प्रवृत्ति.

५१५. अन्येच्छानधीनेच्छा विषयत्व - अन्येच्छा म्हणजे दुसरी इच्छा तिच्या अनधीन म्हणजे आधीन नसणारी जी इच्छा त्या इच्छेचा विषय असणे.
सुखाची इच्छा ही अशाच इच्छेचा विषय आहे,
असे उदाहरणांत स्पष्ट केले आहे.

७५

५१६. मुख्य प्रयोजनेच्छाधीनेच्छाविषयत्व - मुख्य प्रयोजन जें सुख त्याची जी इच्छा त्या इच्छेच्या आधीन असणारी जी दुसरी इच्छा त्या इच्छेचा विषय असणे भोजनादि जे विषय त्यांची इच्छा सुखाच्या इच्छेकरता असते असा अर्थ.

५१७. द्विविध प्रयोजन प्राप्तिकाम - दोन्ही प्रयोजनाच्या प्राप्तीची इच्छा करणारा.

५१८. धनवान कुशल मी द्विज आहे - धनवान, कुशल आणि 'मी द्विज आहे' असे वाचावे.

५१९. साधन चतुष्टयसंपन्न - साधन चतुष्टयांनी युक्त 'साधन चतुष्टय' ओवी ७ खाली पहावे.

५२०. बंधन सापेक्ष - बंधनाच्या अपेक्षेने. जेथे खरोखर बंधनच नाही तेथे मुक्तीचीही जरूर नाही. परमेश्वराची सेवा करीत राहणे हेच योग्य आहे. अशी बुद्धि धारण करणारा.

५२१. द्वितीय चतुर्थमध्यगामी - तृतीय.

५२२. पूर्वाज्ञाननिवर्तक पदार्थतत्त्वज्ञानोपयोगी निरूपणास - पूर्वीच्या अज्ञानाची निवृत्ति करणारे आणि पदार्थाच्या तत्त्वज्ञानाला उपयोगी असे जें निरूपण त्यास.

५२३. अव्यभिचारी - निरपवाद - अपवादरहित.

५२४. निश्चयज्ञानगोचर - निश्चयरूप जे ज्ञान त्याला गोचर; निश्चित ज्ञानाचा विषय.

५२५. तंत्राधिकरणाभ्युपगमार्थसंस्थिति - (एक सामासिक शब्द)
सर्वतंत्र, प्रतितंत्र, अधिकरण आणि अभ्युपगम ह्यांनी प्राप्त होणारा जो अर्थ त्याची संस्थिति असणे. पुढे दिलेले सर्वतंत्र वगैरे जे चारभेद त्यापैकी कोणताही.

५२६. सिद्धांत पर्याय - सिद्धांत ह्या अर्थाचा दुसरा शब्द.

५२७. अविरोधाने असणारा - ज्याचेशीं कोणत्याच शास्त्राचा विरोध नाही असा.

५२८. अधिकरण सिद्धांत - जो सिद्धांत दुसऱ्या सिद्धांतांना अधिकरण आहे म्हणजे ज्या सिद्धांतावर दुसरे सिद्धांत अवलंबून आहेत तो . 'मी आहे' ह्या सिद्धांतावर 'मी गंध धेतला' 'मी बोललो' हे सिद्धांत अवलंबून आहेत म्हणून 'मी आहे' हा अधिकरण सिद्धांत. (त्या अर्थाचा तोच अर्थ - 'मी गंध घेतला' 'मी बोललो' इत्यादि अर्थ जरी 'मी आहे' ह्या अर्थावर अवलंबून असले तरी 'मी आहे' हा अर्थ 'मी आहे' या अर्थावरच अवलंबून आहे.)

५२९. विषयग्राही - विषय ग्रहण करणारे.

५३०. तदिंद्रियत्व - त्याचे इंद्रियत्व, 'ते इंद्रिय आहे' असे.

५३१. षड्लिंगवाक्य निर्णयास - षड्लिंगांनी सिद्ध असा जो वाक्याचा निर्णय

त्यास.

५३२. अपूर्वता फल - कित्येक ग्रंथकार 'अपूर्वता' आणि 'फल' असे दोन भिन्न मानतात. आणि 'उपक्रम' व 'उपसंहार' हे दोन्ही एक मानतात. व प्रकरणाचा आरंभ आणि समाप्ति ह्यांची एकरूपता असणे असा त्याचा अर्थ करतात.

५३३. गुंतलेल्या दोन पदार्थास - (किंवा) दोन पदार्थांच्या गुंतण्यास.

५३४. प्राप्य प्रापक भाव संबंध - प्राप्य - प्राप्त होणारा (मोक्ष) आणि प्रापक - प्राप्त करून घेणारा (अधिकारी) ह्यांचा भाव - असणे हा संबंध. तसेच जन्य - (ज्ञान) आणि जनक - (ग्रंथ) ह्यांचा भाव असणे हा संबंध - जन्यजनकभाव संबंध समजावा.

५३५. अन्याधिष्ठानस्थ भ्रमभान कथनास - दुसऱ्या अधिष्ठानाचे ठिकाणी होणाऱ्या भ्रमाचे जे भान आणि (टीपा.पा.९०) कथन त्यास; दुसऱ्या अधिष्ठानावर भ्रम भासतो. आणि कसा भासतो हे सांगणे.

५३६. आच्छादित - दिसेनासी

५३७. रजताचा आपल्या अवयवांत ध्वंस होतो- रजताचा ध्वंस (नाश) होऊन त्याचे अवयव राहतात.

५३८. रज्जू सर्प - रज्जू (दोरी) वर भासणारा सर्प.

५३९. शून्य - अत्यंत असत् - नाहीच - खोटा (टीप क्रमांक ५४५ पहा.)

५४० रज्जूसर्पभ्रम - रज्जूवर भासणाऱ्या सर्पाचा भ्रम

५४१. रज्जूचे ठायीं सर्पत्व समवायमात्र असत् आहे - रज्जूचे ठिकाणी भासणारे जे सर्पत्व त्या सर्पत्वाचा जो रज्जूशी समवाय संबंध तो मात्र असत्- खोटा आहे म्हणजे नाही.

(समवाय संबंधाचा अर्थ टीप क्रमांक १८२ मध्ये पहावा.) व्यक्तीचे ठिकाणी जातीचा जो संबंध त्यालाही नैय्यायिक समवाय संबंध म्हणतात. येथे रज्जू जी व्यक्ति तिचे ठिकाणी सर्पत्व जी जाति तिचा जो समवायाने रज्जूच्या जातीत्वाने संबंध तो असत् आहे असा अर्थ (टीप क्रमांक ५४५ पहा) (कारणाचे ठायी कार्य होण्याचा जो संबंध तो समवाय संबंध असे प्रस्तुत 'दीपिकेत' म्हटले आहे. (टीप क्रमांक १८२ पहा) रज्जू व सर्प ह्यांचा रज्जू कारण व सर्प , कार्य असा कार्यकारण भाव अत्यंत असत् - खोटा आहे, असाही अर्थ घेता येईल.)

५४२ बुद्धितच - भ्रम होणाऱ्याच्या बुद्धितच.

५४३. अन्यस्थळी अन्य वस्तूचे भान - बीळ आदिक स्थळाहून जे अन्य स्थळ - रज्जू - त्या ठिकाणी, रज्जूहून अन्य जो सर्प त्या वस्तूचे म्हणजे सर्पाचे भान; (रज्जूचे

७६

ठिकाणी सर्पाचे भान) हे प्राचीन न्यायमताप्रमाणे लक्षण.(टीपा.पा.९१)

५४४. अन्यरूपेकरून अन्य वस्तूचे भान - रज्जूच्या रूपाहून अन्य रूपाने म्हणजे सर्पाचे रूपाने. सर्पाहून अन्य जी रज्जू तिचे भान; (सर्पाचे रूपाने रज्जूचे भान) ही चिंतामणी मता प्रमाणे अन्यथा ख्याति.

५४५. प्रतीत होते म्हणून - रज्जू वगैरे ठिकाणी भासणारे सर्प वगैरे अत्यंत असत् असते तर प्रतीतीच झाली नसती म्हणून. ('असत्' शब्दाचे अर्थ दोन होतात. (१) कधीच नसणे. (२) बाध होणारे. 'कधीच नसणे' ह्या अर्थात 'असत्' शब्द घेता येत नाही कारण प्रतिती होते. 'पुढे बाध होतो. म्हणून असत्' असे म्हणावे तर इष्टापत्ति आहे. 'अनिर्वचनीय' ख्यातीतहि असेच म्हणणे आहे.)

५४६. असंगत - चुकीची

५४७. रज्जूसर्पही दीप आणीपर्यंत स्थिर राहू शकतो म्हणून - रज्जूवर भासणारा सर्पहि दिवा आणीपर्यंत तसाच भासत राहतो म्हणून तो सर्प क्षणिक विज्ञानाने भासणारा नाही.

५४८. चिंतामणि मंतव्यान्यथा ख्याति - चिंतामणीच्या मता प्रमाणे जी अन्यथाख्याति तीही.

५४९. ज्ञेयानुसार - ज्ञेयाला अनुसरून; ज्ञेयाप्रमाणे.

५५०. इदंत्वेकरून - नुसते 'हे' असे.

५५१. एकसमयावच्छेदेकरून - एकाच वेळेस.

५५२. बाकीच्या चार ख्यातीचे - असत् ख्याति, आत्मख्याति व अन्यथा ख्याति ह्या सत् ख्यातीहून बाकीच्या चार ख्यातीचे खंडन आणि प्रतिपादन विवरण व 'सुरेश्वराचार्यकृत स्वाराज्यसिद्धि' ह्या ग्रंथात केले आहे.

५५३. आवरण भंग - आवरण (अज्ञानरूप पडदा) त्याचा भंग (नाहीसा करणे)

५५४. तिमिरादि दोषामुळे - अंधार वगैरेमुळे.

५५५. आवरण भंग करीत नाही - रज्जूचे अज्ञान नष्ट करीत नाही; अंतःकरणाची वृत्ति रज्जूचे आकाराची होत नाही. (टीपा.पा.९२)

५५६. तदा - तेव्हां.

५५७. रज्जूपहित चैतन्यस्थ अविद्या - ज्याला रज्जू ही उपाधि आहे अशा चैतन्याचे ठिकाणी असलेली अविद्या; रज्जूचे उपाधीने असणाऱ्या चैतन्याचे ठिकाणी असलेली जी अविद्या त्या रज्जूचा आकार घेते ती.

५५८. क्षुब्ध होऊन - तिमिरादि दोषामुळे क्षुब्ध होऊन.

५५९. उपाधित्वेकरून जो पूर्वधृत स्वाकार जो रज्जूसंज्ञक - चैतन्याची उपाधि

असणारा व अविद्येने पूर्वीच धारण केलेला जो रज्जूनावाचा स्वतः - अविद्येचा - आकार.

५६०. त्याते दीर्घत्वादिसदृश - त्या रज्जूला दीर्घत्वादिकाने सारखी.

५६१. नियति - निश्चित, नियमित.

५६२. सर्पाकारेण उत्पन्न करते अथवा सर्पाकारा होते - सर्पाच्या आकाराने उत्पन्न होते अथवा स्वतः सर्पाचा आकार धारण करते; पहिल्या पक्षांत सर्पाचा आकार होण्यास निमित्त अविद्या आहे असे सांगितले व दुसऱ्या पक्षांत त्या सर्पाच्या आकाराला उपादान कारणहि ती अविद्याच आहे असे सांगून मागाहून हा पक्ष दिल्यामुळे तोच इष्ट आहे असे सुचविले.

५६३. रज्जू ज्ञानेकरून - रज्जूच्या ज्ञानाने.

५६४. सदसद् विलक्षण - सत् व असत् ह्या दोहोहूनहि निराळा.,

५६५. अनिर्वचनीय - निर्वचन करण्यासारखा - कसा झाला हे सांगता येण्यासारखा - नसलेला.

५६६. विकारधारा नैमित्तिक - विकारांच्या प्रवाहाच्या निमित्ताने होणारी.

५६७. यथा शुक्तौ रूप्याची— जशी शिंपेवर रूप्याची (चांदीची) (टीपा.पा.९३)

५६८. तद्दर्शन लोभादिकांची - त्या शिंपेच्या दर्शनाने उत्पन्न होणाऱ्या लोभादिकांची.

५६९. समीचीन - योग्य.

५७०. लय चिंतनार्थ - वेदांत सांगितलेल्या उत्पत्तीच्या क्रमाचे उलट क्रमाने - जसे पृथ्वीचा आपांत, आपाचा तेजांत, तेजाचा वायूंत, वायूचा आकाशांत ह्या प्रमाणे - पुढल्या पुढल्या पदार्थाचा त्या पदार्थाच्या मागल्या मागल्या कारणांत लय करून शेवटी त्या सर्वांचा ब्रह्मांत लय करून ब्रह्मचिंतन करता यावे ह्या करता वेदान्त शास्त्रांत त्या उत्पत्तीच्या उपदेशाचे ग्रहण केले आहे.

५७१. उत्पत्ति चिंतनार्थ - ह्या क्रमाप्रमाणे उत्पत्ति झाली असे चिंतन करण्याकरिता.

५७२. कारण जगदनादित्वाचे वेदान्ती अभ्युपगन्ते आहेत म्हणून - वेदान्त्यांना जगताची उत्पत्ती मान्य नाही ह्याचे कारण त्यांनी जगत् अनादि आहे ह्या पक्षाचा स्विकार केला आहे म्हणून - हे जगताचे अनादित्व देखील वेदान्ताचा मुख्य सिद्धान्त नव्हे. अद्वितीय ब्रह्माचे ठिकाणी जगतच झाले नाही असा त्यांचा मुख्य सिद्धांत आहे. हा जगताचे अनादित्वाचा सिद्धांत वेदान्त्यांनी आपल्या शास्त्रांत सांख्य शास्त्रांतून घेतला आहे व तोही अभ्युपगम करून घेतला आहे - म्हणजे आपल्या सिद्धांताला बाध येणार नाही अशी विशेष परीक्षा करून ग्रहण केला आहे - त्यांचे म्हणणे असे आहे कीं अद्वितीय ब्रह्माचे ठिकाणी ज्यांना जगताचे भान होत

असेल त्यांना ते भान भ्रमाने होते म्हणून ज्यांना तो भ्रम असेल त्यांचा तो भ्रम व त्याचे कार्य जगत् हे दोन्ही अनादि असून त्यांची ब्रह्मज्ञानाने निवृत्ति होते. (ह्याच ओवीत वर अभ्युपगम सिद्धांताचे लक्षण दिले आहे.) (टीपा.पा.९४)

५७३. सकारण जगन्निवृत्ती - जगताचे कारण जी अविद्या तिच्यासह जगताची निवृत्ति.

५७४. हें विचार सागरावरून कळते. - ज्याची निवृत्ति झाली असता पुन्हा उत्पत्ति झाली नाही तर त्याची अत्यंत निवृत्ति म्हणतात. दुःखाचे सर्व साधनांचा नाश झाला तरच सर्व दुःखाची निवृत्ती नियमाने होईल व पुन्हा दुःख होणार नाही. सकळ दुःखाचे कारण ब्रह्माहून भिन्न असे जे अज्ञान तें व त्या अज्ञानाचे कार्य जो प्रपंच तें आहे. म्हणून सकारण जगन्निवृत्ति अपेक्षित आहे असे ''विचार सागरात'' म्हटले आहे.

(पं. निश्चलदासकृत हिंदी ग्रंथ 'विचारसागर' द्वितीय तरंग ६१-६३)

५७५. सा निवृत्ति - ती निवृत्ति.

५७६. कार्य प्रध्वंस - कार्याचा नाश.

५७७. तृतीय पूर्वा - द्वितीया.

